गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय

# तुकारामबावांचे चरित्र

## कृष्णराव अर्जुन केळूसकर



संपादक

**राजन गवस**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

संत तुकाराम महाराज यांचे मराठीतील पहिले चरित्र

# संत तुकाराम

अर्थात्

तुकारामबावांचे चरित्र


**कृष्णराव अर्जुन केळूसकर**

संपादक - राजन गवस

प्रस्तावना - रणधीर शिंदे



**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई**

वाय ६५४-१

⏩ **पुस्तकाचे नाव :** गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांचे समग्र वाङ्मय
तुकारामबावांचे चरित्र

⏩ **लेखक :** कृष्णराव अर्जुन केळूसकर

⏩ **संपादक :** डॉ. राजन गवस

⏩ **पुनर्मुद्रण :** २०१९

⏩ **प्रकाशक :**

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला,
पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५.

⏩ © **प्रकाशकाधीन :**

⏩ **मुखपृष्ठ :** सरदार जाधव

⏩ **मुद्रक :**

व्यवस्थापक,
शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
ताराबाई पार्क, कोल्हापूर ४१६ ००३.

⏩ **किंमत : १३८/-**

---

या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वत: लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.

महाराष्ट्राचे वाङ्मयमहर्षी




गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर

# अध्यक्षांचे मनोगत

## वाङ्मयमहर्षी कृ. अ. केळूसकरांचे पहिले तुकाराम चरित्र

महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्यासंबंधी लेखन-साहित्य वाचताना गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर यांची अधिक ओळख होत गेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गौतम बुद्धाची ओळख करून देणारे ते होते; एवढाच त्यांचा पूर्व परिचय होता. गुरुवर्य केळूसकरांचे 'आत्मचरित्र व चरित्र' हे डॉ. धनंजय कीर यांनी संपादित पुस्तक वाचल्यानंतर महाराष्ट्राच्या या वाङ्मयमहर्षीची चांगली ओळख झाली. ते मराठीतील मोठे विचारवंत, विख्यात चरित्रकार, विवेकवादी वक्ते, इतिहासकार, सामाजिक नेते आणि कामगारांचे कैवारी होते, हे लक्षात आले. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे व राजकीय ऋषी मामा परमानंदांनी त्यांच्या लेखणीची व विचारांची त्या काळात प्रशंसा केली होती.

महाराजा सयाजीराव यांनी गुरुवर्य केळूसकरातील लेखनगुण ओळखून ग्रंथप्रकाशनास प्रथम मदत केली. त्या काळात बडोद्यातून ग्रंथलेखकास आणि प्रकाशनास प्रोत्साहन मिळू लागले होते. दिवाण रामचंद्र धामणसकर यांनी महाराजा सयाजीराव यांच्याकडे कृ. अ. केळूसकरांची शिफारस केली. जगप्रसिद्ध बारा इंग्रजी ग्रंथांचे मराठीत भाषांतर करण्याची योजना सयाजीरावांनी आखली होती. महाराजांनी मुंबईत केळूसकरांना भेटीला बोलावून त्यांची खडसून परीक्षा घेतली. त्यांची हुशारी बघून इंग्रजी ग्रंथांचे मराठी भाषांतर करण्याचे काम केळूसकरांकडे सोपविले. बडोद्यातील बारा राष्ट्रकथामालेतील हे पुस्तक 'फ्रान्सचा जुना इतिहास' या नावाने १८८३ साली बडोदा सरकारने प्रकाशित केले. हा कृ. अ. केळूसकरांचा प्रकाशित पहिला ग्रंथ. पुढे त्यांनी पस्तीस चरित्रे लिहिली. गौतमबुद्ध, संत तुकाराम आणि छत्रपती शिवाजी या युगपुरुषांचे ते मराठीतील पहिले महान चरित्रकार आहेत. ते गीता व बौद्धधर्माचे मोठे भाष्यकार होते. लोकमान्य टिळकांनी गीतारहस्य ग्रंथ लिहिण्याअगोदर गुरुवर्य केळूसकरांनी गीतेवर ९५० पृष्ठांचा टीकाग्रंथ

लिहिला; बावीस वर्षे तो ग्रंथ प्रकाशकाविना पडून राहिला, अशी खंत केळूसकरांनी आत्मकथेत व्यक्त केली. श्रीमद्‌भगवद्‌गीता हा बृहत ग्रंथ १९०२ साली प्रकाशित झाला. धर्मशास्त्र, अर्थशास्त्र, शिक्षणशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, कोशवाङ्मय या गहन विषयांवर अनेक ग्रंथ लिहिणारे ते प्रकांड पंडित होते.

संत तुकाराम महाराजांवर पहिला विस्तृत चरित्रग्रंथ गुरुवर्य केळूसकरांनी १२० वर्षांपूर्वी लिहिला. तुकारामबावांचे चरित्र या नावाने तो प्रकाशित झाला. दाते ग्रंथसूचीवरून आणि केळूसकरांच्या आत्मचरित्रावरून वरील माहिती समोर आली. केळूसकरांनी तुकाराम चरित्र लिहायला घेतले त्यावेळी ते गीतेवरील टीका लिहीत होते. त्या काळात कवी महीपतीने लिहिलेले संत तुकारामांचे ओविबद्ध चरित्र आणि एका युरोपियन गृहस्थाचा इंग्रजी लेख उपलब्ध होता. या दोन संदर्भाशिवाय संत तुकाराम यांच्यासंबंधी इतर साहित्य उपलब्ध नव्हते. लक्ष्मण पांडुरंग नागवेकर यांच्या 'आध्यात्मिक ज्ञानरत्नावली'च्या मासिकात तुकारामबावांचे चरित्र १० पाने आणि गीतेवरील टीका ४० पाने प्रत्येक महिन्याला केळूसकर लिहू लागले. तुकारामबावांच्या अभंगाची गाथा तुकाराम तात्या पडवळांनी प्रकाशित केली होती. त्या अभंगगाथेच्या आधारे गुरुवर्यांचे तुकारामबावांचे चरित्र नागवेकरांच्या अंकात प्रकाशित होत गेले. लक्ष्मणराव नागवेकरांनी १८९६ साली पुस्तकरूपाने तुकारामबावांचे चरित्र प्रकाशित केले. २०८ पृष्ठांच्या या ग्रंथांच्या पहिल्या आवृत्तीची किंमत ठेवली होती सव्वा रुपया. या ग्रंथाबद्दल त्याकाळात सर्वांत चांगला अभिप्राय न्यायमूर्ती रानडे यांचा आला आणि दक्षिणा प्राइज कमेटीने या चरित्रग्रंथास पहिले बक्षीस दिले.

१८९६ साली प्रकाशित तुकारामबावांचे चरित्र ग्रंथ मधल्या काळात प्रकाशित केला काय, याचा आम्ही शोध घेतला. संत साहित्याचे अभ्यासक असलेल्या काही मित्रांकडे चौकशी केली. मराठी संत परंपरेत तुकाराम महाराजांचे अभंग अक्षरलेणी आहेत. असा हा चरित्र ग्रंथ सव्वाशे वर्षात कोणीही पुन्हा प्रकाशित केला नाही, हे समोर आले. संत तुकाराम आणि वारकरी परंपरेच्या अभ्यासकांना, विचारवंतांना आणि दुर्मिळ मराठी पुस्तक प्रकाशनात काम केलेल्या मान्यवर प्रकाशकांनाही हे पहिले महत्त्वाचे तुकाराम चरित्र पुन्हा प्रकाशित करावे, असे वाटले नाही. संत साहित्याचे एक दोन अभ्यासक मित्र म्हणाले, आम्ही तो ग्रंथ

आमक्या ग्रंथालयात वाचला. आपण तिथे शोध घ्या. संत तुकाराम यांच्या बऱ्याच अभ्यासकांना या ग्रंथाचे नावही माहीत नव्हते.

केळूसकर गुरुजीलिखित संत तुकारामांच्या पहिल्या साधार चरित्र ग्रंथांचा मी पुणे, मुंबई, कोल्हापूर, बडोदा येथील ग्रंथालयात शोध घेतला. नाशिकच्या सावाना ग्रंथालयात ग्रंथ आढळला. ग्रंथालयाच्या पदाधिकारी आणि ग्रंथपालांनी झेरॉक्स प्रत उपलब्ध करून दिली; पण त्यात बरीच पाने नव्हती. लातूरचे आमचे मित्र डॉ. श्रीराम गुंदेकर यांच्याकडून निरोप आला. शाहू वाचनालय काकडवाडी ता. मिरज येथील बाबू रामचंद्र मुळे यांच्याकडून मिळालेली तुकाराम चरित्राची प्रत त्यांच्याकडे आहे. डॉ. गुंदेकरांनी तुकारामबावांचे चरित्र झेरॉक्स करून दिले. नाशिकचे सावाना आणि काकडवाडीच्या शाहू वाचनालयामुळे गुरुवर्य केळूसकरांचे मराठीतील पहिले तुकाराम महाराजांचे चरित्र हाती आले. ते साकेत प्रकाशनाने प्रकाशित केले. तुकाराम महाराजांचे चरित्र उपलब्ध करून देणाऱ्या या दोन्ही संस्था आणि आमचे लेखक मित्र डॉ. गुंदेकरांचे या निमित्ताने मनापासून आभार!

गुरुवर्य केळूसकर हे चौफेर लेखन केलेले प्रकांड पंडित होते; पण बहुजन समाजाच्या लेखकाच्या वाट्याला येणारी फरफट सव्वाशे वर्षं त्यांच्या या संत तुकाराम चरित्राच्या वाट्याला आली. महाराष्ट्राच्या या वाङ्मयमहर्षींची आम्ही शंभर वर्षे उपेक्षाच केली. अशा या गुरुवर्यांची ओळख महाराष्ट्राने आज पुन्हा करून घेण्याची गरज असल्याने मी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचा अध्यक्ष होताच कार्यकारी मंडळाच्या पहिल्या बैठकीत समग्र कृ.अ.केळूसकरांचे प्रकाशन शासनाने करावे असा निर्णय घेतला. या संपादनाचे काम आमचे मित्र श्री. राजन गवस यांच्याकडे सोपविले. त्यांनी ही महत्त्वाची जबाबदारी पार पाडून महाराष्ट्राच्या या वाङ्मयमहर्षींची नव्याने ओळख करून दिली आहे, याचा मला खूप आनंद आहे.

दि. २८-५-२०१८ **बाबा भांड**

अध्यक्ष

म. रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ,

मुंबई

## संपादकीय...

गुरुवर्य केळूसकर यांनी लिहिलेल्या चरित्रांची दोन विभागात विभागणी करता येते. पहिल्या विभागात संत तुकाराम चरित्र, गौतम बुद्ध यांचे चरित्र आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र यांचा समावेश करावा लागतो. तर दुसऱ्या विभागात रावबहादूर एल्लापा बाळाराम, बडोदा संस्थानचे दिवाण रामचंद्र विठोबा धामणसकर, गुणाजीराव धोंडीराम घुले जे. पी. यांचे चरित्र, जनाबाई रोकडे यांचे चरित्र, माधवराव रोकडे यांचे चरित्र यांचा समावेश करावा लागतो. गुरुवर्य केळूसकरांना आपल्या अवती भवतीची जी माणसे कर्तृत्ववान व गुणवान दिसली त्यांची चरित्रे त्यांनी लिहिलेली आहेत. ही सर्व कर्तृत्ववान माणसे सामान्य परिस्थितीतून संकटाशी चिवट झुंज देत कर्तृत्ववान बनली आहेत. त्यांनी आपल्या स्वकर्तृत्वावर स्वतःचे उज्ज्वल वैभवशाली विश्व निर्माण केलेले दिसते. अशा उत्तम गुणवान माणसांची चरित्रे गुरुवर्य केळूसकरांनी परिश्रमपूर्वक लिहिलेली आहेत. या चरित्रांचा हेतू असा की, या सामान्य माणसांच्या असामान्य कर्तृत्वाचा आदर्श घेऊन सामान्य बहुजन समाजातील लोकांनी प्रेरणा घ्यावी व या लोकांच्या प्रमाणेच किर्ती संपादन करावी असे गुरुवर्य केळूसकरांना वाटत होते. हे सारे चरित्रनायक त्यांच्याच काळातील असल्यामुळे स्वाभाविकच माहितीच्या उपलब्धतेची त्यांना काही कमतरता नव्हती. आपल्या चरित्रनायकांचे चरित्र वास्तवाबरहुकूम असावे आणि ते सत्य कथन करणारे असावे, असा प्रत्यय गुरुवर्य केळूसकरांनी जाणीवपूर्वक केलेला आहे. केळूसकरांनी लिहिलेल्या या चरित्रनायकांचे चरित्र अन्य कोणी लिहील, अशी त्यावेळची परिस्थिती नव्हती. त्यामुळे एक सामाजिक उत्तरदायित्व म्हणून ही चरित्रे त्यांनी आत्मीय भावाने लिहिली आहेत. पण या चरित्रांत वास्तव अशी फारकत होणार नाही, याची पुरेपूर खबरदारी घेतलेली आहे. ही चरित्रे पृष्ठसंख्येने छोटी आहेत. पण काळाच्या परिप्रेक्ष्यात या चरित्रांचे महत्त्व अधिक आहे. सामान्य बहुजन समाजाला कार्यप्रवण करावयाचे असेल तर त्यांच्यात ऊर्जा निर्माण होईल, असे त्यांच्या नजीकच्या काळातील कर्तृत्ववान लोक त्यांच्यासमोर चरित्रातून ठेवले पाहिजेत, याचे भान गुरुवर्य केळूसकरांना अधिकच होते.

पहिल्या भागातील चरित्रे ही केळूसकरांच्या लेखकीय भूमिकेचे प्रत्यंतर घडविणारी आणि व्यासंगाचे दर्शन घडविणारी आहेत. संत तुकाराम, महात्मा गौतम बुद्ध आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची चरित्रे गुरुवर्य केळूसकरांनी लिहिण्यात त्यांची निवडदृष्टी व लेखकीय भूमिका आपल्यासमोर येते. केळूसकरांनी ही चरित्रे लिहिण्यापूर्वी या महामानवांचा शोध चरित्र रूपाने कोणीच कसा घेतला नाही, याबरोबरच केळूसकरांनी ही चरित्रे अग्रक्रमाने का लिहिली, या प्रश्नांचा धांडोळा घेणे क्रमप्राप्त ठरते.

२.

गुरुवर्य केळूसकरांनी संत तुकारामांचे चरित्र लिहिले, याबाबतची पार्श्वभूमी शोधताना आपल्याला गुरुवर्य केळूसकरांच्या बालपणाकडे जावे लागते. गुरुवर्य केळूसकरांच्या वडिलांची नोकरी सुटल्यानंतर त्यांनी आपल्या मुलास सावंतवाडीस शिक्षणासाठी ठेवले. गुरुवर्य केळूसकर जेथे राहत होते तेथे एक सधन शेणवी गृहस्थ राहत असत. त्यांच्या मुलाची आणि गुरुवर्य केळूसकरांची मैत्री जडल्यानंतर ते त्यांच्या घरी जात असत. याबाबत ते लिहितात, 'या शेणवी मित्राच्या घरी मी जात असे. त्यांच्या घरातील सगळ्या माणसांना मी आवडण्याचे कारण असे की, त्यांच्या घरी दररोज पोथ्या वाचण्याचा प्रघात असे. ह्या पोथ्या ऐकावयास जाऊन बसण्याचे मी मुळीच कधी चुकवित नसे. पोथ्यांचा चौरंग जागा झाडून ठेवण्याचे काम मी मोठ्या तत्परतेने करीत असे. ही माझी सेवा त्यांना फार आवडत असे. गुरुचरित्र वाचू लागले म्हणजे मला ते ऐकावयास बसू देत नसत. कारण ते शुद्रांच्या कानी पडू नये, अशी त्यांची भोळी समजूत होती. ह्या शेणव्याच्या घरी सणासुदीला गोडधोड केले म्हणजे मला ते मिळत असे. त्यांच्या बायका व मुले मला 'कृष्ण्या' म्हणत. कृष्ण्या हे कृष्णा यांचे अपभ्रष्ट रूप होय. हलक्या मानलेल्या माणसांचा जातीच्या नावाचा असा अपभ्रंश करण्याची वहिवाट वरच्या जातीच्या म्हणवणाऱ्या लोकांमध्ये आहे.' उपरोक्त परिच्छेदातील तपशील बारकाईने वाचल्यास गुरुवर्य केळूसकरांनी संत तुकारामांच्या चरित्र लेखनाकडे वळणे स्वाभाविक होते. गुरुवर्य केळूसकरांना हेडमास्तर कृष्णशास्त्री यांच्याकडून विवेकदृष्टी आणि आधुनिक मुल्यांचा संस्कार जसा प्राप्त झाला, तसेच कृष्णशास्त्रींचे काव्याचे अप्रतिम निरूपण त्यांच्या मनावर खोलवर परिणाम करीत गेले. गुरुवर्य केळूसकर व्हर्नाक्युलर शाळेत शिकत असता ते मुगभाटात राहत होते. तेथे त्यांच्या शेजारी एक वृद्ध सोनार राहत असे. तो सोनार डोळ्यांनी आंधळा असल्याकारणाने त्याला देवळात जाऊन पुराण ऐकण्याची अडचण होते. त्याने गुरुवर्य केळूसकरांना घेऊन दररोज संध्याकाळी ठाकूरद्वारच्या देवळात जाण्याचा परिपाठ

ठेवला. या देवळात दोन पुराणे वाचीत. एक संध्याकाळी साडेचार ते साडेसहा व दुसरे लगेच सुरू होऊन नऊ वाजेपर्यंत चाले. ही संस्कृत पुराणे सांगणारे दोन्ही पुराणिक अर्थ करून सांगत. ही पुराणे सांगत असलेला अर्थ गुरुवर्य केळूसकर लक्षपूर्वक ऐकत असत. त्यातला बोधही त्यांना चांगला अवगत होत होता. त्यामुळे त्या पुराणिकांसह देवळातील पुजारीही गुरुवर्य केळूसकरांना 'प्रती तुकाराम' म्हणत. याही गोष्टीचा संबंध गुरुवर्य केळूसकरांनी तुकाराम चरित्र लिहिण्याशी असल्याचे आपल्या ध्यानात येते.

३.

लक्ष्मणराव नागवेकरांच्या *अध्यात्मिकज्ञानरत्नावली* या नियतकालिकात केळूसकर गीता, वेदान्त, महाभारत आदी विषयावर लिहित असत. त्याचवेळी साधूचरित्रावरही लिहिण्याचे काम करीत असत. संत तुकाराम यांचे चरित्र गुरुवर्य केळूसकरांनी १८९३ पासून क्रमशः लिहिले व १८९६ साली ग्रंथ रूपाने प्रसिद्ध झाले. यासाठी त्यांच्याजवळ फारशी साधन सामग्री उपलब्ध नव्हती. महिपतीचे ओवीबद्ध पद्य चरित्र व एका युरोपियन गृहस्थाचा चरित्रलेख आणि सरकारच्या सांगण्यावरून तुकारामांच्या अभंगाचे केलेले एकत्रीकरण एवढीच सामग्री उपलब्ध होती. या तुटपुंज्या सामग्रीच्या आधारावर त्यांनी मराठीतील पहिले संत तुकाराम चरित्र सिद्ध केले. हे कार्य ते व्यासंगाच्या जोरावर व बहुश्रुततेच्या बळावर पूर्ण करू शकले. गुरुवर्य केळूसकरांनी हे चरित्र लिहित असताना प्रारंभी उपक्रम या शीर्षकाखाली पंढरपूर आणि महाराष्ट्रातील साधूजन या परंपरेतील संत तुकाराम यांचे स्थान कथन करून चरित्र लेखनास सुरुवात केली आहे. प्रारंभी देहू गावातील मराठे जातीचे मोरे घराणे व त्यांचा कुलवृत्तांत दिलेला आहे. विठ्ठलांचे भजन पूजन या घराण्यात पूर्वंपार चालत असल्याचे नोंदवून त्रोटक बालपण लिहिण्याचा प्रयत्न गुरुवर्य केळूसकरांनी केलेला आहे. बालपणाविषयी विस्तृत लिहीण्यास माहितीची कमतरता भासली असावी असे दिसते. नंतर 'संसारप्रवेश' या प्रकरणात सविस्तर चरित्राला सुरुवात केली आहे. एकूण १६ प्रकरणात हे चरित्र विभागले असून महात्म्याचे चरित्र लोकांना समजून सांगावे असा दृष्टिकोण त्यात स्वीकारलेला आहे. 'संसारप्रवेश' या प्रकरणात मातापित्याचे निधन, वडीलबंधूचा अंत अशी कोसळलेली संकटे आणि फसवणूक, कर्ज आणि तुकारामांचे दिवाळे निघण्याचा वृत्तांत गुरूवर्य केळूसकर कथन करतात. या काळातील जनजीवन, तुकारामांचा परोपकारी स्वभाव, या काळात पडलेला भीषण दुष्काळ याचे वर्णन करून पत्नी व मुलगा संतोबा यांचा दुःखद अंत, बंधुपत्नी मरण पावल्यानंतर बंधूचे

परागंदा होणे, यातून मनाची झालेली उद्विग्न स्थिती आणि तुकारामाचे विरक्तीकडे ओढले जाणे गुरुवर्य केळूसकर तपशीलाने चित्रित करतात. या उद्विग्न परिस्थितीत भांबनाथ डोंगरावर जाऊन तुकारामाने केलेले चिंतन आणि त्यांची भावस्थिती अभंगाच्या आधारे गुरुवर्य केळूसकरांनी रेखाटली आहे. 'वैराग्यवृत्ती' या प्रकरणात तुकारामांचा देवळातील मुक्काम आणि जनसेवेचा परिपाठ नोंदवून अखंड नामसंकिर्तनात रमलेल्या तुकारामाला काव्यस्फूर्तीचा साक्षात्कार कसा झाला, याचे निवेदन करतात. विठोबासमवेत नामदेवाचा स्वप्नदृष्टांत होऊन शतकोटीचा अभंगध्यास लागलेला तुकाराम कीर्तनकार म्हणून परिसरात प्रसिद्ध पावला. त्यामुळे त्यांच्याविषयीचा मत्सर आपोआपच काही लोकांच्या मनात निर्माण होऊ लागला. छळ या प्रकरणात हा वृत्तांत शब्दबद्ध झाला आहे. तुकारामांच्या कीर्तनास जवळपासच्या गावातून लोंढेच्या लोंढे येऊ लागले आणि मंबाजी व इतर ब्राम्हणांना तुकारामाची ही लोकप्रियता असह्य होवू लागली. त्यांनी तुकारामाचा अनेक युक्त्याप्रयुक्त्यांनी छळ सुरू केला. त्याच्या अभंगाच्या वह्या इंद्रायणीत बुडवल्या. याचा तपशीलवार उल्लेख गुरुवर्य केळूसकरांनी केला आहे. त्यानंतर तुकारामाची निर्माण झालेली शिष्यपरंपरा आणि त्यांच्या हकिकती सविस्तरपणे नोंदवल्या आहेत. तुकाराम, शिवाजी आणि रामदास या प्रकरणात गुरुवर्य केळूसकरांनी अत्यंत नेमकेपणाने याबाबतची सविस्तर हकिकत कथन केली आहे. त्या काळात असणारा ब्राम्हण आणि बहुजन संघर्ष आपल्यापरीने मांडण्याचा प्रयत्न गुरुवर्य केळूसकर करतात. हे करत असताना स्वतःची वेगळी दृष्टी आणि वेगळे आकलन ते वाचकांसमोर ठेवतात. अंतकाळ या प्रकरणात तुकारामाच्या मनःस्थितीचे आणि तुकारामास लागलेल्या मृत्यूच्या ओढीचे वर्णन गुरूवर्य केळूसकरांनी अत्यंत सामर्थ्यपूर्ण शैलीत केले आहे. *आपल्या माहेरी जाईन मी आता। माहेरचा मज आलासे मुराळी। उद्या प्रातःकाळी जाणे मज।।* या अभंगाच्या आधारे केळूसकरांनी केलेले वर्णन मुळातून वाचले पाहिजे.

४.

हे तुकारामचरित्र लिहीत असताना केळूसकरांनी रूढ, पारंपरिक पद्धतीला फाटा दिलेला आहे. कोणत्याही संतांच्या चमत्कारकथा त्याचे भक्तगण रंगवून नोंदवत असतात. यामुळे चरित्रनायकाचे वलय विस्तारित करणे हा त्या पाठीमागचा हेतू असतो. परंतु, गुरुवर्य केळूसकरांची भिस्त सत्याधिष्ठित इतिहास कथनावर असल्यामुळे तुकारामांच्या चरित्रातील चमत्कार कथांची साधार चिकित्सा करण्याचा प्रयत्न करतात. अनेक अद्‌भूत कथांना बाजूस सारतात. स्वत: गुरूवर्य केळूसकर आधुनिकतावादी व विचारशील विवेकावर विश्वास ठेवत असल्यामुळे ते तुकारामाच्या बाबतीत विश्वसनीय

गोष्टीच सांगितल्या पाहिजेत असे स्वतःवरच बंधन घालून घेतात. ग्रंथाच्या शेवटी तुकारामाच्या व्यक्तिमत्त्वाची केलेली विस्तारपूर्वक चर्चा याची साक्ष देणारी आहे. तुकारामाला माणूस म्हणून समजून घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यामुळेच तुकारामाने जलसमाधी घेतली असावी अशा निष्कर्षापर्यंत गुरुवर्य केळूसकर येऊन पोहोचतात. तुकारामाने स्वतः आपल्या अभंगात चमत्कार किंवा माहिमा वर्धित करणाऱ्या कथा नोंदवलेल्या नाहीत. उलट अंधश्रद्धेचा चमत्काराचा, भोंदू साधूंचा त्यांनी खरपूस समाचारच घेतला आहे. अशा माणसाचे चरित्र लिहित असताना कल्पित दंतकथांना थारा मिळू नये याची खबरदारी गुरुवर्य केळूसकरांनी सतत घेतलेली आहे. विठ्ठलाचा तुकारामाशी होणारा संवाद याकडेही ते वास्तव दृष्टिकोनातून पाहतात. यामुळे तुकारामाच्या प्रत्यक्ष अभंगातून दिसणारे तुकाराम गुरुवर्य केळूसकरांना महत्त्वाचे वाटतात.

तुकारामाचे मोठेपण चित्रित करत असताना गुरुवर्य केळूसकर त्यांच्या सुबोध शैलीचा गौरव करतात. तुकारामांनी अत्यंत साध्या सोप्या शब्दात भक्तीमार्ग अबालवृद्धांना समजून सांगितला. ही कला फक्त तुकारामांनाच साधली गेली होती. याचा उल्लेख करून तुकारामाच्या अभंगाचे वेगळेपण उदाहरणासहित नोंदवतात. तुकाराम लोकांच्या भाषेत बोलणारा, रचना करणारा कवी होता. त्यामुळे नित्याचे जीवनानुभव व जीननानुभवातील रूपक प्रतिमा त्यांच्या अभंगात सहजपणे येतात आणि सामान्य माणसाच्या हृदयाचा ठाव घेतात. हे तुकारामाच्या अभंगाचे वेगळेपण गुरुवर्य केळूसकर नोंदवतात. त्यांनी तुकारामाच्या अभंगाचे स्वतःसंबंधी वैराग्यपर, भक्तीविषयक ज्ञानसंबंधी आख्याने, भगवद्‌गीता व चरित्रपर असे वर्गीकरण केले आहे. या वर्गीकरणासाठी तुकारामतात्या पडवळ यांच्या विभागणीचा आधार त्यांनी घेतलेला आहे. ब्रिटिश आधिकाऱ्यांनी तुकारामबुवांची गाथा प्रसिद्ध करण्यासाठी घेतलेला पुढाकार ते नोंदवतात. बार्टल फियर व अलेक्झांडर ग्रांट यांनी सरकारी तिजोरीतून मदत करून गाथा प्रकाशित केल्याचे ते नोंदवतात. या कामी मदत करणाऱ्या सहकाऱ्यांचाही त्यांनी आवर्जून उल्लेख केलेला आहे. तुकारामाच्या विविध विचारांचा जीवनधर्म तत्त्वज्ञानविषयक मनांचा परामर्श गुरुवर्य केळूसकर ‘तुकारामाची मते’ या प्रकरणात घेतात. ईश्वरभक्ती करण्यास कोणताही जातीभेद आडवा येत नाही. हे सांगणारे तुकाराम तत्कालीन ब्राह्मणांच्या कर्मकांडाविरुद्ध कसे कठोरपणे बोलतात, हे सांगून बहुजनांच्या ईश्वरविषयक धारणा ते तुकारामांचे अभंग उद्‌धृत करून वाचकांसमोर ठेवतात. उपसंहार प्रकरणात गुरुवर्य केळूसकर आपल्या तुकाराम चरित्राचे वेगळेपण नोंदवतात.

५

गुरुवर्य केळूसकरांनी हे तुकारामचरित्र नव्या शिक्षित वर्गाला व सामान्य वाचकाला बोधप्रद होईल अशा पद्धतीने लिहिले आहे. भाषेचे प्रासादिक व उत्कंठावर्धक रूप हे या चरित्राचे महत्त्वाचे वेगळेपण आहे. आपण एका महानायकाचे चरित्र सांगत आहोत याची जाणिव सतत गुरुवर्य केळूसकरांनी मनाशी ठेवली आहे. त्यामुळे चरित्र नायकाविषयीचे तपशील नोंदवताना ते कुतूहल जागृत करणारे असले पाहिजे याची खबरदारी गुरुवर्य केळूसकरांनी घेतली आहे. आवश्यक तेथे संवादांचा वापर, गरजेपूरता अभंगांचा आधार आणि विश्लेषण करत असताना सहृदयतेची धरलेली कास यामुळे या चरित्राची वाचनीयता अधिकच वाढत जाते. या चरित्रात गुरुवर्य केळूसकर प्रसंगांची गुंफण करत असताना अतिशयोक्तीचा कोठेही आधार न घेता सत्याधिष्ठीत घटनांची शृंखला एकमेकात विणत, वाचकमनात ठसली पाहिजे यासाठी विविध क्लृप्त्या आणि तंत्रांचा वापर करतात. दर्शनी सुबोध वाटणारे हे चरित्र वाचकाचा नवा जीवनविषयक दृष्टिकोन घडवण्यास मदत करते. केळूसकरांनी महिपतीने लिहिलेली तुकारामांची चरित्रसंहिता समोर ठेवून त्याबाबत लेखकीय स्वातंत्र्य घेऊन हे चरित्र साकार केले आहे. हे करत असताना सामान्य माणसाच्या मनात तुकारामांविषयीचा आदरभाव आधिक खोलवर रुजत जावा यासाठी त्यांनी खास मेहनत घेतलेली आहे. गौतमबुद्धांचे चरित्र, छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र आणि तुकारामबुवांचे चरित्र या तिन्ही चरित्रग्रंथातून गुरुवर्य केळूसकर स्वतःची चरित्रलेखनपद्धती विकसित करतात. जी चरित्रपद्धती मराठी चरित्रलेखन परंपरेत वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण आहेत. या चरित्रलेखनात सत्याधिष्ठितता, विवेकनिष्ठा आणि वास्तव विश्लेषणाची साधारता अधिक महत्त्वाची असल्याचे प्रत्ययाला येते. या चरित्रलेखन पद्धतीचा अवलंब गुरुवर्य केळूसकरांच्या नंतरच्या चरित्रकारांनी घेतला असता तर मराठीतील आजच्या चरित्रवाङ्मयाचे स्वरूप बदलले असते. पण घडले याच्या विपरीत. केळूसकरांच्या चरित्रांची उपेक्षा करण्यासाठी अनुल्लेखाचे शस्त्र उपसले गेले. त्यांच्या चरित्रलेखनांची नोंदही करण्याचे औदार्य इतिहासकारांनी दाखवले नाही. यात तोटा केळूसकरांचा काहीच झाला नाही, बिघडले ते मराठीतील चरित्रलेखन पद्धतीचे. ती फारच ढोबळ बनत गेली. आजतरी या चरित्रकाराने दाखवलेली वाट चरित्रलेखक धुंडाळतील अशी आशा करायला जागा आहे.

वाङ्मयमहर्षी गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकरांचे वाङ्मयातील व सामाजिक कार्यातील असामान्य कर्तृत्व जाणून घेऊन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती

मंडळाचे अध्यक्ष मा. बाबा भांड व मंडळातील त्यांचे सहकारी, मंडळाच्या सचिव मिनाक्षी पाटील यांनी ह्या महत्त्वकांक्षी प्रकल्पाची जबाबदारी महाराष्ट्र शासनाच्या वतीने माझ्यावर सोपवून जो विश्वास दाखवला त्या बद्दल त्यांच्या ऋणातच असणे मी पसंत करतो. महाराष्ट्र शासनाच्या उदार व वाङ्मयप्रेमी दृष्टिकोनाचा मी कृतज्ञपूर्वक उल्लेख करतो.

हा प्रकल्प पूर्ण करताना अनेकांचे सहकार्य लाभले सतीश बडवे, प्रकाश पवार, अवनीश पाटील, प्रवीण बांदेकर, नीतीन रिंढे, रणधीर शिंदे, नंदकुमार मोरे, अरुण शिंदे, नीला जोशी यांनी गुरुवर्य केळूसकरांच्या ग्रंथांना अभ्यासपूर्ण प्रस्तावना लिहून दिल्या. त्यासाठी त्यांनी बरेच परिश्रम घेतले. तसेच रफिक सूरज, शोभा नाईक, सुजय पाटील, अनिल गवळी, रमेश साळुंखे, गोमटेश्वर पाटील यांचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांचे आभार मानणे त्यांना आवडणार नाही. कारण हे सर्व अभ्यासक व्रतस्थ वाङ्मय सेवक आहेत. या ग्रंथाचे संकलन करण्यात साकेत बाबा भांड यांनी केलेली मदत मोलाची आहे. याबरोबर हे प्रकल्प काम पूर्ण करण्यास आप्पासाहेब बुडके, तेजस चव्हाण, राजेश पाटील, नवनाथ गोरे, संदीप मुंगारे, प्रदीप पाटील, निहाल शिपुरकर यांची मदत झाली. त्यांचे मनःपूर्वक आभार. त्या बरोबरच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे ग्रंथपाल, सा.वा.ना. नाशिक, श्रीराम वाचन मंदिर सावंतवाडी, करवीर नगर वाचन मंदिर कोल्हापूर, बॅ. खर्डेकर ग्रंथालय, कोल्हापूर या बरोबरच महाराष्ट्रातील अनेक ग्रंथालयाच्या ग्रंथपालांनी विशेष मदत केली. त्यांचे मनःपूर्वक आभार. या शिवाय या प्रकल्पास मदत करणाऱ्या सर्व ज्ञात अज्ञातांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतो. ह्या प्रकल्पाचे वाचक मनापासून स्वागत करतील अशी खात्री आहे. या प्रकल्पात काही त्रुटी असेल तर ती माझी असेल मात्र चांगल्याचे सर्व श्रेय बाबा भांड आणि त्यांचे सहकारी यांचे आहे. धन्यवाद!

**– राजन गवस**

## प्रस्तावना...

कृष्णराव अर्जुन केळूसकर (१८६०-१९३४) मराठीतले आघाडीचे चरित्रकार होत. इतिहासकार, पत्रकार, निष्णात शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्ते अशी त्यांची ओळख आहे. केळूसकरांनी सातत्याने विविधस्वरूपी लेखनकामगिरी केलेली आहे. केळूसकरांच्या वैचारिक जडणघडणीमागे वसाहतकाळातील इंग्रजी शिक्षणाचा संदर्भपट आहे. समाजशास्त्र, नीतिशास्त्र, तत्त्वज्ञान, वैचारिक व धर्मपर वाङ्मयांनी या पिढीचे भरणपोषण केले. एका बाजूला पाश्चात्त्य नीतिपर वाङ्मय आणि दुसऱ्या बाजूला भारतीय परंपरेतील सुधारणावादी वाङ्मयवाचनाचा प्रभाव असणारा हा काळ होता. हेन्री थॉमस, ऑगस्त कॉम्त, हर्बर्ट स्पेन्सर, जॉन स्टुअर्ट मिल, डार्विन यांच्या नीतिपर उदारमतवादी विचारांच्या वाङ्मयाचा संस्कार केळूसकरांच्यावर झाला. मुंबईतील त्यांच्या शालेय जीवनात त्यांच्या शाळेचे मुख्याध्यापक कृष्णराव गोडबोले यांच्या शिकवणुकीचा खोलवर परिणाम केळूसकरांवर झाला. गोडबोले यांच्या जातिभेदविरहित दृष्टीचा उल्लेख केळूसकरांनी असा केला आहे, 'गोडबोले म्हणत, एखादा भंगी नीतीने वागत असला तर तो शूचिर्भूत म्हणविणाऱ्या कार्मोपाध्यायांपैकी मला अधिक सत्य व आदरणीय वाटेल.' या शिकवणुकीचा स्वाभाविक असा परिणाम केळूसकरांच्या घडणीवर झाला. अखंड स्वरूपाच्या ज्ञानलालसेचे मूर्तिमंत उदाहरण म्हणून केळूसकरांकडे पाहावे लागते. वसाहतकाळात नव्या शिक्षणाच्या प्राप्तीने व्यक्तींच्या मनात नवे जग व ज्ञान समजून घेण्याची आकांक्षा निर्माण झाली. आपल्या आयुष्याचे मिशन हे ज्ञानलालसेसाठी व्यतीत करावे, या आंतरिक प्रेरणेने झपाटलेल्या व्यक्तींमध्ये केळूसकरांचा समावेश करावा लागतो. पाश्चात्त्य वाङ्मयाच्या परिशीलनातून त्यांचा ओढा बुद्धिवादाकडे झुकला. त्यांच्यातील विवेकनिष्ठ व विज्ञाननिष्ठ भूमिका घडविण्यात पाश्चात्त्य वाङ्मयाचा वाटा होता. ऑगस्त कॉम्त व हर्बर्ट स्पेन्सर यांच्या नीतिपर ग्रंथांचा खोलवरचा संस्कार केळूसकरांच्या मनावर झाला. या ग्रंथांकडे त्यांचे मन इतके वेधले की, ते त्याची पारायणे करू लागले. याच काळात थॉमस पेनचे 'एज ऑफ रीझन', 'राइटस् ऑफ मॅन' हे ग्रंथही उत्कृष्ट असल्याचे ते नोंदवतात. दरम्यान

तरुण काळातच त्यांचा मुंबईतील नीतिप्रसारक मंडळीशी संबंध आला. ते त्यांच्या साप्ताहिक कार्यक्रमांना जाऊ लागले. या मंडळातील लोक स्वातंत्र्यवादी विचारांचे होते. धर्म सोडून स्वतंत्र विचार करणारी ही मंडळी होती. या सर्व वातावरणाचा परिणाम त्यांच्या नास्तिक बुद्धी होण्याकडे झाला.

अखंड अशी ज्ञानलालसा आणि त्याची पूर्तता हा केळूसकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा खास विशेष होता. सचोटीचे, प्रामाणिक तळमळीचे शिक्षक म्हणून काम करत असताना त्यांनी विविध विषयांचा विद्याव्यासंग केला. अफाट वाचन केले, तेही आंतरिक प्रेरणेने. त्यांच्या ग्रंथनिर्मितीचा व ज्ञानलालसेचा विविधस्वरूपी पसारा पाहिल्यानंतर थक्क व्हावे अशा तऱ्हेची विविधता त्यामध्ये आहे.  इस्राएली शाळेच्या चालकामुळे ते मराठी ग्रंथनिर्मितीच्या क्षेत्राकडे ओढले गेले. 'कसे बोलावे व कसे लिहावे' यासाठीदेखील त्यांनी अविरत कष्ट घेतले. त्या काळातील प्रस्थापित ब्राह्मणी व्यवस्थेतील वर्णवर्चस्ववादी भूमिकेचे चटके त्यांना बसले होते. 'अब्राह्मणी लेखकांपुढील अडथळे' असा त्यांचा त्यांनी आपल्या आत्मचरित्रात उल्लेखही केला आहे.

**अखंड ज्ञानलालसा व वाचन छंद**

'ज्ञानसंपादन  करून लोकांच्या उपयोगासाठी ग्रंथ लिहावे, यातच आपल्या जीविताचे साफल्य आहे, असे केळूसकर मानत. गरिबीमुळे त्यांना इच्छा असूनही कॉलेजात शिक्षण घेता आले नाही. तसेच शिक्षकी पेशाच्या अल्प पगारात त्यांची लेखन-वाचनाची कुचंबणा व्हायची. 'सुबोध प्रकाश,' 'नित्युपदेशक,' 'आध्यात्मिक ज्ञान रत्नावली', 'दीनबंधू' मधून त्यांनी आरंभी लेखन केले. *शिवचरित्र*  लिहिल्याबद्दल मुंबईच्या काही मंडळींनी त्यांचा मानपत्र देऊन सत्कार केला. याप्रसंगी त्यांना स्पेन्सरचे सुमारे पाच हजार पृष्ठांचे समग्र वाङ्मय भेट देण्यात आले. हे वाङ्मय पुन्हा त्यांनी वाचून काढले.

वाचनध्यास हा त्यांच्या  व्यक्तिमत्त्वाचा प्रमुख उर्जास्रोत होता. त्यांचा तो जीवनक्रम होता. वाचनाबद्दलच्या फार सुंदर नोंदी त्यांच्या आत्मचरित्रात आहेत. कथा कादंबऱ्यांपेक्षा वैचारिक व बोधपर वाङ्मय वाचनाची त्यांना आवड होती. शिक्षकी पेशाची नोकरी सांभाळून त्यांनी आपला वाचनछंद जोपासला. आपल्या वाचनाचे वर्णन त्यांनी 'चालताना प्रवासात बागेत वाचन' असे केले आहे. जिथे जाईल तिथे वाचन असा त्यांचा नित्य परिपाठ होता. निसर्गदत्त प्रकाशात ते वाचन करायचे, याचे कारण घरातील जागा व अडचणी, हे असावे. बांद्र्याहून चर्नी रोडला पहाटे स्टेशनवर उतरून समुद्राकडेने विल्सन कॉलेजला वळसा घालून ग्रँट रोडला वाचत जात. पहाटे उठून

समुद्रावर जात व प्रकाश दिसू लागताच वाचत. मुंबईतील वेगवेगळ्या बागांमध्ये त्यांचे वाचन व्हायचे. चर्नी रोड बाग, हँगिग गार्डन, राणीचा बाग, युनिव्हर्सिटी गार्डन या बागांत बसत. वाचताना ऊन लागू नये म्हणून काखेला छत्री बांधून वाचत, तर पावसात निवांत वाचायला मिळावे म्हणून वांद्रे ते कुर्ला असा लांबचा रेल्वे प्रवास वाचनासाठी करत. सुट्टीच्या दिवशी सबंध दिवस ते बागेत वाचत बसायचे. वाचनवेडाने झपाटलेला असा माणूस विरळाच म्हणावा लागेल. घरच्या परिस्थितीमुळे त्यांना उच्चशिक्षण घेण्याची इच्छा असूनही घेता आले नाही. त्या आधी काही वर्षे त्यांनी इस्त्राइल शाळेत शिक्षकाची नोकरी केली. विल्सन हायस्कूलमध्ये त्यांनी दीर्घकाळ शिक्षक म्हणून कार्य केले. 'चार सहा आणे खर्चून त्या काळात बोधाची पुस्तके ज्ञानेच्छू मनुष्याला उपलब्ध होत' याची त्यांना धन्यता वाटायची. 'वाचन, वाचन असा जप करीत, अफाट वाचनतृष्णा तृप्त करण्यासाठी धडपडणारा हा कोणी आधुनिक ब्रह्मर्षीच असावा असे लोकांना वाटे'(गुरुवर्य कृष्णराव अर्जुन केळूसकर अल्पचरित्र व चरित्र, संपा. धनंजय कीर, १९७७, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, १३३)

**ब्राह्मणेत्तर चळवळ : शाहू महाराज व केळूसकर**

केळूसकरांच्या विचारांवर ब्राह्मणेत्तर चळवळीचा विशेषतः महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभाव होता. महात्मा फुले यांच्या काही व्याख्यानास ते हजर होते. तसेच फुले यांच्यानंतर छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याकडेही ते ओढले गेले. प्रत्यक्ष शाहू महाराजांचा त्यांना सहवास लाभला. केळूसकर यांच्या 'शिवचरित्र' लेखनासाठी रु. १००० चे पारितोषिक शाहू महाराजांनी त्यांना दिले होते, व या ग्रंथाच्या प्रती विकत घेतल्या. हे चरित्र केळूसकरांनी छत्रपती शाहू महाराजांना अर्पण केलेले आहे. त्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीच्या विचारदृष्टीचा त्यांच्यावर प्रभाव असणे स्वाभाविक आहे. कृष्णराव केळूसकर यांनी ३० मे, १९२१ रोजी दादरहून छत्रपती शाहू महाराज यांना एक इंग्रजीत पत्र लिहिले आहे. शिवचरित्रकार म्हणून त्यांनी हे पत्र मोठ्या कळकळीने लिहिले आहे. *शिवचरित्र* या ग्रंथाच्या ५००० प्रतीच्या विक्री मदतीसाठी त्यांनी हे विनंती पत्र लिहिले आहे. या पत्रात केळूसकरांनी लिहिलेल्या चरित्राची होत असलेल्या उपेक्षेची मीमांसा केली आहे. या ग्रंथाची विक्री न होण्यामागची कारणे या पत्रात आहेत. त्यापैकी एक कारण हे किंमत जास्त असल्यामुळे तर इतर तीन चार कारणांमध्ये त्यांनी महाराष्ट्रातील संस्कृति व्यवहारातील वर्चस्ववादी हितसंबंधाचे सूचन केले आहे. लोकमान्य टिळकांनी पुढाकार घेऊन शिवाजी स्मारक बांधण्यासाठी निधी जमा केला

होता. तो निधी गिळंकृत झाला याचा उल्लेख केळूसकरांनी शिवचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीत केला. तसेच दादोजी कोंडदेव व रामदास या ब्राह्मण संस्कृतीतील आवडत्या प्रतिमांना केळूसकरांनी छेद दिला. या साऱ्या घटनांमुळे ब्राह्मण समाज नाराज होणे स्वाभाविक होते असे केळूसकर नोंदवतात. *शिवचरित्रा*तील दादोजी कोंडदेव, रामदास व शिवाजी संबंधाबद्दल केळूसकरांनी जी भूमिका मांडली ते ब्राह्मणमंडळींना आवडली नाही, तसेच हा ग्रंथ त्यांनी छत्रपती शाहू महाराजांना अर्पण केला, हेही त्यांना आवडले नाही. या कारणांमुळे या ग्रंथाच्या उपेक्षा होत असून तो विकला जात नसल्याची खंत केळूसकर व्यक्त करतात. (*केळूसकरांचे पत्र–राजर्षी शाहू छत्रपती चित्रमय चरित्र*, इंद्रजित सावंत व देविकाराणी पाटील, २०१४, पृ.९५ ) महाराष्ट्रातील लेखन व्यवहार आणि प्रस्थापित समाजमन समजून घ्यायला हे पत्र फार महत्त्वाचे ठरते.

**संतचरित्राची आवड**

केळूसकरांच्या संतचरित्राच्या ओढीची बीजे त्यांच्या बालपणात पाहायला मिळतात. वडिलांच्या अनेक ठिकाणच्या भ्रमंतीमुळे त्यांचे शिक्षण वेगवेगळ्या गावात घडले. सावंतवाडी, मुंबई येथे त्यांचे शालेय शिक्षण झाले. सावंतवाडी येथे असताना एका सधन शेणवी कुटुंबातील वर्गमित्रामुळे त्या कुटुंबाशी त्यांचा स्नेह जडला. या कुटुंबात नित्य धार्मिक पोथ्यांचे वाचन व्हायचे. कृष्णराव संध्याकाळी त्यांच्या घरी पोथी ऐकायला जात. पोथी पुराणाविषयी त्यांना तेथे गोडी लागली. त्या घरात पोथीसाठी चौरंगपाट मांडून ठेवणे, जागा झाडून ठेवणे व दिवा लावण्याचे काम ते मोठ्या आवडीने करत. बाळ कृष्णराव यांची याप्रकारची वर्तणूक त्या घरातील सर्वांना आवडत असे. या प्रवचन–निरूपणादी ऐकण्यामुळे शालेय पाठ्यक्रमातील कवितांचा अर्थ त्यांना लावता येऊ लागला. *रामविजय, हरिविजय, पांडवप्रताप* यासारखी काव्ये चांगली समजू लागली. त्यातील कथांनी गोडी निर्माण केली. संतसाहित्याकडे जाण्याची वाट त्यांच्या बालपणातील या संस्काराने केली.

केळूसकर आंग्लो व्हर्नाक्युलर शाळेत असताना मुंबईत 'मुगभाट' परिसरात राहत. त्यावेळी त्यांच्या शेजारी सोनार समाजातील एक वृद्ध अंध गृहस्थ राहत होते. त्यांना कथा–कीर्तने, प्रवचने ऐकण्याची आवड होती. त्यांना लहान कृष्णराव हाताला धरून प्रवचन ऐकायला म्हणून जवळच्या देवळात घेऊन जायचे. त्यावेळी स्वतःही देवळातच पुराण ऐकत बसत. हे काम ते जवळपास साडेतीन वर्षे करत होते. याप्रसंगी आरतीच्यावेळी नगारा वाजविण्याचे काम ते करत. पुराणिकबाबांचे ते आवडते होते.

त्यावेळी देवळातले पुजारी त्यांना ‘प्रती तुकाराम’ म्हणत. पुढे त्यांनी काही काळ कुडाळ जवळील ‘कर्लेची तार’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जुवे येथे एका घरी छोट्या मुलाला शिकविण्याचे काम केले. त्यावेळी तेथील घरात गीतेची पोथी वाचत व त्याचे अर्थही सांगत. बालपणीच्या या साऱ्या घटनांत केळूसकरांच्या संतचरित्र आवडीची बीजे आहेत. पोथी, प्रवचने, कथा कीर्तनादी आवडी, नामसंकीर्तनादी आवडीचे बीजारोपण त्यांच्या बालवयातच झाले.

### एकोणिसावे शतक आणि तुकाराम

तुकारामांचे चर्चाविश्व हे एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील महत्त्वाचे चर्चाविश्व आहे. प्रबोधनशतक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या काळात अनेकविध स्वरूपाची घुसळण भारतीय समाजजीवनात झाली. तुकारामांच्या या चर्चाविश्वाचे पाझर केळूसकरांपर्यंत आले, याचे महत्त्वाचे कारण म्हणजे या काळातील समाजअग्रभागी मंडळींना तुकारामांचे माहात्म्य व थोरवी कळू लागली होती. त्यादृष्टीने महाराष्ट्राच्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व धर्मविचारात तुकाराम चर्चेचा झालेला प्रवेश, ही एकोणिसाव्या शतकातील एक महत्त्वाची सामाजिक आणि सांस्कृतिक घटना आहे.

तुकाराम अस्तित्वाचे धागे लोकपरंपरेत तर घट्ट होतेच; परंतु, त्याला शिक्षितांच्या चर्चाविश्वात केंद्रीय स्थान मिळाले ते एकोणिसाव्या शतकात. एकोणिसाव्या शतकातील तुकारामचर्चा ही तिहेरी अंगाने समजून घ्यावी लागते. तुकाराम अभंगांचे संशोधन, गाथा प्रकाशन व चरित्रमाहिती पुढील अंगांनी साकार झाली. ब्रिटिश उदारमतवादी अधिकाऱ्यांनी यासंबंधी केलेले कार्य. मिशनरी मंडळींनी तुकारामांच्याविषयी केलेले कार्य तसेच; एतद्देशीय विद्वान मंडळींनी केलेल्या गाथेच्या पाठशुद्धीचे प्रयत्न. त्याबरोबरच सांप्रदायिक मंडळींनीही तुकारामांच्या अभंग व धर्मकार्यासंबंधी केलेले कार्य हा एक वेगळा पैलू आहे. या पार्श्वभूमीवर प्रार्थना समाज व सत्यशोधक समाजाने तुकाराम थोरवीचे ओळखलेले महत्त्वही ध्यानात घ्यावे लागते.

तुकारामांच्या अभंगांकडे लक्ष वेधण्याचे काम १८४४ पासून सुरू होते. या काळात तुकारामांचे अभंग स्फुट स्वरूपात प्रकाशित होऊ लागले होते. माधव चंद्रोबा डुकले यांनी १८६२– ६८ या काळात सर्वप्रथम तुकारामांचे ३३२९ अभंग छापले. तुकाराम या काळात चर्चेच्या केंद्रस्थानी येण्याचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे सर अलेक्झांडर ग्रॅण्ट यांचे कार्य. ग्रॅण्ट हे शिक्षणखात्याचे डायरेक्टर होते. वृत्तीने उदारमतवादी आणि मराठी संस्कृतीचे जाणकार होते. एलफिन्स्टन महाविद्यालयाचे ते प्राचार्य होते.

संतवाङ्मयाकडे व मराठी संस्कृतिभ्यासात त्यांना विशेष रुची होती. तुकारामांच्या अभंगांनी ते फार प्रभावीत झाले होते. न्या. म. गो. रानडे यांच्यावर अलेक्झांडर ग्रॅण्ट यांचा विशेष प्रभाव होता. ग्रॅण्ट यांनी 'तुकाराम : अ स्टडी ऑफ हिंदूइझम' या शीर्षकाचा एक निबंध 'फोर्टनाइटली रिव्ह्यू' (१८६७) या अंकात लिहिला, तर ख्रिस्ती धर्मप्रसारक मरे मिचेल (१८१५-१९०४) या मिशनरीने रॉयल एशियाटिक सोसायटीच्या जर्नलमध्ये महिपती लिखित तुकारामचरित्राचा घोषवारा 'द स्टोरी ऑफ तुकाराम' या नावाने १८४९ साली प्रसिद्ध केला. मरे मिचेल यांनी वसाहतकाळात आरंभी तुकाराम चरित्राकडे व अभंगाकडे लक्ष वेधले, असे मानले जाते. मात्र त्यांच्याही आधी आठ वर्षे आधी जुलै, १८४१ च्या पुण्यात राहणाऱ्या डॉ. जे. स्टिव्हन्सन या स्कॉटिश मिशनरीने 'ॲन एसे ऑन द व्हर्नाकुलर लिटरेचर ऑफ द मराठाज' चा नावाचा लेख रॉयल एशियाटिक सोसायटीच्या अंकात लिहिला. त्यात त्याने *तुकारामांचे संक्षिप्त चरित्र* व एका अभंगाचे भाषांतर केले होते. (रे. जे. स्टिव्हन्सन तुकाराम आणि मराठी-नीतीन रिंढे, मराठी संशोधन पत्रिका, जुलै-डिसें. २०१७) सर अलेक्झांडर ग्रॅण्ट यांच्या प्रयत्नानेच तुकारामाच्या गाथेचे संशोधन आणि प्रकाशन झाले. मुंबई सरकारतर्फे चोवीस हजार रुपये खर्चून *तुकारामबावाची गाथा* दोन भागात 'इंदूप्रकाश' छापखान्यात शिळाछाप प्रेसवर १८६९ व १८७३ साली छापली. ही गाथा प्रकाशित करण्यात विष्णू परशुराम पंडित व शंकर पांडुरंग पंडित यांचा फार मोलाचा वाटा होता. या गाथेस 'इंदूप्रकाश गाथा', 'पंडिती प्रत' व 'सरकारी गाथा' या नावानेही ओळखले जाते. या गाथेत जनार्दन सखाराम गाडगीळ यांनी इंग्रजी-मराठीत लिहिलेल्या तुकाराम चरित्राचा लेखस्वरूपात समावेश होता.

एकोणिसाव्या शतकातील तुकारामांच्या चरित्र व अभंगांचे आवाहन मोठ्या प्रमाणात होते, याची अनेक उदाहरणे पाहायला मिळतात. ग्रॅण्टने म्हटले होते की, 'ज्यांच्या मुखी तुकारामाची वाणी वसत आहे; त्यांना नैतिकदृष्ट्या ख्रिस्ती धर्म श्रेष्ठ आहे, हे पटवून देणे तसे दुरापास्त आहे.' या दृष्टीने तुकारामांच्या अभंगातील तत्त्वज्ञानाकडे व आवाहनाकडे अभ्यासकांनी पाहिले. रे. ना. वा. टिळकांसारखे कवी म्हणतात, 'तुकानिर्मित सेतूवरूनि आलो मी ख्रिस्तचरणी' ते ध्यानात घ्यावे. 'एकोणिसाव्या शतकामधील मराठी प्रबोधनाच्या केंद्रस्थानी तुकोबा असून, महाराष्ट्राच्या उच्चशिक्षिताच्या हृदयपटलावर तुकोबा आरूढ होण्याचे एक महत्त्वाचे कारण अलेक्झांडर ग्रँट असल्याचे' डॉ. सदानंद मोरे यांनी नोंदविले आहे. (*तुकारामदर्शन*, पृ. २१७)

**प्रार्थनासमाज आणि तुकाराम**

प्रार्थना समाज आणि तुकाराम यांचे विशिष्ट नाते आहे. प्रबोधनकाळात भारतीय संतांच्या जीवनदृष्टीचा परिप्रेक्ष्य बलवर्धक ठरेल, असे वाटणाऱ्या मंडळीत प्रार्थनासमाजाचा विशेष सहभाग होता. प्रार्थना समाज आणि तुकारामप्रेम यांतील नाते हे फार महत्त्वाचे आहे. आधुनिक धर्मश्रद्धेचा पाया हा भागवत धर्मात असून नव्या 'युगप्रभावीनुसंगी' काळात वारकरी तत्त्वाचे स्मरण समाजाला आवश्यक ठरेल, असे प्रार्थना समाजीय मंडळींना वाटले. यामध्ये न्या. म. गो. रानडे, रा.गो. भांडारकर, महर्षी वि. रा. शिंदे व समाजातील इतरही मंडळींना याचे श्रेय जाते. एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पावशतकात प्रार्थना समाजाने तुकारामाची महती वारंवार सांगितली, त्याचेही पडसाद केळूसकरांच्यावर पडले असावेत. रानडे-भांडारकरांचे तुकारामप्रेम सर्वश्रुत आहे. समाजात आरंभी पाश्चात्त्य लेखकांची काही पदे म्हटली जात होती. मात्र एके वर्षी तुकारामांचे अभंग म्हटले, ते लोकांना फार आवडले. त्यामुळे पुढे साप्ताहिक उपासनेत व इतरही कार्यक्रमात तुकारामाचे अभंग गायिले जाऊ लागले. प्रार्थना समाजाच्या भजनपदाच्या सहाव्या आवृत्तीत तुकारामांच्या ५५० अभंगांचा समावेश होता. त्यावरूनही समाजाचे तुकारामप्रेम लक्षात येते. भांडारकर व द्वा. गो. वैद्य यांच्या तुकाराम प्रेमापोटी महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी म्हटले आहे की, 'ह्या गुरूशिष्यांनी तुकारामाला अगदी सळो की पळो करून सोडले आहे. तुकाराम जिवंत असता, तर तो पुनः काही सजीव स्वर्गाला गेला नसता.' (*संसार व धर्मसाधना*, वि. रा. शिंदे, १९३५) १८६७ साली प्रार्थना समाजाची स्थापना झाली. प्रार्थना समाजाने आरंभापासून भागवत संप्रदाय व तुकारामांबद्दल प्रेम व्यक्त केले. प्रार्थना समाजाच्या उपासनेत अनेकवार तुकारामांचे अभंग सुस्वर स्वरात गायिले जात. रा. गो. भांडारकर यांनी इंदूर येथे 'तुकोबा आणि प्रार्थना समाज' या विषयावर व्याख्यान देताना म्हटले होते की, 'कलकत्यामधील ब्राह्मसमाजाची एक शाखा प्रतिवर्षी ख्रिस्तजयंती साजरी करते परंतु तुकारामबीजेचा उत्सव कोणी करत नाही.' (*तुकारामदर्शन*, सदानंद मोरे २४५) रा. गो. भांडारकर यांच्या प्रेरणेनेच पुण्यात तुकाराम सोसायटी स्थापन होऊन त्याद्वारे दर आठवड्यात तुकारामांच्या अभंगांची चर्चा होत असे.

रानडे धर्मपर व्याख्यानात सतत तुकारामांचे अभंग उद्धृत करत. रानडे तुकाराममय झालेले होते. नित्यकार्यात ते नेहमी तुकारामांचे अभंगचरण गुणगुणत. उपासनाप्रसंगीची त्यांची वृत्ती तन्मय होत असे. अभंग म्हणताना त्यांचा कंठ दाटून यायचा. साप्ताहिक उपासना प्रसंगी तुकारामांच्या अभंगांचे निरूपण करत असताना रानडे यांच्या डोळ्यातून

अश्रू ओघळत, याचा अनुभव महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी त्यांच्या आत्मचरित्रात नोंदविला आहे. रानडे यांनी पुण्यात दिंडीचा अनुभवही एकदा घेतला व १८८२ साली पुणे प्रार्थना समाजात 'पंढरीची यात्रा' या विषयावर व्याख्यानही दिले होते. दिंड्या म्हणजे वैष्णव साधूंचे थवे अगर संघ आहेत. तसेच प्रेम आणि भक्तिभावाचा आविष्कार म्हणून ते पाहतात. प्रबोधनकाळात परंपरेतील पोषक असा नीतिविचार व शिकवण ही वारकरी संप्रदायातून घेता येते याचा वस्तुपाठ प्रार्थनासमाजाने दिला. एका अर्थाने एतद्देशीय विचारांवर आधारलेला प्रबोधनविचार त्यांना महत्त्वाचा वाटत होता. महर्षी शिंदे व केळूसकर यांच्याबद्दल एक निरीक्षण सदानंद मोरे यांनी नोंदविले आहे. ते असे, 'महर्षी शिंदे हे एक गुरुवर्य पक्के अस्तिक तर केळूसकर हे दुसरे गुरुवर्य पक्के नास्तिक बुद्धिवादी आणि नीतिवादी, ब्राह्मणेतर चळवळीतील शिंदे आणि केळूसकर ही अनुक्रमे श्रद्धावादी आणि बुद्धिवादी विचारप्रवाहांची विलोभनीय शिखरे होत.' (*तुकारामदर्शन*, २८४) केळूसकरांनी आपल्या *श्री छत्रपती शिवाजी महाराज* या चरित्रग्रंथाची प्रत महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांना दि. ५ मे, १९२२ रोजी प्रत्यक्ष भेटून दिली होती. शिंदे यांचा आदरपूर्वक श्रद्धाभावाने उल्लेख करून हा ग्रंथ त्यांनी त्यांना भेट दिला होता.

## तुकारामबावा चरित्रग्रंथाची निर्मिती प्रेरणा

लक्ष्मणराव पांडुरंग नागवेकर यांच्या सांगण्यावरून *ज्ञानेश्वरी* व वामनाची *यथार्थदीपिकेचा* सारांश ग्रंथ करावा या उद्देशाने केळूसकरांनी वेदान्त व गीतेवरचा अभ्यास केला. त्यासाठी तीन-चार महिन्यांचा खास कालावधी काढून त्यांनी संतकवितेचे भाषांतर काळजीपूर्वक केले. वामन, मोरोपंत, श्रीधर, तुकारामांच्या पद्याचा क्रम लावत असताना तुकारामांच्या अभंगांचा उपयोग केला. हे अभंग तुकाराम तात्या पडवळ यांच्या गाथेतील आहेत, याची खात्री त्यांनी केली. गीतेवरील टीका लिहीत असताना मराठी संतचरित्राचाही त्यांनी उपयोग केला. तुकारामांचे चरित्र लिहीत असताना केळूसकरांपुढे फारशी साधने नव्हती. त्यांच्या आत्मचरित्रात त्यांनी त्याचा स्पष्ट असा उल्लेख केला आहे. महिपतीचे ओवीबद्ध पद्यचरित्र, एका युरोपियन गृहस्थाचा चरित्रलेख, त्याचबरोबर सरकारच्या सांगण्यावरून बाबांच्या अभंगांचे केलेले एकत्रीकरण, एवढी सामग्री त्यांच्यापुढे होती.

लक्ष्मणराव नागवेकरांच्या 'आध्यात्मिक ज्ञानरत्नावली' या नियतकालिकात केळूसकर गीता, वेदांत, महाभारतादी विषयावर लिहीत. या मासिकात केळूसकरांनी सुमारे ४०

पृष्ठांचा मजकूर लिहावा असा तगादा नागवेकर यांनी केळूसकरांकडे लावला होता. केळूसकर या मासिकात सुमारे ३० पृष्ठे गीतेवर लिहीत तर १० पृष्ठे साधूचरित्रावर लिहीत यातूनच तुकारामचरित्राचे लेखन झाले. तुकारामांचे सदरचे चरित्र १८९३ साली लक्ष्मणराव पांडुरंग नागवेकर यांच्या 'आध्यात्मिक ज्ञानरत्नावली' या नियतकालिकांतून क्रमशः प्रसिद्ध झाले. केळूसकरांचे हे तुकाराम चरित्र १८९६ साली ग्रंथरूपाने प्रसिद्ध झाले. केळूसकरांनी तुकाराम चरित्राची चरित्रसामग्री कशी शोधली हेही पाहणे उद्‌बोधक आहे. सामान्य जणांना तुकारामांचे चरित्र सांगावे या हेतूने ते लिहिले गेले आहे. भारतीय परंपरेत संतगौरवपर व चमत्कार चरित्रलेखनाची परंपरा मोठी आहे. या पार्श्वभूमीवर केळूसकरांनी नवा मार्ग निवडला व आरंभकाळातच वस्तुनिष्ठ चरित्राच्या जवळ जाणारे चरित्र लिहिले. केळूसकरांनी मुख्यत्वे महिपतीचे संतचरित्र आधाराला घेतले तसेच 'ज्यांनी आजपर्यंत या साधूच्या गाथा किंवा चरित्रे प्रसिद्ध केली आहे. त्या सर्वांचे मला पुष्कळ साहाय्य' झाले असे त्यांनी कृतज्ञतेने नोंदविले आहे.

**मानवी चरित्र**

तुकाराम चरित्राकडे केळूसकरांची पाहण्याची दृष्टी ही लौकिक चरित्रकथनाची आहे. चमत्कार, अतिशयोक्तीपूर्ण व धर्मसंप्रदायांच्या प्रचारार्थ लिहिलेल्या संतचरित्रातून 'मानवी' चरित्रे शोधणे ही अवघड अशी किमया होती. त्यामुळे तुकारामांविषयी 'माहितीच्या आधारे जितका ऐतिहासिक व खरासा भासला तितकाच ग्रंथित केला आहे' असे ते म्हणतात, तसेच 'आमच्या चमत्कारप्रिय भाविक लोकांस हा प्रयत्न फारसा आवडणार नाही' असेही त्यांना वाटते. तत्कालीन वाङ्मयाभिरुची व संस्कृति-व्यवहारातील चमत्कारप्रिय लेखनाच्या उपस्थितीची पार्श्वभूमी या ग्रंथलेखनामागे आहे.

केळूसकरांचे तुकारामबावांचे प्रस्तुत चरित्र एकूण १६ प्रकरणात विभागले आहे, 'उपक्रम' या आरंभिक छोट्या निवेदनात त्यांनी या चरित्रलेखनाचा हेतू स्पष्ट केला आहे. तुकारामांसारख्या प्रेमळ भगवद्‌भक्त पूज्यनीय साधूचा अनेकांनी महिमा वर्णिला आहे. या साधुपुरुषाचे गद्यचरित्र लिहावे या भावनेतून ते लिहिले आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायात सर्व जातिधर्मीय संतमंडळी, सदाचार व समतावर्धक भक्तिमार्गातून व सहिष्णुतावादी परंपरा निर्माण झाली. संत तुकाराम हा या साधूमालिकेतील श्रेष्ठ व एकंदर संतमंडळाचा शिरोमणी आहे. अशा महात्म्याचे चरित्रामृत लोकांना समजून सांगावे या धारणेतून या चरित्राची निर्मिती झाली. वारकरी पंथाची महाराष्ट्रातील सहिष्णुतावादी परंपरा व अस्तित्व सांगत असताना तुकारामपूर्वकालीन संतांमध्ये,

साधूवृंदांमध्ये ब्राह्मण, कुणबी, मराठे, माळी, शिंपी, कुंभार, चांभार, महार वगैरे एकंदर उच्चनीच जातीतील संत आढळतात असे त्यांनी म्हटले आहे. सदाचारप्रवर्तक व समतावर्धक भक्तिमार्ग म्हणून ते वारकरी पंथाची नोंद घेतात. आमचा चरित्रनायकही ह्याच साधूमालिकेतला संतमंडळाचा शिरोमणी असल्याचे म्हटले आहे.

**कुलवृत्तांत**

'कुलवृत्तांत' या पहिल्या प्रकरणात केळूसकरांनी तुकारामांचा कुलवृत्तांत सांगितला आहे. तुकारामपूर्व सातव्या पूर्वजपरंपरेत पंढरीची वारी होती. तुकारामपूर्व चरित्रवृत्तांत कथन केला आहे. त्यानंतर तुकारामांच्या बालपणाची माहिती दिली आहे. तुकारामांच्या बालपणीची फारशी माहिती उपलब्ध नसावी त्यामुळे त्यांनी ती अल्पशी अशीच दिली आहे. घरची शेती, दुकान आणि विठ्ठलपूजेची पूर्वजपरंपरा ते सांगतात. तेराव्या वर्षी तुकाराम प्रापंचिक जीवनात प्रवेश करतात. सचोटी, नम्रता, सेवा, सुश्रुषा, प्रामाणिकता ही तुकारामांच्या व्यक्तिस्वभावाची वैशिष्ट्ये होत, असे सांगून 'संसार प्रवेश' या प्रकरणात माता पित्याचा व वडीलबंधूचा दुर्दैवी अंत, कर्ज, फसवणूक व दिवाळे निघण्याचा उल्लेख केळूसकर करतात. 'संसाराविषयी वैराग्य' या प्रकरणात तुकारामांच्या तरुणपणातील काही दंतकथा दिल्या आहेत. तुकारामांचे बैलावर गोणी वाहण्याचा धंदा, ठकांकडून फसवणूक, तुकारामांचा परोपकार स्वभाव या घटनांचा उल्लेख केला आहे. तर उत्तरार्धात तुकारामांच्या आयुष्याला जे नवे वळण मिळाले त्या काळातील घडामोडींचा आणि तुकारामांच्या मानसिक स्थितीचा परामर्श घेतला आहे. या काळात पडलेल्या भयावह अशा दुष्काळाचे, पाऊस-पाणी नाही, गुरे-ढोरे मरण पावतायत, रुपयास दोन पायल्या धान्य मिळण्याच्या विदारक काळाचे वर्णन केले आहे. याच काळात तुकारामांची पत्नी मरण पावली. थोरला मुलगा संतोबा व बंधूपत्नी मरण पावते तर बंधू परागंदा होतात. घरातील आप्तांच्या मरणांनी तुकारामांच्या मनावर विरक्तीचे ओरखडे उमटतात. मनाच्या उद्विग्न अवस्थेत ते भांबनाथ डोंगरावर जाऊ लागले. या अवस्थेतील भावस्थितीचे कथन करणारे अभंग त्यांनी दिले आहेत.

तर 'वैराग्यवृत्ती' या प्रकरणात 'सापडला देव तुका म्हणे गेला भेव' या आत्मसाक्षात्कारी अनुभवाचे निवेदन केले आहे. तुकाराम परोपकाराच्या कामात गुंतले. देवळात सतत राहू लागले. वाटसरू आणि गरिबांची सेवा करू लागतात. या परोपकाराच्या कथा दिल्या आहेत. एव्हाना कीर्तनकार म्हणून तुकारामांची ख्याती झाली होती. पूर्वपरंपरेचे वाचन, भजन नामसंकीर्तनादी गोष्टींच्या ध्यासामुळे त्यांना कवित्वस्फूर्ती झाली. महाराष्ट्र साधूमंडळीचा त्यांना अहर्निश ध्यास लागला.

विठोबासमवेत नामदेवांचा स्वप्नदृष्टांत होऊन शतकोटी अभंग करण्याचा ध्यास लागला. याकाळात तुकारामांच्या लोकप्रियतेमुळे प्रस्थापित वर्गात नापसंतीचा सूर उमटू लागला. त्याचा वृत्तांत 'छळ' या प्रकरणात दिला आहे. तुकारामांच्या कीर्तनास जवळच्या गावातून लोकांचे 'थवेच्या थवे येत' असे केळूसकर सांगतात. मंबाजी व इतरही ब्राह्मण मंडळींनी त्यांची केलेली छळवणूक, तसेच इंद्रायणी डोहात अभंगांच्या बुडवलेल्या वह्या याचे निवेदन दिले आहे.

**संवाद सेतू आणि राज्यसंस्थेची जबाबदारी : नवी दृष्टी**

त्यानंतर वैष्णवभक्त राघव चैतन्य, चैतन्य केशव व बाबा चैतन्य अशी तुकारामांची गुरूपरंपरा सांगतात. तर गंगाधर पंत, मवाळ कडूसकर, संताजी (ब्राह्मण), संताजी जगनाडे चाकणकर (तेली), रामेश्वरभट्ट पुराणिक, शिवाजी कासार व नावाजी माळी ह्या तुकारामांच्या बहुजातीय शिष्यांच्या हकिकती दिल्या आहेत.

'तुकाराम, शिवाजी आणि रामदास' या प्रकरणात केळूसकरांनी महाराष्ट्रीय इतिहासात वादचर्चा ठरलेल्या विषयावर प्रकाश टाकला आहे. तुकारामांची या संबंधातील सोज्ज्वळता, विनयशीलता व वैराग्यवृत्ती प्रकट झाली आहे. लोकव्यवहारात अस्तित्वात असणाऱ्या शिवाजी-तुकाराम संबंधाबद्दलच्या आठवणी या कथनात आहेत. केळूसकरांनी या प्रकरणात रामदासांनादेखील त्यांचा विचार सोडून एकमय पंढरी माहात्म्याचे महत्त्व कसे पटले ते विशद केले आहे. एकदा रामदास पंढरपुरात आल्यानंतर तुकारामांच्या भक्तिरसपूर्ण कीर्तनाने प्रभावीत होतात. तेथील वातावरणाचे रामदासांस आश्चर्य वाटते. 'तेथे जमलेले निरनिराळी संत परस्परजातिप्रकरणी वगैरे भिन्नत्व मुळीच मनास न आणिता परस्परांस समान बंधुत्वाच्या नात्याने आदरपूर्वक नमन करिताना व प्रेमभावाने आलिंगने देताना पाहून त्यांच्या मनात स्वजातीच्या उच्चत्वाची वगैरे थोडीशी आढ्यता होती ती समूळ नष्ट होऊन त्यांचे मन विकास व सुप्रसन्न पावले' असा त्या काळस्थितीचा अन्वयार्थ केळूसकर मांडतात. या प्रकारच्या दृष्टीमागे रामदास आणि वारकरी पंथ यांच्यात अनुबंध शोधण्याचा भाग होता. केळूसकर इथे तुकाराम-रामदास हे जोडरूपक कल्पितात. सांप्रदायिक मंडळींनी व अभ्यासकांनी या दोघांत विरोधभाव दर्शविला आहे तो टोकाच्या भूमिकांवरून. केळूसकर तो मोडतायत. तुकाराम-रामदासांचा संवादसेतू ते उभा करत आहेत. केळूसकर इथे आणखी एक बाब करू इच्छित आहेत. राजसत्ता आणि धर्मकार्य यातील संवादाचा भाग ध्वनीत करत आहेत. शिवकाल व वारकरी परंपरा यातील परस्परसंबंधाचा ते

विचार करतात. रामदास– तुकाराम भेटीचे वर्णन *देशावरासी आलो आता। लाभ कोणता चाहूनी ।। प्रेम चित्ती आनंद झाला। जीव झाला दर्शने।।* या शब्दांत केले आहे. या प्रकरणात वैदिक आणि बहुजन यांच्यातील सुप्त संघर्षाचे प्रतिध्वनी आहेत. मात्र त्याची उकल केळूसकरांनी आपल्या परीने केली आहे.

केळूसकरांच्या शिवचरित्रातही तुकाराम व शिवाजी संबंधाचे विस्तृत विवेचन आले आहे. साधुसंत समागम हा शिवाजींचा मोठा गुण होता. शिवाजीच्या मनात वसत असलेल्या संत आदरासंबंधाची माहिती दिली आहे. आदर्श राजाचे विशेष सांगून लोकाग्रणीने करावयाची कर्तव्ये यावर त्यांनी भर दिला आहे. समाज नेतृत्व करणाऱ्या व्यक्तींकडून समाजाने कोणता बोध घ्यावा त्यादृष्टीने शिवकार्याकडे केळूसकर पाहतात. केळूसकरांच्या विचारदृष्टीचा कंद व लेखनाची इतिहासदृष्टी या विवेचनात आहे. भविष्यात महाराष्ट्राच्या ज्ञानव्यवहारात उद्भवणाऱ्या चर्चेची बीजे देखील या विवरणात आहेत. देशकार्य हे पवित्र असावे. या सृष्टीचा उत्पन्नकर्ता कोणी नाही हा विचार ठसला, त्यामुळे धर्मावरील व देवावरील श्रद्धा नाहीशी झाल्याचे त्यांनी नोंदविले आहे. राजाने अमूक एका जातीवर व जनवर्गावर विशेष कृपादृष्टी ठेवू नये. समबुद्धी ठेवावी. तसेच सांप्रतच्या काळात जात्याभिमानातून पक्षपात व मत्सरभाव वाढल्याचे केळूसकर नोंदवतात. यादृष्टीने केळूसकरांनी इतिहास पुरुषांचे, जननायकाच्या कार्याचे वाचन केले आहे.

'अंतकाळ' या प्रकरणात तुकारामांच्या अंतकाळाचे फार हृदयभेदी वर्णन केले आहे. 'बायका मुले' या प्रकरणात तुकारामांच्या मुला–मुलींची माहिती दिली आहे. तुकारामांच्या एका मुलीच्या लग्नाची मनोरंजक हकिकतही सांगितली आहे. शेवटचा मुलगा नारायण बद्दलची माहिती दिली आहे. या प्रकरणात केळूसकरांनी विस्ताराने तुकारामपत्नी अवलाई ऊर्फ जिजाईबद्दलचे विवेचन केले आहे. केळूसकरांच्या चरित्र लेखनाचा हा एक महत्त्वाचा दृष्टिकोन आहे. असामान्य कार्य करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनात स्त्रीचा अवकाश पुरुषी संस्कृतीत झाकोळला जातो. तुकारामपत्नीचे वृत्तांत सांगताना केळूसकरांचा दुहेरी दृष्टिकोन आहे. लोकपरंपरेने अवलाईची खलत्वाची कर्कश कजाग अशी प्रतिमा रेखाटली आहे. चरित्रकारांनी व ललित लेखकांनीही याच प्रतिमेचा पुनरुच्चार केला. परंतु केळूसकरांना ही बाब खटकते. अवलाईचा स्वभावरंग आणि संसाराविषयीची काळजी यातून काहीवेळा तिच्याकडून उद्धटपणाचे उद्गार निघाले असतील; परंतु तिचे तुकारामांवर निरतिशय प्रेम होते. दोघांचीही एकमेकांवर

एकभावाची प्रीती होती. तुकारामांची व संसाराची ती फार काळजी घेत असे. तुकारामांच्या अभंगात स्त्रियांविषयीचे जे उद्‌गार येतात ते जणूकाही अवलाईच्या स्वभावातून आले आहेत व तिच्या तोंडचे आहेत 'हे म्हणणे बरोबर नाही.' असे केळूसकरांना वाटते. त्यामुळेच शेवटी त्यांनी म्हटले आहे की, 'अशा साध्वीवर नाही नाही ते दोषारोप करणे आमच्या मते कृतघ्नपणाचे काम आहे' या अर्थाने या चरित्रातला हा वृत्तांत दृष्टिकोन महत्त्वाचा आहे.

तुकारामांच्या अंतसमयीच्या मनोवस्थेचे त्यांच्या अभंगांचा आधार घेऊन फार हृदयभेदक असे वर्णन केले आहे. मनाच्या उदार, वैराग्य वृत्तीचे अतीताकडे लागलेला ध्यास व अस्वस्थ तळमळीचे उद्‌गार अभंगातून कथन केले आहेत. इहलोकाचा त्याग करण्याची आलेली वेळ 'आपुल्या माहेरा जाईन मी आता, माहेराचा मज आलासे मुराळी। उद्या प्रातःकाळी जाणे मज' या भाववस्थेचे वर्णन केळूसकरांनी फार हृद्य असे केले आहे. जणू काही आपण कादंबरी वाचत असल्याचा प्रत्यय केळूसकरांच्या या वृत्तांतकथनात आहे.

**चमत्कारकथा – नवी इतिहासदृष्टी व विज्ञानदृष्टी**

चरित्रग्रंथात अखेरच्या भागात चरित्रकार म्हणून त्यांची भूमिका सुस्पष्टपणे व्यक्त झाली आहे ती फार महत्त्वाची आहे. ग्रंथाअंती त्यांनी तुकारामांच्या व्यक्तिमत्त्वाची विस्ताराने चर्चा केली आहे. या चर्चाविवरणातून केळूसकरांचा तुकारामचरित्राकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यक्त झाला आहे. त्यामुळेच चमत्कारप्रकरण या प्रकरणातील चर्चा महत्त्वपूर्ण ठरते. तुकारामच काय किंवा किंबहुना थोर अध्यात्म पुरुषांवरील चरित्रे ही अद्‌भुतरम्य दंतकथांची व अतिशयोक्तींनी खचाखच भरलेली असतात. पंथप्रसारक व चरित्रनायकाच्या गुणसंकीर्तनाचे माहात्म्य व थोरवी सांगण्यासाठी दंतकथांच्या उंचच्या उंच इमारती रचलेल्या असतात. त्यामुळे खऱ्या विश्वसनीय ऐतिहासिक वस्तुस्थितीचे विस्मरण घडते; त्यामुळेच पारलौकिक वृत्तांतकथांना भारतीय चरित्रपरंपरेत कमालीचे महत्त्व दिसते. ही वाट केळूसकरांनी चोखाळली नाही. वास्तविक त्यांच्यासमोर तुकारामांच्या चमत्कृतिप्रधान घटनांनी भरलेला समूहप्रिय ऐवज मोठा होता. परंतु त्या वाटेने न जाता ऐतिहासिक स्थितीचा संदर्भ ध्यानात घेऊन हे चरित्र लिहिले.

यामागे वसाहतकाळातील नव्या ज्ञानचर्चांच्या सत्यान्वेषण दृष्टीचा भाग होता. त्यामुळेच तुकारामांच्या चरित्राभोवती जे चमत्कारकथांचे मोहक वलय होते. ते बाजूला

सारून प्रत्यक्ष त्यांच्या अभंगात त्याचा पुरावा आहे काय या दिशेने जात तुकाराम चरित्राच्या वाटा धुंडाळण्याला अधिक महत्त्व दिले आहे. 'अद्‌भूत व चमत्कृतिजनक गोष्टींच्या रेलचालीमुळे महापुरुषांचे चरित्र डागाळते' असे त्यांना वाटते. म्हणूनच तुकारामांचे जीवनवृत्त सांगताना 'केवळ विश्वसनीय व ऐतिहासिक गोष्टींचे निरूपण करण्याची खबरदारी आम्ही घेतली आहे' अशी सुस्पष्ट कबुली देतात. चमत्कृतिप्रधान दंतकथांचा ते मराठी समाजशास्त्राच्या अंगाने विचार करतात. अशा कथा रचण्यामागे समाजाची बांधणी, समूहमानसिकता व त्याचे आंतरसंबंध कार्यरत असतात असे नमूद करतात. देवावताराच्या रंजनप्रियतेमागे समूहधर्म संबंध असतात. देवाचे लौकिकीकरण करण्याची भूमिका त्यामागे दडलेली असते. देव भक्ताशी बोलतो, त्याला मदत करतो, तसेच जगातील एकंदर व्यापारामागे देवच कारणीभूत असतात. या प्रबळ अशा समाजधारणेतून अवतारकथा निर्माण होतात असे केळूसकरांना वाटते. त्यामुळे भारतीय चरित्रलेखनात अद्‌भूतरम्य कथांची रेलचेल आढळते असे केळूसकरांना वाटते.

केळूसकरांना इतिहासलेखनाबद्दल आस्था होती. त्यामुळेच इतिहासावर त्यांनी सतत लिहिले. त्यांच्या साऱ्या लेखनामागे ऐतिहासिकतेचे भान व्यक्त झाले आहे. तद्‌वत तुकारामांच्या चरित्रातही ऐतिहासिकतेचे भान ढळू देत नाहीत. चरित्र आणि इतिहास यातील संबंधाविषयी त्यांची सुस्पष्ट अशी भूमिका होती. त्यांच्या या इतिहासविषयक भूमिका घडणीमागे एकोणिसाव्या शतकातील नव्या ज्ञान संस्कृतीचा परिचय होता. आधुनिक ज्ञानपरंपरेने ज्ञानाच्या ज्या कक्षा विकसित केल्या त्या परिप्रेक्ष्यात केळूसकर इतिहास पुरुषांकडे पाहतात. एकाअर्थाने त्यांच्या या लेखनावर आधुनिक प्रबोधनातील ज्ञानप्रकल्पाची सोबत होती. पुराणग्रंथांना इतिहास म्हणता येणार नाही असे सांगून ते म्हणतात, 'परंतु इतिहास कसा असला पाहिजे, तो विश्वसनीय होतो याविषयी सत्यजिज्ञासू पाश्चात्यांच्या परिश्रमाने योग्य निर्णय झाला आहे' याकडे ते लक्ष वेधतात. केळूसकरांच्या या दृष्टीवर एकोणिसाव्या शतकातील नवज्ञान समाजपट होता. पारंपरिकता आणि आधुनिकतेच्या संघर्षकाळाची उपस्थिती त्यांच्या या विवेचनावर आहे. ते सांगतात, 'आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा सर्वत्र प्रसार होऊन सृष्टिक्रमाच्या अबाधितपणाची सुशिक्षितांना पूर्ण खात्री झाली आहे. साप्रंतकाळी अनेक शोधक पुरुषांनी सप्रयोगांनी अनेक गोष्टी सिद्ध केल्या आहेत. यासाठी त्यांनी उदाहरणे दिली आहेत की ज्याला आपण जादू म्हणत होतो ते केवळ एखादे त्या

विषयावरील पुस्तक वाचून सिद्ध करता येते. एखादा असाध्य रोग दैवीप्रसादाने बरा होतो हे जाऊन आता तो औषधादि उपचाराने बरा होतो असे लोकांना माहीत झाले आहे. पदार्थविज्ञानादी शास्त्राचे ज्ञान आधुनिक काळात वाढत आहे.' जगात आता वस्तुज्ञान वाढले आहे. सृष्टीत सर्वत्र कार्यकारणभाव वाढला आहे याची जाण केळूसकरांना होती. त्यांच्या या दृष्टीमागे नव्या ज्ञानपरंपरेने आलेली चिकित्सक अशी इतिहास व नवी विज्ञानदृष्टी होती.

केळूसकरांनी या प्रकरणात तुकारामांच्या चरित्रातील अनेक चमत्कारकथा सांगून त्याची ऐतिहासिकतेच्या आधारावर चिकित्सा केली आहे. तुकारामांच्या निर्वाणीच्या अनेक चमत्कारकथा ते काढून टाकतात. त्यांच्या अभंगाधारे त्यांनी जलसमाधी घेतली असावी असे सांगतात. तसेच त्यांच्या वैकुंठागमनाबद्दलचे प्रवाद बाजूला सारतात. देहासकट कोणी स्वर्गास गेल्याचे उदाहरण पुराणग्रंथात नसल्याचे ते नोंदवतात. देहासकट स्वर्गारोहण हा निसर्गाविरूद्ध चमत्कार आहे, असे म्हणावे लागते असे केळूसकरांनी म्हटले आहे. विठ्ठल तुकारामाला बोलतात या कथेकडे केळूसकर नव्या दृष्टीने पाहतात. देवाशी बोलणे हे आत्मनिवेदन स्वरूपाचे आहे. यामागे देव आपल्या संनिध असल्याची सहभावना असते असे त्यांनी नोंदविले आहे.

भाविक लोक चमत्कृतीवर विश्वास ठेवून दंतकथा रचतात यामागे भक्तांमधील शरणागतीची भावना असते असे केळूसकरांना वाटते. विवंचनाग्रस्त माणसे संकटमुक्त व दुःखमुक्तीसाठी असे आधार शोधतात. या धारणेतून सिद्धपुरुषांबद्दल विविध प्रवाह निर्माण होतात. या लोकसामूहिक भावनाशास्त्राचा उलगडा केळूसकर करतात. सामूहिक भक्तांच्या शरणागतीची एकोणिसाव्या शतकातील अक्कलकोट निवासी स्वामी समर्थांचे व देव मामलेदार या दोन साधूंची उदाहरणे त्यांनी दिली आहेत. या साधूंच्या हातून पुष्कळ चमत्कार घडल्याचे प्रवाद पसरल्याचे त्यांनी नमूद केले आहे. परंतु त्यात 'कितपत तथ्य आहे ते पाहण्याचे शोधक पुरुषांनी मनावर घेतले नाही' असेही ते नोंदवितात. भक्त परमपुज्य गुरूचा महिमा वाढवतात, पुण्यप्राप्ती, अंधप्रेम व निस्सीम भाव यामुळे 'भक्त पिसाचा कावळा करतात' असे त्यांनी म्हटले ते खरेच आहे. प्रत्यक्ष तुकारामांनी आपल्या अभंगात कोणतीही चमत्कारकथा सांगितली नाही व त्यास दुजोराही दिला नसल्याचे केळूसकर वारंवार सांगतात. त्यामुळे जनांच्या उद्धारासाठी सारे आयुष्य वेचणाऱ्या, अत्यंत शुद्ध सरळ आचरणाच्या परमपवित्र तुकारामांचे

'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' असणाऱ्या तुकारामांबद्दल काही शंका असल्यास या महापुरुषाचे प्रत्यक्ष अभंग वाचण्याची विनंती ते करतात.

**तुकारामांच्या कवितेचे केळूसकरकृत गुणविशेष**

'तुकारामांची कविता' या प्रकरणात तुकारामांच्या अभंगांचे वेगळेपण नोंदविले आहे. परंपरानिष्ठ कवितेपेक्षा तुकाराम कवितेचे गुणविशेष सांगितले आहेत. त्यांची सारी कविता ही धर्मसंबंधी असून स्वकर्तव्यबुद्धीने सहजस्फूर्तपणे लिहिली गेली आहे, असे सांगून या कवितेची पुढील वैशिष्ट्ये केळूसकर नोंदवितात. सहृदयता हा या कवितेचा मुख्य गुण आहे. प्रेमळपणाचा संसार व कीर्तनप्रसंगादीचे सहजोद्गार वाचकहृदयात सहृदयतेचा वेगळा ठसा उमटवितात. तुकारामांची कविता गूढ वा दुर्बोध नाही. ती वचनस्वरूपाची आहे. ती नित्यव्यवहारातल्या दृष्टांतिकाचा उपयोग करते. ती गंभीर व शांतरसाने परिपूर्ण आहे. ही कविता एकाच वेळी निरक्षरांच्या तसेच पंडितांच्याही मनात प्रेम उत्पन्न करते. अबालवृद्धांच्या तोंडी तुकारामांची वचने खेळत असून या वचनांच्या आवाहनप्रियतेचा परामर्श केळूसकर घेतात. तुकारामांचा एकेक अभंग हे एक स्वतंत्र वचनच असते. त्यामध्ये समग्रता, बोध आणि संक्षिप्तरूप असते हा विशेष त्यांना महत्त्वाचा वाटतो.

तुकारामांच्या थोरवीचे महत्त्व सांगताना केळूसकरांनी लिहिले आहे.'धर्मसिद्धान्त इतक्या सोप्या रीतीने व मनावर पूर्णपणे ठसण्यासारखे समजावून देण्याची कला महाराष्ट्रातील कोणाही कवीस किंवा ग्रंथकारास साधलेले नाही. यास्तव तुकारामांचे समग्र महाराष्ट्रावर मोठे उपकार झाले आहेत. पंडित-अपंडित, वृद्ध, तरुण, स्त्रिया या सर्वांस त्यांचे अभंग अगदी सहजरीतीने आध्यात्मिक ज्ञान करून देणारे आहेत.' यानंतर त्यांनी तुकारामांनी अभंग कोणत्या प्रसंगी रचले ते सांगून या अभंगांची काही वर्गीकृत सूत्रे सांगितली आहेत. कीर्तनभजनादी प्रसंगी हे अभंग घडले आहेत. स्वतःसंबंधी, वैराग्यपर, भक्तिविषयक, ज्ञानसंबंधी आख्याने, भगवद्गीता व चरित्रपर असे अभंगांचे वर्गीकरण केले आहे. या अभंग वर्गीकरणास तुकाराम तात्या पडवळ यांच्या विभागणीचा आधार घेतला आहे. एकोणिसाव्या शतकातील ब्रिटिश अधिकाऱ्यांचे गाथा प्रकाशित करण्याच्या प्रयत्नाचा या प्रकरणांती आवर्जून उल्लेख केला आहे. मुंबई इलाख्याचे गव्हर्नर नेक नामदार सर बार्टल फीअर व अलेक्झांडर ग्रॅण्ट साहेबांनी या कामी पुष्कळ लक्ष घालून तुकारामांचे चोपड्यात बंदिस्त हस्तलिखित प्रकाशात आणले. या काळी सरकारी तिजोरीतून अभंग छापण्यास रु. २४००० खर्चही आल्याचे

ते नोंदवितात. या ब्रिटिश अधिकऱ्यांसह शंकर पांडुरंग पंडित व जनार्दन सखाराम गाडगीळ यांच्या साहाय्याचा उल्लेख ते करतात. एकूणच या प्रकरणात केळूसकरांनी तुकारामांच्या अभंगाची वैशिष्ट्ये, अभंग आवाहनपरता व अभंग विषय विभागणी याचा विचार केला आहे.

'तुकारामाची मते' या प्रकरणात तुकारामांच्या विविध विचारांचा परामर्श घेतला आहे. धर्म, तत्त्वज्ञान व जीवनविषयक धारणांचा यात समावेश आहे. तुकारामांच्या ईश्वरविषयक व जातविषयक कल्पनेचा ऊहापोह आहे. वारकरी पंथाची जातीबद्दलची सर्वसमावेशकता सांगून ईश्वरभक्ती व कैवल्यप्राप्तीस जातिभेद आडवा येत नसल्याचे केळूसकरांनी नोंदविले आहे. तुकारामांची विचारमते केळूसकरांनी फार ठाशीवपणे सांगितली आहेत. केळूसकरांच्या या प्रकरणातील विवेचनावर ब्राह्मणेतर विचारदृष्टीचा प्रभाव आहे. तुकाराम पूर्वकालीन व समकालीन परिदृश्याच्या पार्श्वभूमीवर तुकारामांनी केलेल्या वेगळेपणाचा निर्देश केळूसकर करतात. त्याकाळातील वर्णाधिकार प्रभुत्व, ब्राह्मणी प्रभावातील कठोर योग साधनेच्या भक्तिपेक्षा नवविधा भक्तीला तुकारामांनी महत्त्व दिले.'नलगे हा लौकिक सोडावा वेव्हार' या दृष्टीने तुकारामांनी चित्तशुद्धी व गुरुमाहात्म्य विशद केले. ईश्वर आणि भक्त यातला मध्यस्थ काढून टाकला. संस्कृत भाषेचे माहात्म्य काढून टाकले. 'वेडेवाकडे गाईन । परी मी माझा म्हणवीन ।।' या ब्रीदाला तुकारामांनी महत्त्व दिले. कर्मकांड व ब्राह्मणांचे महत्त्व कमी करून मानसपूजेला महत्त्व दिले. नवे मतस्वातंत्र्य व आचार स्वातंत्र्य त्यात केंद्रीय होते. केळूसकरांनी या प्रकरणात ईश्वराला 'मायबाप प्रभू' म्हटले आहे, हेही लक्षात घ्यावे. एका बाजूला तुकारामकालीन धर्म व समाजजीवनातले प्रभुत्व संबंध ते ब्राह्मणी-अब्राह्मणी परिप्रेक्ष्यात न्याहाळत आहेत. तर दुसऱ्या बाजूला प्रबोधनकाळातील विचार जागृतीचा त्यांवर प्रभाव आहे.

याच प्रकरणात तुकारामांच्या ईश्वरविषयक मतांचाही परामर्श आहे. तुकारामांची ईश्वरविषयक कल्पना ही अद्वैतवादी, वेदांतमतवादी होती. जीवात्मा परमात्मा एकरूप होता. समग्र विश्व ब्रह्मरूपी आहे. अनेकत्वात एकत्व सामावलेले आहे. तुकारामांच्या या अद्वैतवादी विचारांची विस्ताराने मांडणी केळूसकर करतात. तुकाराम क्षुद्र देवतांचा निषेध करतात. 'जाखाई जोखाई- मायराणी मेसाबाई । गणोबा विक्राळ-लाडूमोदकांचा काळ' या अभंगात तुकारामांनी गणपतीलाही क्षुद्र देवतात बसविले आहे. त्याचेही ते निराकरण करतात. या ठिकाणी तुकाराम आणि फुले यांच्या गणपतीविषयक प्रतिमेतील

अनुबंध ध्यानात घ्यावा. 'तुका म्हणे एक विठ्ठलचि खरा । येर तो पसारा वाऊगाचि' या वचनाधारे तुकारामांची ईश्वरविषय कल्पना स्पष्ट केली आहे.

उपसंहार या प्रकरणात तुकारामचरित्र समाप्ती विवेचनाचा शेवट केला आहे. तुकारामांच्या निधनानंतर २५० वर्षांनी प्रकाशित होत असलेल्या तुकाराम चरित्राचे वेगळेपण नोंदविले आहे. या शेवटच्या टिपणावरही आधुनिक इतिहास लेखनाचा प्रभाव आहे. त्यांनी म्हटले आहे, 'आमच्या देशामध्ये खरा विश्वसनीय असा व्यक्तीविषयक किंवा राष्ट्रविषयक इतिहास लिहून ठेवण्याची पद्धती पुरातन काळी म्हणण्यासारखी मुळीच नाही.' या दृष्टिकोनाच्या प्रभावातून या चरित्रलेखनाचा उलगडा झाला आहे. अखेरीस तुकारामांबद्दल पुढील गौरवोद्गार काढले आहेत. 'सद्भाव, सदाचार, निरंहरकारता, परोपकारबुद्धी, विनय, मनोनिग्रह इत्यादी ज्या उज्ज्वल सद्वृत्ती त्यांचा पूर्ण विकास झालेला ज्यास पाहणे असेल, त्यांना या तुकारामासारख्या अत्यंत विरल महात्म्याच्याच ठायी आढळतील. असा हा जगदुदाहरक अद्वितीय साधू आमच्या महाराष्ट्रात निर्माण झाल्याबद्दल आम्हास मोठा अभिमान वाटला पाहिजे' असे तुकारामथोरवीचे उद्गार केळूसकरांनी काढले आहेत.

**शैलीविशेष**

केळूसकरांची शैली ही प्रासादिक व प्रगल्भ स्वरूपाची आहे. सर्वसामान्यांना व नव्याने शिक्षित झालेल्या समाजाला तुकारामांच्या चरित्राचा बोध नीट व्हावा यादृष्टीने ते लिहिले आहे. एका थोर माहात्म्याचे चरित्रामृत सुबोध भाषेत सांगितले आहे. त्यामुळे या कथनावर निरुपणकाराचा बाज आहे. तसेच चरित्रनायकाविषयी आस्थेचा ममत्वभाव आहे. त्यामुळे या निवेदनात सतत 'आमचा चरित्रनायक' असा शब्दप्रयोग येतो. एका महामानवाचे गोष्टीरूप चरित्र आपण सांगत आहोत, याचे भान सतत त्यांच्या कथनात आहे. ही गद्यकथा तांत्रिक वा कंटाळवाणी होऊ न देता. तुकाराम हे मुख्य केंद्र कल्पून तुकारामकाळ सजीव केला आहे. वाचकाचे भान तुकाराम केंद्रावरून ढळू नये याकडे केळूसकरांचा सतत कटाक्ष आहे. 'पदाजीस शंकरनामे पुत्र झाला' अशी जुन्या मराठी वळणाची निरूपणशैली या गद्य वर्णनात आहे. घटना, प्रसंग, व्यक्ती जीवनातील नाट्य, संघर्ष व भावस्थितीचे फार हृदयभेदक वर्णने या चरित्रात आहेत. काही प्रसंग, उदा. तुकारामांच्या अंतकाळीचे वर्णन हे कादंबरीतल्या वर्णनाला शोभलसे असे आहे. या भाषेवर एकोणिसाव्या शतकातील मराठी भाषेचा तसेच ग्रांथिक विवेचनपर गद्याचादेखील प्रभाव आहे. 'घरात काही खुडूक मुडूक

होते' अशी काही वाक्ये विवेचनात आहेत. या निवेदनात त्या काळातील शब्द जरी आपण पाहिले तरी या गद्यशैलीचे स्वरूप ध्यानात येईल 'कागाळी,' 'लोभ- जडे,' 'माता- पितरे', 'तगादा,' 'जिनसा,' 'गोणी,' 'मातेरे', 'चिरगुट पांघरून' असे शब्द जागोजागी आढळतात. हे कथन सुबोध अल्पाक्षरी स्वरूपाचे आहे. तसेच तीमध्ये आकलन सुलभता मोठ्या प्रमाणात आहे.

केळूसकरांच्या या संहितेतील कथनाचादेखील विचार करायला हवा. एका महासाधूच्या मानवी चरित्रपटाचा हा विवेकवादी दृष्टिकोनातून आस्थाभावाने घेतलेला शोध आहे. त्यामुळे या कथनात चरित्रनायकाविषयी प्रेमभाव आहे. त्याचा बाज हा लोकप्रिय कथनाचा आहे. 'सांगणे' या संहितेत केंद्रवर्ती आहे. महाराष्ट्रीय जीवनातील लोकप्रिय कहाणी कथनाचा बाज या निवेदनास आहे. त्यामुळे या गद्यानुवादास गोष्ट सांगण्याचे स्वरूप प्राप्त होते. चर्चात्मक विवरणात्मक टोक सतत सक्रीय ठेवून या संहितेवर गोष्ट सांगण्याचा प्रभाव कायम राहतो. 'पुण्यापासून सुमारे आठ कोसांवर इंद्रायणीनामक एका नदीच्या तीरी देहू म्हणून एक गाव आहे,' असे कहाणीकथन तीमध्ये आहे. धर्मकथांच्या स्वरूपाचे कहाणीकथन तीमध्ये आहे. तुकारामांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनाक्रमांची एक साखळीबद्ध सुसंगत कालपटाची संरचना सिद्ध केली आहे. एकेका प्रकरणात तो घटना प्रसंग ध्यानात घेऊन प्रकरणारंभी या विषयासंबंधीचे तुकारामांचे एक किंवा दोन अभंग दिले आहेत. जेणेकरून त्या विषयाच्या पोटात जाण्याचा मार्ग सुकर व्हावा. प्रकरणमध्यमात तुकारामांचे प्रस्तुत विषयानुरोधाने अनेक अभंग देऊन  चर्चात्मक विवरणाचा, 'म्हणण्या'चा टोण ठेवला आहे. तर प्रकरणांती त्याच विषयासंदर्भात महत्त्वाचा अभंग देऊन त्यास विराम दिला आहे. या क्रमाने ही सबंध संहिता घडविली आहे. कीर्तनकारबुवाच्या कथनाचा पट असावा त्याप्रमाणे.

तसेच या कथनात संवादाचाही विपुल वापर आहे. तुकारामकालीन अनेक व्यक्तींच्या उपस्थिती बोलण्यातून या कथनाला भक्कमपणा प्राप्त करून दिला आहे. तुकारामांचे पूर्वज, वडील, पत्नी, मुलगा व इतरही व्यक्तींच्या बोलण्यामुळे या कथनास बहुमितीपण प्राप्त झाले आहे. 'बाळा आता मी म्हातारा झालो आहे', असे तुकारामांच्या वडिलांनी म्हणणे. याप्रमाणे वाचकांशी विश्वासार्हतेचे नाते प्राप्त होते. त्यामुळे स्वाभाविक हे कथन आवाहनप्रिय होते. केळूसकरांच्या या गद्यशैलीवर एकोणिसाव्या शतकातील मराठी गद्याचा प्रभाव आहे. तसेच ते नियतकालिकातून प्रकाशित झाले त्यावेळच्या नागर शिक्षित वाचकाच्या उपस्थितीचे भान असावे. कोणत्या प्रकारचा वाचक उपस्थित

आहे. त्यामुळे माध्यम आणि ते कोणासाठी याच्यातील संबंध इथे गृहीत धरले आहेत. तसेच संस्कृती रचितातील विशिष्ट वर्गाच्या उपस्थितीचाही दाब त्यांच्या गद्यसंभाषितावर असावा.

**तुकाराम चरित्रलेखनाचे विशेष**

केळूसकरांच्या तुकाराम चरित्राचे वेगळेपण विविध गोष्टींमध्ये सामावलेले आहे. एकतर या चरित्राला ऐतिहासिक असे महत्त्व आहे, तुकारामाविषयीचे हे पहिले चरित्र आहे. त्यामुळे त्याकडे प्रथमपणाचा मान जातो. ज्या काळात चरित्रलेखनाची प्राथमिक अवस्था मराठी लेखनपरंपरेत होती. त्यामध्ये आधुनिक दृष्टीचा अभावदेखील होता. साधन सामग्रीची जुळवाजुळव, उपलब्धता, तथ्य तपासणी अशा शिस्तशीर बाबींचा अभाव होता त्या काळातला हा चरित्रग्रंथ आहे. त्यामुळे मध्यकाळातील वारकरी संप्रदायातील महाराष्ट्र संस्कृतिपुरुषाचे चरित्र कथन करण्याचे ऐतिहासिकदृष्ट्या पहिले श्रेय केळूसकरांकडे जाते.

शिवाय केळूसकरांची तुकारामांसारख्या संस्कृती पुरुषांकडे पाहण्याची दृष्टी ही ध्येयवादाची होती. बुद्ध, तुकाराम आणि शिवाजी महाराज या महापुरुषांच्या चरित्राचा मराठी वाचकांना परिचय करून देण्याचे श्रेय केळूसकरांकडे जाते. आज ज्या तऱ्हेने आधुनिक चरित्रलेखनाचा व इतिहासपुरुषांच्या कार्याच्या अन्वेषण दृष्टीचा विस्तार झाला आहे. ती पद्धत केळूसकराकडे जरी काही प्रमाणात कमी असली तरी मराठी संस्कृतीतील त्यांच्या लेखनाचे मोल हे बहुविध स्वरूपाचे आहे. केळूसकरांच्या लेखनदृष्टीत इतिहासविषयीचे एक वेगळे असे भान होते. भारतीय विचारक्षेत्रांवर एका विशिष्ट प्रभुत्ववादी जातिनिष्ठ गटाचे वर्चस्व आहे. सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रांत या धुरीणत्व प्रस्थापित व्यवस्थेचे नियंत्रण आहे. ते आपल्या विचारदृष्टीतून लेखन करत आहेत याची मर्यादा केळूसकरांना कळलेली होती. त्यामुळे आपण पर्यायी इतिहास लिहावा. पर्यायी मांडणीचे प्रारूप सर्वसामान्य नवशिक्षित वर्गापुढे ठेवावे, अशी त्यांची धारणा होती. यादृष्टीने सामाजिक, धर्म व नीतिवादी दृष्टीने विवेकवादी विचारांची मांडणी करणाऱ्या नायकाचे इतिहास आपण लिहावेत. तसेच हे चरित्रनायक प्राचीन काळातील असोत वा आधुनिक काळातील असोत. नवी वाट निर्माण करणाऱ्या इतिहास समाजपुरुषांबद्दल लिहावे ही दृष्टी त्यांच्या लेखनामागे होती, म्हणून ते बुद्ध, शिवाजी, तुकाराम तसेच आपल्या लगतच्या काळातील व्यक्तींबद्दल लिहीत होते. पर्यायी दृष्टीतून अशा व्यक्तींच्या जीवनकार्याचा शोध घेणे. प्रस्थापित एकजातीय वर्चस्ववादी दृष्टीपेक्षा नव्या दृष्टीतून कानोसा घेणे व लोकांपुढे मांडत राहावे याला त्यांनी महत्त्व दिले. आज ज्याला आपण नवा इतिहास, पर्यायी इतिहास, तळाचा

इतिहास व बहुजन इतिहास म्हणूयात अशा इतिहासलेखन प्रकल्पाची पायाभरणी केळूसकरांनी केली. धर्म व जीवनाकडे विवेकाच्या व विज्ञानाच्या दृष्टीने पाहण्याचे श्रेय त्यांच्या लेखनकामगिरीकडे जाते.

केळूसकर यांच्या या विविधस्वरूपी वाटणाऱ्या लेखनकामगिरीकडे पाहून अचंबित व्हावे असे आहे. तसेच त्यांच्या बहुविध कामगिरीमुळे त्यांना वैचारिक व सांस्कृतिक क्षेत्रांत इतिहासकार म्हणून मान्यताही मिळाली. 'इतिहास लिहिताना सत्याचाच अवलंब करावयाचा असतो. मग तो कोणाला विषाद करणारा असो, किंवा आनंद करणारा असो' त्याची क्षिती सत्यप्रिय इतिहासकाराने कदापि बाळगता कामा नये त्याने सत्याचे प्रकाशन व समर्थन बिनधोकपणे केले पाहिजे. लोकाराधनेची पर्वा करणाराच्या हातून सत्य प्रकाशन फारसे कधी होत नसते' असे त्यांनी आपल्या आत्मचरित्रात स्वच्छपणे म्हटले आहे. (पृ. १०३) या त्यांच्या दृष्टीचा प्रभाव त्यांच्या सर्वच लेखनावर आहे. इतिहासाविषयी इतकी सुस्पष्ट भूमिका केळूसकरांची होती. त्यांच्या या दृष्टीचा त्यांच्या लेखनावर प्रभाव आहे. १९३० साली केळूसकरांनी मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या एकविसाव्या वार्षिक समारंभाच्या अध्यक्षीय भाषणात ' ग्रंथ आणि ग्रंथालये' या विषयावर विस्तृत असे भाषण दिले या भाषणातही ते शास्त्रीय ज्ञानाचे महत्त्व सांगून धर्मपर वाङ्मयाभ्यासाचे वेगळेपण सांगितले आहे. संतसाहित्याचा अभ्यास हा सूक्ष्म बुद्धीने व चिकित्सापूर्वक करून साधुसंतांच्या बोधाचे सार सुसंगत व सुबोध रीतीने सामान्यजणांपुढे गद्यरूपाने मांडणे इष्ट आहे' असे म्हटले होते.

तुकारामबावांच्या या चरित्रसंहितेची काही वैशिष्ट्ये आहेत. एकतर केळूसकरांकडे महिपतीचे रसाळ असे तुकाराम चरित्र होते व दुसऱ्या बाजूला लोकपरंपरेतील तुकारामांविषयीच्या माहितीचा ऐवज याआधारे केळूसकरांनी आपल्या अभ्यासाची व विचारांची जोड देऊन तुकाराम कथेचा सांगाडा रचला. महिपतीच्या संहितेचा विमुक्त वापर केळूसकरांनी या चरित्र लेखनात केला.

केळूसकरांच्या या तुकारामचरित्राचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लोकपरंपरेत तुकारामांच्या चरित्राभोवती ज्या अद्भुताचे चमत्कारचरित्राची मोहक गुंफण होती; त्या चमत्कार अतिशयोक्तीपूर्ण चरित्रघटनांना केळूसकरांनी फाटा देऊन तुकारामाचे लौकिक चरित्र मांडण्याचा प्रयत्न केला. एका अर्थाने आज मराठीत तुकारामांच्या संतकवी व वारकरी संप्रदायातील भक्तकवींच्या लौकिकीकरणाची प्रतिमा रूढ व्हायला आरंभकाळातील या चरित्राकडे जाते. तुकारामांच्या आयुष्यातील अनेकविध चमत्कारांना, अतिशयोक्ती घटनांना बाजूला सारून तुकाराम चरित्राची मांडणी

केळूसकरांनी केली. केळूसकरांच्या चरित्रलेखनाचा इत्यर्थ त्यांच्या दृष्टिकोनातून व्यक्त झाला आहे. तुकारामाचे पूर्वज विश्वंभरांच्या विठ्ठल भक्तीतून ते व्यक्त झाले आहे ते असे, विश्वंभरबुवा म्हणतात, ह्या वेदांताच्या उपपत्तीनी माझे समाधान होत नाही. निर्गूण निराकार ब्रह्माची उपासना कोणी कशी करीत असेल ती असो, सगुण ब्रह्माच्या ठिकाणी माझे प्रेम जडले आहे, आणि ते पंढरीक्षेत्रातच पहावयास मिळते, या विश्वंभरबुवाच्या ईश्वरी पूजनातच केळूसकरांची भूमिका दडलेली आहे. निर्गूण निराकार ब्रह्मोपासनेपेक्षा सगुण भक्तीची उपासना असा चरित्रपट त्यांना उभा करावयाचा आहे.

यासाठी केळूसकरांनी एक मार्ग निवडला तो म्हणजे महिपतीच्या चरित्राची संहिता समोर ठेवून प्रत्यक्ष तुकारामाचे अभंग त्याच्या चरित्राबद्दल काय सांगतात हा दृष्टिकोन ठेवून त्यांनी तुकारामचरित्र लिहिले आहे. प्रत्यक्ष निर्मात्याचा शब्दच त्यांच्या चरित्राचा कोणता ऐवज पुरवितो. संहिताच्या आविष्कारातून चरित्रार्थाचे कोणते आवाज साकार होतात. यावर केळूसकरांनी भिस्त ठेवली. त्यामुळे तुकारामांच्या अभंग संहितेतून त्यांच्या आयुष्यातले विविध घटना प्रसंग याबद्दल कोणते  ध्वन्यर्थ निघतात ते पाहिले आहे. त्या त्या प्रसंगाचे निवेदन करणाऱ्या अभंगांची देखील त्यांनी विभागणी केली आहे. जरी त्यांच्या समोर तुकाराम तात्या पडवळ व शंकर पांडुरंग पंडित व सांप्रदायिक गाथा असल्या तरी एवढ्या विस्तृत अभंगांतून त्या त्या परिस्थितीचे कथन करणारे अभंग निवडणे ही कठीण अशी गोष्ट आहे. अभंगाच्या सूक्ष्म वाचनातून चरित्रपट मांडण्याचा हा प्रयत्न आहे. त्यामुळे महिपतीचे पद्यातले चरित्र आणि प्रत्यक्ष तुकारामांचे अभंग यांच्या समांतर विवेचनातून तुकाराम चरित्राला एक सुसंगतता आणि विश्वासार्हता लाभली आहे. विसाव्या शतकाच्या अखेरकाळात आत्मचरित्रकार तुकाराम व अस्तित्वानुभवी तुकाराम प्रतिमा प्रस्थापनेचा जो प्रयत्न झाला, त्याची बीजे केळूसकरांच्या या चरित्रग्रंथात पहायला मिळतात. केळूसकरांच्या या चरित्रातील सूक्ष्म अर्थवाटा अलीकडील काही ललित लेखकांना आवाहनपर वाटत आल्या आहेत. तुकाराम चरित्राधारित काही कथा आधुनिक काळात लिहिल्या आहेत. त्या चर्चाविषय ठरल्या, त्या कथांची पूर्वबीजे केळूसकरांच्या या चरित्रात आहेत असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

केळूसकरांची चरित्रलेखनाची वहिवाट पुढे अनेक अभ्यासकांनी हाताळलेली आहे. प्रत्यक्ष तुकारामांचे अभंग हाच त्यांच्या चरित्राचा पुरावा या वाटेने पुढील चरित्रे लिहिली गेली आहेत. याचे बरेचसे श्रेय या आरंभकालीन चरित्रास जाते. १९२०

साली प्रसिद्ध झालेल्या ल. रा. पांगारकर यांच्या तुकाराम चरित्रात असे म्हटले आहे, ‘ह्या ग्रंथाची इमारत कोणत्या आधारांवर उभारली आहे. याचा उलगडा करणे आवश्यक आहे. पहिला आणि मुख्य आधार म्हणजे तुकोबांचे अभंग हा होय. तुकोबांचे चरित्र त्यांच्या अभंगातच उत्कृष्ट लिहिले गेले आहे’. (सहा) तर पुढे दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांनी तुकोबांची महागाथा हा आत्मचरित्राचा आदर्श वस्तुपाठ असल्याचे म्हटले आहे. यादृष्टीने केळूसकरांचे तुकारामचरित्र आणि त्यांच्या उत्तरकालीन तुकारामचरित्रे या संहितांचा तौलनिकदृष्ट्या अभ्यास होऊ शकतो. तसेच तुकारामांच्या अभंगांचे विषयसूत्रानुसारी केलेले वर्गीकरण महत्त्वाचे आहे. पुढील काळात तुकारामांच्या अभंगांची विषयसुत्रानुसारी अनेक संपादने झालेली दिसतात. त्याचे पूर्वरूपही तुकारामांच्या या चरित्रात आहे.

केळूसकरांच्या या चरित्रग्रंथाचा गौरव करताना धनंजय कीर यांनी त्यांचा निस्सीम सरस्वतीभक्त व साधुग्रंथकार असा गौरव करून पुढे म्हटले आहे. ‘संतचरित्रे कशी लिहावी हे केळूसकरांसारख्या एका विख्यात चरित्रकाराने महाराष्ट्रास बहुधा प्रथमच सांगितले, ते मत यथार्थच आहे. सत्यनिष्ठा, चिकित्सा व माहिती पडताळून पाहण्याचा आग्रह हा केळूसकरांचा स्थायीभाव त्यात दिसून येतो’ (‘गुरुवर्य कृष्णराव केळूसकर आत्मचरित्र व चरित्र’-संपा. धनंजय कीर, १९७७, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय १४९-५०)

एकंदरीत केळूसकरांच्या या तुकाराम चरित्राला अनेकार्थांनी महत्त्व आहे. ऐतिहासिक तसेच सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिकदृष्ट्या या चरित्राचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. दंतकथा व चमत्कारकथांच्या जोखडातून संतपुरुषांना काढून वस्तुनिष्ठ विवेकाच्या पायावर उभे करण्याची दृष्टी केळूसकरांच्या चरित्राने दिली. तुकाराम अभ्यासशाखेच्या भविष्यातील अनेक अभ्यासाची कळसूत्रे या चरित्राने सिद्ध केली. विज्ञान व सत्यनिष्ठ चरित्र लेखनाचा वस्तुपाठ दिला. शेंदूराखाली झाकोळलेल्या महापुरुषांच्या मानवी लौकिक चित्रपटाकडे पाहण्याची नवी दृष्टी दिली. तसेच राष्ट्रबांधणीच्या प्रकल्पात अशा पर्यायी समांतर इतिहासलेखनाचा वस्तुपाठ निर्माण करून दिला. याचे ऐतिहासिक श्रेय निश्चितच कृष्णराव अर्जुन केळूसकरांच्या चरित्रलेखन प्रकल्पाकडे जाते.

**– रणधीर शिंदे**

---

(प्रस्तुत ग्रंथाची प्रस्तावना लिहीत असताना श्री. बाबा भांड, डॉ. राजन गवस व डॉ. अशोक चौसाळकर यांच्याशी झालेल्या चर्चेचा उपयोग झाला.)

# तुकारामबावांचे चरित्र

(आध्यात्मिकज्ञानरत्नावलीत खंडशः प्रसिद्ध झालेले)

********

हे चरित्र


## रा. रा. कृष्णराव अर्जुन केळूसकर


यांनी

आध्यात्मिकज्ञानरत्नावलीत मासिक पुस्तकासाठी लिहिले

ते


## रा. रा. लक्ष्मणराव पांडुरंग नागवेकर आणि कंपनी

यांनी

छापून प्रसिद्ध केले

********

मुंबई

'सुबोधप्रकाश' छापखाना

********

सन १८९६

किंमत सव्वा रुपया

## प्रस्तावना....

हे चरित्र 'आध्यात्मिकज्ञानरत्नावली' मासिकपुस्तकासाठी लिहिले असून त्यात ते खंडशः समग्र प्रसिद्ध झाले आहे.

आजपर्यंत तुकारामबावांचे गद्यरूप विस्तृत चरित्र कोणीही लिहिले नव्हते. ते आम्ही उपलब्ध असलेल्या सर्व माहितीचा आधार घेऊन लिहिले आहे. हे चरित्र तयार करताना जितका भाग ऐतिहासिक व खरासा भासला तितकाच ग्रंथित केला आहे. *भक्तिविजय, संतलीलामृत* व *संतविजय* या ओविबद्ध ग्रंथांत महिपतीने जी भक्तजनांची चरित्रे लिहिली आहेत, त्यात आपल्या वेळच्या लोकप्रवादांप्रमाणे चमत्काराची अगदी रेलचेल करून सोडली आहे; परंतु सांप्रतकाळी सुशिक्षित जनांचा या चमत्कारप्रकरणावर मुळीच भरवसा नाहीसा झाला आहे. यामुळे त्या चरित्रांतील खऱ्या ऐतिहासिक भागावरही त्यांची अश्रद्धा होण्याचा संभव आहे. यासाठी महिपतीसारख्या ग्रंथकारांचा आधार घेऊन जे कोणी आपल्या देशात पूर्वी होऊन गेलेल्या महापुरुषांची गद्यरूप चरित्रे लिहितील त्यांनी चमत्कारप्रकरण गाळून खरा ऐतिहासिक असा जितका भाग दिसेल तितकाच घेण्याचा प्रयत्न करणे इष्ट होय. हे लक्षात आणून प्रस्तुत चरित्र लिहिले आहे. ते लोकादरास कितपत पात्र होते ते पाहणे आहे. आमच्या चमत्कारप्रिय भाविक लोकांस हा प्रयत्न फारसा आवडणार नाही; परंतु जे आपणास सत्यसे वाटते त्याचाच पुरस्कार कायावाचामनेकरून करावा हे मानवाचे कर्तव्य आहे. त्यास अनुसरून प्रस्तुत प्रयत्न केला आहे.

चरित्र लिहिण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग असल्यामुळे त्यामध्ये बरीच व्यंगे अभिज्ञास दिसून येतील; परंतु त्याबद्दल त्यांनी क्षमा करून या प्रयत्नास साहाय्य करावे, एवढेच त्यांच्यापाशी मागणे आहे.

शेवटी ज्यांनी ज्यांनी आजपर्यंत या साधूच्या गाथा किंवा चरित्रे प्रसिद्ध केली आहेत, त्या सर्वांचे मला पुष्कळ साहाय्य झाले आहे. त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

**– कृ. अ. केळूसकर**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| उपक्रम | .. | १ |
| कुलवृत्त | .. | ४ |
| बाल्यावस्था | .. | ९ |
| संसारप्रवेश | .. | १२ |
| संसाराविषयी वैराग्य | .. | १७ |
| वैराग्यवृत्ती | .. | २६ |
| कवित्वस्फूर्ती | .. | ३४ |
| छळ | .. | ३८ |
| शिष्यवर्ग | .. | ५५ |
| तुकाराम, शिवाजी आणि रामदास | .. | ६९ |
| अंतकाळ | .. | ८८ |
| बायकामुले | .. | १०४ |
| चमत्कार प्रकरण | .. | ११३ |
| तुकारामाची कविता | .. | १३३ |
| तुकारामाची मते | .. | १४० |
| उपसंहार | .. | १५७ |

# उपक्रम

*येथे न तर्पिला तो सुतृषित चातक करील आ जितुका ।।*
*जो जो मुमुक्षु त्याते त्याते करितो सुतृप्त आजि तुका ।।१।। मोरोपंत.**
*जयाची वदे पूर्ण वेदांत वाणी ।। ह्मणावे कसे हो तयालागी वाणी ।।*
*परब्रह्मरूपी असा जो तुकावा ।। तयाचे तुकी कोण ऐसा तुकावा ।।१।। वामनपंडित.*

आपल्या ह्या महाराष्ट्रामध्ये पूर्वकाळी जे महान महान साधू होऊन गेले त्यामध्ये तुकारामबावाची गणना फार मोठी आहे. तो जातीचा मराठा असून आपल्या ठायीच्या अद्वितीय भक्तितेजाने व प्रासादिक अभंगवाणीने एकंदर महाराष्ट्रीयांच्या पूज्यतेस व मान्यतेस पात्र झाला आहे. ह्या प्रेमळ भगवद्‌भक्ताचा चरित्रमहिमा वामन, मोरोपंत, महिपती आदिकरून सर्वमान्य कवींनी मोठ्या प्रेमाने गाईला आहे. तेव्हा त्याचा अल्पमात्र अनुवाद गद्यरूपाने केला असता तो भाविक जनास अत्यंत ग्राह्य होईल असे वाटते.

शालिवाहन शकाच्या सातव्या शतकाच्या सुमारास शंकराचार्य नामेकरून एक महातेजस्वी ब्रह्मनिष्ठ पुरुष निर्माण होऊन त्याने व्यासकृत शारीरभाष्य व भगवद्गीता या उपनिषत्सारभूत ग्रंथद्वयावर भाष्य केले आणि वेदविहित सत्यधर्माचा प्रचार सर्वत्र सुरू केला. ह्या जगद्गुरूने पूर्वकालीन कर्मकांडाभिमानी ब्राह्मणवर्गाशी वादविवाद करून स्वाभिमत धर्ममार्गाची स्थापना केली. हा धर्ममार्ग भक्तिप्रधान असून जीवात्मा व परमात्मा यांच्या ऐक्याचा प्रतिपादक आहे. पुढे शालिवाहन शकाच्या बाराव्या शतकात मुकुंदराज नामेकरून एका संस्कृतज्ञ विद्वान ब्रह्मनिष्ठाने विवेकसिंधुनामक एक प्राकृत ओवीबद्ध ग्रंथ केला. त्यात शंकराचार्यांच्या वेदांतमताचे विवरण केले आहे. हा आमच्या भाषेतील प्रथम ग्रंथ होय. शंकराचार्यांच्या वेळापासून जो एक प्रकारचा भक्तिमार्ग महाराष्ट्रात सर्वत्र प्रचलित झाला होता त्याचे अवलंबन करणाऱ्या प्राकृतजनांस ह्याच ग्रंथाच्याद्वारे प्रथमत: अद्वैतमताचे ज्ञान प्राप्त होण्याची सोय झाली. पुढे शालिवाहन शकाच्या तेराव्या शतकात ज्ञानेश्वरनामक एक महासाधू निर्माण झाला. त्याने वेदांतमत खऱ्या भक्तिमार्गाचे विघातक नसून उलट ते त्या मार्गाचे अत्यंत परिपोषक आहे, असे

* रा. रा. तुकारामतात्याकृत तुकारामाची गाथा भा. १, पृ. २७, २८.

भगवद्गितेवर भावार्थदीपिका नावाची प्राकृत ओवीबद्ध टीका करून प्रतिपादन केले. इतकेच नव्हे तर त्याने स्वत:च्या आचरणानेही स्वमताची सत्यता महाराष्ट्रजनांच्या प्रत्ययास उत्तम प्रकारे आणून दिली. हा टीकारूप प्राकृत ग्रंथ हल्ली ज्ञानेश्वरी या नावाने प्रसिद्ध झाला आहे. ज्ञानेश्वराने आणखी अमृतानुभव व समास असे दुसरे दोन ग्रंथ स्वमतपुष्ट्यर्थ प्राकृत भाषेत लिहिले आहेत. त्याचप्रमाणे त्याने पुष्कळ अभंग व पदेही केली आहेत. ह्या सर्वांमध्ये भगवद्भक्तीचा महिमा विशद केला आहे. नामदेवशिंपी, सावतामाळी, गोराकुंभार, कबीरमुसलमान वगैरे साधू ज्ञानेश्वराचे समकालीन होते. या साधूंपैकी नामदेव व कबीर यांनीही भक्तिरसप्रधान कवने केली आहेत. नामदेव व त्याच्या घरच्या जनाबाई वगैरे मंडळीने तर अभंगादी अत्यंत सुगम कवने हजारो हजार केली आहेत.* या सर्व कवनांच्या योगाने अमृतोपम असा सात्त्विक भक्तिरस सर्व महाराष्ट्रीयांस सुलभ झाला. ह्या अत्यंत प्रासादिक व प्रेमळ कवनांच्या प्रभावाने महाराष्ट्रामध्ये भक्तिवैराग्यादी शांत वृत्तीचा उत्कर्ष होऊन सदाचार व खरी धर्मनिष्ठा यांचा विकास झाला. निर्गुण, निर्विकार असे जे परब्रह्म- जे खऱ्या कैवल्याचे केवळ निधान-ते सगुण ब्रह्माच्या नवविधा भक्तीने** पाहिजे त्यास सुसाध्य झाले आणि यज्ञादी कर्मकांडाच्या खटपटीत निमग्न झालेल्या ब्राह्मणमंडळाच्या ठायी जो इतर जनांविषयी नीचत्वाचा भाव वसत होता तो निराधार आहे असे सिद्ध झाले. सर्वत्र भक्तिमार्गाचे महत्त्व वाढून एकंदर कृत्रिम भेदभावांचा लोप झाला. सर्व वर्णांच्या व जातींच्या लोकांस ह्या मार्गाचे अवलंबन करण्याचा अधिकार आहे असे ठरले. म्हणूनच ह्या पूर्वकालीन साधुवृंदामध्ये ब्राह्मण, मराठे, कुणबी, माळी, शिंपी, कुंभार, चांभार, महार वगैरे एकंदर उच्च-नीच मानलेल्या जातींचे जन आढळतात. हे सारे साधू परस्परजातींच्या उच्चनीचत्वाचा विचार चित्तात अणुमात्रही न वागविता परस्परांस पूज्य व सन्माननीय मानीत, किंबहुना ते एकमेकांशी अन्नादी व्यवहार करण्यासही मागेपुढे पाहत नसत. तेव्हा हा असा कृत्रिम भेदभावाचा विध्वंसक धर्ममार्ग कोणास इष्ट व प्रिय वाटणार नाही? आणखी असे की, हा भक्तिमार्ग वृद्धतरुण, स्त्रीपुरुष, अज्ञप्राज्ञ इत्यादी सर्वप्रकारच्या जनांस सारखाच सुलभ व सुगम असल्याकारणाने त्याचा सार्वत्रिक प्रसार होण्यास विलंब लागला नाही.

---

* यांचे जितके अभंग सापडले तितके आमचे प्रसिद्ध ग्रंथकार रा.रा.तुकारामतात्या यांनी छापून भाविक लोकांस सुलभ करून ठेविले आहेत. हा त्यांचा महाराष्ट्रजनांवर मोठा उपकार झाला आहे.

** श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य आणि आत्मनिवेदन हे भक्तीचे नऊ प्रकार होत.

ह्या भगवद्भक्तिपरायण साधुजनांस पंढरपूर हे एक सगुणब्रह्माच्या उपासनेचे सर्वसाधारण स्थल झाले होते. येथे वर्षास दोन वेळा साधुसंतांचा मोठा भव्य मेळा जमून ज्याचा भेटीचा अत्यंत स्पृहणीय असा अमृतयोग घडून येत असे. तेणेकरून त्यांची भक्ती व वैराग्य ही अधिकाधिक दृढ व वृद्धिंगत होत असत. हे प्रेमळ व भाविक भक्तजनांचे संघ पंढरपुरास एकत्र मिळाले म्हणजे त्यांच्या मुखांतून ज्ञानेश्वर, नामदेव, जनाबाई, मुक्ताबाई वगैरे संतमंडळीने रचलेले सहस्रावधी अभंग निघत. त्यांचे श्रवण घडून सामान्यजनांच्या चित्तवृत्ती भक्तिरसाने उचंबळत व ते प्रेमानंदभरात देहभान विसरून नाचू, उडू लागत. त्यांच्या तोंडचे ते भक्तिरसपरिपूरित व प्रासादिक अभंग ऐकून ऐकून पाठ करून ब्रह्मानंदात निमग्न होत.

असा हा सदाचारप्रवर्तक व समतावर्धक भक्तिमार्ग महाराष्ट्रात सर्वत्र प्रसृत झाला असल्याकारणाने येथे वेळोवेळा मोठे मोठे भगवद्भक्त निर्माण झाले आहेत. त्यापैकी काही जणांची चरित्रे महिपतिनामक एका भक्तिपरायण ग्रंथकाराने पद्यरूपाने लिहून ठेविली आहेत. हे सारे भक्तजन पंढरपुरी नियमाने जमत असल्यामुळे कोणाच्या अंगी कितपत भक्ती व वैराग्यही वसत असत हे सर्वांस अनायासे विदित होत असे. त्यातूनही जे साधू आपली केलेली कवने तेथे म्हणून दाखवीत त्यांची कीर्ती चोहोकडे तत्काळ पसरत असे आणि ज्यांची कवने चांगली असत ती लोकांना पसंत वाटून त्यांचा संग्रह ते करीत. ह्याप्रमाणे त्यांची कीर्ती अजरामर होई; पण पंढरपूरच्या वारकऱ्यांमध्ये असे पुष्कळ साधू निपजत की, जे ज्ञानदेव, नामदेव वगैरे साधूंच्या केवळ तोडीचेच असत. लौकिक होण्याचे मुख्य साधन जी कवनशक्ती ती त्यांच्या अंगी नसल्यामुळे त्यांची नावे चिरायू झाली नाहीत इतकेच काय ते. तेव्हा तात्पर्य काय की, ज्ञानेश्वराच्या वेळापासून महाराष्ट्रामध्ये जो हा भक्तिमार्ग सर्वत्र रूढ झाला त्याच्या प्रभावाने आजपर्यंत पुष्कळ साधू आमच्या प्रांतात निर्माण झाले आहेत. आमचा चरित्रनायकही ह्याच साधुमालिकेतला एक होय; परंतु हा महासाधू आपल्या ठायींच्या भक्तिवैराग्यादी परम उज्ज्वल गुणांच्या योगाने व आपल्या अत्यंत बोधप्रचुर व भक्तिपर अभंगांच्या योगाने एकंदर संतमडळाचा शिरोमणी झाला; किंबहुना या संतमंडळीस तो केवळ गुरुस्थानी झाला. तेव्हा ह्या महात्म्याचे चरितामृत आम्हासही नि:संशय बोधप्रद व उन्नतिकारक होईल.

●●●

# कुलवृत्त

*माझ्या वडिलांची मिरासी गा देवा ।। तुझी चरणसेवा पांडुरंगा ।।१।।*
*उपवास पारणे राखिला दारवटा ।। केला भोगवटा आम्हालागी ।।२।।*
*वंशपरंपरा दास तुझा देवा ।। मोकळिता केशवा लाज कोणा ।।३।।*
*तुका म्हणे झालो माना अधिकारी ।। योग्य नव्हे परी लोकलाज देवा* * ।।४।।

पुण्यापासून सुमारे आठ कोसांवर इंद्रायणीनामक एका नदीच्या तीरी देहू म्हणून एक गाव आहे. ह्या गावात मोरे ह्या आडनावाचे एक मराठे जातीचे प्राचीन घराणे आहे. ह्या घराण्यात तुकारामाचा जन्म शालिवाहन शकाच्या पंधराव्या शतकाच्या प्रथमपादात झाला. महाराष्ट्रातील इतर पुष्कळ घराण्यांप्रमाणे ह्या मोरे घराण्यात पंढरीची वारी करण्याचा क्रम पिढ्यान्‌पिढ्या चालत आला आहे. प्रत्येक पिढीत कोणीना कोणीतरी भगवद्भक्त निपजून प्रतिवर्षी दोन वेळा पंढरीस जात असतो. तुकारामाच्या सात पूर्वजांची माहिती महिपतीने दिली आहे. तुकारामाचा सातवा पूर्वज विश्वंभर नामेकरून एक भगवद्भक्त होता. तो वाण्याचा धंदा करीत असे. तो आपला एकंदर व्यवहार मोठ्या सचोटीने व प्रामाणिकपणाने करीत असे. तो कदापि असत्य बोलत नसे. आपल्या बऱ्याच उत्पन्नाचा व्यय तो सत्कार्यी करीत असे. कोणी साधुसंत किंवा तीर्थयात्रा करणारा भेटला असता त्यास तो आपल्या घरी मोठ्या आदराने आणून त्याची शुश्रूषा उत्तम प्रकारे करीत असे आणि त्याच्याकडून बोधाच्या गोष्टी ऐकून घेत असे. त्याच्या मुखावाटे नेहमी एकसारखा भगवन्नामाचा उच्चार होत असे. प्रत्येक दिवशी रात्री भाविक जनांस आपल्या घरी जमवून तो भजन, कीर्तन वगैरे करीत असे. ज्ञानदेवनामदेवादी साधुसंतांनी केलेली अभंगादी कवने त्यास पुष्कळ पाठ येत असत आणि जेवढी नवी मिळत तेवढी तो आपल्याजवळ लिहून ठेवी किंवा पाठ करी. अशी विश्वंभराची भक्तिपरायणता पाहून त्याच्या आईने त्यास आठवण दिली की, बाळा तुझ्या वाडवडिलांनी पंढरीची वारी आज शेकडो वर्षे चालविली आहे, ती तुला पुढे चालविली पाहिजे. त्यातच तुझ्या जन्माचे सार्थक आहे. हा मातेचा उपदेश शिरसावंद्य मानून विश्वभराने प्रतिवर्षी पंढरीस जाण्याचा क्रम सुरू केला. तो मूळचाच प्रेमळ

* रा.रा.तुकारामतात्याकृत तुकारामाच्या अभंगांची गाथा भा.१, पृ.५.

भक्त असून आणखी पंढरीस जाऊ लागल्यापासून त्याला साधुसंतांच्या भेटी व त्यांच्या मुखातून निघणाऱ्या सहस्रावधी भक्तिपर अभंगांचे श्रवण घडू लागल्यामुळे त्याचा भक्तिभाव अधिकाधिक वृद्धिंगत होत गेला. पंढरीच्या देवस्थानाचा तो सर्व देखावा पुन्हा पुन्हा पाहून त्याचा त्यास अहर्निश निदिध्यास लागला. वारी करून घरी आल्यावर त्यास कित्येक दिवसपर्यंत मुळी चैनच पडू नये. त्याच्या मनात वारंवार असे यई की, पंढरीस एकदा जावे ते मुळी परतच येऊ नये. पुढे पुढे तो दर पंधरवाड्यास पंढरपुरास जाऊ लागला. हा असा क्रम त्याने आठ महिने चालविला. पण यामुळे त्याला फारच त्रास होऊ लागला; आणि त्याचा धंदा नीट चालेनासा झाला. लोक त्याला सांगत की, देव सर्व चराचर व्यापून आहे, त्याच्यावाचून अणुमात्र स्थळ रिते नाही; तेव्हा उठल्यापायी पंढरीस जाण्यात काय अर्थ आहे? यावर विश्वंभर असे म्हणे की, ह्या वेदांताच्या उपपत्तींनी माझे समाधाना होत नाही; निर्गुणनिराकार ब्रह्माची उपासना कोणी कशी करीत असेल ती असो; मला तीत मुळीच गम्य नाही. सगुण ब्रह्माच्या ठिकाणी माझे प्रेम जडले आहे; आणि ते पंढरीक्षेत्रातच पहावयास मिळते, एरवी कोठेही ते नाही. असा त्याचा निर्धार पाहून लोक त्यास म्हणू लागले की, मग पंढरीसच जाऊन रहा, पुन्हा पुन्हा घरी येतोस कशाला? तुला जर संसार करावयाचा नसेल तर तुझा हा क्रम योग्यच आहे; पण दोहीकडे लक्ष पुरवीन म्हणशील तर तुझी फजिती मात्र होईल. याप्रमाणे लोक त्यास नावे ठेवू लागले, तेव्हा त्याला मोठी पंचाईत पडली. पंढरीस दर पंधरवड्यास गेल्यावाचून तर त्यास चैन पडेना आणि संसारही सोडवेना. अशा विवंचनेत तो पडला असता एके दिवशा रात्री त्यास स्वप्न पडले की, पंढरीचा विठोबा आपल्या निस्सीम भक्तीने संतुष्ट होऊन देहूस येऊन राहिला आहे. नंतर दुसरे दिवशी हे आपले स्वप्न लोकांस सांगून तालमृदंगादी भजनाची सामग्री घेऊन काही भाविक लोकांसह तो स्वप्नांत दिसलेल्या आंब्याच्या झाडाखाली गेला. तेथे खणून पाहता विठोबाची मूर्ती त्याला सापडली. ही मूर्ती विश्वंभराने एक लहानसे देऊळ बांधवून त्यात स्थापिली. यानंतर पुढे विश्वंभराने दर पंधरवड्याच्या एकादशीला पंढरीस जाण्याचे सोडून दिले आणि प्रत्येक एकादशीस तो आपल्या ह्या देवळात पंढरीतल्यासारखा उत्सव नेमाने करू लागला; पण त्याने आषाढ व कार्तिक या दोन महिन्यातील एकादशीस पंढरीस जाण्याचा क्रम मरेपर्यंत कायम ठेविला होता.

विश्वंभराच्या बायकोचे नाव अमाबाई असे होते. तीही भगवद्भक्तिपरायण असून विठोबांचे नेहमी भजनपूजन करीन असे. आपल्या नवऱ्यामागे त्याने बांधलेल्या देवळाची सर्व व्यवस्था ती मोठ्या प्रेमाने व भाविकपणाने करीत असे. कोणी साधुजन घरी

आले असता त्यांचा ती उत्तम प्रकारे परामर्श घेत असे. तिचा हरी व मुकुंद असे दोन पुत्र होते. हे आपल्या आईबापांप्रमाणे सात्त्विक वृत्तीचे नव्हते. क्षात्रधर्माचा स्वीकार करून द्रव्यसंपादन करावे असे त्यांच्या मनात आले आणि हे आपले मनोगत त्यांनी मातेस कळविले. तेव्हा ती म्हणाली बाबानो, ह्या गावी राहून वडिलांचाच धंदा कराल तर तुमचा योगक्षेम पंढरीनाथाच्या कृपेने चांगल्या प्रकारे चालेल; परंतु हा मातृबोध त्यास मुळीच रुचला नाही. राजाश्रयाने युद्धकर्म करून ऐश्वर्य संपादन करावे यातच खरा पुरुषार्थ आहे, असे जे त्यास वाटत होते ते त्यांच्या मनातून मुळीच जाईना. असा हा पुत्रांचा हेका पाहून अमाबाईने शेवटी त्यास आपल्या संकल्पाप्रमाणे वागण्यास आज्ञा दिली. ह्याप्रमाणे आईची आज्ञा घेऊन हरी व मुकुंद यांनी राजाच्या लष्करात नोकरी धरली. पुढे त्यांच्या अंगच्या पराक्रमामुळे व हुशारीमुळे त्याजवर राजकृपा होऊन त्यांची पुष्कळ बढती झाली.

मग त्यांनी असा विचार केला की, आपल्या आईस व बायकांस आपल्याजवळ येऊन राहण्यास बोलवावे. त्याप्रमाणे त्यांनी आईस एक पत्र लिहून माणसे व घोडी पाठविली. तो पुत्रांचा निरोप कळला तेव्हा अमाबाईस मोठी चिंता पडली. आपल्या नवऱ्याने स्थापलेले देवस्थान सोडून जाणे तिच्या जिवावर आले; पण शेवटी पुत्रमोह अनिवार होऊन तिने त्यांच्याकडे जाण्याचा निश्चय केला. मग घरातील सारी चीजवस्तू घेऊन ती सुनांसह आपले पुत्र होते त्या गावी गेली; परंतु तेथे गेल्यावर तिला मुळीच चैन पडेनासे झाले. ज्या देवाची आपण आज इतकी वर्षे एकनिष्ठपणे सेवा केली त्यास आपण पुत्रमोहास्तव सोडून आलो हे ठीक केले नाही, अशी तळमळ तिच्या चित्तास रात्रंदिवस लागली. पुढे तिच्या स्वप्नांत विठोबा येऊन म्हणू लागला की, तुझ्या नवऱ्याने मला देहूस आणून ठेवले असता तू पुत्रमोहास गुंतून मला टाकून आलीस, हे चांगले नाही. तर हा धनलोभ व पुत्रांची माया सोडून देहुक्षेत्री परत चल. हे स्वप्न अमाबाईने आपल्या पुत्रास सद्गदित होऊन सांगावे आणि ह्मणावे की, बाळांनो तुमच्या वडिलांनी विठोबाची मूर्ती इंदायणीतीरी स्थापिली आहे. त्यास सोडून आह्मांस दूर राहता कामा नये. तेव्हा ते तिला हसून म्हणत की, आई स्वप्नांतली गोष्ट कोणी कोठे खरी मानली आहे काय? तू उगीच कष्टी कशाला होतेस! आम्ही काही येथे वाईट रीतीने वागत नाही. आम्ही आमच्या धन्याची एकनिष्ठपणे सेवा करीत आहोत. आम्ही आमच्या क्षत्रियधर्माप्रमाणे वर्तन करीत आहो. यास्तव देवाची आम्हावर कदापि अवकृपा व्हावयाची नाही. हे पुत्रांचे उत्तर ऐकून बिचारी अमाबाई निरुपायास्तव उगी राही; पण तिच्या चित्ताची अस्वस्थता मुळीच कमी होईना आणि मायाजाळामुळे

तिला पुत्रास सोडून तर जाववेना. एके दिवशी रात्री अमाबाई निजली असता तिला असे स्वप्न पडले की, विठोबाचा तिजवर पराकाष्ठेचा कोप होऊन तिचे ते दोन्ही मुलगे रणात पडून मेले व त्यांच्या सर्व धनदौलतीची वाताहत झाली. हे भयंकर स्वप्न पडताच अमाबाई जागी होऊन मोठ्याने आक्रोश करू लागली. तो ऐकून तिचे ते दोघेही पुत्र जागे होऊन तिच्याकडे आले आणि तिला रडण्याचे कारण विचारू लागले. तेव्हा तिने ते भयंकर स्वप्न त्यास निवेदन केले. तरीपण हरी व मुकुंद हे मुळीच डगमगले नाहीत. ते म्हणाले की, आई तुला म्हातारचळ लागल्यामुळे असली अशुभ स्वप्ने पडतात. यात काहीच अर्थ नाही. या गोष्टीत थोडे दिवस लोटल्यावर कर्मधर्मसंयोगाने असा प्रकार घडून आला की, राज्यावर मोठे परचक्र येऊन त्या दोघा बंधूला लढाईस जावे लागले. त्या लढाईत ते मोठ्या शौर्याने व निकराने लढले; पण शेवटी त्यांच्या पक्षाचा पराभव होऊन ते दोघे शूर बंधू समरांगणात पतन पावले. पुढे विजयी झालेल्या सैन्याने जिकडे तिकडे लुटालूट आरंभिली. त्या गर्दीत शत्रूंनी अमाबाईचेही घरदार धुऊन नेले. ह्याप्रमाणे दोन्ही मुलगे मरण पावून जवळ होते नव्हते तेही सारे गेले, असे पाहून अमाबाईच्या शोकास पारावार राहिला नाही. तिच्या धाकट्या सुनेने क्षत्रियांच्या चालीप्रमाणे सहगमन केले आणि मोठी सून त्यावेळी गरोदर होती म्हणून ती मागे राहिली; नाहीतर तीही सती जाणार होती. ह्याप्रमाणे ज्या धनपुत्रादी नश्वर वस्तूंच्या लोभाने विठोबाचे चरण सोडून आपण इकडे आलो त्यांचा असा एकाएकी नाश झाला हे पाहून तिला परम अनुताप झाला आणि ती आपल्या थोरल्या सुनेसह पुनरपि देहूस आली. आपल्या गावी आल्यावर नी भाविक साध्वी अधिकच विरक्तपणाने वागू लागली. ती आपला बहुतेक सारावेळ आपल्या विठोबाच्या देवळात घालवू लागली. देवाचे रात्रंदिवस भजन–पूजन करण्यापलीकडे तिला काहीएक सुचत नसे. घरात कोणी धंदारोजगार करणारा पुरुष नसल्यामुळे तिच्या खाण्यापिण्याचे व कपड्यालत्त्याचे हाल फारच होऊ लागले. म्हणून तिने आपल्या सुनेस नवलाख्याच्या उंबरात तिचे माहेर होते तिकडे पाठवून दिले आणि आपण एकटीच राहू लागली. ह्या प्रमाणे हालअपेष्टा भोगावी लागल्यामुळे अमाबाईचे पुढे डोळे गेले. तरी त्या भाविक व भक्तिपरायण माउलीने आपल्या चित्ताची यत्किंचितही चलबिचल होऊ न देता ती सारी विपत्ती मरेपर्यंत मोठ्या धैर्याने सोसली.

अमाबाईची थोरली सून आपल्या सासूचे देहावसान झाल्याचे वर्तमान ऐकून आपणास झालेल्या पुत्रासह देहूस येऊन राहिली. तिने आपल्या सासुसासऱ्यांचा विठ्ठलभक्तीचा क्रम पुढे चालविला. तिच्या मुलाचे नाव विठोबा असे होते. हा

आपल्या आईस घेऊन प्रतिवर्षी पंढरीस जात असे. याच्या मुलाचे नाव पदाजी असे होते. पदाजीस शंकर नामे पुत्र झाला. ह्या शंकरास कान्ह्यानामा पुत्र झाला आणि कान्ह्याच्या पोटी बोल्होबा जन्मास आला. हा आमच्या चरित्रनायकाचा पिता होय. ह्या साऱ्यांनी पंढरीची वारी अखंड चालविली असून यांचा व्यवसाय दुकानगिरीचा होता. बोल्होबाची वृत्ती मोठी सात्त्विक असून तो आपला सारा व्यवहार मोठ्या सचोटीने व नेकीने चालवीत असे. तो कधीही खोटे बोलत नसे. त्याचा आपपरभाव सगळा नाहीसा होऊन तो सर्व प्राणिमात्रास आत्मवत लेखीत असे. एवढी ममता व विरक्तता त्याच्या ठायी वास करीत होती, तरी पोटी पुत्रसंतान नसल्यामुळे तो फारच उदास असे. पुढे विठोबाचा प्रसाद होऊन आपली मन:कामना पूर्ण व्हावी म्हणून त्याने आणि त्याची स्त्री कनकाई हिने देवाची नवविधा भक्ती मोठ्या प्रेमाने व उत्सुकतेने चालविली. याप्रमाणे नवससायास करता करता कनकाई गरोदर होऊन तिला एक पुत्र झाला. त्याचे नाव सावजी असे ठेविले. हा पुत्र झाल्यावर त्या दांपत्याचा विठ्ठलचरणीचा भाव अधिकच दृढ झाला. विठोबाच्या भजन पूजनादिकांवाचून त्यांच्या फुरसदीची एकही घटक व्यर्थ जाईना. नंतर पुन्हा कनकाई गरोदर होऊन तिच्या पोटी आमच्या चरित्रनायकाचे जन्म झाला. तुकारामाच्या पाठीवर कनकाईस आणखी एक मुलगा झाला. त्याचे नाव कान्होबा असे होते. तुकारामास एक बहीणही असावी असे वाटते; पण तिच्या संबंधाचा स्पष्ट उल्लेख महिपतीने कोठेही केलेला आढळत नाही.

●●●

# बाल्यावस्था

*बरा कुणबी केलों ।। नाही तरी दंभें असतो मेलों ।।१।।*
*भलें केलें देवराया ।। नाचे तुका लागे पायां ।।२।।*
*विद्या असती कांहीं ।। तरी पडतों अपायीं ।।३।।*
*सेवा चुकतों संतांची ।। नागवण हे फुकाची ।।४।।*
*गर्व होता ताठा ।। जातों यमपंथें वाटा ।।५।।*
*तुका म्हणे थोरपणे ।। नरक होती अभिमानें ।।६।।*

तुकारामाच्या बाळपणाविषयी महिपती काहीच लिहीत नाही. तरी तुकारामाचा बंधू कान्होबा याने या संबंधाचे केलेले काही अभंग रा. रा. तुकारामतात्या यांनी छापलेल्या गाथेत आहेत. त्यात फक्त एका गोष्टीविषयी उल्लेख आहे. ती हीच की, तुकारामास अगदी लहानपणापासून विठ्ठलाचे भजनपूजन करण्याचा नाद असे. ह्याशिवाय त्याला दुसरा कोणताही खेळ आवडत नसे. तरी मुलांच्या एकंदर खेळांची त्याला माहिती होती असे दिसते. कारण त्याने हमामा, हुतुतू, हुंबरी, लखोटा इत्यादी खेळांचे वर्णन अभंगरूपाने करून त्यात देवाची पुराणांतरी वर्णिलेली लीला मोठ्या प्रेमाने गाइली आहे; इतकेच नव्हे तर त्यात अध्यात्मज्ञानाचीही फोड सामान्य जनांस अगदी सुगम करून ठेवली आहे.* त्याचे आईबाप नेहमी विठ्ठलभक्तीत गढलेले असल्या कारणाने त्यांच्या मुलांपुढे सदोदित तोच कित्ता असे. यामुळे तुकारामाची प्रवृत्ती अगदी अल्पवयातच ईश्वरभजनपूजनांकडे होणे साहजिक होते. तुकारामास गावातील इतर शेतकऱ्यांच्या मुलांप्रमाणे गुरे राखावयास जावे लागे; पण त्यास ते काम न आवडून तो कोठे तरी एकांत ठिकाणी जाऊन बसे. एके दिवशी त्याच्या सोबत्यांनी येऊन कनकाईस कागाळी सांगितली की, तुमचा तुक्या गुरांकडे नसतो; तो कोठे तरी जाऊन बसतो आणि आम्हाला त्याची गुरे वळावी लागतात. त्याला काही तरी सांगा. आम्ही रोज रोज त्याचे काम करणार नाही. हे ऐकून कनकाईस फार राग आला आणि ती तुकारामास म्हणाली, तुझ्या हातून एवढेही काम होत नाही, तर तू जगला आहेस कशाला? मरेनास एकदाचा. हे आईच्या तोंडचे रागाचे शब्द त्याने मुकाट्याने ऐकून

* रा. रा. तुकारामतात्यांनी छापलेल्या गाथेच्या दुसऱ्या भागाची ३३६ पासून पाने पाहा.

घेतले आणि आपल्या सवंगड्यांपाशी जाऊन त्यास विचारू लागला की, गड्यांनो मला आईने मर म्हणून सांगितले आहे, तर मरतात कसे ते तुम्हाला ठाऊक आहे काय रे? तेव्हा त्या पोरांनी आपल्या काठ्या तिरडीसारख्या बांधून त्यावर तुकारामास निजविले आणि सर्वांनी मिळून त्याला उचलून नदीतीरच्या वाळवंटांत नेले. तेथे त्यांनी रेती उकरून एक खाडा करून त्यात त्याला निजविले आणि त्याच्यावर रेती लोटली; परंतु तो गुदमरून मरेल असे त्यांच्या लक्षात येऊन ते त्याला काढण्यासाठी परत तेथे जातात तो नदीला एकाएकी पूर आला. तेव्हा ते घाबरून पळून गेले आणि तुकाराम खाड्यातच राहिला! संध्याकाळी गुरे घरी आली तरी तुकाराम कोठे दिसेना. तेव्हा कनकाई घाबरून गेली आणि त्याच्या सोबतत्याच्या घरी जाऊन आपल्या मुलाचा तपास करू लागली. तेव्हा तिला एकंदर वृत्तांत कळला. मग ती ओक्साबोक्शी रडत ओरडत त्या वाळवंटांत जाऊन आपल्या मुलास हाका मारू लागली. आईची हाक ऐकून तुकारामाने खाड्यातूनच ओ म्हटले. तेव्हा त्या कनवाळू आईने तेथे धावत जाऊन त्याला खाड्यातून वर काढले आणि उराशी घट्ट धरून त्याला तिने असे का केलेस म्हणून विचारले. तो म्हणाला तू मजवर त्रासून मला मरावयास सांगितलेस, म्हणून मी हा असा येथे मेलो होतो!

इतर मराठ्यांच्या वगैरे मुलांप्रमाणे तुकारामास लहानपणी लिहिता वाचता काही शिकविले नव्हते. तरी पुढे साधुसंतांच्या वगैरे मदतीने त्याला वेदांतादी धर्मविषयांचे व पुराणांचे श्रवण घडून त्याचे ज्ञान पुष्कळ वाढले होते, असे त्याच्या अभंगांवरून उघड होते. त्याचप्रमाणे त्याची बुद्धिमत्ताही अलौकिक होती असे दिसते. गीतेसारख्या ग्रंथाचे भाषांतर ऐकून घेऊन त्यावर जे अभंग त्याने रचले आहेत ते पाहिले असता या गोष्टीची सत्यता स्थापित होते. तेव्हा अशा बुद्धिमान पुरुषास जर सुशिक्षण प्राप्त झाले असते तर तो अप्रतिम विद्वान झाला असता व विद्वत्ता आणि नीतिमत्ता यांचा त्याच्या ठायी संयोग होऊन त्याच्या हातून महाराष्ट्रजनांवर घडले त्याहूनही अधिक उपकार झाले असते; परंतु त्या वेळी द्विजांवाचून इतरांस विद्याध्ययनाचा अधिकार नाही असा राष्ट्रसुखविघातक निर्बंध कर्मठांनी घातला असल्यामुळे तुकारामासारख्या बुद्धिमान पुरुषांचे बुद्धितेज व्हावे तसे प्रकट झाले नाही. ही एक राष्ट्राची महाहानीच झाली असे समजावयाचे, असो. बोल्होबा पंढरपूरच्या वारीस किंवा धंद्याच्या निमित्ताने बाहेरगावी गेला म्हणजे देवळातील देवाची पूजा वगैरे करण्याचे काम तुकारामच पाहत असे. हे काम तो अगदी मनापासून परम उल्हासाने करीत असे. हे काम करण्यात तो आपले तासांचे तास घालवी; पण त्यास त्याचा यत्किंचितही कंटाळा किंवा त्रास येत नसे.

घरी आलेल्या साधुसंतांचा परामर्श तो इतक्या दक्षतेने व हुशारीने घेत असे की, त्यांचा त्याच्यावर अगदी अल्प परिचयाअंती लोभ जडे आणि ते त्याला बोल्होबापाशी फारच वाखाणीत. ह्याप्रमाणे अल्पवयातच त्याच्याठायी भगवद्भक्तास अनुरूप असे सगळे गुण प्रकट झाले. हा सारा प्रभाव सत्संगाचा होय. त्याची माता-पितरे सदाचारी व भगवद्भक्तिपरायण होती; म्हणून त्यासही तेच वळण अगदी लहान वयापासून मिळाले. 'जशी खाण तशी माती' अशी जी एक म्हण आहे ती तुकारामाच्या संबंधाने यथार्थ झाली.

●●●

# संसारप्रवेश

*सुखी संसारीं असावें।। चित्त परब्रह्मीं ठेवावें ।।१।।*
*पहा न्याय कमळिणीचा शोष न करी जीवनाचा ।।२।।*
*ताकामध्ये लोणी राहे।। त्याची भेळणी कदा न होय ।।३।।*
*तुका म्हणे त्याचपरी।। सुखी असावें संसारीं ।।४।।*

मागील प्रकरणात सांगितल्याप्रमाणे बोल्होबास संततिसुखाचा अनुभव घडला असता, त्याचा उदीमही चांगला चालून त्याच्याजवळ द्रव्यसंचय विपुल झाला. तेव्हा त्याने आपल्या मुलांची लग्ने करून टाकली. त्याच्या संपत्तीस्तव त्याचा सोयरेसंबंध मोठमोठ्या घराण्यांशी झाला. ह्याप्रमाणे संतती, संपत्ती व कीर्ती यांची त्यास पूर्ण अनुकूलता असताही तो विठ्ठलभजनांत नेहमी तत्पर असे. संसार सुखास भुलून जाऊन देवभक्तीस अंतराय घडू देणे किंवा अनुचित कर्मांत गढून जाणे हे परम अश्लाघ्य व अहितकर आहे असा त्याच्या बुद्धीचा दृढ निश्चय झाला होता व तदनुसार त्याचे अहर्निश आचरण असे. प्रपंचात दक्षता राखून अंगी वैराग्यही पूर्णपणे बाणणे हे काही सोपे काम नाही; पण बोल्होबाने आपल्या वर्तनाने ह्या गोष्टीचा प्रत्यय जगास पूर्णपणे आणून दिला. असो; पुढे त्यास वार्धक्यदशा प्राप्त झाल्यामुळे आपला धंदा चालविण्याची शक्ती त्याच्यात उरली नाही, असे पाहून त्यांने आपला वडील पुत्र सावजी यास आपल्याजवळ बोलावून म्हटले: बाळा मी आता म्हातारा झालो. मला धंदा करण्याचे सामर्थ्य उरले नाही. तू माझा वडील मुलगा आहेस; तरी यापुढे हा माझा संसार तुला चालविला पाहिजे. माझे देणे घेणे संभाळ, खते पत्रे काय आहेत ती नीट पाहून घे. हे पित्याचे शब्द ऐकून सावजी हात जोडून म्हणाला: बाबा, मला ह्या प्रपंचात गुंतून राहणे मुळीच आवडत नाही. आपले सारे आयुष्य तीर्थाटनांत व भगवद्भक्तीत गुंतवावे असा माझा संकल्प आहे. आपण जिवंत आहा तोपर्यंत आपले चरण सोडून माझ्याने कोठे जाववत नाही व असे करणे शास्त्रविरुद्धही असल्याकारणाने लोकांचे विनाकारण हसे होणार आहे. यासाठी मला अजून घर सुटत नाही. ही अशी त्याची विरक्तता व उदासीनता पाहून बोल्होबा उगीच राहिला. त्याने त्याजकडे पुन्हा ती गोष्ट काढली नाही. नंतर त्याने तुकारामास बोलावून त्याला तीच गोष्ट विचारिली. तेव्हा त्याने

बापाच्या म्हणण्यास लागलाच रुकार दिला आणि सर्व व्यवहाराची व देण्याघेण्याची त्याच्याकडून मोठ्या उत्साहाने समजूत करून घेतली. यावेळी तुकारामाचे वय अवघे तेरा वर्षांचे होते.

ह्याप्रमाणे तुकारामाच्या गळ्यात लहानपणीच संसार पडला असता त्याने तो मोठ्या दक्षतेने व हुशारीने चालविला. व्यापाराच्या कामात तर त्याने आपल्या बापाचाच कित्ता उचलला होता. सर्व देवघेव व क्रयविक्रय तो मोठ्या प्रामाणिकपणाने व सचोटीने करीत असे. आपल्या दुकानातील सामान चांगले निर्मळ राखून ते गिऱ्हाइकास नेमस्त दराने व पुऱ्या मापाने विकीत असे. तो सर्वांशी मोठ्या नम्रतेने वागत असे. कोणी काही काम सांगितल्यास ते तो मोठ्या काळजीने व मनापासून करीत असे. आईबापांच्या तर तो नेहमी अगदी अर्ध्या वचनांत असे. ती जे काही सांगत ते कितीही त्रास पडला तरी केल्यावाचून तो कदापि राहत नसे. त्याच्या अंगी लहानपणीच दिसून आलेली हुशारी, दक्षता, सचोटी व नम्रता पाहून बोल्होबासही फारच आनंद वाटत असे.

तुकारामाच्या पहिल्या बायकोस दम्याचा उपद्रव असल्यामुळे त्याचे दुसरे लग्न करावे असा त्याच्या आईबापांनी विचार करून पुण्यात कोणी आपाजी गुळव्या नावाचा एक धनाढ्य सावकार होता, त्याच्या मुलीसाठी मागणी घातली. ती त्या सावकाराने तत्काळ कबूल केली आणि तुकारामाचे दुसरे लग्न झाले. ही मुलगी चांगली वाढलेली असून मोठी हुशार होती. हिचे नाव अवलाई अगर जिजाई असे होते व पहिलीचे नाव रखुमाबाई असे होते.

देहूगावातील एकंदर लोक तुकारामाच्या दुकानातून माल खरेदी करीत. त्यांचा त्याच्यावर अगदी पुरा विश्वास बसून जो तो त्याची वाखाणणी करू लागला. यामुळे त्याच्या धंद्यास पुष्कळ बरकत येऊन त्याची संपत्ती बरीच वाढली. ह्याप्रमाणे धनधान्य, गुरेढोरे वगैरे गोष्टींची विपुलता होऊन त्यास सर्व प्रकारचे सांसारिक सुख अनुकूल असता व लोकांतही त्याची मान्यता झाली असता त्यास अहंकारादी दुर्गुण मुळीच जडले नाहीत किंवा आपल्या मातापितरांची व घरी येणाऱ्या साधुसंतांची अमर्यादा किंवा अवज्ञा त्याच्या हातून कधीही घडली नाही. कोणीही साधू दृष्टीस पडला की, त्याच्यापुढे तो दंडासारखा पडून त्यास नमन करीत असे आणि त्याची आपणाकडून होईल तेवढी सेवा करण्यास सदा उत्सुक असे. बोल्होबा व कनकाई ही रात्रंदिवस भजन करीत. त्यांच्यापाशी तो फावल्या वेळी बसून स्वतःस पाठ येत असलेले अभंग

मोठ्या प्रेमाने म्हणत असे. ह्या लहान वयातच त्याला ज्ञानदेव, नामदेव, मुक्ताबाई आदीकरून संतमंडळीने केलेले बरेच अभंग पाठ येत असत. हा असा गुणनिधान सुपुत्र आपल्या उदरी निर्माण होऊन आपणास उतार वयामध्ये सर्व प्रकारे साहाय्य करीत आहे आणि सन्मार्गाने वागून आपली कीर्तीही सर्वत्र पसरीत आहे, असे पाहून बोल्होबास व कनकाईस अतिशयित समाधान वाटे आणि ती आपणास या संसारामध्ये अत्यंत धन्य व सुखी समजत; पण ह्या सुखसोहळ्यांचा अनुभव त्या वृद्ध दांपत्यास फारच थोडा काळ घडला. तुकाराम सतरा वर्षांचा झाला असता ती दोघेजणे पाच सहा महिन्यांच्या अंतराने निवर्तली. मातापितरांच्या मृत्यूमुळे तुकाराम फारच कष्टी झाला. आपल्या भावंडांचा शोक पाहून तर त्याचे चित्त अतिशयित खिन्न व उदास झाले. हा मातापितरांचा वियोग घडून एक वर्ष लोटते न लोटते तो तुकारामाच्या थोरल्या बंधूंचे कुटुंब निवर्तले. सावजी पहिल्यापासूनच विरक्त असून त्यास हे संसाराचे बंधन केव्हा तुटेलसे झाले होते. कर्मधर्मसंयोगाने वर सांगितल्याप्रमाणे त्याच्या मातापितरांचे व लागलीच दुसऱ्या वर्षी त्याच्या स्त्रीचे देहावसान झाले, तेव्हा तो अगदी फटिंग होऊन तीर्थयात्रेस निघाला. तो पुन्हा कधीही घरी परत आला नाही. त्याने गोसाव्याच्या वृत्तीचा अवलंब करून शेष राहिलेले आयुष्य साधुसंगतीत व विठ्ठलभजनात घालविले. ह्याप्रमाणे प्राणांहूनही प्रिय जी मातापितरे व वडील बंधू ती नाहीतशी झाल्यामुळे तुकारामांचे चित्त अत्यंत उदास झाले. ज्यांच्यासाठी उदीमधंद्याची दगदग करून द्रव्यार्जन करावयाचे ती तर आपणास सोडून गेली आणि ती शेष राहिली आहेत त्यांचे साहचर्यही केवळ क्षणभंगुर आहे. हा संसाराचा व्याप व्यर्थ आहे आणि हा मायापाशही चित्तास विनाकारण व्यामोह करणारा आहे. तेव्हा अशा ह्या केवळ अशाश्वत सुखसंपादनाच्या पाठीस लागून शाश्वत सुखास मात्र अंतरावे लागेल असे तुकारामास वाटू लागले. अशाप्रकारे त्याच्या चित्तांत वैराग्याचा प्रवेश झाल्याकारणाने त्याचा उदीम पूर्वीसारखा दक्षतेने चालेना. नफ्यातोट्याचे काहीएक धोरण न ठेवता तो केवळ यदृच्छेने क्रयविक्रय करू लागला. त्यामुळे त्याला नेहमी नुकसानच होत गेले. पूर्वीची कमाई हळूहळू आटत चालली. लोकांजवळचे येणे वसूल करण्याकडे दुर्लक्ष होऊन सगळाच आतबट्ट्याचा व्यापार सुरू झाला. कुटुंबातील खर्च सारखाच बडेजावीचा राहिल्यामुळे तर जवळची पुंजी लवकरच खल्लास झाली. जवळ भांडवल नाहीसे झाले तेव्हा मोठा व्यापार चालविण्याचे त्राण राहिले नाही. मग त्याने एक लहानसे किराणा जिनसांचे दुकान घातले. त्यातही काही बरकत येईना. विशेष नफा ठेवून माल विकणे म्हणजे लोकांस नाडणे होय असे त्याला वाटे. यास्तव लोक मागतील त्या

दराने तो जिनसा विकी. कोणी गरीब मनुष्याने उधार मागितले असता त्यास तो सहसा नाही म्हणत नसे आणि मग त्याच्याकडे कितीही बाकी थकली तरी तिच्याबद्दल तो त्याला तगादा लावीत नसे. कारण तो म्हणे की, असे करणे म्हणजे आपल्या स्वार्थासाठी दुसऱ्याची निवंता व अडचण यांची पर्वा न करणे होय. अशी त्याची वृत्ती पाहून गावच्या लबाड लोकांनी त्याला अनेक प्रकारे फसविले. शेवटी त्याने ते दुकान काढून टाकून गोण्या वाहण्याचा धंदा आरंभला. त्याचे चार बैल होते. त्यांच्यावर गोण्या टाकून तो गावोगाव हिंडू लागला. हा धंदा त्या काळी फारच दगदगीचा आणि त्रासदायक असे. वारा, पाऊस, ऊन यांची पर्वा न करिता व झोप आणि विश्रांती कधी पुरी न घेता तुकाराम रात्रंदिवस खपत असे; तरी ह्याही धंद्यात त्यास मुळीच यश आले नाही. पुढे त्याने सावकारांचे वेळोवेळी कर्ज काढून निरनिराळे धंदे केले; पण त्या सर्वांत त्यास बूड आली आणि लोकांचे कर्ज मात्र माथी बसले. घरात काही खुडूकमुडूक होते ते सगळे त्याने सावकारास देऊन टाकिले. तरी कर्जाचा बोजा काही कमी होईना. सावकारांचा तगादा सुरू झाला. त्यांच्या ऋणांतून मुक्त होण्याचा त्यास काही मार्ग सापडेना.

......................

ह्याप्रमाणे तुकारामाची विपत्ती हळूहळू वाढतच गेली आणि तितक्या मानाने त्याच्या अंगी वैराग्य अधिकाधिक दृढावत जाऊन त्याचे विठ्ठलभजनाकडे विशेष लक्ष लागत चालले. रात्रंदिवस त्याच्या तोंडचे विठ्ठलनाम खळत नसे. त्याचा तो नामस्मरणाचा घोष अविचारी लोकांस हास्यास्पद वाटून ते त्याला असा बोध करीत की, बाबा हे विठोबाचे नाव सोडून दे. तुझे परमार्थाकडे लक्ष लागल्या दिवसापासून तुझ्या संसाराचे मातेरे होण्यास आरंभ झाला. तुझे दिवाळे निघून सर्व जनांत फटफजिती झाली तरी तू अजून शुद्धीवर येत नाहीस हे कसे? विठ्ठलाची भक्ती करणाऱ्या लोकांचे कधीही बरे व्हावयाचे नाही. हे तुला भिकेचेच डोहाळे लागले आहेत. हा देवभक्तीचा नाद तू सोडला नाहीस तर तुझे अजूनही अधिक हाल होतील. तेव्हा आम्ही तुझ्या हिताची एवढीच गोष्ट सांगतो की, तू विठ्ठलनामस्मरण करण्याचे सोडून देऊन पुन्हा पूर्वीसारखे व्यापारात मन घाल, म्हणजे तुझे कर्ज नाहीसे होऊन तुझ्या कुटुंबाचा निर्वाह चालेल. हा त्यांचा बोध तुकाराम निमूटपणे ऐकून घेत असे; पण त्यांच्या ह्या बुद्धिवादाने त्याचे चित्त विठोबाच्या भक्तीपासून तिळभरही ढळले नाही, तर उलट त्याचे वैराग्य विशेषच वाढून तो आपला सारा वेळ देवभजनात घालवू लागला. ही त्याची अवस्था पाहून त्याच्या बायकोला तर फारच दु:ख होत असे. ज्या घरात पूर्वी धनधान्य मुबलक होते,

तेव्हा चिरगुटपांघरुणाची मुळीच ददात नसे, त्याच घरात शाश्वत सुखास मात्र अंतरी गाठ येऊन वेळेस पोटभर अन्न मिळण्याचीही सोय नाही.

......................

ती जे काही सांगत ते कितीही त्रासदायक असो केल्यावाचून तो कदापि राहत नसे. त्याच्या अंगी लहानपणापासून आलेली हुशारी, दक्षता, सचोटी व नम्रता पाहून लोक त्याची फारच स्तुती करू लागले. ही आपल्या पुत्राची वाहवा होत असलेली पाहून बोल्होबासही फारच आनंद वाटत असे.

एका धंद्यात यश आले नाही तर दुसरा करून पाहावा, दुसऱ्यात आले नाही तर तिसरा करून पाहावा, असा क्रम त्याने चालविला होता; परंतु अंगी भूतदया व पराकाष्ठेची सत्यप्रीती असल्याकारणाने नफा होईल असा व्यापार किंवा देवघेव करण्यासंबंधाचे त्याचे धोरण नाहीसे झाले. म्हणून त्यास ही कष्टदशा प्राप्त झाली; परंतु त्यामुळे त्यास मुळीच खेद किंवा विषाद वाटत नसे. उलट त्याने एका अभंगामध्ये याबद्दल देवाचे आभार मानले आहेत. तो अभंग

येणेप्रमाणे:-

*बरें झालें देवा निघालें दिवाळें।। बरी या दुष्काळें पीडा केली ।।१*
*अनुतापें तुझें राहिलें चिंतन ।। झाला हा वमन संसार ।।२।।*
*बरें झालें देवा बाईल कर्कशा ।। बरी हे दुर्दशा जनांमध्यें ।।३।।*
*बरें झालें जगी पावलो अपमान ।। बरें गेलें धन ढोरें गुरें ।।४।।*
*बरें झालें नाही धरिली लोकलाज ।। बरा आलों तुज शरण देवा।।५।।*
*बरें झालें तुझें केलें देवा ईल ।। लेंकरें बाईल उपेक्षिलीं ।।६।।*
*तुका म्हणे बरें क्रत एकादशी ।। केले उपवास जागरण ।।७।।*

●●●

# संसाराविषयी वैराग्य

*संसाराच्या तापें तापलों मी देवा ।। करिता या सेवा कुटुंबाची ।।१।।*
*ह्मणऊनि तुझे आठविले पाय ।। येवो माझी माय पांडुरंगे ।।२।।*
*बहुतां जन्मीचा झालो भारवाही ।। सुटिजे ते नाहीं वर्म ठावें ।।३।।*
*वेढियलो चोरी अंतर्बाह्यात्कारी ।। कीव न करी कोणी माझी ।।४।।*
*बहु पांगविलों बहु नागविलो।। बहु दिवस झालो कासावीस।।५।।*
*तुका म्हणे आतां धावं घाली वेगीं।। ब्रीद तुझें जगी दीननाथा ।।६।।*

तुकारामाने निरनिराळ्या प्रकारचा व्यापार करून पाहिला; पण त्यास प्रत्येक व्यवसायात खोटच येत गेली. शेवटी त्याने बैलांवर गोणी वाहण्याचा धंदा पुन्हा आरंभिला. त्याच्या घरचे चार बैल होते. त्यावर हा धंदा त्याने चालविला. ज्या उदम्यांच्या संगतीने तो हा धंदा करीत असे ते त्याला अगदी कंटाळत असत; कारण त्याचे रात्रंदिवस भजन चाललेले असे. दिवसभर चालून थकून भागून बरोबरचे उदमी निजले तरी याला झोप कशी ती मुळीच येत नसे. तो आपला टाळ घेऊन भजनास सुरुवात करी.

.......................

आपला चालता काळ होता तेव्हा जे आपणास मानीत असत तेच आता आपला सर्वप्रकारे तिटकारा करतात. इतकेच नव्हे, तर आपले नुकसान करण्यासही ते मागेपुढे पाहत नाहीत, असा विचार त्याच्या मनात येऊन तो फारच उद्विग्न झाला. ही सारी विपत्ती आपण संसारात राहिलो आहो म्हणून प्राप्त झाली आहे, असे त्यास वाटून, आपला भाऊ जसा संसाराचा व्याप सोडून आपला सारा वेळ देवभक्तीत निर्वेधपणे घालवीत आहे त्याप्रमाणे आपणही करावे, असे त्याच्या मनात आले; परंतु पुन्हा कुटुंबाचे रक्षण करणे हे आपले कर्तव्य आहे, असे त्यास वाटले. ह्याप्रमाणे खेद करीत तो त्या घोर अरण्यात बसला असता एक वाटसरू त्या वाटेने आला. तुकारामास अशा रात्रीच्या वेळी वाटेत बसलेला पाहून तो पहिल्याने फारच घाबरला. त्याला वाटले की, हा कोणी वाटमाऱ्या विठ्ठलनामस्मरणाचे मिष करून येथे बसला आहे. तरी त्याने असा विचार केला की, हा एकटा आहे, याकरिता यास याच्या कुकर्माबद्दल

यथास्थित प्रायश्चित्त द्यावे. म्हणून त्याने तुकारामाच्या जवळ येऊन त्यास दरडावून विचारले की, तू ह्या अपरात्री येथे का बसला आहेस? तेव्हा तुकारामाने आपली एकंदर हकीगत त्याला मोठ्या हृदयद्रावक रीतीने सांगितली. ती ऐकून व त्याची ती सात्त्विक वृत्ती पाहून त्या वाटसरूंच्या मनाचा पूर्वीचा ग्रह पालटून त्याची त्याला फारच दया आली आणि त्याने त्याला भिऊ नको म्हणून सांगून त्याच्या बैलावर गोणी लादावयास त्याला मदत केली व त्याला त्या अरण्यातून सुखरूपपणे पार नेले.

ह्याप्रमाणे गावोगाव हिंडत असता वाटेत तुकारामाचे तीन बैल वाखा होऊन मेले, तेव्हा त्याच्याबरोबरच्या दुसऱ्या उदम्यांनी अशी कडी उठविली की, तुकारामाने आपले तीन बैल मुद्दाम मारले. तो खेप पुरी करून देहूस परत आला तेव्हा जो तो त्याची छी:थू: करू लागला. तुकारामाने जो काय खरा प्रकार घडला होता तो सांगून त्यांची समजूत करण्याचा प्रयत्न केला; पण त्याचे ऐकतो कोण? खळास साधूंची विटंबना करण्यास अल्पस्वल्पही कारण पुरते. आपल्यावर सर्व गावातील लोक बिथरले आहेत असे पाहून त्याच्या चित्तास परम उद्वेग झाला. ज्या लोकांचे तुकारामाने कर्ज काढून फेडले नव्हते, त्यांनी तर त्याचा अगदी पाठपुरावा मांडला होता. ते म्हणत की, ह्या वेड्या खुळ्याला विठ्ठलभक्तीचा नाद लागून तीतच नेहमी गुंग होऊन राहणे आवडते. लोकांचे आपण कर्ज घेऊन व्यापार आरंभला, तर तो दक्षतेने व हुशारीने करून त्यांच्या देण्याची फेड करावी, असा काहीच विचार न करिता हा साधूपणाचे सोंग करून भलताच विक्षिप्तपणा करितो आणि लोकांचे कर्ज बुडवितो आणि असे एकदा नव्हे तर अनेकवेळा करूनही हा शुद्धीवर येत नाही. आपली साऱ्या गावात नापत होत चालली आहे; आपणास लोक भ्रमिष्ट समजतात; आपल्या कुटुंबाचे हाल होत आहेत; आपली जनांत फजिती होत आहे; असा काहीच विचार याच्या मनात येत नाही. तेव्हा याचा साधेल तेवढा छळ करून याला वाटेवर आणावे असा त्यांना निश्चय केला होता; पण या त्यांच्या करण्याने तुकारामांचे मन जे थोडे बहुत संसारात गुंतून राहिले होते तेही हळूहळू उडत चालले. लोकांकडून जितका जास्त छळ होऊ लागला तितका तो अधिकच विरक्त होत चालला. असो.

ह्याच सुमारास देशात अवर्षण होऊन दुष्काळ पडला. तेव्हा तर तुकारामाच्या कुटुंबाचे फारच हाल होऊ लागले. या समयी त्याने दोन तीन बैल मोठ्या प्रयासाने मिळवून त्यावर मिरच्यांच्या गोण्या घालून त्या विकण्याकरिता तो खाली कोकणात उतरला; पण ह्यावेळी आमच्या चरित्रनायकास संसाराचा पुरा वीट आला होता. तो सोडून मोकळे होण्याचा त्याचा बहुतेक निर्धार झाला होता. कोकणात गावोगाव

मिरच्या हिंडवून त्याने त्या सगळ्या विकल्या; पण ह्या व्यापारात त्यास म्हणण्यासारखा नफा झाला नाही. कारण तुकशेटींच्या अंतर्यामींचा आपपरभाव बहुतेक लोपून, सर्वांभूती एकच परमात्मा भरला आहे अशी त्याची वृत्ती झाल्यामुळे त्याजकडे आलेले गिऱ्हाईक मागतील त्या दराने त्याने मिरच्या विकल्या. ह्याप्रमाणे माल विकून जो काही पैसा मिळाला तो घेऊन तुकाराम परत येत असता वाटेत त्याला एक ठक भेटला. त्या ठकाने तुकारामाची वृत्ती व चालचलणूक पाहून ताडले की, आपली ठकविद्या चालविण्यास ही असामी बरी आहे. मग त्याने त्याच्याशी मोठे मानभावीपणाचे बोलणे लावून म्हटले की, शेटजी, ही एवढी सोन्याची कडी घ्याल तर मी ही आपणास विकण्यास राजी आहे. तुकशेटीने म्हटले, एवढा ऐवज घेण्यापुरते माझ्याकडे पैसे नाहीत. असे म्हणून त्याने आपल्याकडची सारी रोकड त्याला दाखविली. तेव्हा तो ठक म्हणाला, तुमच्याकडे तूर्त जे काही नगद नाणे असेल ते मला द्या आणि बाकीचे पैसे मागाहून सवडीप्रमाणे द्या; मी तुम्हास ओळखतो. तुमच्यावर माझा पूर्ण विश्वास आहे. तुकशेटीने पाहिले की, हा मनुष्य फार अडला आहे; तर आपण याची गरज करावी आणि यात आपलाही फायदा होईल. असा विचार करून त्याने ती कडी घेऊन आपल्या जवळचे सारे पैसे त्याच्या पदरात मोजले. ह्या फायदेशीर सौद्याबद्दल त्यास मोठा हर्ष वाटून तो लगबगीने घरी यावयास निघाला. तो मनात म्हणू लागला की, हे सोने सावकारास देऊन त्याचे थोडेसे कर्ज वारावे आणि त्यांच्याकडून काही आपल्या खर्चासही मागून घ्यावे. तुकाराम परत आला असे कळताच सावकारलोक त्याच्याकडे येऊन त्यास काय आणलेस ते आम्हाला दाखीव, असे म्हणू लागले. तेव्हा त्याने बैल बाहेर दावणीस बांधून आपले गाठोडे त्यांच्या समक्ष सोडले आणि ती सोन्याची कडी त्यांच्या पुढे करून म्हटले, माझ्याकडचे सारे द्रव्य देऊन मी हे सोने घेतले आहे. तर हे तुम्ही घेऊन आपल्या काही देण्याची वजावाट करावी व मलाही थोडेसे पैसे घरी खर्चास द्यावे. सावकारांनी ती कडी हाती घेऊन परीक्षा करून पाहिली तो ती पितळेची असून वरून त्यास सोन्याचा मुलामा दिला आहे, असे त्यांच्या नजरेस आले. तेव्हा त्यांनी त्याचा पुष्कळ उपहास करून त्यास म्हटले: अरे वेड्या, त्या ठकावर विश्वास ठेवून तू खचीत फसलास आणि आपल्या बरोबर तू आम्हांसही बुडविलेस. तू एकदाचा मरशील तर सगळ्या गावाची पीडा टळेल. तू जोपर्यंत विठोबाची भक्ती करीत राहशील तोपर्यंत तुझी अशीच दशा व्हावयाची. यापुढे तुझा संसार चालणे मोठे कठीण आहे. असे म्हणून ते सावकार निराश होऊन आपापल्या घरी निघून गेले. इकडे त्याच्या बायकांना ही गोष्ट कळताच त्या ऊर बडवून घेऊ लागल्या.

त्या बिचाऱ्या तर आपल्या नवऱ्याची चातकासारखी वाट पाहत बसल्या होत्या. मिरच्या विकून आल्यावर काही दिवस तरी पोटभर अन्न मिळेल अशी त्यास आशा होती; पण हा भोळा भगवद्भक्त ठकाच्या नादी लागून सफाई बुडाला, असे कळताच त्यास पराकाष्ठेचे दु:ख झाले.

ते दिवस दुष्काळाचे असल्याकारणाने तुकारामाच्या कुटुंबाचे फारच हाल होऊ लागले. जुने घेतलेले कर्ज न फिटल्यामुळे त्यास कोणी नवे कर्ज देईना. तशात तुकशेटीची वृत्ती अगदीच विरक्त झालेली. तेव्हा त्याच्यावर कोणीच विश्वास ठेवीना. ही अशी भयंकर स्थिती आपल्या नवऱ्यास प्राप्त झालेली पाहून त्याची धाकटी बायको अवलाई हिने असा विचार केला की, आपली पत खर्चून थोडेसे भांडवल यास आणून द्यावे, मग ती एका सावकाराकडे जाऊन त्यास म्हणाली:

मी माझ्या नावे खत लिहून देते. मला थोडे रुपये कर्जी द्या. त्या सावकाराने पाहिले की, ही बाई श्रीमंताची मुलगी असून हिचे भाऊ पुण्यात मोठे धनाढ्य सावकार आहेत, तेव्हा हिला आपण कर्ज दिले तर ते वसूल करण्यास पंचाईत पडणार नाही. असा विचार मनात आणून त्याने तिला दोनशे रुपये कर्जी दिले. ते अवलाईने आणून तुकारामाच्या स्वाधीन करून म्हटले: हे पैसे मी आपल्या अंगावर काढले आहेत. तर हे घेऊन आता तरी नीट व्यापार करा. कोठे तरी लांबच्या गावी जाऊन उदीम करा. हे भांडवल मिळाल्यावर तुकारामाने आपल्या बैलांवर मीठ भरून काही उदमी बालेघाटाकडे चालले होते, त्यांच्या बरोबर प्रयाण केले. घरातून निघते वेळी अवलाईने त्यास असे निक्षून सांगितले की, हे भांडवल चांगले जतन करा. हेही जर का घालवून याल, तर तो सावकार माझ्या नावाने खडे फोडील. वाटेत कोणी याचक किंवा ठक भेटल्यास त्याला काहीएक देऊ नका आणि विठोबाच्या भक्तीचे वेड किंचित कमी करून कुटुंबाची उपासमार होत आहे याचा काही तरी विचार मनात येऊ द्या. ह्याप्रमाणे बायकोचा उपदेश ऐकून तुकाराम व्यापारास निघून गेला.

बरोबरच्या उदम्यांनी ज्या गावी आपला माल विकला, त्याच गावी आपल्या मालाची व्यवस्था लावून तो त्यांच्या बरोबर परत यावयास निघाला. वाटेत एके ठिकाणी ते उतरले असता, तेथे एक ब्राह्मण गळ्यात लाकडाचा नांगर अडकवून याचना करावयास आला. तेव्हा काही उदम्यांनी तर त्यास झिडकारून लावले आणि जे कित्येक अंमळ दयाळू होते त्यांनी त्यास चवली पावली देऊन वाटेस लाविले. हे पाहून तुकारामास त्याची दया आली. त्याने त्याला आपल्या जवळ बोलावून बसवून घेतले आणि आपली साद्यंत हकीगत निवेदन करावयास सांगितले. तेव्हा तो ब्राम्हण

म्हणाला: माने पाटीलकाकांचे वचन होते ते माझ्या दायादांनी हिरावून घेतले आणि दिवाणास अवदाने चारून मला बंदीत टाकले. पुढे माझ्या तर्फेने पंचांनी सरकारास समजूत दिल्यामुळे मला बंदमुक्त केले; परंतु मी तुरुंगातून सुटलो याबद्दल हरकी* म्हणून मजकडून तीनशे रुपये घ्यावे, असे त्या अविचारी व दुष्ट दिवाणाने ठरविले. माझ्याकडे जे काही होते ते सगळे विकून मी त्यापैकी पन्नास रुपये भरले. आता बाकी राहिलेल्या रकमेसाठी राजाचा तगादा माझ्या पाठीशी लागला आहे. हा पहा सरकारचा शिपाई. हा मजबरोबर रात्रंदिवस असतो. हा मला घटकाभरसुद्धा कोठे चैन पडू देत नाही. म्हणून मी माझी बायको मुले जिकडे तिकडे याचना करीत फिरत आहो. हा त्या गरीब ब्राह्मणाचा हृदयद्रावक वृत्तांत ऐकून तुकारामाचे हृदय अगदी कळवळून आले आणि तो त्यास म्हणाला: तुम्ही चिंता करू नका. माझ्यापाशी हे पहा अडीचशे रुपये आहेत. ते नेऊन तुमच्या उरलेल्या राजदंडाची भरपाई करा. असे म्हणून त्याने आपल्या जवळचे सगळे रुपये त्या ब्राम्हणाच्या हातावर ठेविले. तेव्हा त्या ब्राम्हणास पराकाष्ठेचा आनंद वाटून त्याने तुकारामाचे फार आभार मानले. हे त्याचे विलक्षण औदार्य पाहून सोबतच्या उदम्यांस परम विस्मय वाटला; पण ते याचा उपहास करून म्हणू लागले की, वाहवारे दाता! घरी बायकापोरास खावयास मिळण्याची पंचाईत असता व दुसऱ्याचे कर्ज काढून भांडवल जमविले असता, त्याची अशी विल्हेवाट करावयाची काय? नवलाईस हे वर्तमान कळले म्हणजे ती तर अगदी मोकील. असे म्हणून उदमी त्याला तेथेच सोडून पुढे चालते झाले. इकडे तुकारामाने एक न्हावी बोलावून आणून त्या ब्राह्मणाचे डोईदाढीचे वगैरे केस वाढले होते ते उतरविले आणि त्याच्या बायकोस बोलावून आणून तिला आपल्याकडची सामग्री दिली व तिच्या हाती स्वयंपाक करवून दहा ब्राह्मणांम भोजन घातले.

ह्याप्रमाणे त्या गरीब ब्राह्मणास ऋणमुक्त व सुखी केल्याबद्दल तुकारामास मोठा संतोष वाटला आणि आपल्याकडचा पैसा सत्कार्यी लागला असे तो मनात म्हणू लागला; परंतु त्यास लागलीच अवलाईच्या सांगण्याची आठवण आली आणि आता घरी गेल्यावर तिला काय सांगावे याचा त्याला विचार पडला. त्याच्या बरोबरचे उदमी जे पुढे गेले त्यांनी ही गोष्ट तिला अगोदरच कळवून ठेविली होती. तुकारामाने घरी जाण्यास काही वेळ अळंटळं केली; पण शेवटी अवलाईच्या शिव्याशाप सोसण्याचा निर्धार करून त्याने घरची वाट धरली. तो घरी गेल्यावर अवलाईने त्याला किती दोष

* पूर्वी ज्या कुळाच्या तर्फेचा न्याय होत असे. त्याच्याकडून राजेलोक काही भाग घेत असत. त्या द्रव्याला हे नाव आहे. हा शब्द हर्ष या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश असावा.

दिला असेल त्याची वाचकांनीच कल्पना करावी. यानंतर तुकारामाला कोणाकडूनही कर्जी पैसा मिळेनासा झाला. दुष्काळ तर एवढा जबर पडला की, रुपयास दोन पायल्या धान्य मिळू लागले. पाऊस कसा तो मुळीच पडेना. गुरेढोरे चाऱ्यावाचून पटापटा प्राण सोडू लागली. ह्यावेळी तुकारामाची स्थिती फारच कठीण झाली. जो तो त्याची हेळणा करू लागला. त्यास कोणी आपल्या दारी उभा करीना. घरात मुळीच अन्न नसल्यामुळे बायकापोरास खडखडीत उपास पडू लागले. कोणी काही उसनवार देईना. मग आप्तसोयऱ्याच्या दारोदार हिंडून काय मिळे ते तो घरातील माणसास आणून घाली. तो कोणापाशी कर्ज मागावयास गेला म्हणजे ते त्याला म्हणत की, आधी जुने कर्ज फेड आणि मग नवे माग; असे म्हणून ते त्याला आपल्या दारातून हाकून देत! त्याला कोणी आपल्या घरी येताना पाहिले म्हणजे त्यांच्या कपाळास आठ्या पडत आणि ते त्याला म्हणत की, तू आपल्या संसाराचे मातेर करून आता आमच्या पाठीस लागावयास आला आहेस काय? चल नीघ येथून. ह्याप्रमाणे तो जिकडे जाई तिकडे लोक त्याला पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणे हाकून देत! त्याने आपल्या आप्तसोयऱ्यांपाशी एक वेळ अशी करुणा भाकिली की, ह्या दुष्काळात जर तुम्ही आह्मास मदत करणार नाही, तर आम्ही खचित मरून जाऊ. यासाठी आम्हास थोडेसे कर्ज द्या; परंतु त्याची कोणासही करुणा आली नाही. ते त्यास म्हणाले की, आमचीही तुझ्यासारखीच अवस्था झाली आहे. ह्याप्रमाणे तुकारामाची भयंकर स्थिती झाली असता दुष्काळ तर एकसारखा वाढतच गेला आणि शेवटी एक शेराची धारण झाली. तेव्हा तर कोणासही अन्न मिळेनासे झाले. तुकारामाच्या माणसास चार चार आठ आठ दिवस नुसते पेजेचे पाणीही मिळण्याची पंचाईत पडू लागली. अशा स्थितीत त्याची थोरली बायको अन्न अन्न करून प्राणास मुकली. यामुळे तर तो फारच लज्जित झाला. त्याचे आप्तजन या प्रसंगी त्याला म्हणाले की, तू आता हा विठ्ठलभजनाचा नाद सोड. या वेड्या नादाने तुझ्या संसाराचे वाटोळे झाले. तुला आता जनात तोंड दाखवायला मार्ग उरला नाही. तेव्हा अजून तरी सावध हो आणि हे खूळ सोड. नाही तर तुझी याहूनही वाईट स्थिती होऊन तुझा सत्यनाश होईल. हे त्यांचे भाषण ऐकून तुकाराम त्यास म्हणाला: विठोबाच्या भक्तीचा दुष्काळात प्राप्त होणाऱ्या विपत्तीशी काय संबंध आहे? जे विठोबाची भक्ती करीत नाहीत ते ह्या दुष्काळात मरत नाहीत काय? आम्ही काही केले तरी होणारे कधी चुकणार नाही. तेव्हा मला उगीच दोष देऊन आपली वाणी कशाला शिणविता? पुढे काही दिवसांनी तुकारामाचा वडील मुलगा संतोबा म्हणून होता, त्याचे देहावसान झाले. ह्या मुलावर तुकारामाचे फारच प्रेम होते. यास्तव तो गेला तेव्हा तर त्याला संसाराचा पुरा वीट आला.

ह्याप्रमाणे केवळ तेरावे वर्षी संसाराचा व्याप गळ्यात पडला असता, तो मोठ्या दक्षतेने चालवून तुकारामाने आपल्या माता-पितरांस संतुष्ट केले; परंतु ही प्रिय मातापितरे फार दिवस जगली नाहीत. त्याच्या वयाच्या सतराव्या वर्षी त्यांचा त्यास वियोग घडला. पुढे अठराव्या वर्षी वडील बंधू सावजी याची स्त्री आटपली. तेव्हा सावजी विरक्त होऊन घरदार सोडून तीर्थयात्रेस गेला. तो पुन्हा परत आलाच नाही. पुढे एकविसावे वर्षी तुकारामांचे दिवाळे निघून चोहोकडे मोठा दुष्काळ पडला. त्यात त्याची एक बायको आणि एक मुलगा यांचा अंत झाला. ह्या अशा एकामागून एक विपत्ती प्राप्त झाल्यामुळे संसार हा केवळ दुःखमय आहे. त्याच्या पाठीस लागले असता नाना विपत्ती प्राप्त होऊन सर्व जन्माचे मातेरे होते. असे त्याच्या पूर्णपणे लक्षात आले. हे आपले क्षणभंगुर जीवित अशा अशा अशाश्वत संसाराच्या उपद्व्याप सोडून निखालस मोकळे व्हावे, असा त्याने आपल्या मनाचा पूर्ण निर्धार केला. ह्याप्रमाणे अगदी उद्विग्न व विरक्त होऊन तो त्या आवेशासरशी घरातून बाहेर पडला आणि भांबनाथ नावाच्या एका डोंगरावर जाऊन अगदी ध्यानस्थ होऊन बसला. इकडे तुकाराम कोठे दिसेनासा झाला तेव्हा त्याचा धाकटा भाऊ कान्होबा त्याच्या शोधास निघाला. आपल्या बंधूस शोधून काढल्यावाचून अन्नसेवन करावयाचे नाही असा निश्चय करून, तो त्यास रानावनांत व डोंगरदरीत धुंडू लागला. हा शोध त्याने एकसारखा सात दिवसपर्यंत चालविला; पण त्याचा काहीच पत्ता लागेना. शेवटी सातवे दिवशी तो अवचित भांबनाथ पर्वतावर गेला. तेथे त्याने आपला भाऊ डोळे मिटून विठोबाचे नामस्मरण करीत पडला आहे असे पाहिले. तुकारामास पाहून कान्होबाला अत्यंत हर्ष वाटला. त्याने धावत जाऊन मोठ्या प्रेमाने त्याचे पाय घट्ट धरले आणि घरी परत येण्याविषयी त्यास विनंती केली. भावाचा फारच आग्रह पाहून तुकाराम देहूस परत आला आणि घरी न जाता इंद्रायणीच्या तिरीच बसला. तेथे दुसरे दिवशी स्नान वगैरे करून त्या सात दिवसांच्या उपवासाचे त्या दोघा बंधूंनी पारणे सोडले. मग तुकारामाने आपल्या भावास सांगून घरी असलेली एकंदर खतेपत्रे आणविली. ती सगळी हाती घेऊन तो कान्होबास म्हणाला की, यावरून पाहता आपले लोकांकडे बरेच येणे निघते; परंतु ते त्यांच्याकडे मागावयास जाण्यात काही अर्थ नाही. आपल्या देण्याची त्यांच्याकडे मागणी करून शत्रुत्व पत्करावे, यापेक्षा ही खते नाहीतशी करून टाकावी ते बरे. असे म्हणून तो ती नदीत टाकून देण्यास तयार झाला. ते पाहून कान्होबा हात जोडून म्हणाला वडिलास मी सांगावे असे नाही; पण आपण वैराग्य घेतले तरी माझ्या मागे अजून संसार आहे. माझ्या मुलामाणसांचा चरितार्थ मला चालविणे आहे. तेव्हा तुकारामाने त्याच्या स्वाधीन त्यातली अर्धी खतेपत्रे करून

बाकीची आपल्या वाट्याची म्हणून इंद्रायणीत बुडवून टाकली आणि तो त्यास म्हणाला आजपासून मला संसाराची दगदग करणे नाही; भिक्षा मागून उदरनिर्वाह करावा व कोठे तरी पडून राहावे हेच मला योग्य वाटते. तेव्हा तुला जर काहीतरी व्यवसाय करून संसार चालवावयाचा असेल, तर तुझे माझे जुळावयाचे नाही. हे वडील बंधूचे निश्चयाचे वचन ऐकून कान्होबाने आपला निराळा संसार आरंभिला.

यानंतर तुकारामाने आपल्या वडिलांनी स्थापलेल्या देवळामध्ये रात्रंदिवस राहून भजनपूजनादिकांचा नित्यक्रम आरंभिला. तो प्रात:काळी उठून स्नानादी विधी उरकून विठोबाच्या प्रतिमेची पूजाअर्चा करीत असे आणि मग बाकी उरलेला दिवसाचा वेळ तो रानात बसून काढीत असे. देहूगावाच्या पश्चिमेस तीन कोसांवर भांडार नावाचा एक डोंगर आहे, त्यावर तो वेळोवेळी जाऊन एकांत बसे आणि विठोबाचे ध्यान व भजन निर्वेधपणे करीत असे. सायंकाळ झाली म्हणजे त्याने परत विठोबाच्या देवळात येऊन मोठ्या प्रेमाने देवाचे भजन करावे. ही त्याची वृत्ती पाहून लोक त्याच्या संबंधाने नाना कुतर्क करीत. कोणी म्हणत की, याला वेड लागल्यामुळे हा असे रात्रंदिवस न विसंबता नामस्मरण करितो. कोणी म्हणत की, याला व्यापारात तोटा आल्यामुळे हा बावचळला असावा. एरवी संसाराची परवा न करून हा असा फटिंग झाला नसता. कोणी म्हणत की, याने आपली खतेपत्रे बुडवून व बायकोपोरांस सोडून विशेष ते काय केले? याला पोट कोठे सुटले आहे? पोटाची खळी भरण्यासाठी याला नेहमी गावात येऊन दारोदार भिक्षा मागावी लागत आहे. तेव्हा दररोज उठून पर्वतावर किंवा रानात जाऊन बसण्यात अर्थ काय? कोणी त्याचा पक्ष घेऊन बोलत की, उगीच रिकामे बसून त्याची निंदा करिता, यात काय हाशील आहे? आजपर्यंत संसारात विपत्ती आल्यामुळे तो सोडून कितीसे ईश्वरभजनी लागले आहेत बरे? आपण तर नेहमी असे पाहतो की, संसारात कितीही दु:ख भोगावे लागले तरी त्याची आवड कोणासही सुटत नाही. असे असता याने त्यावर लात मारून वैराग्य धारण केले आहे. हे काही लहानसान काम नव्हे. ह्याप्रमाणे ज्याला जसे वाटे, तसे तो तुकारामाविषयी बोले; पण त्याचा त्यास मुळीच विषाद वाटत नसे. त्याचे चित्त ईश्वरभजनी सदा रममाण होऊन त्यास खऱ्या भक्तिसुखाचा अनुभव घडू लागल्यामुळे त्यास जनप्रवादाची मुळीच क्षिती वाटेनाशी झाली. पुढे एके प्रसंगी काही संतांनी त्यास वैराग्य धारण करण्यास काय कारण झाले? असा प्रश्न विचारिला असता, त्याचे समाधान त्याने पुढील अभंग म्हणून केले.

*याती शूद्रवंश केला व्यवसाव ।। आदि तो हा देव कुळपूज्य ।।१।।*
*नये बोलों परी पाळिले वचन ।। केलियाचा प्रश्न तुम्ही संतीं ।।२।।*

*संसारें झालों अतिदुःखे दुःखी ।। मायबाप सेखीं क्रमिलिया।।३।।*
*दुष्काळें आटिलें द्रव्ये नेला मान ।। स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली ।।४।।*
*लज्जा वाटे जीवा त्रासलो या दुःखे ।। व्यवसाय देखें तुटी येतां ।।५।।*
*देवाचें देऊळ होतें ते भंगलें ।। चित्तासी जें आलें करावेसें ।।६।।*
*आरंभी कीर्तन करी एकदशी ।। नव्हतें अभ्यासीं चित्त आधीं ।।७।।*
*काही पाठ केली संतांचीं उत्तरें ।। विश्वासे आदरे करोनियां ।।८।।*
*गाती पुढें त्यांचें धरावे धृपद ।। भावें चित्त शुद्ध करोनियां ।।९।।*
*संतांचे सेविले तीर्थ पायवणी ।। लाज नाहीं मनीं येऊं दिली ।।१०।।*
*टाकला तो काही केला उपकार ।। केले हे शरीर कष्टवूनि ।।११।।*
*वचन मानिले नाही सुहृदांचे ।। समूळ प्रपंच वीट आला ।।१२।।*
*सत्य असत्यासी मन केले ग्वाही ।। मानियेले नाही बहुमता ।।१३।।*
*मानियेला स्वप्नी गुरूचा उपदेश ।। धरिला विश्वास दृढ नामी ।।१४।।*
*यावरी या झाली कवित्वाची स्फूर्ति ।। पाय धरिले चित्ती विठोबाचे ।।१५।।*
*निषेधाचा काही पडिला आघात ।। तेणे मध्ये चित्त दुखविले ।।१६।।*
*बुडविल्या वह्या बैसलो धरणे।। केले नारायणे समाधान ।।१७।।*
*विस्तारी सांगता बहुत प्रकार ।। होईल उशीर आता पुरे ।।१८।।*
*आता आहे तैसा दिसतो विचार ।। पुढील प्रकार देव जाणे ।।१९।।*
*भक्ता नारायण नुपेक्षी सर्वथा ।। कृपावंत ऐसा कळो आले ।।२०।।*
*तुका म्हणे माझे सर्व भांडवल ।। बोलविले बोल पांडुरंगे ।।२१।।*

ह्या अंभंगात तुकारामाने आपले सारे चरित्र मोठ्या खुबीने अगदी संक्षिप्त व साध्या रीतीने सांगितले आहे. ह्याप्रमाणे त्याने कोणाची पर्वा न करिता व कोणाचा बुद्धिवाद मनास न आणिता संसारत्याग करून पांडुरंगभजनात आपला सर्व काळ घालविण्याचा क्रम मोठ्या निश्चयाने सुरू केला आणि तो त्याने आमरण तसाच एकसारखा चालविला. या संसारातील सुखविषयांनी व नानाविध मोहप्रसंगांनी त्याच्या चित्तास व्यामोह झाला नाही आणि त्याच्या हातून कोणतेही अन्याय कर्म किंवा अनाचार कधीही घडला नाही. अशी निःसीमभक्तिपरायणता, निश्चयाची दृढता व आचरणाची शुद्धता फारच थोड्या नररत्नांच्या ठायी आढळते. त्याने जो एकदा वैराग्याचा अंगीकार केला तो केलाच. त्याचे ते वैराग्य स्मशानवैराग्य किंवा प्रसूतिवैराग्य यासारखे क्षणिक नव्हते. त्यात दंभाचा तर लवलेशही नव्हता. म्हणून ते त्याच्या अंगी पूर्णपणे बाणून आजन्म शुद्ध व अढळ राहिले. असो, आता तुकारामाने वैराग्यवृत्तीचा अवलंब केल्यावर त्याच्या हातून काय काय गोष्टी घडल्या, त्यांचे निरूपण पुढील प्रकरणात करू.

●●●

# वैराग्यवृत्ती

*रुसलों संसारा ।। आम्ही आणिक व्यापारा ।।१।।*
*म्हणऊनि केली सांडी ।। देऊनि पडिलों मुरकुंडी ।।२।।*
*परतेचिना मागे ।। मोहो निष्ठुर झालो अंगें ।।३।।*
*सांपडला देव ।। तुका म्हणे गेला भेव ।।४।।*

*काय माझें नेती वाईट म्हणोन ।। करूं समाधान कशासाठी ।।१।।*
*काय मज लोक नेती परलोका ।। जातां कोणा एका निवारे ।।२।।*
*न म्हणे कोणासी उत्तम वाईट ।। सुखे माझी कूट खावो मागें ।।३।।*
*सर्व माझा भार असे पांडुरंगा ।। काय माझें जगासवें काज ।।४।।*
*तुका म्हणे माझे सर्वही साधन ।। नामसंकीर्तन विठोबांचे ।।५।।*

ह्याप्रमाणे संसारचिंताताप नष्ट होऊन चित्तास अढळ शांती प्राप्त झाल्यावर तुकाराम आपला सगळा काळ ईश्वरभजनपूजनादिकांत व आध्यात्मिक ज्ञानसंपादनात घालवू लागला. त्याच्या पूर्वजांनी बांधलेले विठोबाचे देऊळ या वेळी अगदी मोडकळीस आले होते. ते त्याने देहूकरांच्या साहाय्याने पुन्हा नीट केले. हा जीर्णोद्धार चालला असता, तुकाराम जातीने हातात कुदळपावडे घेऊन केवळ मजुरासारखा खपला. ह्या देवळात तो प्रत्येक एकादशीस मोठा उत्सव करीत असे. कोणातरी हरिदासास बोलावून आणून त्या रात्री तो कीर्तन करवी आणि आपण त्याच्या मागे उभा राहून टाळ, वीणा वगैरे वाजवी. कीर्तन आटोपल्यावर सर्व रात्र जागून तो भजन करी आणि दुसरे दिवशी यथाशक्ती ब्राह्मणभोजन घालून पारणे करी. देवळातील झाडलोट व सारवण वगैरे तो स्वत: आपल्या हाताने करी. कोणी प्रवासी तेथे उतरावयास आला असता त्याचा परामर्श तो यथाशक्ती घेत असे. एखाद्या प्रवाशास भूक लागली असून त्याच्यापाशी काही खावयास नसल्यास त्याला तो हरप्रयत्न करून भोजनाची सामग्री मिळवून देत असे. लांबचा प्रवास करून आलेल्या यात्रेकरूंचे पाय सुजले असता, ते शेकण्याकरिता त्यास पाणी तापवून देत असे आणि त्यांचे पाय चेपून व अंग रगडून त्याला झालेल्या वाटेच्या श्रमाचा परिहार करी. त्यापैकी कोणी साधुसंत असल्यास त्यापाशी बसून आत्मानात्मविचार मोठ्या भक्तीने ऐके. कोणी प्रवासी वाटेत आजारी होऊन त्या

गावी आला असता, तुकाराम त्यास देवळात नेऊन ठेवी. तेथे तो त्याच्या औषधपाण्याची व खाण्यापिण्याची तरतूद घरातल्या अगदी मायेच्या माणसाप्रमाणे ठेवी आणि तो चांगला बरा झाला म्हणजे त्याला जाऊ देत असे. कोणी वाटसरू तृषाक्रांत झाला असता त्याला पाणी मिळावे म्हणून तो मार्गात पाण्याच्या घागरी भरून ठेवी. कोणी डोकीवर मोठा बोजा घेऊन चालता चालता टेकीस आला तर त्याचे ओझे हलके व्हावे म्हणून त्याला तो मदत करी. गावातील गाईबैल निर्बळ व निरुपयोगी झाले म्हणजे निर्दय लोक त्यास रानात सोडून देत असत. अशा पशूंना तुकाराम चारापाणी घालून त्यांची जोपासना करी. सारांश काय की, कोणीही मनुष्य अथवा प्राणी विपत्तीत आहे असे दृष्टीस पडले असता त्याचे चित्त कळवळून जात असे आणि तो त्याला आपल्याकडून होईल तेवढे साहाय्य करण्यास सदा तत्पर असे. ब्राह्मणांच्या घरी तर तो एखाद्या पगारी चाकराप्रमाणे राबत असे. त्यांचा घरचा झाडलोट, सडासंमार्जन वगैरे कामे तो मोठ्या प्रेमाने करी. कोणी काहीही करावयास सांगितले असता त्याला तो नकार असा सहसा सांगत नसे. सर्वांभूती समदृष्टी झाल्याकारणाने आपल्याकडून कोणास तिळप्रायही दुखवू नये, असा त्याच्या मनाचा निर्धार असे. ह्याप्रमाणे लोकांच्या उपयोगी पडण्यात त्याला मोठ संतोष वाटे. तो नेहमी अल्पाहार करून निद्राही बेताचीच घेत असे. सारा दिवस काही ना काही लोकोपकाराचे काम करून रात्रीस थकवा आला म्हणजे त्यास झोप लवकर येई. येणेकरून त्याच्या नित्याच्या भजनक्रमास अंतराय घडे. हा अंतराय न घडावा म्हणून तो आपल्या शेंडीस दोरी बांधून ती तो वरती खुंटीस किंवा दुसऱ्या कशास तरी अडकवी. म्हणजे मग भजन करिता करिता डुलकी आल्यास त्याच्या मानेस हिसडा बसून त्याची झोप टळे आणि पुन्हा पूर्वीप्रमाणे त्याचे भजन चाले.

तुकाराम आपला उदरनिर्वाह भिक्षा मागून करीत असे, हे मागे सांगितलेच आहे. तरी ह्या वृत्तीचा त्यास मनापासून कंटाळा असे. आपला व आपल्या बायकोमुलांचा योगक्षेम कसा तरी चालला पाहिजे, म्हणून तो निरुपायास्तव काखेस झोळी लावून दारोदार हिंडत असे. ह्या भिक्षावृत्तीची निर्भर्त्सना त्याने एका अभंगात केवळ स्वानुभवावरून केली आहे. तो अभंग हा :

*भिक्षापात्र अवलंबणे । जळो जिणे लाजिरवाणे ।।*
*ऐसियासी नारायणें । उपेक्षिजे सर्वथा ।।१।।*
*देवा पायीं नाहीं भाव । भक्ति वरी वरी वाव ।।*
*समर्पिला जीव । नाहीं तो हा व्यभिचार ।।२।।*
*जगा घालावे सांकडें । दीन होऊनि बापुडें ।।*
*हेंचि अभाग्य रोकडें । मूळ आणि विश्वास ।।३।।*
*काय न करी विश्वंभर । सत्य करितां निर्धार ।।*
*तुका म्हणे सार । दृढ पाय धरावे ।।४।।*

हे भिक्षावृत्तीचे निंद्यत्व केवळ ढोंगी व दांभिक लोकांच्या संबंधाने यथार्थ होय; परंतु तुकारामासारख्या ज्या नि:सीम भगवद्भक्तास संसाराविषयी पुरा वीट आला असून, कोणत्याही प्रकारच्या व्यवसायात मन घातले तर ईश्वरभक्तीस अंतराय घडतो असे वाटते, त्याने लोकांपाशी घासभर अन्न मागून खाऊन शरीरयष्टी कशीबशी उभी ठेविल्यास त्यात काही वावगे होत नाही आणि तुकारामासारख्या परोपकारार्थ अहर्निश देह झिजविणाऱ्या महात्म्यास पोसावे लागल्याने लोकांस मोठे 'साकडे' पडले असे सहसा होत नाही. मोठ्या धर्मगुरुत्वाचा आव घालून व संसारी जनांस अधिकच संसारनिमग्न करण्यास कारणीभूत होऊन, केवळ परान्न सेवनाने पुष्टतुष्ट होणाऱ्या जनापेक्षा तुकारामासारखे विदेही व विरक्त पुरुष लक्षपट चांगले होत. असो. तरी आपले लोकांवर विनाकारण ओझे आहे, हा विचार त्याच्या मनास नेहमी टोचीत असे. म्हणून तो लोकांच्या उपयोगी पडण्यास सदोदित झटत असे. कोणी काही काम करू सांगितल्यास तो ते मोठ्या उत्साहाने करीत असे.

एकदा असे घडले की, इंद्रायणीतीरच्या एका शेतकऱ्याचे शेत पिकास यावयाच्या ऐन समयास त्याला दुसऱ्या गावी धान्य खरेदी करावयाला जाणे प्राप्त झाले. म्हणून तो शेतराखणीसाठी कोणी तरी इसम पाहू लागला. तेव्हा आपल्या शेताजवळील विठोबाच्या देवळात तुकाराम रात्रंदिवस विठोबाचे नामस्मरण करीत बसलेला असतो; त्याला, 'आपल्या शेतातील माळ्यावर बसून शेत राखतोस  काय म्हणून विचारावे असे त्याच्या मनात आले. मग तो शेतकरी तुकारामापाशी येऊन म्हणाला, तुकारामबावा, तुम्ही सारा दिवस ह्या देवळात देवाचे भजन करीत बसता, ते माझ्या शेतातील माळ्यावर बसून राहाल तर माझ्या शेताची राखण होऊन तुमचाही ईश्वरभजनाचा क्रम अखंड चालेल. मी बाहेरगावी जात आहे. तिकडून परत यावयास मला निदान एक महिना लागेल. तर एवढा काळ तुम्ही माझ्या शेताचे रक्षण केल्यास मी तुम्हाला अर्धा मण धान्य देईन. तुकारामाने हे त्यांचे म्हणणे मान्य केले आणि त्याच्या माळ्यावर जाऊन तो बसला. ह्याप्रमाणे शेतकरी निर्धास्त होऊन आपल्या योजलेल्या कामास परगावी निघून गेला. इकडे तुकाराम जो एकदा त्या माळ्यावर जाऊन बसला तो तेथून दिवसभर हललाच नाही. दोन प्रहरी अवलाई नवऱ्याची वाट पाहून पाहून थकली. तो जेवल्यावाचून ती कधीही जेवीत नसे. तेव्हा तिने आपल्या मुलीला त्याच्या शोधास पाठविले. तिने देवळात येऊन पाहिले तो तुकाराम तेथे नाही. मग ती त्याला शोधीत शोधीत त्या माळ्यापाशी आली आणि त्याला घरी येण्याविषयी विनंती करू लागली.

तेव्हा तुकारामाने तिला सांगितले की, मी हे शेत राखावयास बसलो आहे. माझी भाकर इकडेच घेऊन ये. त्याप्रमाणे अवलाईने त्याची भाकर शेतात पाठवून दिली. पुढे दररोज सकाळपासून संध्याकाळपर्यंत तो त्या माळ्यावर भजन करीत बसत असे. पहाटेस उठून स्नानादी विधी आटपून तो विठोबाची पूजा करी आणि दिसू लागले न लागले तो माळ्यावर येऊन बसे व रात्र पडली म्हणजे पुन्हा देवळात जाऊन बायकोने पाठविलेला भाकरतुकडा खाऊन तो देवाच्या भजनात दंग असे; पण ह्या राखणदाराच्या हातून शेताचे रक्षण मुळीच झाले नाही. शेतावर येऊन बसलेल्या पक्ष्यास हाकून लावणे हे मोठे क्रूरपणाचे काम आहे, असे त्या सद्य भगवद्भक्तास वाटे. तो मनात म्हणे की, गेल्या दुष्काळामध्ये ह्या बिचाऱ्या पक्ष्यास काहीएक खावयास न मिळाल्यामुळे यांना खडखडीत उपास पडले असतील. आता देवाच्या कृपेने पर्जन्य चांगला पडून शेते पिकास आली आहेत. तर ह्या पक्ष्यांना पोटभर दाणा खाऊ द्यावा. यास हाकू नये. कारण हे पक्षी क्षुधा शमन होण्यास जेवढे पाहिजे तेवढेच येथे खातात. घरी एक दाणाही घेऊन जात नाहीत. यास्तव अशा निरपेक्ष प्राण्यांच्या तोंडातला दाणा काढणे हे मोठेच पातक होय. हे विचार त्याच्या मनात येऊन तो त्या पक्ष्यांना मुळीच हाकून देत नसे. यामुळे त्या शेतावर पक्ष्यांचे मोठमोठाले थवे येऊन नेहमी बसू लागले! असा क्रम सारा महिना चालला होता. पुढे तो शेतकरी आपल्या गावी परत आला आणि शेताची कशीकाय स्थिती आहे ती पाहण्याकरिता लगबगीने तेथे आला व पाहू लागला तो जिकडे तिकडे शेताची नासाडी होऊन गेली आहे. एकाही कणसावर धड दाणा नाही. सगळे शेत काळे ठिक्कर पडले आहे. असे त्याच्या दृष्टीस पडले. तेव्हा त्याला पराकाष्ठेचा संताप येऊन, त्याने तुकारामास माळ्यावरून खाली ओढले आणि त्याला खरपूस मार देऊन ढकलीत बुकलीत गावच्या पाटील-कुलकरण्यांपाशी नेले. त्यांनी त्या कुणब्यांचे सारे म्हणणे ऐकून घेऊन, तुकारामास खरी हकीकत काय घडली म्हणून विचारले. तेव्हा त्याने आपल्या हातून झालेली गोष्ट त्यास कळविली. ती ऐकून त्यास हसू आले; परंतु शेतकरी अगदी बिनकदलीवर येऊन त्रागा करण्याच्या बेतात आला आहे, असे पाहून त्यांनी अशी तोड काढली की, ह्या कुणब्याच्या नुकसानाची भरपाई करण्यापुरता ऐवज तुकारामापाशी मुळीच नाही. तेव्हा याने ह्याच्या नुकसानीबद्दल रोखा लिहून द्यावा. ही तोड त्या कुणब्यास पसंत पडून त्याने आपल्या नुकसानीच्या अंदाज त्यास सांगितला आणि तेवढ्या ऐवजाबद्दल तुकारामाकडून रोखा लिहून घेतला.

अशा प्रकारे भूतमात्राच्या ठायी तुकारामाची समदृष्टी झाल्यामुळे त्याच्या हातून वेळोवेळी लोकव्यवहारदृष्ट्या वेड्यासारखे आचरण होत असे. त्याच्या ठायीचा ममत्वभाव नाहीसा होऊन शमदमकरुणादि सद्वृत्तींचा विकास उत्तरोत्तर अधिकच

होत गेला. स्वदेह परोपकारी झिजविणे हेच आपले परम कर्तव्य होय असे त्याला वाटत असे. त्याच्या ठायींच्या आपपरबुद्धीचा जसजसा लोप होत चालला तसतसा अखिल विश्वामध्ये विठोबारखुमाई वास करीत आहे असा त्याच्या बुद्धीचा निश्चय झाला. त्याचा एकंदर आचारविचार ह्या वृत्तीस अनुरूप असा होऊ लागला. तो सर्व लोकांस आपले मायबाप म्हणत असे. त्याच्याशी कोणी बोलावयास आला असता त्याला तो 'मायबाप' असे संबोधन करीत असे. कोणी काही काम करावयास सांगितले असता 'करितो मायबाप' असे म्हणून ते तो मनापासून करी. एकदा एक म्हातारी बाई तेलाचा नळा घेऊन तेल आणण्याकरिता बाजारात चालली होती. तिला चालण्याची मुळीच शक्ती नव्हती; चार पावले चालली की ती थकून खाली बसे आणि पुन्हा उठून पुढे चाले. ही तिची अवस्था पाहून तुकाराम तिच्याकडे धावत जाऊन म्हणाला, माई, तुला चालण्याची शक्ती नाही. माझ्या पाठीवर बस ये. मी तुला बाजारात वाहून नेतो व परत घरी नेऊन पोचवितो. ते मायेचे शब्द ऐकून ती त्याला म्हणाली, बाबा, मला बाजारापर्यंत उचलून नेण्याचे श्रम न करिता, हा माझा तेलाचा नळा व हे पैसे घेऊन जा आणि यांचे काय तेल येईल ते घेऊन ये. त्याप्रमाणे त्याने तिचे तेल आणून दिले. ही गोष्ट दुसऱ्या लोकांस कळली तेव्हा तेही आपले तेलाचे नळे तुकारामाकडे तेल आणण्यासाठी देऊ लागले. त्याच्या गळ्यात एक पिशवी अडकविली असे. तीत जो तो आपले पैसे आणून टाकी आणि तेलाचा नळा त्याच्या स्वाधीन करी. तुकाराम त्यांचे ते सगळे नळे तेल्याच्या दुकानी नेई आणि त्यात तेल भरून ते ज्यांचे त्यास परत नेऊन देई; पण पुढे असे होऊ लागले की, पुष्कळच लोक आपापले नळे त्याच्याकडे देऊ लागले, तेणेकरून कोणाचे किती तेल आणावयाचे याची आठवण त्यास राहू नये; यामुळे सर्वच घोटाळा होऊ लागला. तेव्हा मग ते त्याला तेल आणावयाचे काम सांगतनासे झाले. ह्या एका गोष्टीवरून तुकारामाच्या ठायीची अहंकारवृत्ती कितपत नाहीशी झाली होती हे स्पष्ट होते; परंतु लोकांस वाटे की, हा आपला वेडा झाला आहे, तर याच्याकडून आपले साधेल तेवढे काम करून घ्यावे. म्हणून ते त्याला हवे ते काम सांगत आणि तो ते 'होय मायबाप करितो' म्हणून करावयास लागे. असे सांगतात की, गावातील लोक आठवड्याच्या बाजारास गेले म्हणजे तुकारामास बरोबर घेऊन जात आणि त्याच्या डोकीवर आपला बोजा चढवून घरी घेऊन येत! कोणी तर इतके नीच असत की, आपल्याकडचे ओझे किंचित जड झाले किंवा न्यावयास कठीण पडू लागले तर त्यातले थोडेसे तुकारामाच्या हवाली करीत आणि हा भगवद्‌भक्त 'द्या मायबाप' म्हणून खुशाल घेत असे आणि डोकीवरचा बोजा अतिशयित जड होऊन तो अगदी मेटाकुटीस आला तरी तो कुरकुर अशी मुळीच

करीत नसे. मुखाने विठोबाच्या नावाचा गजर करीत तो आनंदाने वाट चालत असे. ह्याप्रमाणे लोक त्याच्याकडून जे काही वाटेल ते काम करून घेत असत आणि तुकाराम ते मोठ्या संतोषाने करी; कारण त्याची अशी दृढ भावना झाली होती की, सर्वांच्या अंतर्यामी विठोबारखमाई वसत आहे. यास्तव त्यांचे काम करणे म्हणजे देवास संतुष्ट करणे होय असे तो समजे.

ह्याप्रमाणे भूतमात्राच्या उपयोगी पडल्याने देहाचे सार्थक होईल असे त्यास वाटत असे. कोणी संत भेटले असता त्यास दंडवत घालून त्याची साधेल तेवढी सेवा करण्यास तो नेहमी तत्पर असे. संतसेवेसारखे दुसरे सुकृत नाही असा त्याच्या बृद्धीचा दृढ निश्चय असे. संतजनांचा मेळा विठ्ठलभजनांत दंग होऊन नाचू लागला म्हणजे त्यांच्या पायास खडेबिडे लागू नयेत म्हणून तुकाराम आपल्या हाताने जागा साफ करून ठेवी. संतजन कीर्तनास बसले असता त्यांची पायतणे राखीत त्याने बाहेरल्या बाजूस कीर्तन ऐकावे. कीर्तनाच्या वेळी दिवटी धरावयास कोणी नसल्यास तुकाराम स्वत: हातात दिवटी धरून उभा राहत असे. कोणी संत कीर्तन करू लागले असता त्यांच्यामागे तो उभा राहून ध्रुपद धरीत असे आणि मोठ्या प्रेमाने त्यांच्याबरोबर गात असे. उन्हाळ्यामध्ये कीर्तन करणाऱ्या व कीर्तनास बसलेल्या संतास आणि इतर जनांस उष्मा होऊ नये म्हणून हातात पंखा घेऊन तो वारा घालीत असे. तुळशीच्या व फुलांच्या माळा तयार करून तो त्यांच्या गळ्यात घाली. त्यास शिधासामग्री हवी असल्यास ती तो हरप्रयत्न करून मिळवी. त्यांचे पाय, अंग वगैरे दाबून त्यास आराम वाटेल असे करी. संतांनी कितीही कष्टाचे काम सांगितले तरी तो ते मोठ्या उल्हासाने करी. कोणी ब्राह्मण भेटला असता त्याचाही आदरमान व सेवा तो मोठ्या प्रीतीने करी. संतसेवेविषयी त्याचा निर्धार पुढील अभंगात व्यक्त होतो.

*संतांच्या पादुका घेईन मोचे खांदीं ।। हाती टाळ दिंडी नाचेन पुढें ।।१।।*
*भजनविधि नेणें साधन उपाय ।। सकळ सिद्धि पाय हरिदासांचे ।।२।।*
*ध्यानगति मति आसन समाधि ।। हरिनाम गोविंदी प्रेमसुख ।।३।।*
*नेणता निर्लज्ज नेणे नादभेद ।। सुखे हा गोविंद गाउं गीती ।।४।।*
*सर्व जोडी मज गोत आणि वित्त ।। तुका म्हणे संतमहंतपाया ।।५।।*

तुकारामापाशी असलेली कोणतीही वस्तू कोणी मागितली असता ती त्याला तो नाही म्हणत नसे; मग तिच्यावाचून त्याचे कितीही अडण्यासारखे असले तरी त्याची तो परवा करीत नसे. एकदा असे घडले की, अवलाई आपले जुने लुगडे चुणून ठेवून स्नानास गेली होती आणि तुकाराम बाहेर नामस्मरण करीत बसला होता. इतक्यात

एक गरीब बाई त्याच्याकडे येऊन एकादे जुनेपुराणे वस्त्र असल्यास द्या असे म्हणू लागली. तेव्हा त्या भगवद्भक्ताने बायकोने ठेवलेले ते वस्त्र हळूच आणून तिच्या स्वाधीन केले आणि तिला येथून लवकर गुपचूप जा म्हणून सांगितले. तेव्हा ती त्यास आशीर्वाद देत निघून गेली आणि तुकारामही तेथून उठून इंद्रायणीच्या तीरी जाऊन बसला. इकडे अवलाई स्नान आटोपल्यावर वस्त्र ठेवल्या ठिकाणी येऊन पाहते तो ते तेथे नाही. तेव्हा तिला पहिल्याने असे वाटले की, ते कोणीतरी चोरून नेले असावे; परंतु तिला नंतर कळले की, एक बाई आपल्या नवऱ्यापाशी येऊन वस्त्र मागत होती. तिला त्याने ते दिले. घरात वस्त्र तेवढेच असल्यामुळे तिला ओलेच वस्त्र अंगावर धरावे लागले. इतक्यात कोणा नातलगाच्या घरी लग्न निघून अवलाईच्या येथे आमंत्रण सांगावयास लोक आले आणि तिला बाहेर येण्याविषयी हाका मारू लागले. तेव्हा अवलाईस मोठे संकट पडले आणि ती नवऱ्यास शिव्याशाप देऊन खेद करू लागली. त्या दिवशी तुकाराम मुळीच घरी आला नाही. अवलाईने नित्यक्रमाप्रमाणे भाजीभाकर केल्यावर ती स्वत: घेऊन न जाता त्या दिवशी मुलीच्या हाती पाठवून दिली. याप्रमाणे आपपरभावाचा लोप होऊन तुकाराम अगदी विदेही बनल्यामुळे अवलाईस वेळोवेळा त्रास होत असे. तिने कोणाचे तरी दळणकांडण वगैरे मोलमजुरी करून काही दाणे मिळवून आणावे आणि तुकारामाने कोणातरी संतास किंवा अपंगास घरी आणून त्यांचा फन्ना उडवावा. कोणास शिधासामग्री पाहिजे असली म्हणजे त्याने पहिल्याने घरी येऊन काही दाणा असल्यास पाहावा. आपली व आपल्या मुलाबाळांची उपासमार झाली तरी चिंता नाही; पण दुसऱ्यांचे अन्न न मिळून हाल झालेले त्याच्याने पाहवत नसत.

याप्रमाणे तुकाराम मनुष्य मात्रावरच दया करून राहत नसे, तर गुरेढोरे, पशुपक्षी, किडीमुंग्या यांच्यावरही त्याची कृपादृष्टी असे. पशुपक्ष्यांस चारापाणी, फळेमुळे वगैरे व किडीमुंग्यांस मैदासाखर तो घालीत असे. चालताना पायाखाली एकदा प्राणी सापडून प्राणास मुकेल या भीतीने तो फार जपून पावले टाकी. तो एकदा वाटेने चालला असता त्याच्या सर्व अंगावर डास येऊन बसले. तेव्हा त्याला मुळीच न उडविता तो स्वस्थ उभा राहिला. वाटेने जाणारे वाटसरू ती त्याची दशा पाहून दुरून जात. त्याच्या अंगावरची ते डास हाकण्याचे कोणास धैर्य होईना. इतक्यात कोणी त्याच्या ओळखीचे लोक तेथे येऊन त्यांनी ते मोठ्या प्रयासाने झाडले आणि त्याला मोकळे केले. असा सर्व प्रकारे विदेही झालेला हा साधुशिरोमणी एकंदर जीवसृष्टीचा मित्र होऊन राहिला होता. असे सांगतात की, एके ठिकाणी काही पक्षी दाणा खात असता तिकडून तुकाराम जाऊ लागला. तेव्हा ते पक्षी त्याला भिऊन उडून गेले. ते पाहून त्यास फार वाईट वाटले आणि तो मनात म्हणाला की, ह्या बिचाऱ्या प्राण्यांनी

मला भिऊन दाणा खात असता उडून जावे हे काही चांगले नव्हे. असे म्हणून तो तेथेच अगदी निथळ बसला आणि ते पक्षी अगदी निर्भय होऊन तेथे येऊन दाणा खाईपर्यंत मुळीच हलावयाचे नाही असा त्याने निर्धार केला. तेव्हा काही वेळाने आसपास उडून गेलेले पक्षी, तो अगदी दगडा सारखा बसलेला पाहून त्याच्या जवळ आले व तो मुळीच हालत नाही असे दिसल्यावरून ते त्याच्या अंगावरही बिनधोक येऊन बसले! या प्रसंगास अनुलक्षून तुकारामाने एक अभंग म्हटला आहे. तो असा :-

*अवघीं भूते साम्या आलीं ।। देखिलीं म्यां कैं होतीं ।।१।।*
*विश्वास तो खरा मग ।। पांडूरंग कृपेचा ।।२।।*
*माझी कोणी न धरो शंका ।। होका लोका निर्द्वंद्व ।।३।।*
*तुका म्हणे जें जें भेटे ।। तें तें वाटे मी ऐसें ।।४।।*

या सर्व गोष्टींवरून त्याच्या अंगी साधुत्वाची सर्व लक्षणे किती पूर्णपणे बिंबली होती हे चांगल्या प्रकारे ध्यानात येईल. खऱ्या संतांच्या लक्षणाचे वर्णन तुकारामाने आपल्या अभंगात अनेक प्रकारी केले आहे. ही सारी लक्षणे त्याच्या अंगी पूर्णपणे बाणली होती. त्याच्या संतवर्णनपर अभंगांपैकी एक वचन येथे उतरून घेतो. म्हणजे त्याच्याच शब्दांनी त्याचे वर्णन केलेसे होईल.

*तरी संत म्हणवावें ।। नेणे आपुलें परावें ।।१।।*
*भनमात्री हरीवीण ।। न पाहेची दुजेपण ।।२।।*
*प्रेम अंतरी निःसीम ।। मुखीं ज्याचें रामनाम ।।३।।*
*तुका म्हणे देहभाव ।। संतीं सोडियेला गांव ।।४।।*

●●●

# कवित्वस्फूर्ती

*नामदेवें केले स्वप्नामाजी जागें ।। स्वये पांडुरंगे येऊनिया ।।१।।*
*सांगितले काम करावें कवित्व ।। वावगें निमित्त बोलो नको ।।२।।*
*माप टाकी सळ धरोनि विठ्ठले ।। थापटोनि केले सावधान ।।३।।*
*प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी ।। उरले ते शेवटी लावी तुका ।।४।।*

मागे सांगितलेच आहे की, तुकारामास कीर्तनाची आवड अतोनात असून कोणी कीर्तन करू लागला म्हणजे त्याच्या पाठीशी त्याने ध्रुपद धरण्यास मोठ्या प्रेमाने उभे राहावे. तो हरिदासाच्या पाठीशी उभा राहिला म्हणजे कीर्तनास उत्तम रंग यावयाचा. असे करता करता स्वत:ला कीर्तन करता यावे अशी त्याच्या मनात इच्छा उद्भवली. त्याला नामदेवाचे वगैरे बरेच अभंग पाठ येत असत; परंतु ते केवळ ऐकून त्याला पाठ झाले होते. मुद्दाम अभंगांच्या वह्या घेऊन पाठांतर असे त्याने अगोदर फारसे केले नव्हते; परंतु कीर्तन करता येण्याची इच्छा त्याच्या मनात उद्भवल्यापासून त्याने अभंगाच्या वह्या मिळवून त्यांचा रात्रंदिवस ध्यास घेतला. त्याचप्रमाणे आध्यात्मिक विषयांचे साधारण प्रकारे प्रतिपादन करण्याचे सामर्थ्य अंगी यावे म्हणून त्याने पूर्वी होऊन गेलेल्या निरनिराळ्या साधुसंतांनी लिहून ठेवलेल्या आध्यात्मिक ग्रंथांचे परिशीलन केले. त्यापैकी काहीकांची नावे येथे सांगतो. एतद्विषयक पहिला प्रख्यात ग्रंथ म्हटला म्हणजे ज्ञानेश्वरी होय. या ग्रंथाची शुद्ध प्रत मोठ्या प्रयासाने आमच्या वैष्णववीराने मिळविली. त्याचप्रमाणे भागवतांतर्गत एकादश स्कंधावर एकनाथ स्वामींनी प्राकृत टीका केली आहे. ती मोठा प्रयत्न करून त्याने पैदा केली; तसेच भावार्थरामायण, योगवासिष्ट, अमृतानुभव आदिकरून आध्यात्मिक ग्रंथांचा त्याने यथावकाश व्यासंग केला. ह्या साऱ्या ग्रंथांचा मननपूर्वक अभ्यास करण्यासाठी त्याने भांडार पर्वतावर एकांती जाऊन बसावे आणि तेथे चित्तवृत्ती एकाग्र करून ह्या महाग्रंथांचे यथार्थ ज्ञान करून घ्यावे आणि त्यातील एकंदर ऊहापोह चित्तात चांगला ठसण्यासाठी त्याने प्रत्येक प्रकरण पुन्हा पुन्हा वाचून त्यावर मनन करावे. त्याचप्रमाणे भागवत, रामायण वगैरे पुराणग्रंथांचे श्रवण तो एकाग्रचित्ताने व सद्भावपूर्वक पुन्हा पुन्हा करी. तुकारामाची बुद्धी मूळचीच चलाख असून त्यात आणखी असे मोठ्या आस्थेने व परम उल्हासाने

सदरील ग्रंथांचे त्याने अध्ययन केल्यामुळे त्या ग्रंथातील प्रतिपाद्य विषय त्याच्या ध्यानात पूर्णपणे येऊन गेला आणि त्याची स्मरणशक्ती अत्यंत तीव्र असल्याकारणाने त्याला अधिक विषयांची उपस्थिती उत्तमप्रकारे असे. फार तर काय; पण त्या ग्रंथातील बहुतेक भाग अगदी मुखोद्गत झाले होते. याप्रमाणे तयारी चालली असता त्याने हळूहळू आपल्या देवळात कीर्तन करण्याचा क्रम सुरू केला. पुढे या कलेत तो उत्तरोत्तर चांगला घटावत जाऊन सर्व महाराष्ट्रात उत्तम कीर्तनकार म्हणून प्रसिद्ध झाला. याचे कीर्तन किती प्रेमळ व भक्तिरसाने परिपूरित असे याविषयी पुढे क्रमाक्रमाने सांगावयाचेच आहे. प्रस्तुत त्याने हे अप्रतिमत्व प्राप्त करून घेण्यासाठी कसा काय परिश्रम केला याविषयीच मुख्यत: सांगू. तुकारामास अध्यात्मविषयांचा निदिध्यास लागल्यापासून एकांतात बसून मनन करण्याची सवय लागली. पूर्वी तो जो एकांतात जाऊन बसे तो देवाचे भजन, प्रार्थना, स्मरण वगैरे करण्यासाठीच केवळ होय; पण आता त्यास आत्मानात्मविचारात गढून जाणे विशेष आवडू लागले. ह्या विवेचनात निमग्न होऊन तो भांडार पर्वतावर तासांचे तास जाऊन बसत असे. यामुळे अवलाईस फार त्रास होऊ लागला. तिचा नेम असा असे की, नवरा घरी जेवावयास न आल्यास तो कोठे असेल तेथे ती त्याची भाकर पोचवीत असे. कीर्तन करण्याची योग्यता आपल्या अंगी यावी म्हणून तो भांडारपर्वतावर जाऊन बसू लागला. तेव्हापासून अवलाईला प्रति दिवशी दोनप्रहरी भाकर व भोपळाभर पाणी घेऊन ह्या पर्वतावर जावे लागे. एके दिवशी नित्यक्रमाप्रमाणे ती भाकरपाणी घेऊन चालली असता तिच्या पायात एक भला मोठा करवंदीचा काटा रुतला. आधीच भर दोनप्रहरच्या उनातून चालत आल्यामुळे ती अगदी बेदम होऊन गेली होती, त्यात आणखी काटा पायात भरला. तेव्हा ती व्याकूळ होऊन तेथेच मूर्च्छा येऊन पडली आणि हातातला भोपळा उलडून सर्व पाणी बाहेर सांडले. अशा स्थितीत ती बराच वेळ होती. शेवटी त्या मार्गाने एक इसम जात होता, त्याच्या दृष्टीस तिची ती अवस्था पडून तो तिच्या जवळ गेला आणि तिच्या डोळ्याला पाणी लावून व तिला वारा घालून सावध केले. मग तिच्या पायात खोलवर गेलेला तो काटा काढून तिला त्याने उभी केली तेव्हा ती भाकरी व रिता भोपळा घेऊन तुकाराम होता तेथे गेली आणि त्याच्यापुढे भाकरी ठेवून म्हणाली की, तुम्ही आपल्यामुळे दुसऱ्यास त्रास देता हे काही चांगले नव्हे. असे म्हणून तिने आपली हकीकत त्याला सांगितली. तेव्हा तुकारामाचे चित्त कळवळून त्याने असा विचार केला की, अत:पर हिला उगीच त्रास देऊ नये. देव सर्वत्र आहे. त्याची प्रार्थना, भजन व चिंतन करण्यास इतके लांब येयाची काहीएक आवश्यकता

नाही. असे मनात आणून तो त्या दिवसापासून एकांत साधण्यासाठी इतका दूर जाऊन बसेनासा झाला.

ह्याप्रमाणे पूर्वी होऊन गेलेल्या महाराष्ट्र साधूंच्या वाङ्मयाचा त्यास अहर्निश निदिध्यास लागून त्याची चित्तवृत्ती केवळ तन्मय होऊन गेली. उठता बसता, हिंडता फिरता साधुसंतांची वचने त्याने एकसारखी म्हणत असावे. त्यातून विशेषत: नामदेवाच्या अभंगांचा ध्यास त्याला फारच असे. लहानपणापासून त्या महासाधूचे बरेच अभंग त्याला पाठ येत असत आणि आता तर त्याला त्या कविवराच्या एकंदर अभंगवाणीची पूर्ण उपस्थिती प्राप्त झाली होती. हा असा रात्रंदिवस अभ्यास चालला असता त्यास एके दिवशी रात्री असे स्वप्न पडले की, नामदेव व विठोबा यांनी येऊन त्यास थोपटून जागे केले आणि सांगितले की, वाल्मीकीने शंभर कोटी रामायण केले होते त्याप्रमाणे शंभर कोटी अभंग करण्याचा नामदेवाने निर्धार केला; पण एवढी संख्या पुरी होण्यापूर्वीच नामदेवांचे देहावसान झाले. तेव्हा बाकी राहिलेले अभंग तू करावे.* हे स्वप्न त्या भाविक भक्ताने सत्यवत मानून दुसरे दिवसापासून कविता करण्यास सुरुवात केली. कोऱ्या कागदांची वही करून तीवर तो आपली कविता स्वहस्ते लिहून ठेवीत असे. त्याला पूर्वी बाळबोध लिहिण्याचा सराव नसल्यामुळे त्याचे अक्षर चांगले नसे. तरी तो वेडेवाकडे जसे येई तसे कागदावर टिपून ठेवीत असे. महिपती सांगतो की, तुकारामाचे पहिले काव्य ओविबद्ध असून त्यात भागवतातील दशमस्कंधात कृष्णाची बाळक्रीडा वर्णिली आहे ती सांगितली आहे. ह्या ओव्या एकंदर नऊशे आहेत. यानंतरचा तुकारामाचा मुख्य कवित्व प्रकार म्हटला म्हणजे अभंगात्मकच होय. हे अभंग करू लागल्यापासून त्याच्या कीर्तनास विशेषच रंग येऊ लागला. तुकाराम स्वकृत अभंग आपल्या कीर्तनास म्हणून दाखवी. पुढे पुढे त्याला ही कवित्वकला इतकी अंगवळणी पडून गेली की, तो कीर्तन चालले असता समयी एकादे पूर्व कविवचन आठवले नाहीतर तत्काळ तदर्थवाहक अभंग रचून ती वेळ मारून नेत असे. कधी कधी तर प्रसंग विशेषास अनुरूप असा बोध तो तात्कालिक स्फूर्तीने अभंग रचून करीत असे. हे असे सहज रचलेले त्याचे अभंग फारच सरस झाले आहेत. ह्याप्रमाणे त्याची कवित्वशक्ती उद्भूत होऊन विकास पाऊ लागली असता त्याची लोकात विशेष चहा होऊ लागली. आधीच त्याची कीर्तनपद्धती परम प्रेमळ व चित्तवेधक असून त्यात आणखी वाटेल तेव्हा नवीन कविता करून कीर्तनात म्हणण्याचे सामर्थ्य त्यास आल्यामुळे त्याचे श्रोतृजन नेहमी तल्लीन होत असत आणि त्याने केलेला बोध व ईश्वरयशोवर्णन

* एकावन्न लक्ष पांच कोटी जाण ।। शेष राहिलें याचें बोलणें. भ.ली.

ही त्यांच्या मनावर उत्तम प्रकारे ठसत. त्याचे कीर्तन असले म्हणजे लोकांची अगदी गर्दी होत असे. त्याने स्वत: करून म्हटलेले अभंग लोकांस फारच आवडू लागले. जो तो त्याचे अभंग ध्यानात ठेवून किंवा टिपून घेऊन पाठ म्हणत असे. तो आपल्या कवितेमध्ये जो बोध करी त्याप्रमाणे त्याचे स्वत:चे वर्तन असल्यामुळे त्याच्या वचनांचा लोकांच्या अंत:करणावर उत्कृष्ट परिणाम होत असे. त्याची वाक्शक्ती, त्याची प्रसादगुणयुक्त कवित्वशक्ती, त्याच्या अंत:करणाचा प्रेमळपणा, त्याच्या अंगचे अमर्याद वैराग्य त्याची नि:सीम ईश्वरभक्तिपरायणता इत्यादी गुण पाहून लोकांच्या मनात त्याच्याविषयी हळूहळू पूज्यताबुद्धी उत्पन्न होत गेली. या त्याच्या अंगच्या परम उज्ज्वल व अप्रतिम गुणास्तव हा कोणी अलौकिक पुरुष आहे अशी त्याची जिकडे तिकडे ख्याती झाली. आसपासच्या गावचे लोक त्यांचे कीर्तन ऐकण्यासाठी मोठ्या उत्साहाने येत आणि त्याचे बोधामृत सेवन करून कृतकृत्य होत. तुकाराम पंढरीची वारी वर्षास दोन वेळा नेमाने करीत असे, हे मागे सांगितलेच आहे. तो पंढरीस गेला म्हणजे तेथे स्वत: केलेले विठ्ठलस्तुतिपर, वैराग्यपर वगैरे अभंग म्हणून भक्तकीर्तनादी करीत असे. त्या वेळी निरनिराळ्या प्रांतातून आलेली संतमंडळी त्याचे कीर्तन व अभंग ऐकून व त्याची वैराग्यशीलता पाहून नवल करीत आणि तो मोठा वक्ता, प्रासादिक कवी व महान भगवद्भक्त आहे अशी त्यांची खात्री होत असे.

●●●

# छळ

*माझें मन पाहें कसून ।। चित्त नढळे तुजपासून ।।१।।*
*कापुनि देईन शिर ।। पाहा कृपण कीं उदार ।।२।।*
*मजवरी घालीं घण ।। परि मी न सोडी चरण ।।३।।*
*तुका म्हणे अंतीं ।। तुजवांचुनि नाहीं गति ।।४।।*

*माझी आतां लोक सुखें निंदा करूं ।। म्हणती विचारू सांडियला ।।१।।*
*कारण होय तो करावा विचार ।। काय भीड भार करूं देवा ।।२।।*
*तुका म्हणे काय करूं लापनिक ।। जनाचार सुख नासिवंत ।।३।।*

तुकारामाची प्रासादिक अभंगवाणी व भक्तिरसपरिपूरित आणि सद्‌बोधप्रचुर असा कीर्तनप्रकार ऐकून व पाहून लोक त्याच्या भजनी लागले. त्याचे सच्चरित्र व सन्मार्गप्रवर्तक वाङ्मय यांची कीर्ती सर्वत्र प्रसृत झाली. ही त्याची महती जसजशी वृद्धिंगत होऊ लागली तसतसे खलजन त्याचा विशेष मत्सर व द्वेष करू लागले; परंतु जे बावन्न कशी सोने असते. त्यास कितीही तावून सुलाखून पाहिले तरी त्याच्या योग्यतेत लेशमात्रही न्यूनाधिक्य व्हावयाचे नाही. मात्र अग्नी प्रदीप्त करून मुशीत घालून तापविणारांची खटपट व्यर्थ होते. तद्वतच तुकारामाची कीर्ती असह्य होऊन ज्यांनी त्यास उपद्रव देण्याचा प्रयत्न केला त्यांचा तो प्रयत्न निष्फळ झाला. आता ज्यांनी ज्यांनी तुकारामाचा थोडाबहुत छळ केला, त्याविषयी येथे थोडेसे निरूपण करितो; म्हणजे तुकारामाच्या अंगच्या वैराग्यादिसद्‌वृत्ती किती उज्ज्वल व दृढ होत्या याचा वाचकास चांगला प्रत्यय येईल.

देहू गावापासून काही कोसांवर चिंचवड म्हणून एक गाव आहे. तेथे मंबाजी नावाचा एक ब्राह्मण राहत असे. तो पुढे वैराग्य धारण करून गोसावी बनून देहूस येऊन राहिला होता. त्या ठिकाणी मठ बांधून त्यात आपल्या कुटुंबासह तो राहत असे. त्याने त्या गावात व आसपासच्या इतर गावात काही शिष्य केले होते. या शिष्यांच्या आधारावर त्याचा योगक्षेम चालत असे. पुढे जेव्हा त्याने पाहिले की, तुकारामाचे महत्त्व वाढून लोक त्याच्या भजनी लागले, तेव्हा त्यास फार वाईट वाटले. ज्याने आपल्या देखत वह्या मिळवून पाठांतर केले त्याची अगदी अल्प काळात एवढी

प्रतिष्ठा वाढावी आणि ब्राह्मणांनीसुद्धा त्याला नमस्कार करू लागावे. तो जातीचा केवळ शूद्र आणि मी मोठा प्रतिष्ठित महंत, असे असता त्याची जनात कीर्ती पसरावी आणि मला कोणीच पुसू नये. हे काही चांगले नव्हे. असे विचार त्याच्या मनात येऊन तो तुकारामाचा मनापासून द्वेष करू लागला. शेवटी त्याने असा निर्धार केला की, त्याची केव्हा तरी लोकांदेखत चांगली फजिती करून त्याच्यावर आपला द्वेष उगवून घ्यावा.

ह्या मंबाजीने तुकारामाच्या देवालयाच्या दक्षिणेकडील बाजूस काही झाडे लावून वही केली होती. एकदा असे घडले की, अवलाईला तिच्या बापाने दिलेली एक म्हैस होती. तिने मंबाजीच्या बागात शिरून झाडापेडांची बरीच नासाडी केली, तेव्हा त्याने रागावून तुकारामास व अवलाईस पुष्कळ शिव्या दिल्या; परंतु तुकारामाने त्याला उलट जबाब असा मुळीच केला नाही. पुढे त्याने देवळाच्या एका बाजूपासून आपल्या बागेपर्यंत कुडून देवळासभोवती प्रदक्षिणा घालण्याची वाट अगदी बंद करून टाकली. नंतर काही दिवसांनी एकादशीचा उत्सव आला. तेव्हा आसपासच्या खेड्यातले हजारो लोक त्या देवळाशी उत्सवानिमित्त जमा झाले. त्या वेळी तुकारामाने पाहिले की, मंबाजीच्या कुडामुळे देवळासभोवती प्रदक्षिणा घालण्यास लोकांना अडचण पडते. म्हणून त्याने प्रदक्षिणेच्या वाटेवरच्या काटक्या आपल्या हाताने काढून टाकल्या. हे त्या ब्राम्हणास कळताच तो शिव्याशाप देत तेथे धाऊन आला आणि उपटून टाकलेल्या काटक्यांपैकी एक काटकी उचलून तुकारामास तिने मारू लागला. तरी तुकाराम एक शब्दही बोलला नाही. तो मुकाट्याने त्याच्या शिव्या व मार खात उभा राहिला. मंबाजी मागे पुढे न पाहता त्याला एकसारखा झोडीत सुटला. एक काटकी पिंजली म्हणजे त्याने दुसरी घ्यावी. याप्रमाणे दहावीस काठ्या त्याच्या पाठीवर मारून त्याने फोडल्या; तरी तुकाराम अगदी शांतपणे विठोबाचे नाव घेत उभा राहिला. ह्याप्रमाणे खरपूस मार देऊन मंबाजी अगदी हा बेदम झाला. तेव्हा हात आटपून परत गेला. त्याचा मार आटोपल्यावर तुकाराम तेथून देवळात गेला. तेव्हा त्याची ती अवस्था लोकांच्या नजरेस पडून ते हळहळू लागले व त्यांच्या डोळ्यांतून खळखळलेल्या अश्रुधारा लोटल्या. मग अवलाईने व इतर यात्रेस जमलेल्या लोकांनी त्याच्या अंगात रुतलेले काटे काढून उठलेल्या वळांवर व झालेल्या क्षतांवर शामक उपचार केले. मग संध्याकाळी तुकाराम कीर्तनास उभा राहिला तेव्हा सर्व यात्रा मोठ्या प्रेमाने व उत्साहाने श्रवणास बसली. गावचे सर्व भाविक लोकही तेथे आले; पण मंबाजी बोवा कोठे दिसेना. तो तुकारामाच्या कीर्तनास नेहमी येत असे. याप्रसंगी तो आला नाही, असे पाहून त्याने त्याला यावयास उशीर का लागला ते पाहण्यासाठी एक मनुष्य पाठविला.

मंबाजीने सांगून पाठविले की, आपले सर्व अंग दुखत आहे, म्हणून आपल्याच्याने येववत नाही. हे ऐकून तुकाराम त्याच्या घरी तत्काळ गेला आणि त्याला साष्टांगदंडवत घालून त्याचे अंग रगडीत बसला व म्हणाला की, महाराज मी आपल्या झाडास इजा होईल असे काम केले नसते तर आपल्यास राग येताना आणि आपणास स्वत: आपल्या हाताने मला मारण्याचा प्रसंग आला नसता. तरी याबद्दल मला क्षमा करा आणि आता कीर्तनास चला. ही अशी तुकारामाची अलौकिक क्षमावृत्ती पाहून मंबाजी लज्जित झाला आणि लागलाच उठून त्याच्या कीर्तनास गेला. या उदाहरणावरून तुकारामाची शत्रुमित्रांविषयी किती समबुद्धी झाली होती हे चांगले ध्यानात येते. या प्रसंगास अनुलक्षून त्याने सहा अभंग केले आहेत. ते अभंग हे:

*न सोडीं न सोडीं ।। विठोबा चरण न सोडीं ।।१।।*
*भलतें जड पडो भारी ।। जीवावरी आगोज ।।२।।*
*शतखंड देह शास्त्रधारीं ।। करितां परी न भियें ।।३।।*
*तुका म्हणे केली आधीं ।। दृढ बुद्धी सावध ।।४।।*

*बरवें बरवें केलें विठोबा बरवें ।। पाहोनि अंत क्षमा अंगी काठीवरी मारविलें ।।१।।*
*शिव्यागाळी नीत नाहीं ।। बहु फार विटंबिलें ।।२।।*
*तुका म्हणे क्रोधा हातीं ।। सोडवूनि घेतलेरे ।।३।।*

*पावलो पावलो ।। देवा पावलो रे ।।१।।*
*बरवें संचित होतें तैसे आलें रे ।। आतां काय बोलों रे ।।२।।*
*सोज्वळ कंटकवाटा भावें करूं गेलों रे ।। तुका म्हणे करूनी वेगळा केलों रे ।।३।।*

*कां होतीं कां होतीं ।। देवा एवढी फजिती ।।१।।*
*मुळी वर्म नसतों चुकलों ।। तो मी ऐसे चित्ती ।।२।।*
*होणार होऊनि गेलें ।। मिथ्या आतां खंती रे ।।३।।*
*तुका म्हणे पुरे आतां ।। दुर्जनाची संगति रे ।।४।।*

*सोडवा सोडवा ।। सोडवा हो अनंता ।।१।।*
*तुजविण ऐसा ।। कोण दुजा प्राणदाता ।।२।।*
*कोणा लाज नेणा ऐसें ।। आणिका शराण आम्ही जातां ।।३।।*
*तुका म्हणे सखया ।। माझ्या रखुमाईच्या कांता ।।४।।*

*पुत्राची वारता ।। शुभ ऐके जेवीं माता ।।१।।*
*तैसे राहो माझें मन ।। गाता ऐकता हरिगुण ।।२।।*
*नादें लुब्ध जाला मृग ।। देह विसरला अंग ।।३।।*
*तुका म्हणे पाहे ।। कासवीचें पिलें माये ।।४।।*

ह्याप्रमाणे सत्कवींच्या वृत्तीस अनुसरून तुकारामाने चित्तक्षोभास सदरी सांगितल्याप्रमाणे कारण होताच तो क्षोभ कवितारूपाने प्रकट केला. असो. आता त्याच्या छळाचे दुसरे उदाहरण सांगतो.

एके समयी लोहगावी तुकाराम कीर्तन करीत असता तेथे काही संन्यासी येऊन त्याचे कीर्तन श्रवण करावयास बसले. तेव्हा तुकारामाने आपल्या कीर्तनात जपतपादी मोक्षसाधनांची व्यर्थता स्थापित करून भगवन्नाममहात्म्याचे वर्णन केले आणि जनांनी हा स्वल्प भक्तिमार्ग आचरून इतर मार्ग तुच्छ मानावे, असे मोठ्या आवेशाने व श्रोतृवृंदाच्या चित्तावर पूर्णपणे ठसे अशारीतीने प्रतिपादन केले. हा बोध ऐकून त्या संन्याशास फार वाईट वाटले आणि त्यांनी पुण्यास दादोजी कोंडदेव मोकाशी होता त्याच्याकडे जाऊन कागाळी केली की, तुकाराम म्हणून कोणी एक साधू देहू गावी आहे. तो वेदोक्त कर्ममार्गाच्या उच्छेदार्थ प्रवृत्त होऊन जनांस त्यापासून निवृत्त होण्याविषयी आपल्या कीर्तनांत नेहमी बोध करीत असतो आणि केवळ नाममहात्म्याची प्रौढी गाऊन सनातन धर्ममार्गाचा निषेध करीत असतो. तर त्याला योग्य शासन करून या अनुचित मार्गापासून त्यास परावृत्त करा. दादोजी कोंडदेवास तुकारामाची योग्यता केवढी आहे आणि तो जो जनांस उपदेश करीत आहे तो संन्यासी सांगतात तसा अयोग्य किंवा सद्धर्मविध्वंसक आहे किंवा कसे हे चांगले कळत होते. त्याने त्यांची एकंदर फिर्याद ऐकून घेऊन त्यास सांगितले की, तुकारामास येथे बोलावून आणतो आणि त्याचा तुमचा वादविवाद होऊन जो वादात हरेल त्याला शासन करितो. हे म्हणणे त्या संन्याशास मान्य होऊन मोकाशाने तुकारामास बोलावणे पाठविले. हा निरोप पोचताच तुकाराम लोहगावच्या ब्राह्मणादी भाविकजनांसह पुण्यास आला आणि संगमापाशी उतरला. तो आल्याची वार्ता गावात पसरताच भाविक लोक त्याच्या दर्शनास आले आणि त्याचा त्यांनी यथोचित आदरमान केला. इतर जनांप्रमाणे दादोजी कोंडदेवही त्याच्या भेटीस निघाले. तेव्हा संन्याशांनी त्याचा निषेध केला. तरी तो म्हणाला मी त्यास गावात घेऊन येतो. मग तुम्ही त्याच्याशी वादप्रतिवाद करून त्यास फजीत करा; म्हणजे मी त्यास शासन करीन. असे म्हणून दादोजीने तुकाराम उतरला होता तेथे जाऊन त्यास मोठ्या आदराने गावात आणले. नंतर कीर्तनाची तयारी होऊन तुकाराम कीर्तनास उभा राहिला. त्याचे कीर्तन ऐकण्यासाठी गावातील लोकांची गर्दी झाली होती. तीत ते संन्यासीही आले होते. त्यांनी तुकारामाचा तो प्रेमळ व भक्तिरसाने ओतप्रोत भरलेला सद्बोध श्रवण केल्यावर व त्याची ती नि:सीम विरक्तता व सद्भाव पाहिल्यावर त्यांची चित्तवृत्ती तटस्थ झाली आणि त्याचे प्रतिपादन

यथार्थ आहे व त्याचा भक्तिमार्ग खरी कैवल्यप्राप्ती करून देणारा आहे अशी त्यांच्या मनाची खात्री झाली. तेव्हा त्यांचा सर्व अभिमान विगलित होऊन ते अगदी नम्र झाले. हा त्यांच्या वृत्तीत फरक पडलेला पाहून दादोजी त्यास म्हणाला की, अशा महासाधूशी तुम्ही विरोध केला. सबब तुम्हास गाढवावर बसवून मी तुमची धिंड काढितो; परंतु तुकारामाने मध्यस्थी केल्यामुळे दादोजीने त्यास असे पुन्हा न करण्याविषयी ताकीद देऊन सोडून दिले. या वेळी तुकारामाने चार अभंग म्हटले. ते हे :

*काखे कडासन आड पडे।। खडबड खडबडे हुसकलें ।।१।।*
*दाद करा दाद करा ।। फजितखोरा लाज नाहीं ।।२।।*
*अवघा जाला राम राम ।। कोणी कर्म आचरेना ।।३।।*
*हरिदासांच्या पडती पाया ।। म्हणती तया नागवावें ।।४।।*
*दोहीं ठायीं फजित जालें ।। पारणे केले अवकळा ।।५।।*
*तुका म्हणे नाश केला ।। विटंबिला वेश जिंहीं ।।६।।*

*कुटुंबाचा केला त्याग ।। नाहीं राग जव गेला ।।१।।*
*भजन ते वोंगळवाणें ।। नरका जाणे चुकेना ।।२।।*
*अक्षराची केली आटी ।। जरी पोटी संतनिंदा ।।३।।*
*तुका म्हणे मागे पाय ।। तया जाय स्थळासी ।।४।।*

*तारतीम वरी तोंडाच पुरते ।। अंतरा हें येतें अंतरींचे ।।१।।*
*ऐसी काय बरी दिसे ठकाठकी ।। दिसतें लौकिकीं सत्या ऐसें ।।२।।*
*भोजनात द्यावे विष कालवूनि ।। मोह चाळवणी मारावया ।।३।।*
*तुका म्हणे मैंद देखो नेदो कुडें ।। आदरेंचि पुढ सोंग दावी ।।४।।*

*ब्रह्मनिष्ठ काडी ।। जरी जीवा नावे मोडी ।।१।।*
*तया घडली गुरुहत्या ।। गेला उपदेश तो मिथ्या ।।२।।*
*सांगितले कानी ।। रूप आपुलें वाखाणी ।।३।।*
*भूतांच्या मत्सरे ।। ब्रह्मज्ञान नेल चौरें ।।४।।*
*शिकल्या सांगे गोष्टी ।। भेद क्रोध वाहे पोटीं ।।५।।*
*निंदा स्तुति स्तवनी ।। तुका म्हणे वेची वाणी ।।६।।*

चिंचवडास चिंतामणीदेव म्हणून एक गणपतीची उपासना करणारा ब्राह्मण होता. त्याने तुकारामाची कीर्ती ऐकून मनात आणले की, त्याला आपल्याकडे बोलावून आणून त्याची वास्तविक योग्यता किती आहे ते पाहावे आणि जर करिता तो दांभिक आहे असे आढळले तर त्यास शिक्षा लावावी. असा विचार करून त्याने त्यास

बोलावयास पाठविले. निरोप पोहोचताच तुकाराम चिंचवड गावी जाऊन देवास भेटला. तेव्हा त्या ब्राह्मणाने त्याची पुष्कळ कसून परीक्षा घेतली आणि तो खरोखरीच महातेजस्वी व परम श्रेष्ठ भगवद्भक्त आहे अशी त्याची खात्री झाल्यावर तो त्यास शरण आला आणि त्याने त्यांचे चांगले आदरातिथ्य केले. यानंतर हा ब्राह्मण त्याचा मोठा भक्त बनला आणि त्यास वेळोवेळी चिंचवडास नेऊन त्याची कीर्तने करवी. चिंतामणीदेवाने तुकारामास चिंचवडास बोलावून नेले, त्यासंबंधाचे त्याने पाच अभंग केले आहेत, त्यापैकी एकच येथे देतो :

*माझा स्वामी तुझी वागवितो लात ।। तेथें मी पतित काय आलों ।।१।।*
*तीर्थे तुमच्या चरणी जाहाली निर्मळ ।। तेथें मी दुर्बळ काय वाणूं ।।२।।*
*तुका म्हणे तुम्ही देवा द्विजवंद्य ।। मी तो काय निंद्य हीन याती ।।३।।*

ह्या एका अभंगावरून तुकाराम ब्राह्मणांस किती वंद्य मानीत असे हे स्पष्टपणे ध्यानात येते. ब्राह्मण हे भूदेव आहेत. तेव्हा त्यांचा सहसा अनादर करू नये. त्यांनी आपला कितीही छळ, द्वेष किंवा तिरस्कार केला तरी तो निमूटपणे सोसावा; त्यांच्या मनास वाईट वाटेल अशी कोणतीही गोष्ट कधी करू नये, असा त्याच्या मनाचा निर्धार होता; परंतु त्याचा भगवत्प्राप्तीचा मार्ग सर्वत्र रूढ असलेल्या कर्ममार्गाहून सर्वथा विपरीत असल्याकारणाने कर्मठ ब्राह्मणलोक त्याचा फार द्वेष करीत; परंतु त्याच्या सद्बोधामृताचा लाभ ज्यास घडे त्यांची भ्रांती फिटून ते त्याचे अनुयायी बनत आणि आपला जात्यभिमान सोडून त्याच्या चरणी लागत.

तुकारामांचे कीर्तन ऐकावे व त्याची प्रासादिक अभंगवाणी कानी पडावी म्हणून त्याच्या कीर्तनास जवळपासच्या गावातून लोकांचे थवेच्या थवे येत. कित्येक गावचे लोक तर त्याला मोठ्या आदराने आपल्या गावी बोलावून नेऊन त्याची कीर्तने करवीत. याप्रमाणे लोकांचा त्याच्यावर भाव बसत जाऊन त्याची कीर्ती सर्वतोमुख झाली. तेव्हा त्याचा शास्त्री, पंडित वगैरे लोक फारच द्वेष करू लागले. तो जातीचा शूद्र असून व अंगी विद्वत्ताही काही नसून नवीन कवित्व करितो व जनास भक्तिमार्गाचा बोध करितो हे पाहून त्यांना फारच वाईट वाटू लागले. कवित्वकीर्तनादि करून जनास उपदेश करण्याचे काम ब्राह्मणाचे असता ह्या शूद्राने त्यात प्रवीण होऊन ब्राह्मणांस खाली पहावयास लावावे हे त्यास कसे सहन व्हावे? तुकारामांचे नुसते नाव ऐकले की, त्यांचे चित्त अगदी संतापून जात असे. अशा ब्राह्मणांपैकी रामेश्वरभट्ट म्हणून एक गृहस्थ पुण्याजवळ वाघोली राहत नावाचा एक गाव आहे तेथे राहत असे. तो चार

शास्त्रे पढला असून आपल्या ब्राह्मण्याचा मोठा अभिमानी होता. सरकारदिवाणात त्याचे मोठे वजन होते. त्याला इतर कर्मठ ब्राह्मणांप्रमाणे तुकारामाचे कीर्तितेज सहन न होऊन त्याचा होईल तेवढा छळ करण्याचा त्याने निश्चय केला. त्याने दिवाणापाशी जाऊन अशी कागाळी केली की, तुकाराम जातीचा केवळ शूद्र असून तो आपल्या अंभगांच्या रूपाने व कीर्तनात श्रुतिमथितार्थाचा जनास बोध करीत असतो. वास्तविक पाहता जी वृत्ती ब्राह्मणासच योग्य, तिचा त्याने आपला अधिकार न ओळखून स्वीकार केला आहे. तेव्हा हा मोठाच अधर्म आहे. त्याने आपल्या कीर्तन करण्याच्या शैलीने तर सर्व साध्याभोळ्या लोकांस जशी काय मोहनीच घालून टाकली आहे. ती इतकी की, ब्राह्मणसुद्धा त्याच्या पाया पडतात. हे तर आम्हा बाह्मणास अतिशयित अश्लाघ्य होय. पुन्हा तो आपल्या वाग्बलेकरून वेदविहित धर्माच्या आचारांवरून लोकांची श्रद्धा उडवून भक्तिपंथाचे माहात्म्य स्थापित आहे. हे तर निव्वळ पाखंडमत आहे. हे रामेश्वरभट्टांचे गाऱ्हाणे ऐकताच दिवाणबुवा अगदी संतापून गेले आणि त्या चित्तक्षोभासरशी त्यांनी देहूगावच्या पाटलास ताकीद केली की, तुकारामास गावातून हाकून द्यावे. हा पाटलास आलेला हुकम तुकारामास कळला तेव्हा तो विचारात पडला. ज्या गावात आपण इतकी वर्षे काढून लोकांचा स्नेह व प्रेम संपादिले व ज्या गावच्या लोकांच्या पारमार्थिक हितासाठी कायावाचामनेकरून झटण्याचा आपला निर्धार आहे, तो गाव ग्रामाधिकाऱ्याच्या हुकमामुळे आपणास सोडून जावे लागणार हे पाहून त्यास फार वाईट वाटले. पुन्हा ज्या वडिलांनी स्थापलेल्या देवस्थानात राहून त्याने इतकी वर्षें विठोबाची सेवा केली होती ते सोडून जाणे त्याच्या जीवावर आले. म्हणून तो तत्काळ रामेश्वरभट्टाकडे गेला. तुकाराम त्याच्या भेटीस गेला तेव्हा तो स्नानसंध्येत गुंतला होता. तेव्हा तुकारामाने त्याला दंडवत घालून एकदम कीर्तनास सुरुवात केली. त्यावेळी त्याने त्या प्रसंगास अनुरूप असे काही अभंग म्हणून त्याचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. तरी तो अभिमानी ब्राह्मण त्याला म्हणाला, तू जातीचा शूद्र असून कीर्तनामध्ये स्वकृत कविता बोलतोस, तीत वेदवचनांचा अर्थ असतो. वेदाचा अधिकार फक्त ब्राह्मणास आहे. तुला वेदवचनांचा अनुवाद करण्याचा मुळीच अधिकार नाही. यास्तव तुझे हे करणे आम्हाला शास्त्रविरुद्ध वाटते. अधिकारावाचून श्रुतिवचनांचा अर्थ सांगणारा व त्याचे वक्तृत्व ऐकणारे हे नि:संशय रौरवनरकाप्रत जातात. ह्यासाठी तू आजपासून मुळीच कविता करू नये. हे त्याचे बोलणे ऐकून तुकारामास जरा बरे वाटले. मग तो रामेश्वरास म्हणाला: महाराज, आपण मला केवळ देवासमान आहा. आपण मला जी आज्ञा केली आहे ती मी शिरसावंद्य

मानितो. तिच्या उलट मी काहीच बोलत नाही. आजपासून पुढे मी कधीही कविता करून लिहून ठेवणार नाही; परंतु महाराज, आजपर्यंत जी कविता मी केली आहे तिची वाट काय? तेव्हा रामेश्वरभट्ट म्हणाला की, तू आजपर्यंत जे काही कवित्व लिहून ठेविले आहेस ते सारे आपल्या हाताने नेऊन पाण्यात बुडीव. ठीक आहे, आपल्या सांगण्याप्रमाणे मी अवश्य करितो, असे म्हणून तुकाराम आपल्या गावी परत आला. रामेश्वरभट्टास आपले कवित्व बुडविण्याचे त्याने वचन दिले खरे. तरी ते त्याने स्वप्नात झालेल्या देवाज्ञेस्तव केले असल्यामुळे त्याचा असा नाश करणे त्याला मुळीच चांगले वाटले नाही. तो विठोबाच्या देवळात जाऊन ह्या संकटाबद्दल देवापाशी करुणा भाकू लागला. इकडे त्याला आपली कविता बुडविण्याची आज्ञा झाल्याची वार्ता गावात पसरताच त्याचा द्वेष करणारे ब्राह्मण त्याच्यापाशी येऊन त्याला आपल्या वह्या बुडविण्याविषयी सांगू लागले. ह्याप्रमाणे त्यांनी त्याचा पाठपुरावा केल्यामुळे त्याने आपल्या सगळ्या वह्या एका कपड्यात गुंडाळून व त्यात मोठमोठे दगड घालून त्या इंद्रायणीच्या डोहात नेऊन बुडविल्या.

हा असा तुकारामाच्या कवित्वाचा नाश झालेला पाहून भाविक लोक चित्तांत फारच हळहळ करू लागले; परंतु जे कुटिल होते ते मनात संतोष पावले आणि म्हणू लागले की, अंगी अधिकार नसता कवित्व करून नसते महत्त्व मिळविण्याचा प्रयत्न हा करीत होता; परंतु ते टिकणार कोठवर? रामेश्वरभट्ट विद्वान खरा. त्याने हा असा असत्याचा मोड केल्यामुळे त्याचे लोकांवर मोठे उपकार झाले. इकडे तुकाराम फारच कष्टी झाला. त्याने इतके दिवस लोकहितार्थ म्हणून जी कविता केली तिचा असा शेवट झालेला पाहून तो मनातल्या मनात झुरू लागला. या गोष्टीस पाच दिवस लोटल्यावर बाह्मण वगैरे काही कुटिल लोक त्याच्याकडे येऊन त्याची निर्भर्त्सना करून म्हणू लागले की, तू मागे आपली खते पाण्यात सोडून आपला प्रपंच बुडविलास आणि आता परमार्थबुद्धीने केलेले कवित्वही पाण्यात बुडविलेस. याप्रमाणे तुझा प्रपंच व परमार्थ हे दोन्ही बुडाले. आता तू जिवंत कशास राहिला आहेस? तुला लोकास तोंड तरी कसे दाखववते? दुसरा कोणी तुझ्या जागी असता तर त्याने प्राणच दिला असता. लोकांच्या ह्या तीक्ष्ण वाग्बाणांनी तर त्यांचे हृदय अगदी भेदून गेले आणि हा जीव आता ठेवू नये असे त्यास वाटले; परंतु आत्महत्या करून एकदम मरणे बरे नाही, असे त्याने मनात आणले? आणि अन्नपाणी वर्जून देवालयाच्या द्वारासमोरील वृंदावनात एक शिळा होती तीवर तो जाऊन निजला. या समयी त्याच्या चित्ताचा पराकाष्ठेचा क्षोभ होऊन त्यासरशी पुढीलप्रमाणे त्याच्या तोंडून हृदयोद्गार निघाले. हे एकंदर वीस अभंग आहेत. त्यांचे येथे समग्र अवतरण करितो.

*भूतबाधा आम्हा। हे तो आश्चर्य गा हरी ।।१।।*
*जाला भक्तीचा कळस । आले वसतीसी दोष ।।२।।*
*जागरणाचें फळ । दिली जोडोनी तळमळ ।।३।।*
*तुका म्हणे देवा । आहाच कळों आली सेवा ।।४।।*

*नाहीं जों वेचलों जिवाचिया त्यागें । तोंवरी वाउगें काय बोलों ।।१।।*
*जाणिवलें आतां करी ये उद्देश । जोडी किंवा नाश तुमची जीवें ।।२।।*
*ठायींचेंचि आलें होतें ऐसें मना । जावें ऐसें वना दृढ जालें ।।३।।*
*तुका म्हणे मग वेचीन उत्तरे । उद्दिशिले खरे जाल्यावरी ।।४।।*

*करूं कवित्व काय नाही आतां लाज । मज भक्तराज हसतील ।।१।।*
*आता आला एका निवाड्याचा दिस । सत्याविण रस विरसला ।।२।।*
*अनुभवाविण कोण करी पाप । रितेचि संकल्प लाजलावे ।।३।।*
*तुका म्हणे आतां न धरवे धीर । नव्हे जीव स्थिर माझा मज ।।४।।*

*नाहीं आइकत तुम्ही माझे बोल । कासया हे फोल उपणूं भूस ।।१।।*
*येसी तें करीन बैसलिया ठाया । तूंचि बुझावया जवळी देवा ।।२।।*
*करावे ते केले सकळ उपाय । आतां पाहों काय अझुनी वास ।।३।।*
*तुका म्हणे त्याला आज्ञेसी सेवट । होऊनिया नीट पाया पडो ।।४।।*

*नव्हे तुम्हां सरी । यवढें कारण मुरारी ।।१।।*
*मग जैसा तैसा काळ । दाट सारावा पातळ ।।२।।*
*स्वामीचे तें सांडें । पुत्र होतां काळतोंडें ।।३।।*
*शब्दा नाहीं रुचि । मग कोठें तुका वेची ।।४।।*

*केल्यापुरती आळी ।। काही होते टाळाटाळी ।।१।।*
*सत्य संकल्पाचे फळ । होतां न दिसेचि बळ ।।२।।*
*दळणाच्या ओव्या । रित्या खऱ्या मापें घ्याव्या ।।३।।*
*जातीं उखळे चाटूं । तुका म्हणे राज्य घाटूं ।।४।।*

*आतां नेम जाला । याच कळसी विठ्ठला ।।१।।*
*हातीं न धरी लेखणी । काय भुसकट ते वाणी ।।२।।*
*जाणें तेणें काळ । उरला सारीन सकळ ।।३।।*
*तुका म्हणे घाटी । चाटूं कोरडा शेवटी ।।४।।*

पावावे संतोष । तुम्ही यासाठी सायास ।।१।।
करीं आवडी वचनें । पालटूनी क्षणक्षणें ।।२।।
द्यावें अभयदान । भूमीं न पडावे वचन ।।३।।
तुका म्हणे परस्परें । कांही वाढवी उत्तरे ।।४।।

बोलतां वचन असा पाठमोरे । मज भाव बरे कळों आले ।।१।।
मागितलें नये अरुचीनें हाता । नाहीं वरी सत्ता आदराची ।।२।।
समाधानासाठी लाविलासे कान । चोरिलें ते मन दिसतसां ।।३।।
तुका म्हणे आम्हां तुमचेचि फंद । वरदळ छंद कळों येती ।।४।।

काशासाठी बैसों करूनिया हाट । वाउगा बोभाट डांगोरा हा ।।१।।
काय आलें एका जिवाच्या उद्धारें । पावशी उच्चारें काय होतें ।।२।।
नेदी पट परी अन्ने तो न मारी । आपुलिये थोरीसाठी राजा ।।३।।
तुका म्हणे आता अव्हेरिलें तरी । मग कोण करी दुकान हा ।।४।।

माझा मज नाहीं । आला उबग तो कांहीं ।।१।।
तुमच्या नामाची जतन । नव्हता थोर वाटे सीण ।।२।।
न पडावी निंदा । कानी स्वामीची गोविंदा ।।३।।
तुका म्हणे लाज । आम्हां स्वामीचे तें काज ।।४।।

कांहीं मागणे हे आम्हा अनुचित । वडिलांची रीत जाणतसों ।।१।।
देह तुच्छ जाले सकळ उपाधी । सेवेपाशी बुद्धि राहिलीसे ।।२।।
उपाधि अचळ निश्चय । अनुभव हा काय नाही अंगीं ।।३।।
तुका म्हणे देह फांकिला विभागीं । उपकार अंगीं उरविला ।।४।।

मागितल्यास कर पसरी । पळतां भरी वाखती ।।१।।
काय आम्ही नेणों वर्म । केला श्रम नेणतां ।।२।।
बोलता बरें येतां रागा । कठीण लागा मागें मागें ।।३।।
तुका म्हणे येथे बोली । असे चाली उफराटी ।।४।।

असो तुझें तुजपाशीं । आम्हा त्यासी काय चाड ।।१।।
निरोधें का कोंडू मन । समाधान असोनी ।।२।।
करावा तो उरे आट । खटपट वाढतसे ।।३।।
तुका म्हणे येउनि रागा । का मी भागा मुकेन ।।४।।

*आहे तेचि पुढें पाहों । बरे आहो येथेंचिं ।।१।।*
*काय वाढवूनी काम । उगाच श्रम तृष्णेचा ।।२।।*
*स्थिरावता ओघीं बरे । चाली पुरें पडेना ।।३।।*
*तुका म्हणे वळितां मन । आम्हा क्षण न लगे ।।४।।*

*सांगा दास नव्हे तुमचा मी कैसा । ऐसें पंढरीस विचारूनी ।।१।।*
*कोणासाठी केली प्रपंचाची होळी । या पायां वेगळी मायबापा ।।२।।*
*नसेल तो द्यावा सत्यत्वासी धीर । नये भाजू हीर उफराटे ।।३।।*
*तुका म्हणे आम्हा आहिक्य परत्रीं । नाहीं कुळगोत्री दुजें कांहीं ।।४।।*

*अनन्यासी ठाव एक सर्व काजें । एकाविण दुजें नेणे चित्त ।।१।।*
*न पुरता आळी देशधडी व्हावें । हे काय बरवें दिसतसे ।।२।।*
*लेकराचा भार माउलीचे शिरीं । निढळ तें दुरी धरिलिया ।।३।।*
*तुका म्हणे किती घातली लांबणी । समर्थ होऊनी केवढ्यासाठीं ।।४।।*

*स्तुति तरी करूं काय कोणापाशी । कीर्ति तरी कैसी वाखाणावी ।।१।।*
*खोट्या तंव नाहीं अनुवादाचें काम । उरला तो श्रम वरी बरा ।।२।।*
*म्हणवावें त्याची खूण नाहीं हातीं । अवकळा फजिती सावकाशें ।।३।।*
*तुका म्हणे हें गे तुमचे माझे तोंड । होऊनिया लंड आळवितों ।।४।।*

*कांहींच नलगे आदि अवसान । बहुत कठीण दिसतसां ।।१।।*
*अवघ्याच माझ्या वेचविल्या शक्ति । न चलेसी युक्ति जाली पुढें ।।२।।*
*बोलिले वचन हारपलें नभीं । उतरलों तों उभीं आहों तैसीं ।।३।।*
*तुका म्हणे कांही न करावेसें जाले । थकितचि ठेले चित्त उगे ।।४।।*

*रूपें गोविलें चित्त । पायी राहिलें निश्चित ।।१।।*
*तुम्ही देवा अवघेचि गोमटे । मुख देखतां दुःख न भेटे ।।२।।*
*जाली इंद्रियां विश्रांति । भ्रमतां पीडित होती ।।३।।*
*तुका म्हणे भेटी । सुटली भवबंदाची गाठी ।।४।।*

ह्या एवढ्या अभंगांमध्ये त्याने रामेश्वरभट्ट वगैरे ब्राह्मणांस मुळीच दोष दिला नाही, तर आपल्या हातून हा अधर्मच घडत होता असे त्या भाविक पुरुषास वाटले असावेसे दिसते. या सर्व उद्गारांचा इत्यर्थ म्हणून एवढाच दिसतो की, देव ठेवील तसे राहावे, त्याच्या व्यवस्थेत दोष असा मुळीच नसावयाचा. आता हे असे उद्वेगयुक्त

उद्गार त्याने काढण्याचे कारण एवढेच की, देवाने स्वप्नांत येऊन त्यास हे कवित्व करावयास सांगितले असून ते करण्यास तो सर्वथा अनधिकारी आहे असे त्याच देवाचे शास्त्र सांगते. ह्या विरोधाचा त्यास उलगडा पाडता आला नाही. असो. तर याप्रमाणे शोकाने अगदी उद्विग्न व विव्हल होऊन तो त्या शिळेवर एकसारखा तेरा दिवस निश्चेष्ट पडून होता. तेवढ्या अवकाशात त्याने अन्नपाणी किंवा फळमूळ काही एक खाल्ले नाही किंवा डोळे उघडून तो कोणाशी बोलला नाही. त्याची अशी जनांत फजिती झालेली पाहून अवलीसुद्धा घराबाहेर पडेनाशी झाली. तिने त्याच्यापाशी येऊन त्याचा त्या तेरा दिवसात मुळी समाचारदेखील घेतला नाही. जे कित्येक लोक त्याचे कीर्तन मोठ्या प्रेमाने ऐकत असत व त्याची कविता ऐकून तल्लीन होत असत, त्यांच्या मनात विक्षेप येऊन ते त्याच्याकडे येईनातसे झाले. जे कोणी फारच भाविक होते ते मात्र वरचेवर येऊन त्याची समजूत करण्याचा प्रयत्न करीत व त्यास काही तरी खाण्याविषयी आग्रह करीत; पण तो त्यांच्याशी एक शब्दही बोलत नसे. उपास करता करता आपोआप प्राण जावा म्हणून त्याने अन्नादिकांचे सेवन न करण्याविषयी जो दृढ निश्चय केला होता तो मुळीच ढळला नाही. पुढे त्याचा श्वासोच्छ्वासही कमी कमी होऊ लागला. त्याचे शरीर अगदी काठीसारखे निश्चेष्ट पडले होते. तो जो एका अंगावर निजला होता ते अंग त्याने मुळी हलविलेच नाही. त्याची ही अशी दशा पाहून निंदक लोक म्हणू लागले की, याची एक बायको जशी दुष्काळामध्ये अन्न अन्न करून मरण पावली तसे याला मरण येईल; परंतु भाविक लोक म्हणत की, तुकारामाचे देव रक्षण करीत आहे. त्याने आज इतके दिवस अन्नपाणी सेवन केले नाही तरी त्याचे तेज आहे तसे आहे, जरासुद्धा कमी झालेसे दिसत नाही. देव त्याचा साहाय्यकारी नसता तर त्याचे प्राण कधीच गेले असते. जवळ जाऊन कान द्याल तर त्याच्या मुखावाटे नामस्मरणाचा ध्वनी चांगला स्पष्ट उमटत आहे, तो तुम्हास ऐकू येईल. ह्याप्रमाणे ज्याला जसे वाटे तसे तो त्याच्याविषयी बोले.

शेवटी तेरावे दिवशी विठोबा बाळरूप धारण करून जवळ येऊन आपली समजूत करितो आहे असा तुकारामास भास झाला. विठोबाने त्यास असे सांगितल्यासारखे वाटले की, मी तुझा पाठिराखा असता तुला चिंता करण्याचे मुळीच कारण नाही. मी तुझ्या वह्या पोटाशी धरून पाण्यात होतो. त्या तुला उदईक दिसतील. असे सांगतात की, तुकारामास जो हा दृष्टांत झाला की, तुकारामाच्या वह्या पाण्यावर तरंगत आहेत; त्या कोणी तरी बाहेर काढून आणाव्या. तेव्हा ते लोक दुसरे दिवशी वह्या बुडविल्या ठिकाणी येऊन पाहतात तो त्या पाण्यावर अगदी कोरड्या तरत आहेत. त्या पाहून

भाविक लोकास मोठा आनंद झाला आणि ते भगवन्नामाचा मोठ्याने गजर करू लागले. त्या जमलेल्या लोकांपैकी जे कित्येक पोहणारे होते त्यांनी लागलीच डोहामध्ये उड्या टाकून त्या वह्या तडीस आणल्या. त्या अगदी सुरक्षित आहेत असे पाहून भक्तमंडळीस मोठाच हर्ष झाला. हा सर्व अद्भुत प्रकार ऐकून तुकारामाने डोळे उघडले आणि तो पाहतो तो वह्या खरोखरीच सुरक्षित आहेत. या वेळी जो त्यास हर्ष झाला त्यासरसे त्याने सात अभंग म्हटले. ते येणेप्रमाणे :-

*थोर अन्याय केला तुझा अंत म्यां पाहिला । जनांचिया बोलासाठी चित्त क्षोभविलें ।।*
*भागविलासी केला सीण अधम मी यातीहीन । झांकूनी लोचन दिवस तेरा राहिलो ।।*
*अवघें घालुनिया कोडे तानभुकेचें साकडे । योगक्षेम पुढे तुज करणे लागेल ।।३।।*
*उदकीं राखिले कागद चुकविला जनवाद । तुका म्हणे ब्रीद साच केलें आपुलें ।।४।।*

*तूं कृपाळू माउली आम्हां दीनांची साउली । न सरीत आली बाळवेशें जवळी ।।१।।*
*माझे केले समाधान रूप गोजिरे सगुण । निववलें मन आलिंगन देऊनी ।।२।।*
*कृपा केली जनां हातीं पायीं ठाव दिला संती । कळो नये चितीं दुःख कैसे आहे तें ।।३।।*
*तुका म्हणे मी अन्यायी क्षम करीं वो माझे आई । आतां पुढे काई तुज घालूं सांकडें ।।४।।*

*कापो कोणी माझी मान सुखें पीडोत दुर्जन ।*
*तुज होय सीण ते मी न करी सर्वथा ।।१।।*
*चुकी जाली एक वेळा मजपासूनी चांडाळा ।*
*उभें करोनियां जळामाजी वह्या राखिल्या ।।२।।*
*नाहीं केला हा विचार माझा कोण अधिकार ।*
*समर्थासी भार नकळे कैसा घालावा ।।३।।*
*गेलें होऊनिया मागें नये बोलों तें वाउगें ।*
*पुढलिया प्रसंगें तुका म्हणे जाणावें ।।४।।*

*काय जाणे मी पामर पांडुरंगा तुझा पार ।*
*धरिलिया धीर काय एक न करिसी ।।१।।*
*उताविळ जालो आधी मतिमंद हीनबुद्धि ।*
*परि तूं कृपानिधि नाहीं केला अव्हेर ।।२।।*
*तूं देवाचाही देव अवघ्या ब्रह्मांडाचा जीव ।*
*आह्मां दासा कीव कां भाकणें लागली ।।३।।*
*तुका म्हणे विश्वंभरा मी तो पतितचि खरा ।*
*अन्याय दुसरा दारी धरणें बैसलों ।।४।।*

*नव्हती आलीसी सासुरी अथवा घाय पाठीवरी ।*
*तो म्यां केला हरी एवढा तुम्हा आकांत ।।१।।*
*वांटिलासी दोही ठायी मजपाशीं आणि डोहीं ।*
*लागों दिला नाही येथें तेथें आघात ।।२।।*
*जीव घेती मायबापें थोड्या अन्यायाच्या कोपें ।*
*हें तो नव्हे सोपें साहों तोंचि जाणीतलें ।।३।।*
*तुका म्हणे कृपावंता तुज ऐसा नाही दाता ।*
*काय वाणूं आतां वाणी माझी कुंठली ।।४।।*

*तू माउलीहून मयाळ चंद्राहूनी शीतळ ।*
*पाणियाहूनी पातळ कल्लोळ प्रेमाचा ।।१।।*
*देऊं काशाची उपमा दुजी तुज पुरुषौत्तमा*
*ओवाळूनी नामा तुझ्यावरूनी टाकिलो ।।२।।*
*तुवां केले रे अमृता गोड त्याही तूं परता ।*
*पांचा तत्वांचा जनिता सकळ सत्तानायक ।।३।।*
*कांहीं न बोलोनी आता उगाच चरणीं ठेवितों माथा ।*
*तुका म्हणे पंढरीनाथा क्षमा करीं अपराध ।।४।।*

*मी अवगुणी अन्यायी किती म्हणोन सांगों काई ।*
*मातां मज पायीं ठाव देई विठ्ठले ।।१।।*
*पुरे पुरे हा संसार कर्म बळिवंत दुस्तर ।*
*राहों नदी स्थिर एके ठायीं निश्चळ ।।२।।*
*अनेक बुद्धीचे तरंग क्षणक्षणां पालटती रंग ।*
*धरूं जाता संग तंव तो होतो बाधक ।।३।।*
*तुका म्हणे आतां अवघी तोडीं माझी चिंता ।*
*येऊनी पंदरीनाथा वास करीं हृदयीं ।।४।।*

ह्याप्रमाणे हा जो अद्भुत चमत्कार घडला त्याची वार्ता लागलीच चोहोकडे पसरली. दूरदूरच्या गावचे भाविक लोक देहूगावास येऊन त्या वह्या पाहत असत आणि त्यांच्या प्रती करून घेऊन जात असत. या गोष्टीमुळे तुकारामाची जिकडे तिकडे फारच ख्याती झाली आणि त्याच्याविषयी लोकांच्या मनात सन्मान्यबुद्धी अधिकच उत्पन्न होऊन कुटिल लोकांची तोंडे अगदी बंद झाली.

आता या चमत्कारासारखाच दुसरा एक चमत्कार महिपतीने सांगितला आहे, त्याचे निरूपण येथे कथेच्या अनुसंधानासाठी करितो. वर सांगितलेला रामेश्वरभट्ट

तुकारामाच्या वह्या पाण्याबाहेर काढण्याच्या सुमारास नागनाथाच्या दर्शनासाठी पुणेशहरी गेला होता. तो त्या देवळाजवळील एका बागेत शिष्यांसहवर्तमान शिरला. हा बाग अनगडशा नामक एका सिद्धाचा होता. त्या बागेत त्याच्या दृष्टीस एक जलाशय पडला. त्यात प्रवेश करून त्याने आपले स्नानादी विधी उरकून घेतले. इकडे त्या सिद्धाने निमाजाच्यावेळी हातपाय व तोंड धुण्याचे आपले पाणी त्या ब्राह्मणाने गढूळ केले आहे असे पाहिले तेव्हा त्याने रागास चढून त्यास असा शाप दिला की, माझे पाणी ज्याने खराब केले आहे त्याच्या अंगाचा एकसारखा दाह होत राहील. हे त्याचे शापवचन कानी पडताच रामेश्वराच्या सर्व अंगाची बेसुमार आग होऊ लागली आणि तो अगदी कासावीस झाला. पुढे काय करावे ते त्यास सुचेना. तेव्हा त्याला लोकांनी सांगितले की, आपण त्या फकिरासच शरण जाऊन कृतापराधाची क्षमा मागावी. ही सूचना त्या गर्विष्ठ ब्राह्मणास मुळीच रुचली नाही. तो म्हणाला की, मी जातीचा बाह्मण असून तो अगदी हीन जातीचा यवन आहे. मी त्याच्याकडे सहसा जाणार नाही. मग तो तेथून अंगावर ओली वस्त्रे घेऊन त्यावर शिष्य झाऱ्यांतून पाण्याच्या धारा धरताहेत अशा थाटाने आपल्या घरी गेला; परंतु त्याच्या अंगाचा दाह काही केल्या शमेना. रात्रंदिवस तो एकसारखा तळमळू लागला. त्या वेळी त्याला वाटू लागले की, आपले प्राण आता खचित जातात. ही अशी रामेश्वराची दशा पाहून निरनिराळे लोक निरनिराळ्या कल्पना करू लागले; परंतु बहुतेक लोक म्हणू लागले की, याने तुकाराम साधूचा नाहक छळ केला त्याचे हे फळ याला प्राप्त झाले. हे यथायोग्यच झाले. पुढे तो आपले घरदार सोडून आळंदीस येऊन राहिला. अजानवृक्षास गळती बांधून तिच्या खाली बसून त्याने ज्ञानदेवापाशी धरणे घेतले. त्याने रात्रंदिवस तेथेच बसून ज्ञानदेवाची आराधना चालविली. असे करता करता एक रात्री त्यास असा दृष्टांत झाला की, महाभगवद्भक्त नामदेवाचा अवतार जो तुकाराम त्याची निंदा व द्वेष तुजकडून घडल्यामुळे तुझे सारे सुकृत नष्ट होऊन तुला ही व्यथा प्राप्त झाली आहे. तरी आता मनात खरा भाव धरून त्या महासाधूस शरण जा, म्हणजे तुझी ही महापत्ती दूर होईल. हा दृष्टांत होताच रामेश्वरभट्ट जागा झाला आणि त्याला कृतकर्माबद्दल अनुताप झाला. तुकारामाच्या वह्या पाण्यातून तेरा दिवसांनी कोरड्या निघाल्याची वार्ता त्याने पूर्वी ऐकिलीच होती. त्यात आणखी सदरी सांगितल्याप्रमाणे त्याला ज्ञानदेवाचा दृष्टांत झाला. तेव्हा त्याने तुकारामास एक पत्र भीत भीत लिहिले आणि ते आपल्या शिष्यांच्या हाती देऊन त्यास देहूस रवाना केले. त्या पत्रात त्याने तुकारामाची स्तुती करून कृतापराधाबद्दल त्याची अनन्यभावे क्षमा मागितली होती. हे पत्र त्या शिष्यांनी तुकारामाच्या हाती देऊन घडलेली सर्व हकीगत त्याला निवेदन केली. तो

त्याचा दु:खकारक वृत्तांत ऐकून तुकारामास फारच वाईट वाटले आणि तो म्हणाला की, रामेश्वरभट्टासारख्या सुशील पंडितावर असा संकटप्रसंग का बरे गुदरावा? यावेळी वास्तविक पाहता त्याने केलेला अपराध त्याच्या लक्षात यावा; पण नाही. त्या महाविरक्त भगवद्भक्तास शत्रुमित्र समान होऊन गेले असल्यामुळे त्या ब्राह्मणाचे त्या पत्रातील करुणापर शब्द वाचून त्याचे अंत:करण लागलीच द्रवून गेले. मग तुकारामाने त्याच्या पत्रास उत्तर म्हणून एक अभंग करून त्या शिष्यांपाशी दिला तो अभंग हा:

*चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती ।। व्याघ्र हे न खाती सर्प तया ।।१।।*
*विष ते अमृत आघात तें हित ।। अकर्तव्य नीत होय त्यासी ।।२।।*
*दु:ख तें देईल सर्व सुख फळ ।। होतील शीतळ अग्निज्वाळा ।।३।।*
*आवडेल जिवां जीवाचिये परी ।। सकळां अंतरी एक भाव ।।४।।*
*तुका म्हणे कृपा केली नारायणे ।। जणिजे तें येणें अनुभवें ।।५।।*

हा अभंग घेऊन शिष्यमंडळी रामेश्वराकडे परत आली. त्याने तो मोठ्या प्रेमाने पुन्हा पुन्हा वाचला. तेव्हा त्याच्या अंगाचा दाह हळूहळू उपशम पावला. हा अद्भुत प्रत्यय येताच त्याने तुकारामास तेथूनच लोटांगण घातले आणि तो म्हणाला की, आम्ही वेद, उपनिषदे वगैरे महाग्रंथांचे अध्ययन केले खरे; परंतु तुकारामाच्या अंगी जो हा पराक्रम आहे तो केवळ अलौकिक होय. ज्याने आपल्या वह्या पाण्यात बुडविल्या असता त्या पुन्हा वरती जशाच्या तशा कोरड्या आल्या, त्याचे सामर्थ्य काय सांगावे? याप्रमाणे तुकारामाची स्तुती करून तो त्याच्या दर्शनासाठी देहूस जावयास निघाला; परंतु तो आपल्या भेटीस येत आहे असे कळताच तुकाराम त्याला सामोरा गेला. वाटेत दोघांची गाठ पडली, तेव्हा रामेश्वरभट्टाने त्याची पुष्कळ स्तुती करून म्हटले, महाराज, आपण परम वैराग्यशील भगवद्‌भक्त आहा. हे मी पामराने न जाणून आपला निरर्थक छळ केला, त्याबद्दल मला क्षमा करा. हे त्याचे नम्रपणाचे भाषण ऐकून तुकाराम म्हणाला: महाराज, मी कसा झालो तरी हीन जातीचा मनुष्य. आपली मजवर नित्य कृपा असावी एवढेच माझे आपल्या चरणापाशी मागणे आहे. हे त्याचे अत्यंत निष्कपटपणाचे व गरिबीचे भाषण ऐकून रामेश्वरभट्टाचे मन अगदी विरघळून गेले आणि तो त्यास म्हणाला: महाराज आपण आपल्या हाताने लिहिलेला अभंग वाचून माझ्या अंगाचा दाह शमला आहे आणि त्या एका अभंगाच्या योगाने माझ्या चित्तवृत्तींतही सर्वतोपरी पालट झाला आहे. आता मी आपला समागम सोडून परत आपल्या घरी कदापि जाणार नाही. आपल्या चरणापाशी या पामराला नित्य ठाव द्यावा. असे म्हणून तुकारामाचे पाय त्याने धरले! याप्रमाणे त्या कर्मठ ब्राह्मणाने आपल्या विद्वत्तेच्या व उचवर्णोत्पत्तीच्या घमंडीत तुकारामाचा विनाकारण छळ केला असता, त्याच्या गर्वाचा अगदी परिहार होऊन तो त्याचा अनुयायी बनला.

ह्या रामेश्वरभट्टाच्या किंवा दुसऱ्या ब्राह्मणांच्या चिथावणीवरून देहूगावच्या अधिकाऱ्याने तुकारामाची एक वेळ धिंडही काढली होती, असे त्याच्या पुढील अभंगावरून दिसून येते:

*दरिद्रही आम्हा सुख ते सोहळे ।। झालेंसें गबाळ लंगणाचें ।।१।।*
*कोण तेथे काय करितसे कोड ।। जन्मीं आम्हा घोडें ठावें नाहीं ।।२।।*
*फार दीस हौस राहिली अंतरी ।। पुरवितां हरी ऐसें झालें ।।३।।*
*जन साधु तुम्हीं केलें असें कोड ।। गाढवाचे घोडें दिल्हें ऐसें ।।४।।*
*तुका म्हणे आता बैसो द्यावें वर ।। सर्व चला स्थिर मागें पुढें ।।५।।*

*नेसणे आले होतें गळ्या ।। लोक रळ्या करिती ।।१।।*
*आपणिया सांवरिले ।। जग भले आपण ।।२।।*
*संबंध तो तुटला येणें ।। जागेपणे चेष्टांचा ।।३।।*
*भलती सेवा होती अंगे ।। वारस वेगें पडिलें ।।४।।*
*सांवरिलें नीट वोजा ।। दृष्टि लाजा पुढिलांच्या ।।५।।*
*बरे उघडिले डोळे ।। हळहळे पासुनि ।।६।।*
*तुका म्हणे विटंबना ।। नारायणा चुकली ।।७।।*

*गावीच्या प्रभूनें बोलाऊनि वरी ।। हजामत बरी केली माझी ।।१।।*
*माझ्या मायबापे नव्हतें केलें कोड ।। गाढवाचे घोडें देवें दिलें ।।२।।*
*कंदर्पाच्या माळा घालुनियां गळां ।। ऐसा हा सोहळा नव्हता झाला ।।३।।*
*सोईरे धाईरे आणिक सहोदर ।। धरियलें छत्र मजवरी ।।४।।*
*मायबापें दोन्ही आणि करवली ।। वरात मिरवली ऐसी नव्हती ।।५।।*
*तुका म्हणे तुम्ही हळूहळू चला ।। उगाच गलबला करू नका * ।।६।।*

हे अभंग वाचले म्हणजे आमच्या चरित्रनायकाच्या अंगी शभदमकरुणातितिक्षादी सात्त्विक गुण किती पूर्णत्वाने वसत होते, ते उत्तमप्रकारे दिसून येते.

●●●

* हे अभंग फक्त रा. तुकाराम तात्यांनी छापलेल्या गाथ्यांत आढळतात. दुसऱ्या कोणत्याही छापील गाथ्यांत आढळत नाहीत व महिपतीही या गोष्टीचा उल्लेख करीत नाही; परंतु एकंदर भाषासरणी व कवित्वाचे स्वरूप पाहता हे अभंग खुद्द तुकारामाचेच आहेत असे म्हणावे लागते. तेव्हा हा छळाचा प्रकार महिपतीने कसा वर्णिला नाही नकळे. तुकारामाने काही तरी खोटेच लिहून ठेवले आहे असे सहसा म्हणता येत नाही. तेव्हा हा असा छळ लोकांनी त्याचा केला होता यात संशय नाही.

# शिष्यवर्ग

*हिरा ठेविता ऐरणीं ।। वांचें मारितां जो घणीं ।।१।।*
*तोचि मोल पावे खरा ।। करणीचा होय चुरा ।।२।।*
*मोहरा होय तोचि अंगे ।। सूत न जणे ज्याचे संगें ।।३।।*
*तुका म्हणे तोचि संत ।। सोसी जगाचे आघात ।।४।।*

*आम्ही वैकुंठवासी । आलो याची कारणासीं ।।*
*बोलिले जे ऋषि । साच भावें वर्ताया ।।१।।*
*झाडूं संतांचे मारग । आडरानी भरलें जग ।।*
*उच्छिष्टाचा भाग । शेष उरलें तें सेवूं ।।२।।*
*अर्थे लोपली पुराणें । नाश केला शब्दज्ञान ।।*
*विषयलोभी मनें । साधने बुडविलीं ।।३।।*
*पिटूं भक्तीचा डांगोरा । कळिकाळासी दरारा ।।*
*तुका म्हणे करा । जयजयकार आनंदे ।।४।।*

मागील प्रकरणात सांगितल्याप्रमाणे तुकारामाचा लोकांकडून एकसारखा छळ होत होता, तरी त्याची सात्त्विक वृत्ती, चित्तावर ठसण्यासारखा बोध व नि:सीम निरपेक्षबुद्धी यांच्या योगाने तो लोकास हळूहळू पूज्य, मान्य व प्रिय होत गेला. आसपासच्या गावातले लोक त्याला मोठ्या आदराने आपल्या गावी घेऊन जात आणि त्यांची कीर्तने करवीत. ही कीर्तने ऐकावयास दूरदूरचे लोक मोठ्या प्रेमाने येत आणि त्याच्या त्या अत्यंत चित्तवेधक व बोधपर वाङ्मयाने त्याच्या ठायी सात्त्विक भावाची उन्नती होत असे. तो जनास ज्या गोष्टीचा बोध करीत असे, तदनुसार त्याचे अहर्निश आचरण असून आणखी तो बोध मोठ्या कळवळ्याने व केवळ लोकहितबुद्धीने त्याच्याकडून होत असे. याशिवाय त्याची वाक्शक्ती अप्रतिम असून तो जे स्वकृत अभंग कीर्तनसमयी म्हणत असे ते अत्यंत प्रासादिक व चित्तवृत्ती तल्लीन करणारे असत. या सर्व गोष्टीमुळे लोकांच्या मनात त्याच्याविषयी परमपूज्यत्वाची बुद्धी उत्पन्न होऊन, त्याचा समागम अहर्निश असावा असे त्यास वाटू लागले; परंतु तुकारामाच्या बोधाने ज्यांच्या ठायी वैराग्यवृत्ती उत्पन्न होत असे, ते सारे संसारी जन असल्या कारणाने त्यास

सर्वसंगपरित्याग करून त्याचे अनुयायी होणे साधत नसे. चित्तांत एकादी वृत्ती उत्पन्न झाली असता सर्व मोहास न जुमानता तदनुसार वर्तन ठेवणे फारच थोड्यांना साधते. त्यातूनही संसारात प्राप्त होणाऱ्या एकंदर सुखविषयांचा त्याग करून व पुत्रदारादिकांच्या प्रेमाचा पाश तोडून केवळ निवृत्तिमार्गाचा अवलंब करण्याचे धैर्य फारच थोड्यांना असते. अशा कमी धैर्याच्या लोकांना तुकारामाचा असा सर्वप्रसिद्ध उपदेश आहे की, 'सुखे संसार करावा माजी विठ्ठल आठवावा.' असो. आता आमच्या चरित्रनायकाचे कोण कोण शिष्य कोणकोणत्या प्रसंगी झाले ते थोडेसे येथे सांगू. हे सांगण्यापूर्वी स्वत: तुकारामाने कोणास गुरू केले होते ते येथे कळविणे इष्ट होय. हा तुकारामाचा गुरू घेण्याचा प्रकार सारा स्वप्नांतच घडून आला. त्याला एक वेळ असे स्वप्न पडले की, तो इंद्रायणीत स्नान करून व हातात तुळशीपत्रे घेऊन विठोबांच्या देवळात चालला असता त्याला एक ब्राम्हण भेटला. तेव्हा आपल्या नित्याच्या परिपाठाप्रमाणे त्या ब्राह्मणाच्या पायी तुळशीपत्र वाहून त्याने त्यास साष्टांग नमन केले. तेव्हा त्या ब्राह्मणाने संतुष्ट होऊन त्याच्या मस्तकावर हस्त ठेविला आणि त्यास रामकृष्णनामाचा मंत्र सांगितला. त्या वेळी तुकारामाने त्यास आपली गुरुपरंपरा कोणती म्हणून विचारले असता, त्या ब्राह्मणाने त्याला असे सांगितले की, राघवचैतन्य नामक वैष्णव भक्ताचा शिष्य चैतन्यकेशव म्हणून होता. तो माझा गुरू असून माझे नाव बाबा चैतन्य असे आहे. इतके झाल्यावर तुकारामाने आपल्या त्या स्वप्नांतल्या गुरूस असा आग्रह केला की, स्वामीमहाराज माझ्या आश्रमी आपले हे पवित्र पाय लागावे. मी आपणास शिधासामग्री आणून देतो. आपल्या हाताने स्वयंपाक करून यथेष्ट भोजन करावे. तेव्हा तो ब्राह्मण म्हणाला की, मला पावशेर तूप देशील तर मी येतो. ते देण्याचे तुकारामाने कबूल केले आणि त्याचा हात धरून त्यास स्वगृही आणले आणि आपल्या स्त्रीस हाक मारून म्हटले की, आपल्या घरी हे द्विजवर्य आले आहेत. यास भोजनाचे सगळे साहित्य पुरवून मागतील तेवढे तूप मिळवून द्यावे. हे त्याचे शब्द ऐकताच अवली अगदी क्रोधाविष्ट झाली. ती म्हणू लागली की, हा आपला जेव्हा तेव्हा कोणाना कोणातरी ब्राह्मणास घरी घेऊन येतो आणि त्यास शिधा देऊ सांगून भांडीकुंडीही काय लागतील ती द्यावयास सांगतो. माझी भांडी तर या लोकांनी अगदी जाळून फोडून टाकली. हा जर नेहमी असेच भिक्षुक आणू लागला तर माझा संसार तरी चालावा कसा? ही तिची चडफड ऐकून तो ब्राह्मण तेथून निघून गेला. येणेप्रमाणे स्वप्न पाहून तुकाराम गलबलून जागा झाला आणि आपल्या मनाशी खेद करू लागला की, माझ्या बायकोच्या वाईट स्वभावामुळे मला सद्गुरूचा सहवास अंतरला. मी करंटा ह्या अशा

कष्टमय संसारास कशासाठी अजून चिकटून राहिलो आहे? असा तीव्र पश्चात्ताप त्याला झाला असता, मनाच्या ह्या सुक्षोभ अवस्थेत त्याने सात अभंग केले आहेत; ते हे :-

*सद्गुरुरायें कृपा मज केली । परि नाहीं घडली सेवा कांहीं ।।१।।*
*सांपडविले वाटे जातां गंगास्नाना । मस्तकी तो जाण ठेविला कर ।।२।।*
*भोजना मागती तूप पावशेर । पडिला विसर स्वप्नामाजी ।।३।।*
*कांही कळे उपजला अंतराय । म्हणोनिया काय त्वरा झाली ।।४।।*
*राघव चैतन्य केशव चैतन्य । सांगितली खूण माळिकेची ।।५।।*
*बाबाजी आपले सांगितले नाम । मंत्र दिला राम कृष्ण हरि ।।६।।*
*माघशुद्ध दशमी पाहुनि गुरुवार । केला अंगीकार तुका म्हणे ।।७।।*

*ओस झाल्या दिशा मज भिंगुळवाणें । जिवलग नेणें मज कोणी ।।१।।*
*भय वाटे देखें श्वापदांचे भार । नव्हे मज धीर पांडुरंगा ।।२।।*
*अंधकारापुढे न चलवे वाट । लागतील खुंट काटे अंगा ।।३।।*
*एकला नि:संग फाकती मारग । भितों नव्हे लाग चालावया ।।४।।*
*तुका म्हणे वाट दावूनि सद्गुरु । राहिला हा दुरु पांडुरंग ।।५।।*

*माझिये मनींचा जाणोनियां भाव तो करी उपाव गुरुराजा ।।१।।*
*आवडीचा मंत्र सांगितला सोपा । जेणे नव्हें गुंपा काहीं कोठें ।।२।।*
*जाती पुढें एक उतरले पार । भवसागर साधुसंत ।।३।।*
*जाणत्या नेणत्या ज्या जैसी आवडी । उतार सांगडी तापे पेटीं ।।४।।*
*तुका म्हणे मज दावियेला तारू । कृपैचा सागरू पांडुरंग ।।५।।*

*सद्गुरूनें मज आशीर्वाद दिला। हरुष भरला हृदयी माझे ।।१।।*
*हृदयीचा भाव कळला गुरूशीं । आनंद उल्हासीं बोले मज ।।२।।*
*बोले मज गुरु कृपा तो करूनि । तुका म्हणे मनी आनंदलों ।।३।।*

*अनंत जन्मींचा शीण उतरला । सद्गुरु भेटला सदानंद ।।१।।*
*सदानंद माझा पांडुरंग पूर्ण । मायादि कारण विश्वबीज ।।२।।*
*देउनिया हाती निज बोधरत्न । तोडिला प्रयत्न संसारींचा ।।३।।*
*तुका म्हणे गुरु उपकारासी पाहीं । न मिळेच कांहीं ब्रह्मांडांत ।।४।।*

*मज अनाथासी घेउनी पदरीं । निघाले बाहेरी गुरुराज ।।१।।*
*आकाराचे माथा देउनियां पाय । ठेविलें अक्षय निज पदीं ।।२।।*

*काय सांगू माझी वाचा हे निमली । सद्‍गुरु माउली दयाळू जे ।।३।।*
*तुका म्हणे येथे मरोनी जन्मलों । आपलें पावलों अधिष्ठान ।।४।।*

*धन्य धन्य सद्‍गुरुराज । ज्योत दाखविली मज ।।१।।*
*काळें पिवळें ढवळें । रूप गोजिरे सावळें ।।२।।*
*जैसे रंग उमटति । पाहे आत्मज्योति ।।३।।*
*चक्रें उमटति । मध्ये हिरे झळकती ।।४।।*
*अनुहाताचा गजर । सोहंनादाचा प्रकार ।।५।।*
*तुका म्हणे ऐसें दावी । त्याचे पाय माझे जिवी ।।६।।*

याप्रमाणे स्वप्नातील गुरुप्राप्ती सत्य मानून तुकारामाने आपला विठ्ठलभक्तीचा क्रम मोठ्या उत्साहाने व प्रेमाने आजन्म अव्याहत चालविला. मनुष्य कितीही ज्ञानसंपन्न व ईश्वरभक्तिपरायण असला तरी त्यास गुरूपसत्ती व गुरुपदेश घडल्यावाचून धर्माचे खरे रहस्य कळत नाही व ते कळल्यावाचून अत्यंत इष्ट जी कैवल्यप्राप्ती ती होण्याची मुळीच आशा नाही. अशी समजूत सर्वत्र रूढ असल्याकारणाने तुकारामास गुरुप्रसादाची अपेक्षा भासणे साहजिक होते. गुरूवाचून सर्व धर्माचरणाचा अटाट लटका असा त्याचा निर्धार होऊन रात्रंदिवस त्याला हा गुरूपसत्तीचा निदिध्यास लागून शेवटी वर सांगितल्याप्रमाणे त्यास स्वप्नामध्ये गुरुदर्शन घडले. ह्या स्वप्नातल्या गुरूने त्याला इष्ट असाच मंत्रोपदेश केल्यामुळे त्याला कृतार्थता वाटून पुढे जागृतीतील खराखुरा गुरू शोधण्याचा हव्यास त्याने सोडून दिला. तो परम भाविक असून जागृतीत व स्वप्नात जे अनुभव आपणास घडतात ते सर्व ईश्वरीमायेचे खेळ आहेत; यास्तव ते व्यवहारात सत्यवत मानूनच चालले पाहिजे; एरवी हा भवसागर तरून जाणे मोठे दुर्घट आहे असे त्यास वाटले, यात काही नवल नाही. असो तर याप्रमाणे स्वप्नातील गुरुपदेशाप्रमाणे पुढे त्याने आपले आचरण किती चोख रीतीने ठेवले हे त्याच्या चरित्रात दिसून येते. असे भाविक, प्रेमळ व दृढनिश्चयी शिष्य ज्या गुरूस प्राप्त होतात ते धन्य होत. नाहीतर हल्ली गुरू करणे म्हणजे केवळ औपचारिक प्रकार होऊन राहिला आहे. गुरूने कानात काहीतरी ठरीव वचन सांगावे आणि या कृत्रिम शिष्यमंडळीने त्या वचनाचा भंग आपल्या आचरणात प्रतिपदी करावा, असा बहुतकरून जिकडे तिकडे क्रम आढळतो. पुन्हा अलीकडे गुरूही अगदी सामान्य प्रतीचे मनुष्य असतात. त्यांचे आचरण किंवा धर्मज्ञान त्यांच्या शिष्यवर्गाहून म्हणण्यासारखे चांगले नसते. कित्येक ठिकाणी तर गुरूपेक्षा शिष्यांचीच योग्यता अधिक असते. असो; आता ह्या ब्रह्मनिष्ठ महापुरुषाच्या अत्यंत शुद्ध आचरणाने व प्रेमळ उपदेशाने पृष्कळ लोकांच्या मनाची

उन्नती होऊन ते त्याच्या भजनी लागले; परंतु त्यातून मुख्यत: चौदा असामी त्याच्या जवळ सर्वदा असत. त्यातील काही जणांची नाव महिपतीने दिली आहेत. ती ही: गंगाधरपंत मवाळ कडूसकर–ब्राह्मण, संताजी जगनाडे चाकणकर–तेली, रामेश्वरभट्ट, कोंडभट्ट पुराणिक, शिवजी कासार व नावजी माळी. आता याची काही म्हणण्यासारखी हकीकत महिपतीने दिलेली नाही. जी थोडीशी माहिती उपलब्ध आहे. तिच्या आधाराने काही लिहू. गंगाधरपंत मवाळ हा तुकारामाच्या अंगचे अलोकसामान्य गुण पाहून व त्याच्या वैराग्यपर उपदेशाने विरक्त होऊन, सर्व संसार सोडून त्याच्याजवळ नेहमी असे. त्याने आपल्या ब्राह्मण्याचा अभिमान सोडून केवळ संतसंगाने व संतवचनश्रवणाने आपल्या जीविताचे सार्थक्य होईल असे मनात आणून तुकारामाचे अंतेवासित्व स्वीकारले होते. तो नेहमी तुकारामाच्या मागे टाळ घेऊन उभा राहत असे. तुकारामाला जेव्हा जेव्हा कवित्व करण्याची स्फूर्ती होई तेव्हा तेव्हा हा ते लिहून ठेवण्यासाठी हाती दऊतलेखणी घेऊन तयार असे. तुकाराम कीर्तनास उभा राहिला असता प्रसंगोपात्त तात्कालिक स्फूर्तीने जे अभंग करीत असे ते हा प्रेमळ ब्राह्मणशिष्य ध्यानात ठेवून कीर्तन आटोपल्यावर वहीत लिहून ठेवीत असे. ह्याप्रमाणे हा सच्छिष्य सदैव तुकारामापाशी असल्याकारणाने जी जी अमृतरसोपम वचने वेळोवेळा त्याच्या मुखावाटे निघत, ती लिहून ठेवण्याची सोय होऊन आजला आम्हास ती पहावयास मिळत आहेत. तेव्हा याबद्दल सर्व महाराष्ट्रजन ह्या कडूसकर ब्राह्मणाचे ऋणी आहेत. असो. आता त्याच्या दुसऱ्या शिष्याविषयी लिहू. संताजी जगनाडे हा जातीचा तेली असून चाकणचा राहणारा होता. या पलीकडे त्याच्याविषयी विशेष काही माहिती नाही. एवढे मात्र खरे की, हा तुकारामाचा बहुतेक पहिला शिष्य असून तो त्याच्या मागे ध्रुपद धरण्यास नेहमी असे. आता वर ज्यांच्या नावाचा उल्लेख केला आहे, त्यापैकी तिसरा जो रामेश्वरभट्ट त्याच्याविषयी मागे सांगण्यात आलेच आहे. ह्याने पूर्वी तुकारामाचा छळ केला असून पुढे आपल्या उच्चवर्णोत्पत्तीचा व विद्वत्तेचा सर्व अभिमान एकीकडे ठेवून तुकारामाचे शिष्यत्व पत्करावे व सर्व संसारापासून निवृत्त होऊन सर्व काळ त्याच्या सन्निध राहावे हे काही लहानसान कर्म नव्हे. येणेकरून तुकारामाची वास्तविक योग्यता किती होती याचे दिग्दर्शन होते, एवढेच नव्हे तर मनुष्य कितीही अभिमानी व कुर्रेबाज असला तरी त्याचा भ्रम नाहीसा झाला असता, तो लागलीच कसा अगदी शुद्धीवर येतो व सर्व लोकाचाराची व स्वाभिमानवृत्तीची परवा न करिता कसा नि:संगपणे सन्मार्गवर्ती होतो हे कळते. हा विद्वान ब्राह्मण मोठा वेदांती असून तुकारामाशी कोणी वाद करावयास आला असता हा शिष्य त्याचे समाधान करीत असे. याच्याच तोडीचा

कोंडभट पुराणिक हा होता; परंतु हा तुकारामाकडे येऊन राहण्याच्या संबंधाचा वृत्तांत मोठा चमत्कारिक आहे. शिवाजी महाराजांच्या पदरी एक पंडित होता. त्याच्या जवळ हा ब्राह्मण शागीर्दासारखा राहत असे. आपल्या गुरूप्रमाणे अपणास व्युत्पत्ती प्राप्त होऊन पुराण सांगता यावे अशी त्याची फार इच्छा होती. एके प्रसंगी ह्या ब्राह्मणाने तुकारामाच्या दर्शनास येऊन त्यास सद्भावपूर्वक नमन केले. तेव्हा तुकारामाने त्याला एक नारळ व अकरा अभंग एका कागदावर लिहून ठेवले होते ते दिले. कोंडभटाने ते अभंग पुन्हा पुन्हा वाचून त्यांचे मनन केले आणि तुकारामाने दिलेला नारळ प्रसाद म्हणून फोडला, तो आत बहुमोल जवाहीर सापडले. आता या नारळाची कथा अशी आहे की, अमदाबादच्या एका सावकाराने ज्ञानदेवापाशी असा नवस केला होता की, आपल्या इष्ट कार्यात आपणास यश आले असता एक लक्ष रुपयांचे जवाहीर आळंदी येथील समाधीवर वाहीन. पुढे त्या सावकाराची कार्यसिद्धी होताच आपला नवस फेडण्यासाठी जवाहीर घेऊन तो आळंदीस आला असता, त्यास असा दृष्टांत झाला की, देहूगावी तुकारामबावा आहे त्यास हे जवाहीर नेऊन द्यावे. त्याप्रमाणे तो भाविक सावकार देहूस गेला; पण आमच्या चरित्र नायकाच्या निःसीम विरक्ततेची व निरपेक्षतेची ख्याती त्यास ऐकून माहीत होती. हे जवाहीर त्यास अर्पण केले असता तो घेणार नाही हे तो पूर्णपणे जाणून होता. यास्तव त्याने अशी युक्ती केली की, एक नारळ घेऊन त्यातले खोबरे त्याने कोरून काढले व त्यात मोते, रत्ने वगैरे भरून त्यांचे भोक बेमालूमपणे बंद केले आणि तुकारामाच्या दर्शनास जाऊन त्याच्या पुढे तो नारळ ठेवला. तेव्हा त्याच्या शिष्यमंडळीने तो बाकीच्या नारळांसारखाच मानून उचलून ठेवला. ह्याप्रमाणे आपली युक्ती साधल्याबद्दल हर्ष पावून तो सावकार तेथून मुकाट्याने निघून गेला. इकडे आळंदीस एका ब्राह्मणाने आपणास व्युत्पत्ती प्राप्त व्हावी म्हणून ज्ञानदेवाच्या समाधीपाशी धरणे घेतले असता, त्यास असा दृष्टांत झाला की, तू तुकारामास शरण जा? तेव्हा तो ब्राह्मण तुकारामापाशी आला आणि आपणास झालेला ज्ञानदेवाचा दृष्टांत सांगून अनुग्रह होण्याविषयी त्याची विनंती करू लागला. तेव्हा तुकारामाने त्याला अकरा अभंग एका कागदावर लिहून दिले आणि तो सावकाराने दिलेला नारळ त्यास द्यावयास सांगितला. त्या ब्राह्मणास ती देणगी अर्थात आवडली नाही. तो ते अभंग आणि तो नारळ तेथेच टाकून निराश होऊन रागाने चालता झाला. पुढे वर सांगितलेला कोंडभट तुकारामाच्या दर्शनास येऊन त्याला तो अलभ्य लाभ झाला. तेव्हा हा कोणी तरी सिद्धपुरुष आहे, याच्या संन्निध राहिल्याने आपले सर्वतोपरी कल्याण होईल असे त्यास वाटून तो त्याच्याजवळ येऊन राहिला. पुढे त्याच्या इच्छेप्रमाणे त्याची संस्कृत भाषेमध्ये रामेश्वर भट्टाच्या साहाय्याने चांगली गती होऊन

तो त्याच्याच सारखा वेदांती झाला आणि सर्व काळ तुकारामापाशी राहू लागला. आता हे वर सांगितलेले अकरा अभंग येथे देतो :

*नको कांहीं पडो ग्रंथाचिये भरीं । शीघ्र व्रत करीं हेंचि एक ॥१॥*
*देवाचिये चाडे आळवावें देवा । ओस देहभावा पाडोनियां ॥धृ.॥*
*साधनें घालिती काळाचिये मुखीं । गर्भवास सेखीं न चुकती ॥२॥*
*उधाराचा मोक्ष होय नव्हे ऐसा । पतनासी इच्छा आवश्यक ॥३॥*
*रोकडी पातली अंगसंगे जरा । आतां उजगरा कोठंवरी ॥४॥*
*तुका म्हणे घाली नामासाठीं उडी । पांडुरंग थडी पाववील ॥५॥*

*नाही देवापाशी मोक्षाचें गाठोळे । आणूनि निराळें द्यावें हातीं ॥१॥*
*इंद्रियांचा जय साधुनिया मन । निर्विषय कारण असे तेथें ॥धृ.॥*
*उपास पारणीं अक्षरांची आटी । सत्कर्मा शेवटीं असे फळ ॥२॥*
*आदरें संकल्प वारीं अतिशय । सहज ते काय दुःख जाण ॥३॥*
*स्वप्नींच्या घाये विवळसी वाया । रडे रडतियासवे मिथ्या ॥४॥*
*तुका म्हणे फळ आहे मुळापाशी । शरण देवासी जाय वेगीं ॥५॥*

*त्यजिलें भेटवी आणूनि वासना । दाबिल्याचे जना काय काज ॥१॥*
*आळवावें देवा भाकूनि करुणा । आपुलिया मना साक्ष करीं ॥धृ.॥*
*नाहीं जावें यावे दुरूनि लागत । आहे साक्षभूत अंतरीचा ॥२॥*
*तुका म्हणे हा आहे कृपासिंधू । तोडी भवबंधु तात्काळिक ॥३॥*

*गोविंद गोविंद । मना लागलिया छंद ॥१॥*
*मग गोविंद ते काया । भेद नाहीं देवा तया ॥धृ.॥*
*आनंदले मन । प्रेम पाझरती लोचन ॥२॥*
*तुका म्हणे आळी । जेवी नुरेचि वेगळी ॥३॥*

*ज्याचें जया ध्यान । तेंचि होय त्याचें मन ॥१॥*
*ह्मणऊनि अवघे सारा । पांडुरंग दृढ धरा ॥धृ.॥*
*सम खुण ज्याचे पाय! उभा व्यापक विटे ठाय ॥२॥*
*तुका म्हणे नभा । परता अणूचा ही गाभा ॥३॥*

*पाहुनिया ग्रंथ करावें कीर्तन । तेव्हा आले जाण फळ त्याचे ॥१॥*
*नाही तरि वायां केली तोंडपिटी । उरी ते शेवटी उरलीसे ॥धृ.॥*
*पढोनियां वेद हरिगुण गावे । ठावें तें जाणावें तेव्हा जालें ॥२॥*
*तपतीर्थाटणें तेव्हां कार्यसिद्धि । स्थिर राहे बुद्धि हरिच्या नामीं ॥३॥*

*यागयज्ञादिक काय दानधर्म । तरि फळ नाम कंठीं राहे ॥४॥*
*तुका म्हणे नको काबाडाचे भरी । पडों सार धरी हेंचि एक ॥५॥*

*सुखें खावे अन्न । त्याचें करावे चिंतन ॥१॥*
*त्याचें दिले त्यासी । पावे फळ आपणासी ॥धृ.॥*
*आहे हा आधार । नाम त्याचें विश्वंभर ॥२॥*
*नाहीं रिता ठाव । तुका म्हणे पसरीं भाव ॥३॥*

*संकोचोनि काय जालासी लहान । घेई अपोषण ब्रह्मांडाचें ॥१॥*
*करोनि पारणे आंचवे संसार । उशिर उशिरा लावूं नको ॥धृ.॥*
*घरकुलानें होता पाडिला अंधार । तेणें केलें फार कासावीस ॥२॥*
*झुगारूनि दुरी लपविलें काखे । तुका म्हणे वाखे कौतुकाचे ॥३॥*

*माझ्या बापें मज दिधले भातुकें । म्हणोनि कौतुके क्रीडा करीं ॥१॥*
*केली आळी पुढें बोलिलो वचन । उत्तम हें ज्ञान आलें त्याचें ॥धृ.॥*
*घेउनि विभाग जावे लवलाह्या । आलेति या ठाया आपुलिया ॥२॥*
*तुका म्हणे ज्ञानदेवी समुदाय । करावा मी पाय येईन वंदूं ॥३॥*

*ज्ञानियांचा गुरू राजा महाराव । म्हणती ज्ञानदेव ऐसे तुम्हा ॥१॥*
*मज पामरा हे काय थोरपण । पायीची वाहाण पायी बरी ॥धृ.॥*
*ब्रह्मादिक जेथे तुम्हा वोळाणे । इतर तुळणे काय पुरे ॥२॥*
*तुका म्हणे नेणे युक्तीची ते खोली । म्हणोनि ठेविली पायीं डोई ॥३॥*

*बोलिली लेकुरें । वेडी वाकुडीं उत्तरे ॥१॥*
*करा क्षमा अपराध । महाराज तुम्ही सिद्ध ॥धृ.॥*
*नाहीं विचारिला । अधिकार म्यां आपुला ॥२॥*
*तुका म्हणे ज्ञानेश्वरा । राखा पायांपें किंकरा ॥३॥*

हे उपदेशपर अभंग त्या ब्राह्मणास काय होत? संस्कृत भाषेचे ज्ञान आयास केल्यावाचून प्राप्त व्हावे अशी त्याची उत्कट इच्छा होती. त्याला लोकांमध्ये पांडित्य मिरवून मानमरातब मिळवावयाचा होता. त्याला असली प्राकृत बोधवचने काय कामाची? तेव्हा अर्थात तो त्या वचनाचा अव्हेर करून तेथून निघाला. तो गेल्यावर तुकारामाने ज्ञानदेवास पत्र म्हणून आणखी तेरा अभंग लिहिले. तेही वाचण्यासारखे आहेत म्हणून त्याने त्यांचे येथे समग्र अवतरण करितो :-

*काय तुम्ही जाणां । करू अव्हेर नारायणा ॥१॥*
*तरी या लटिक्याची गोही । निवडली दुसरे ठायीं ॥धृ.॥*
*कळों अंतरीचा गुण । नये फिटल्यावांचून ॥२॥*

*आणिलें अनुभवा । जनाच्या हें ज्ञानदेवा ।।३।।*
*आणिक कोणी भिती । त्यांच्या चिंतने विश्रांति ।।४।।*
*तुका म्हणे बीज पोटी । फळ तैसोचि सेवटीं ।।५।।*

*अविश्वासीयाचे शरीर सुतकी । विटाळ पातकी भेद वाही ।।१।।*
*काय त्याचा वेल जाईल मांडवा ।। होता तैसा ठेवा आला पुढें ।।धृ.।।*
*मातेचा संकल्प व्हावा राजबिंडा । कपाळीचा धोंडा उभा ठाके ।।२।।*
*तुका म्हणे जैसा कुचराचा दाणा । परिपाकी अन्ना न मिळे जैसा ।।३।।*

*तामसाची तपे पापाची सिदोरी । तमोगुणें भरी घातले ते ।।१।।*
*राज्यमदा आड सुखाची संपत्ति । उलंघूनि जाती निरयगांबा ।।धृ.।।*
*इंद्रिये दमिलीं इच्छा जिती जीवीं । नागविती ठावी नाहीं पुढें ।।२।।*
*तुका म्हणे हरिभजनावांचून । करिती तो सीण पाहों नये ।।३।।*

*जाईल भंगोन आपुला विश्वास । होईल या नास कारणांचा ।।धृ.।।*
*ज्याचिया बैसावें भोजनपंगती । त्याचिया संगती तैसे खावें ।।२।।*
*तुका म्हणे काय जालेती जाणावे । देवाही परते थोर तुम्हीं ।।३।।*

*सेवके करावें स्वामीचे वचन । त्यासी हुंतूंपण कामा नये ।।१।।*
*घेईल जीव कां सारील परतें । भंगलिया चित्तें सांदीजेना ।।धृ.।।*
*खद्योतें दावावी रवी केवीं वाट । आपुलेंचि नीट उसंतावें ।।२।।*
*तुका म्हणे तो ज्ञानाचा सागर । परि नेदी अगर भिजों भेदें ।।३।।*

*जयाचिये द्वारी सोन्याचा पिंपळ । अंगी ऐसें बळ रेडा बोले ।।१।।*
*करील ते काय नव्हे महाराज । परि पाहे बीज शुद्ध अंगीं ।।धृ.।।*
*जेणे हे घातली मुक्तीची गवांदी । मेळविली मांदी वैष्णवांची ।।२।।*
*तुका म्हणे तेथे सुखा काय उणे । राहे समाधाने चित्ताचिया ।।३।।*

*बहुता छंदांचे बहुवसे जन । नये बाटूं मन त्यांच्या संगे ।।१।।*
*करावा जतन आपुला विश्वास । अंगा आला रस आवडीचा ।।धृ.।।*
*सुखाची समाधि हरिकथा माउली । विश्रांति माउली सिणलियांची ।।२।।*
*तुका म्हणे बुडे बांधोनि दगड । तेथें काय कोड धांवायाचें ।।३।।*

*हरिकथें नाही । विश्वास ज्याचे ठायी ।।१।।*
*त्याची वाणी अमंगळ । कान उंदराचे बीळ ।।धृ.।।*
*सांडुनि हा रस । करिती आणिक सायास ।।२।।*
*तुका म्हणे पिसीं । वाया गेली किती ऐसीं ।।३।।*

*प्रेम अमृताची धार । वाहे देवा हीं समोर ।।१।।*
*ऊर्ध्ववाहिनी हरिकथा । मुगुटमणि सकळा तीर्था ।।धृ.।।*
*शिवाचें जिवन । जाळी महादोष कीर्तन ।।२।।*
*तुका म्हणे हरि । इची स्तुति वाणी थोरी ।।३।।*

*आतां माझ्या मना । इची घडो उपासना ।।१।।*
*ऐसें करी पांडुरंगा । प्रेम वोसंडेसें अंगा ।।धृ.।।*
*सर्व काळ नये । वाचे वीट आड भयें ।।२।।*
*तुका वैष्णवांसंगती । हेचि भजन पंगती ।।३।।*

*उपास कराडी । तिही करावीं बापुडीं ।।१।।*
*आम्ही विठोबाचे दास । चिंता झुगारिली आस ।।धृ.।।*
*भक्तीच्या उत्कर्षे । नाही मुक्तीचें ते पिसें ।।२।।*
*तुका म्हणे बळ । अंगी आमुच्या सकळ ।।३।।*

*करविली तैसी केली कटकट । वांकडे कीं नीट देव जाणे ।।१।।*
*कोणांकारणे हे जालेसे निर्माण । देवाचे कारण देव जाणे ।।२।।*
*तुका म्हणे मी या अभिमाना वेगळा । घालूनि गोपाळा भार असे ।।३।।*

*तुम्ही येथे पाठविला धरणेकरी । त्याची जाली परी आइका ते ।।१।।*
*आतां काय पुढे वाढवूनि विस्तार । जाला समाचार आइका तो ।।धृ।।*
*देवाचे उचित एकादश अभंग । महाफळ त्याग करूनि गेला ।।२।।*
*तुका म्हणे सेवा समर्पूनि पायी । जालों उतराई ठावें असो ।।३।।*

हे एकंदर अभंग वाचले असता तुकारामाच्या अंगी काही अद्भुत चमत्कार करण्याची शक्ती होती असे कोणीही म्हणणार नाही. तो आपला साधा, भाविक व प्रेमळ भगवद्भक्त होता. आपण कोणी मोठा सिद्ध आहो असे त्यास मुळीच वाटत नसे. ब्राह्मणास देण्यासाठी म्हणून लिहिलेल्या सदरील अकरा अभंगात त्याने आपल्या समजुतीप्रमाणे जीवितसाफल्याचा उत्तममार्ग कोणता ते चांगल्याप्रकारे सांगितले आहे. त्याचप्रमाणे ज्ञानदेवास लिहिलेल्या विनंतिपत्रातही त्याने हाच आशय मोठ्या खुबीदार रीतीने व्यक्त केला आहे. आता कोंडभटास हे अभंग वाचून व्युत्पत्ती प्राप्त झाली असे महिपती लिहितो; परंतु त्याच्या वेळच्या लोकसमजुतीप्रमाणे हा उल्लेख त्याने केला आहे. खरा प्रकार काय झाला असावा ते वर दिलेले अभंग मननपूर्वक वाचले असता सहज कळण्यासारखे आहे. कोंडभटासारख्या साध्या वृत्तीच्या ब्राह्मणाच्या मनात

आपणास व्युत्पत्ती प्राप्त व्हावी अशी कितीही उत्कट इच्छा असली तरी हे अभंग वाचून त्याच्या अंगी वैराग्य उत्पन्न होण्यासारखे होते. आणखी असे की, त्याने दिलेल्या नारळात जवाहीर सापडल्यामुळे त्याच्याठायी विशेष पूज्यत्वभाव उत्पन्न होणे साहजिकच आहे.

आता वर सांगितलेला तुकारामाचा पाचवा शिष्य जो शिवजी कासार त्याच्याविषयी काही लिहू. हा गृहस्थ लोहगावचा रहिवासी होता. ह्या गावचे लोक तुकारामास आपल्या गावी वेळोवेळा नेऊन त्याची घरोघर कीर्तने करवीत. ज्याला जशी अनुकूलता असे तशी तो समाराधना घालून कीर्तनाची तयारी करी. ह्याप्रमाणे भक्तिरसपानांत त्या गावचे लोक नेहमी दंग असत. लोहगावातले बहुतेक लोक तुकारामाचे भक्त बनले होते; परंतु त्या गावात हा शिवजी कासार मात्र त्याची नेहमी अवहेलना करी. त्याची कीर्तने ऐकणारांचीही तो खूप विटंबना करी. एके प्रसंगी तुकाराम लोहगावी असता आळंदीहून एक ब्राह्मण त्याचा शोध करीत करीत तेथे आला आणि सांगू लागला की, मला पुष्कळ कर्ज झाले आहे. ते फिटावे म्हणून मी आळंदीस धरणे धरून बसलो होतो. तेव्हा मला आपणाकडे जाण्याविषयी दृष्टांत झाला. त्याप्रमाणे मी आपणाकडे आलो आहे. मी अकिंचन ब्राह्मण आहे. मजवर दया करून मला बह्मस्वातून सोडवा. हे त्याचे संकट पाहून त्या दयाळू भगवद्भक्तास त्याची कीव आली आणि त्याने तेथल्या लोकांस त्या ब्राह्मणाला देशावर करून देण्यास सांगितले. तेव्हा त्यांनी सर्व गावातील लोकांकडून काहीना काही मिळवून त्याच्या कर्जाची भरपाई केली आणि तो ब्राह्मण अत्यंत हर्ष पावून तुकारामाची व लोहगावच्या भाविक लोकांची स्तुती करीत आपल्या गावी गेला. इकडे ह्या कासाराला हा सारा वृत्तांत कळल्यावर त्याच्या चितांत तुकारामाविषयी जो विरोध होता तो कमी झाला आणि त्यास असे वाटू लागले की, अशा महापुरुषाशी द्वेष करून आपले नुकसान करून घेण्यात काही अर्थ नाही. असा पोक्त विचार करून तो तेव्हापासून तुकारामाच्या सेवेस लागला. हा त्याच्या वृत्तीत पालट पडल्यानंतर लवकरच असा चमत्कार घडला की, त्याने कथील आणण्याकरिता मुंबईस छत्तीस बैल गुमास्त्यांसहवर्तमान पाठविले होते. ते कथील घेऊन माघारे आल्यावर पाहतात तो ते कथील नसून रूपे आहे असे आढळून आले. तेव्हा शिवजीने मुंबईच्या व्यापाऱ्यांस कथीलच पाठविले किंवा दुसरे काही पाठविले म्हणून विचारले असता त्यांनी सांगून पाठविले की, आम्ही पाठविले ते कथीलच आहे; दुसरे काहीही नव्हे. मग त्याने तुकारामाकडे येऊन या प्रकरणी त्याचा सल्ला विचारिला. तुकारामाने त्याला सांगितले की, हा असा अवचित धनलाभ तुला तुझ्या सुदैवाने झाला आहे. त्याचा सत्कार्यी व्यय कर म्हणजे झाले. पुढे त्या कासाराने

लोकहितार्थ एक मोठी विहीर लोहगावी बांधली. तिला कासारविहीर म्हणत. त्याचप्रमाणे त्याने ब्राम्हणभोजने घालून पुष्कळ दानधर्म केला. एवढे वैभव त्याला प्राप्त झाले असूनही त्यास भुलून तो संसारात गुंतून राहिला नाही. त्याच्या चित्तांत वैराग्यवृत्ती पूर्णपणे बाणून तो घरदार सोडून नेहमी तुकारामापाशी असे. हे त्याचे वैराग्य त्याच्या बायकोस अर्थात मुळीच न आवडून ती तुकारामाचा मनस्वी द्वेष करू लागली. आपल्या नवऱ्यास याने आपल्या नादी लावून अगदी वेडापिसा करून सोडला आहे, तर याचा नाश हरउपायाने केला पाहिजे असा तिने निर्धार केला. एके दिवशी हा सूड उगविण्याची तिने एक युक्ती योजली. ती अशी की, तिने तुकारामास आपल्या घरी बोलावून आणले आणि घराच्या जोत्याखाली पाट मांडून त्यावर त्याला बसवून स्नान घालण्यासाठी म्हणून अतिशयित कढत पाण्याचे हंडे आणून ते त्याच्या अंगावर ओतले. त्या वेळी त्याचे सर्व अंग अगदी होरपळून गेले. त्या वेदना होत असता त्याने देवाचा धावा एका अभंगात केला आहे, तो अभंग हा :

*जळे माझी काया लागला ओणवा ।। धांवरे केशवा मायबापा ।।१।।*
*पेटली सकळ कांति रोमावळी ।। नावरे हे होली दहन झाले ।।२।।*
*फुटोनियां दोन्ही भाग होऊं पाहे ।। पाहतोसी काय हृदय माझें ।।३।।*
*घेऊनि जीवन धांवें लवलाही ।। कवणाचें काही न चलें येथें ।।४।।*
*तुका म्हणे तूं माझी होसी जननी ।। आणिक निर्वाणी कोण राखी ।।५।।*

ह्या अभंगात वर्णिल्याप्रमाणे खरा प्रकार घडला असता महिपती असे लिहितो की, देवाने तुकारामाचा धावा ऐकून त्यास त्या कढत पाण्यापासून काही एक इजा होऊ दिली नाही. ही त्याची केवळ चमत्कारवर्णनप्रियता होय किंवा त्याने तुकारामाविषयी माहिती मिळविताना ह्या अद्भुत गोष्टी जशा लोकांकडून ऐकिल्या तशाच लिहून ठेवल्या. असो. या चमत्कारांचे एक निराळेच प्रकरण आम्हास पुढे लिहावयाचे आहे; त्या वेळी त्यांच्याविषयी विशेष रीतीने लिहू.

पुढे ह्या कासाराच्या दुष्ट स्त्रीच्या अंगावर कोड फुटले असता ते ज्या ठिकाणी तुकारामास तिने उकळत्या पाण्याचे स्नान घातले होते, तेथली माती तिच्या अंगास लावल्यामुळे नाहीसे झाले असे म्हणतात. हा चमत्कार घडला तेव्हा त्या स्त्रीस कृतापराधाबद्दल पश्चात्ताप होऊन तीही त्याच्या कीर्तनास वगैरे जाऊ लागली आणि आपल्या नवऱ्याप्रमाणेच त्याच्या सेवेस लागली.

आता फक्त तुकारामाच्या एका शिष्याविषयी लिहिणे राहिले. तो नावजी माळी होय. हा गृहस्थ तुकारामाच्या कीर्तनास नेहमी येत असे. त्याची कीर्तने ऐकता ऐकता

त्याच्या मनाचा असा काही विलक्षण पालट झाला की, एके समयी तुकारामाचे कीर्तन चालले असता तो मध्येच उठून म्हणू लागला की, स्वामीमहाराज, आपण काही वेळ विश्रांती घ्यावी. मी थोडेसे कीर्तन करितो. ती त्याची उत्सुकता पाहून तुकाराम खाली बसला. तेव्हा तो तोंडाने विठ्ठल नामाचा गजर करून व टाळ्या वाजवून प्रेमानंदभराने नाचू लागला. असे त्याने अगदी थकून जाईपर्यंत केले. मग पुन्हा तुकारामाने उठून आपल्या कीर्तनाचा समारोप केला. येथून पुढे हा माळी नेहमी फुलाचे हार आणून ते कीर्तनास बसलेल्या संतजनांच्या व ब्राह्मणांच्या गळ्यात घालीत असे व भक्तिरसाने चित्त उचंबळून गेले म्हणजे तो देहभान विसरून कीर्तन चालले असता मध्येच उठून नाचू लागे.

येथवर तुकारामाच्या ज्या शिष्यांची माहिती उपलब्ध आहे त्यांच्या संबंधाने लिहिणे झाले. पूर्वी सांगितलेले चौदा शिष्य तुकारामास क्षणभरसुद्धा विसंबत नसत. तो त्यास नकळन कोठे तरी गेला असता त्याला धुंडीत धुंडीत ते त्या ठिकाणी जात. तो कीर्तन करू लागला म्हणजे कोणी त्याच्या मागे उभे राहावे व कोणी कीर्तनप्रसंगी इतर व्यवस्था ठेवावी. असा त्यांचा क्रम असे. तुकारामासही त्यांचा तो सद्भाव पाहून समाधान वाटे. त्याला सच्छिष्याची आवड फारच होती असे त्याच्या काही अभंगांवरून दिसते. त्यापैकी येथे दोनच देतो.

*देवा ऐसा शिष्य देंई ।। ब्रह्मज्ञानीं निपुण पाहीं ।।१।।*
*जो कां भावाचा आगळा ।। भक्ति प्रेमाचा पुतळा ।।२।।*
*ऐशा युक्ति ज्याला बाणें ।। तेथें वैराग्याचें ठाणें ।।३।।*
*ऐसा झाला हो शरीरी ।। तुका लिंबलोण करी ।।४।।*

*कृपा करावी भगवंतें ।। ऐसा शिष्य वारा मातें ।।१।।*
*माझें क्रत जो चालवी ।। त्यासी द्यावे त्वां पालवी ।।२।।*
*व्हावा ब्रह्मज्ञानी गुंडा ।। तिहीं लोकीं ज्याचा झेंडा ।।३।।*
*तुका तुका हाका मारी ।। माझ्या विठोबाच्या द्वारीं ।।४।।*

अशा लक्षणांनी युक्त शिष्य मिळणे फारच कठीण. तरी जशी गुरूची इभ्रत व तेज असते तशी त्याच्या शिष्याच्या ठायी थोडीबहुत छाया उमटण्याचा संभव असतो. येथवर जे आमच्या चरित्रनायकाविषयी आम्ही लिहिले आहे, त्यावरून त्याच्या ठायी किती अप्रतिम तेज वसत होते हे आमच्या वाचकास थोडेसे कळलेच आहे. अशा महापुरुषाचे सान्निध्य ज्यास प्राप्त होते. त्यांच्या भाग्यास पारावार नाही. त्यांच्या ठायी सद्वृत्तींचा उत्तरोत्तर अधिकाधिक विकास होऊन त्यांची मानसिक उन्नती एकसारखी

होत जावयाची. तुकारामाने आपल्या उज्ज्वल गुणांच्या योगाने व अमृतमय वाक्‌शक्तीच्या प्रभावाने जिकडे तिकडे आपले अनुयायी केले. त्याच्या भक्तिमार्गबोधामृताचे सेवन ज्यास अल्पमात्र घडे, तो या संसारामध्ये नेकीने वागून विठ्ठलभक्तीचा अवलंब करी. अशा प्रकारे आसपासच्या गावात दिंडीपताका धारण करून वर्षास दोन वेळा पंढरीची वारी करणारे भक्तजन पुष्कळच उत्पन्न झाले. केवळ त्याच्या उपदेशाने हा भक्तिमार्ग स्वीकारणारे संत निदान हजार पंधराशे तयार झाले होते. तुकाराम वारीस निघाला की, हे सारे संत त्याच्या मागून त्याचे अभंग म्हणत व प्रेमाने नाचत पंढरीस जात. असा त्यांचा क्रम तुकारामाचे देहावसान होईपर्यंत चालला होता. तर हा क्रम त्याच्या पश्चातही एकसारखा पिढ्यान्‌पिढ्या चालू राहिला. हल्ली देहू आळंदीहून तुकाराम व ज्ञानदेव यांच्या पालख्या निघून पंढरपुरास मोठ्या थाटाने जात असतात हे सर्वांस माहीतच आहे. हा सारा प्रभाव कशाचा बरे? त्या महापुरुषाच्याठायी जर काही अलौकिक गुण नसते किंवा तो केवळ ढोंगी असता तर त्याच्याविषयी आम्हा महाराष्ट्रीयांच्याठायी एवढा पूज्यभाव जागृत राहिला नसता. जे खरे रत्न असते त्याची प्रभा सहसा लोपावयाची नाही किंवा त्याची पारख होण्यास उशीर लागावयाचा नाही. साधुपुरुष म्हटला म्हणजे त्याच्या सात्त्विक गुणांची परीक्षा हवी त्यास करिता येऊन त्याच्याविषयी खरी मान्यताबुद्धी उत्पन्न होण्यास मुळीच उशीर लागत नाही. त्यात आणखी त्या साधुपुरुषाचा प्रयत्न आपल्या बांधवांची मानसिक उन्नती करण्याविषयी अहर्निश चालू असल्यास त्याची ओळख पुष्कळास होऊन त्याचे उपकार बहुत जनावर होतात आणि त्याची कीर्ती सर्वतोमुख होते. अशा पुरुषास कवित्वादी साधनांच्या योगाने आपला सद्‌बोध ग्रंथरूपाने चिरकाल राहिसा करिता आल्यास तो पुढील संततीच्या उन्नतीस कारणीभूत होऊन त्याच्या उज्ज्वल चरित्राचा महिमा कायम रहातो. अशा कोटीतला महापुरुष आमचा चरित्रनायक असल्यामुळे त्याच्या हयातीतच त्याचे शिष्य झाले होते असे कोणी समजू नये. तर त्याचे बहुतेक वाङ्मय कायम राहिल्यामुळे व त्याचे चरित्र बरेच दंतकथाशेष राहिल्यामुळे प्रत्येक पिढीत त्याचे नवे शिष्य होऊन त्याने लावून दिलेला सगुण उपासनेचा मार्ग ते मोठ्या प्रेमाने व भाविकपणाने आजपर्यंत अप्रतिहत चालवित आले आहेत. गुरू असावा तर तो असा तेजस्वी असावा. नुसत्या बुद्धितेजाचा किंवा नुसत्या नीतितेजाचा एवढा प्रभाव नसतो, तर त्या दोहोंचे एकीकरण झाल्याने जी तेजस्विता प्राप्त होते ती पिढ्यान्‌पिढ्या उत्पन्न होणाऱ्या शिष्यजनास प्रकाशप्रद व उन्नतिदायक होते आणि ती कधीही मावळण्याचा संभव नसतो.

●●●

# तुकाराम, शिवाजी आणि रामदास

*थुंकोनिया मान । दंभ करितों कीर्तन ।।१।।*
*झालो उदासीन देहीं । एकावीण चाड नाहीं ।।२।।*
*अर्थ अनर्थ सारिखा । करूनि ठेविला पारिखा ।।३।।*
*उपाधी वेगळा । तुका राहिला सोवळा ।।४।।*

*कामक्रोध आम्ही वाहिले विठ्ठलीं । आवडी धरिली पायांसवें ।।१।।*
*आतां कोण पाहे मागें परतोनि । गेले हरपोनि देहभाव ।।२।।*
*रिद्धि सिद्धि सुखे हाणितल्या लाता । तेथें या प्राकृता कोण मानी ।।३।।*
*तुका म्हणे आम्ही विठोबाचे दास । करूनि ठेलों ग्रास ब्रह्मांडाचा ।।४।।*

येथवर सांगितल्याप्रमाणे तुकारामाची सत्कीर्ती सर्व महाराष्ट्रांत प्रसृत होऊन पंढरपूरच्या वारकऱ्यांत त्याची गणना प्रमुखत्वाने होऊ लागली. त्याचे सद्वर्तन, त्याची नि:सीम वैराग्यवृत्ती, त्याची प्रासादिक अभंगवाणी व त्याचे कीर्तनसमयी होणारे सद्‌बोधप्रचुर वक्तृत्व पाहून व ऐकून लोकांच्या ठायी त्याच्याविषयी पूज्यबुद्धी उत्पन्न झाली आणि त्याची महाराष्ट्रातील महाभगवद्भक्तांत गणना होऊ लागली.

या समयास सर्व महाराष्ट्र यवनांनी पादाक्रांत केले होते; ते त्यांच्या तावडीतून सोडविण्याच्या भगीरथ प्रयत्नास शिवाजीने नुकताच आरंभ केला होता. त्याला लहानपणापासून कथापुराणे ऐकण्याचा नाद फार असे. तेणेकरून त्याच्या हृदयात धर्मसंबंधी विचार नेहमी जागृत असत. साधुसंतांची दर्शने घेऊन त्यांचा बहुमान करावा आणि त्यांच्यापासून सद्‌बोध श्रवण करावा, असा त्याचा क्रम असे. तुकारामाची कीर्ती त्याच्या कानी अनेक प्रकारे आली होती. त्याची वृत्ती मोठी सात्त्विक असून त्यास ब्राह्मणलोकसुद्धा पूज्य मानतात; तो जातीचा केवळ मराठा असून त्यास अभंगादी प्रासादिक कवने करिता येतात; त्याच्या तोडीचा कीर्तनकार साऱ्या महाराष्ट्रात कोणी नाही; त्याचे अभंग ब्राह्मणांनी पाण्यात नेऊन बुडविले असता ते तेरा दिवसांनी पुन्हा पाण्यावर जसेचे तसे कोरडे आले, वगैरे गोष्टी तो लोकांच्या तोंडून ऐकत असे. पुढे त्याच्या पदरच्या एका पुराणिकाचा कोंडभट नावाचा शागीर्द तुकारामाच्या दर्शनास गेला असता त्याला प्रसाद म्हणून मिळालेल्या नारळात जवाहीर सापडले आणि तो

ब्राह्मण मग तुकारामाचा परम शिष्य होऊन सर्व काळ त्याच्याजवळ राहू लागला. हे वर्तमान शिवाजीस कळल्यापासून त्याच्या मनात तुकारामाचे दर्शन घेण्याची इच्छा उत्पन्न झाली; आणि त्याने त्याला एक पत्र कारकुनाच्या हाती पाठविले आणि त्याला आणण्याकरिता त्या कारकुनाबरोबर घोडा, छत्री वगैरे सरंजाम दिला. या वेळी तुकाराम लोहगावी होता. त्याने ते पत्र पाहून राजास पत्राचे उत्तर म्हणून आठ अभंग करून पाठविले. ते अभंग हे होत:-

*दिवट्या छत्री घोडे । हे तों बऱ्यांत न पडे ।।१।।*
*आतां येथे पंढरिराया । मज गोविसी कासया ।।२।।*
*मान दंभ चेष्टा । हे तो शूकराची विष्ठा ।।३।।*
*तुका म्हणे देवा । माझे सोडवणे धांवा ।।४।।*

*नावडे जे चित्ता । तेचि होसी पुरविता ।।१।।*
*कां रे पुरविली पाठी । माझी केली जीवें साठी ।।२।।*
*न करावा संग । वाटे दुरावावें जग ।।३।।*
*सेवावा एकांत । वाटे न बोलावी मात ।।४।।*
*जन धन तन । वाटे लेंखावें वमन ।।५।।*
*तुका म्हणे सत्ता । हाती तुझ्या पंढरिनाथा ।।६।।*

*विंरचीनें केले ब्रह्मांड सकळ । तयामाजी खेळ नाना युक्ति ।।१।।*
*युक्तीचा बाळक ब्रह्मनिष्ठ ज्ञानी । गुरुभक्ति मनी विश्वासेंसी ।।२।।*
*ऐसा तुझा प्रेमा कळे कांहींएक । पाहुनियां लेख पत्रिकीचे ।।३।।*
*शिव तुझे नाम ठेविले पवित्र । छत्रपति सूत्र विश्वाचें कीं ।।४।।*
*क्रत नेम तप ध्यान योग कळा । करूनी मोकळा जालासी तूं ।।५।।*
*हेत लागला आमुचीये भेटी । पत्रामाजी गोष्टी हेचि थोर ।।६।।*
*याचे हे उत्तर ऐक गा भूपति । लिहिली विनंती हेताची हे ।।७।।*
*अरण्यवासी आम्ही फिरों उदासीन । दर्शनही हीन अमंगळ ।।८।।*
*वस्त्राविण काया जालीसे मळीन । अन्नरहित हीन फळाहारी ।।९।।*
*रोडके हात पाय दिसे अवकळा । काय तो सोहळा दर्शनाचा ।।१०।।*
*तुका म्हणे माझी विनंती सलगीची । वार्ता हे भेटीची करूं नका ।।११।।*

*ऐसी माझी वाणी दीनरूप पाहे । हे त्या करुणा आहे हृदयस्थाची ।।१।।*
*नहों किविलवाणे नाही आम्ही दीन । सर्वदा शरण पांडुरंगी ।।२।।*

*पांडुरंग आम्हा पाळिता पोसिता । आणिकांची कथा काय तेथे ।।३।।*
*तुझी भेट घेणें काय हे मागणें । आशेचे हे शून्य केलें आम्हीं ।।४।।*
*निराशेचा गाव दिधला आम्हांसी । प्रवृत्ति भागासी सांडियेलें ।।५।।*
*पतिव्रतेचें हे मन पति भेटो । तैसे आम्ही विठोमाजी नांदों ।।६।।*
*विश्व हें विठ्ठल नाही दुजें कांहीं । देखणें तुझेही तयामाजी ।।७।।*
*तुजही विठ्ठल ऐसेंचि वाटलें । परि एक आलें आडवें हें ।।८।।*
*सद्‌गुरुश्रीरामदासांचे भूषण । तेथे घाली मन चळों नको ।।९।।*
*बहुता ठायी वृत्ति चावळली जेव्हां । रामदास्य तेव्हां धडे कैसें ।।१०।।*
*तुका म्हणे बापा चातुर्यसागरा । भक्ति भाव तारा भाविकांसी ।।११।।*

*तुम्हापाशी आम्ही येऊनियां काय । वृथा सीण आहे चालण्याचा ।।१।।*
*मागावे हे अन्न तरी भिक्षा थोर । वस्त्रासी हे थोर चिंध्या बिदी ।।२।।*
*निद्रेसी आसन उत्तम पाषाण । वरी आवरण आकाशाचें ।।३।।*
*तेथे काय करणे कवणाची आस । वायां होय नाश आयुष्याचा ।।४।।*
*राजगृहा यावें मानाचिये आसे । तेथें काय वसे समाधान ।।५।।*
*रायाचिये घरीं भाग्यवंता मान । इतरां सामान्यां मान नाहीं ।।६।।*
*देखोनिया वस्त्रे भूषणांचे जन । तत्काळ मरण येतें मज ।।७।।*
*ऐकोनियां मानाल उदासता जरी । तरी आम्हा हरि उपेक्षीना ।।८।।*
*आतां हेचि तुम्हा सांगणे कौतुक । भिक्षे ऐसें सुख नाहीं नाहीं ।।९।।*
*तपव्रतयाग महाभले जन । आशाबद्ध दीन वर्तताती ।।१०।।*
*तुका म्हणे तुझी श्रीमंत मानाचे । पूर्वाच दैवाचे हरिभक्त ।।११।।*

*आतां एक योग साधावा हा नीट । भल्याचा तो वीट मानूं नये ।।१।।*
*जेणें योगें तुम्हा घडों पाहे दोष । ऐसा हा सायास करूं नये ।।२।।*
*निंदक दुर्जन संग्रही असती । त्यांची युक्ति चित्तीं आणूं नका ।।३।।*
*परीक्षावे कोण राज्याचे रक्षक । विवेकाविवेक पाहोनियां ।।४।।*
*सांगणें नलगे सर्वज्ञ तूं राजा । अनाथांच्या काजा साह्य व्हावें ।।५।।*
*हेंचि ऐकोनिया चित्त समाधान । आणिक दर्शने चाड नाहीं ।।६।।*
*घेउनिया भेटी कोण हा संतोष । आयुष्याचे दीस गेले गेले ।।७।।*
*एक दोनी कर्में जाणोनियां वर्मे ४। आपुलिया श्रमे राहू आता ।।८।।*
*कल्याणकारण अर्थ याचा एक । सर्वो भूती देख एक आत्मा ।।९।।*
*आत्मारामी मन ठेवूनिया राहे । रामदासीं पाहें आपणेयां ।।१०।।*
*तुका म्हणे राया धन्य जन्म क्षिती । त्रैलोकी हे ख्याति कीर्ति तुझी ।।११।।*

*राया छत्रपति ऐकावे वचन ।। रामदासी ध्यान लावा वेगी ।।१।।*
*रामदाम स्वामी सोयरा सज्जन ।। यासि तूं नमन अर्पी बापा ।।२।।*
*मारुती अवतार स्वामी प्रगटला ।। उपदेश केला तुजलागीं ।।३।।*
*रामनाम मंत्र तारक केवळ ।। झालासे सीतळ उमाकांत ।।४।।*
*उफराटीं नामें जपतां वाल्मीक ।। झाला पुण्यश्लोक तात्कालिक ।।५।।*
*तेंच बीज त्यासि वशिष्ठ उपदेश ।। त्याहूनि विशेष काय आहे ।।६।।*
*आतां धरू नका भलत्याचा संग ।। राम पांडुरंग कृपा करी ।।७।।*
*धरू नको आस आमुची भूपाळा ।। रामदासीं डोळा लावा वेंगीं ।।८।।*
*तुझी चाड नाही आम्हा छत्रपति ।। आम्ही पत्रपति त्रैलोक्याचे ।।९।।*
*चारी दिशीं आम्हा भिक्षेचा अधिकार ।। न मिळे भाकर भक्षावया ।।१०।।*
*पांडुरंगा आमुची झाली पूर्ण भेटी ।। हातांत नरोटी दिधली देवें ।।११।।*
*आतां पडूं नको आमुचिया काजा ।। पवित्र तूं राजा रामभक्त ।।१२।।*
*विठ्ठलाचे दास केवळ भिकारी ।। आम्हालागी हरि उपेक्षीना ।।१३।।*
*शरण असावे रामदासालागीं ।। नमन साष्टांगी घालीं त्यासी ।।१४।।*
*तुका म्हणे राया मुला असो कल्याण ।। सद्गुरुशरण असे बापा ।।१५।।*

*आतां हे विनवणी प्रधान अष्टक । प्रभूसी विवेक समजावा ।।१।।*
*प्रतिनिधि मानरक्षक चतुर । सात्त्विकाचे घर तुम्हांपाशीं ।।२।।*
*मजुमुचे धणी लेखन कारक । पत्रींचा विवेक समजावा ।।३।।*
*पेशवे सुरनिस चिटनिस डबीर । राजाज्ञा सुमंत सेनापति ।।४।।*
*भूषण पंडितराय विद्याधन । वैद्यराजा नमन माझें असे ।।५।।*
*पत्राचा हा अर्थ अंतरीं जाणोनी । विवंचोनी श्रवणीं घाला तया ।।६।।*
*सात्त्विक प्रेमळ दृष्टांताच्या मतें । बोलिलों बहुत कळावया ।।७।।*
*यथास्थित निरोप सांगणें हा राया । अर्थ पाहा वांयां जाऊ नेदा ।।८।।*
*भिडेसाठी बोला गाळूनी अर्थाते । अनर्थकारी तुह्यातें होईल तेणें ।।९।।*
*तुका म्हणे तुम्हा नमन अधिकाऱ्यां । सांगणें ते राया पत्र माझे ।।१०।।*

हे अभंग वाचले म्हणजे तुकारामाच्या ठायी ऐहिक सुखाविषयी व मानाविषयी किती बेपर्वाई वसत होती, हे चांगले ध्यानात येते. त्याच्या अंगी वैराग्यवृत्ती पूर्णपणे बाणल्यामुळे असल्या जबरदस्त मोहास तो मुळीच वश झाला नाही. आपल्याठायी काही विशेष योग्यता किंवा सामर्थ्य आहे असे त्यास मुळीच वाटत नसे. सदरील अभंगाच्या प्रत्येक ओळीमध्ये त्याची लीनता, सरळता, निरपेक्षता इत्यादी उज्जवल

वृत्ती पूर्णपणे प्रतिबिंबित झाल्या आहेत. त्याचप्रमाणे त्याने जो शिवाजीस बोध केला आहे तो तरी किती प्रेमळपणाचा व कळवळ्याचा आहे बरे! आम्हास तर असे वाटते की, यावेळी तुकारामाची वास्तविक योग्यता पूर्णपणे कसास लागली. असे नि:सीम विरक्त पुरुष पृथ्वीतलावर आजपर्यंत फारच थोडे निर्माण झाले असतील. जो मोक्षमार्ग एकवेळ स्वीकारला त्याचे अनुसरण केवळ अनन्य हेतूने करावयाचे व त्यापासून चळण्याचे कितीही मोहप्रसंग आले तरी त्यास हार न जाता देहावसान होईपर्यंत आचरणाची शुद्धता कायम राखावयाची, हे व्रत काही लहानसान नव्हे. हे आजपर्यंत फारच थोड्या महापुरुषांस साध्य झाले आहे.

असो, तर याप्रमाणे पत्राचे उत्तर शिवाजीस मिळाले तेव्हा त्याच्या मनात ह्या महापुरुषाविषयी कोणती वृत्ती उत्पन्न झाली असेल याची कल्पना वाचकांस सहजच होण्यासारखी आहे. ह्या नि:स्पृहीपणाच्या पत्रोत्तराने त्यास विषाद न वाटता उलटी त्याच्याविषयीची आदरबुद्धी व पूज्यत्वबुद्धी अधिकच वृद्धिंगत झाली आणि त्याने असा निश्चय केला की, हा महासाधू आपल्याकडे येत नाही, तर आपण त्याच्या दर्शनास जावे.

पुढे एके दिवशी तुकाराम पुन्हा लोहगावी येऊन रात्रीस घरोघर कीर्तने व दिवसास गोपाळकाला चालला आहे असे ऐकून, शिवाजी राजाने तेथे जाऊन त्यांचे दर्शन घ्यावे व त्याचे अलौकिक बोधामृत सेवन करावे, असा विचार मनात आणिला आणि आपले अष्टप्रधान व इतर लवाजमा बरोबर घेऊन तो लोहगावी आला. तेथे येऊन पोहोचल्यावर वस्त्रे, अलंकार व पूजेचे साहित्य घेऊन तो आपल्या प्रधानांसह वर्तमान तुकारामाच्या दर्शनास आला. राजाने आणि प्रधानांनी त्याला साष्टांग दंडवत घालून बहुमोल वस्त्रे व अलंकार आणि सोन्याच्या नाण्यांनी भरलेले ताट पुढे ठेविले; या वेळी राजाने स्वत: आपल्या हाताने तुकारामाच्या कपाळास बुका लावून गळ्यात तुळशीच्या व फुलांच्या माळा घातल्या. ते द्रव्य राजाने आपल्या पुढे ठेविलेले पाहून तुकारामास फारच वाईट वाटले आणि त्यावेळी त्याने सात अभंग म्हणून तो नजराणा आपण स्वीकारीत नाही असे सांगितले. ते सात अभंग हे :

*जाणोनी अंतरा । टाळिसील करकर ।।१।।*
*तुज लागी हे खोडी । पांडुरंगा बहु कुडी ।।२।।*
*उठविसी दारी । धरणे एखादिया परी ।।३।।*
*तुका म्हणे पाय । कैसे सोडीन तें पाहे ।।४।।*

*नाहीं विचारीत । मेघ हागणदारी सेत ॥१॥*
*नये पाहो त्याचा अंत । ठेवीं कारणापें चित्त ॥२॥*
*वर्जीत गंगा । नाहीं उत्तम अधम जगा ॥३॥*
*तुका म्हणे मळ । नाही अग्नीसी विटाळ ॥४॥*

*काय दिला ठेवा । आम्हां विठ्ठलचि व्हावा ॥१॥*
*तुम्ही कळलेती उदार । साटीं परिसाची गार ॥२॥*
*जीव दिला तरी । वचना माझ्या नये सरी ॥३॥*
*तुका म्हणे धन । आम्हां गोमांसासमान ॥४॥*

*पिकवावे धन । ज्याची आस करी जन ॥१॥*
*पुढें उरे खातां देतां । नव्हे खंडण मावितां ॥२॥*
*खोलीं पडे ओली बीज । तरीच हातीं लागे निज ॥३॥*
*तुका म्हणे धनी । विठ्ठल अक्षरें ही तिन्ही ॥४॥*

*मुंगी आणि राव । आम्हा सारखाचि जीव ॥१॥*
*गेला मोह आणि आशा । कळिकाळाचा हा फांसा ॥२॥*
*सोनें आणि माती । आम्हां समान हें चित्तें ॥३॥*
*तुका म्हणे आले । घरा वैकुंठ सगळें ॥४॥*

*तिहीं त्रिभुवनीं । आम्ही वैभवाचे धनी ॥१॥*
*हातां आले घाव डाव । आमचा मायबाप देव ॥२॥*
*काय त्रिभुवनी बळ । अंगीं आमुच्या सकळ ॥३॥*
*तुका म्हणे सत्ता । अवघी आमुचीच आतां ॥४॥*

*आम्ही तेणें सुखी । म्हणा विठ्ठल विठ्ठल मुखीं ॥१॥*
*तुमचें येर वित्त धन । तें मज मृत्तिकेसमान ॥२॥*
*कंठीं मिरवा तुळसी । व्रत करा एकादशी ॥३॥*
*म्हणवा हरीचे दास । तुका म्हणे मज हे आस ॥४॥*

हे अभंग काहीएक भीड न ठेवता आपणास संबोधून बोललेले ऐकून शिवाजी राजाची चित्तवृत्ती कशी झाली असावी याची कल्पना सहजी होण्यासारखी आहे. प्रत्यक्ष राजा आपल्या अष्टप्रधानांसह दर्शनास येऊन मोठ्या प्रेमभावाने व निष्कपट भक्तीने बहुमोल नजराणा त्याने आपल्या हाताने पुढे ठेविला असता, त्याला तो मुळीच भुलला नाही. एवढ्या भूपतीने आपल्या भेटीस येऊन आपल्या हाताने आपली

पूजा केली असता, त्यास अशी नि:स्पृहतेची उत्तरे करावी आणि जो भक्तिमार्ग आपण स्वीकारला आहे त्याचा अंगीकार करण्याविषयी त्यास उपदेश करावा? हे काही लहानसान धैर्य नव्हे. यात त्याचा दृढनिश्चय, अढळ वैराग्य, अमर्याद आत्मसंयमन व अप्रतिम नि:स्पृहता ही पूर्णपणे दिसून आली. शिवाजी राजास कदाचित असे वाटले असावे की, आपण प्रत्यक्ष एवढ्या लवाजम्यानिशी त्याच्या दर्शनास गेलो असतो, त्याच्या नि:स्पृहीपणात थोडाबहुत फरक पडून तो आपणास भाळेल; परंतु तुकारामास राव व रंक, मान व अपमान, सोने व माती ही समान वाटत असल्यामुळे त्याच्या वृत्तीत अशाने बदल होण्यासारखा नव्हता. त्याची ती कडकडीत वैराग्यवृत्ती पाहून शिवाजीस मोठे नवल वाटले आणि तो मोठ्या मनाचा राजा त्याच्यावर मुळीच रुष्ट न होता उलटा त्याच्यावरील त्याचा भाव अधिकच दृढ झाला. मग त्याने त्याच्यापुढे ठेवलेला नजराणा ब्राह्मणास वाटून दिला व त्या रात्री एकाच्या घरी त्याचे कीर्तन व्हावयाचे होते ते ऐकण्याच्या हेतूने त्याने आपल्या लवाजम्यानिशी लोहगावी मुक्काम केला. ठरल्याप्रमाणे शिवाजी कीर्तनास येऊन बसल्यावर कीर्तनास आरंभ झाला. पहिल्याने मंगलाचरणच अशा थाटाने सुरू झाले की, ते पाहून व ऐकून राजा अगदी चकित होऊन गेला. कीर्तनास बसलेल्या भाविक लोकांची चित्ते प्रेमभराने उचंबळून जो तो देहभान विसरून टाळ्याचुटक्या वाजवीत व मुखाने विठ्ठलनामोच्चारण करीत नाचू लागला. असा अद्भुत भक्तिरस राजाने पूर्वी कधीही अवलोकन केला नव्हता. पुढे प्रतिपादन सुरू झाले. त्यात तुकारामाने वैराग्यवृत्तीचे महत्त्व व लक्षण वर्णन करून विठ्ठलावाचून या विश्वामध्ये दुसरे काहीच थोर नाही, आपल्या जीविताचे सार्थक्य ज्यास करावयाचे असेल त्याने विठ्ठलभक्तीचा सोपा मार्ग स्वीकारावा, असा अनेक दाखले देऊन व मधूनमधून तात्कालिक स्फूर्तीने प्रासादिक अभंग म्हणून श्रोत्यांस बोध केला. ऐहिक वैभवाची व ऐश्वर्याची आस्थिरता, सुखविषयांची अनर्था, वहता व जीविताची क्षणभंगुरता श्रोतृवृंदांच्या मनात पूर्णपणे ठसण्यासारखा त्याचा तो बोध ऐकून राजाच्या चित्तवृत्तीत विलक्षण फरक झाला. तो मूळचाच भाविक व सुवृत्त असल्यामुळे तुकारामाचे ते बोधामृतप्रचुर वक्तृत्व ऐकून त्याची चित्तवृत्ती तल्लीन झाली आणि त्याचा उपदेश खरा कैवल्यप्रद आहे अशी त्याच्या प्रेमळ व ऋजू अंत:करणाची तत्काळ खात्री झाली.

कीर्तन आटोपल्यावर राजा तुकारामाचा निरोप घेऊन आपल्या मुक्कामास गेला व तेथून उठून रानात एकांती जाऊन बसला आणि तुकारामाच्या बोधाचे मनन करू लागला. त्याचे प्रधान त्याच्याकडे येऊन ही अशी उपरती आपणास झाली हे चांगले

नव्हे असा त्याशी बुद्धिवाद करू लागले; पण त्याने त्यास असे निक्षून सांगितले की, तुम्ही कोणी माझ्याकडे येऊ नका. तुम्हाला वाटेल तशी माझ्या राज्याची व्यवस्था करा. मला त्यात इत:पर मुळीच मन घालणे नाही. आयुष्य क्षणभंगुर आहे. ते केव्हा संपेल याचा नेम नाही, यास्तव जोपर्यंत मी हयात आहे तोपर्यंत माझ्या जन्माचे सार्थक्य मला केले पाहिजे. राज्यादी ऐहिक जंजाळाच्या पाठीस लागून मी मोक्षसुखास अंतरावे हे मला मुळीच चांगले वाटत नाही. याप्रमाणे राजाचे भाषण ऐकून प्रधानमंडळीस मोठी चिंता उत्पन्न झाली आणि त्यांनी ही सगळी हकीकत राजाची मातुश्री जिजाबाई हीस लिहून कळविली. तिच्या कानी ही आपल्या पुत्राची वार्ता पडताच ती अत्यंत शोकाकुल झाली आणि शिबिकेत बसून लगबगीने लोहगावास आली. तेथे येताच आधी तुकारामाचे दर्शने घेऊन तिने त्याला हात जोडून व पदर पसरून अशी विनंती केली की, स्वामीमहाराज शिवाजी हा माझ्या पोटी एकुलता एक मुलगा आहे. तो आपले कीर्तन ऐकून विरक्त झाला आणि राज्य सोडून वनात जाऊन बसला. आता त्याने संपादलेले राज्य कोण संभाळील बरे! ते पुन्हा यवनांच्या हाती जाऊन गरीब हिंदू प्रजेस त्या विधर्मीयांचा जाच पुनरपि सोसावा लागेल. बरे शिवाजीच्या पोटी पुत्रसंतान असते तर मला एवढा खेद वाटला नसता; पण तेही नाही. तेव्हा आता माझ्या कुळाचा क्षय होणार आहे. याकडे स्वामींनी काहीतरी नजर पुरवून त्यास राज्य न सोडण्याविषयी बोध करावा. हे तिचे नम्रपणाचे व विनयाचे भाषण ऐकून तुकारामाने तिचे आश्वासन केले आणि सांगितले की, शिवाजी नेहमीप्रमाणे आज रात्री कीर्तनास येईल. त्या वेळी मी त्याला चार गोष्टी सांगून त्याचे मन पुन्हा संसाराकडे लागेसे करितो; परंतु तू मात्र आजपासून विठ्ठलाची भक्ती करावी आणि त्यानेही देवास कधी विसरू नये.

ह्याप्रमाणे तजवीज करून जिजाबाई रात्री तुकारामाच्या कीर्तनास येऊन बसली. इकडे शिवाजीही नित्यनियमाप्रमाणे कीर्तनाला आला. या प्रसंगी त्याने कर्मकांडाचे प्रयोजन काय आहे ते सांगून, ज्याने त्याने आपापल्या धर्माप्रमाणे वर्तन करावे, यातच खरे श्रेय आहे असे प्रतिपादन केले. हरिभक्तीसाठी संसाराचा त्याग करून रानावनात जाऊ बसण्याचे काहीएक कारण नाही. जनांत राहून आपला संसार नेकीने व माणुसकीने चालवून आपल्या बांधवांच्या सुखात स्वशक्त्यनुसार भर घालण्यास अहर्निश झटावे, यातच खरा मर्दपणा आहे. आपल्या सभोवतालील जनांची सर्व प्रकारे वाईट स्थिती प्रतिक्षणी दृष्टीस पडत असता, ती सुधारण्याविषयी आपल्याकडून होईल तेवढी खटपट करणे हे आपले परम कर्तव्य आहे, असे असता अशा विपन्न जनाचा त्याग करून

केवळ स्वमोक्षासाठी गिरिकुहरात जाऊन बसण्यात मुळीच पुरुषार्थ नाही आणि स्वजनकल्याणहेतूने संसारात राहावयाचे म्हटले म्हणजे गृहस्थाश्रमासारखा दुसरा आश्रम मनुष्यास हितप्रद होणे नाही. जगात कंटाळून, बायकामुलांचा त्याग करून व अंगास राख फासून जे विरक्त होतात, त्यांच्या हातून आपल्या एकंदर इंद्रियांचे दमन न होऊन ते पुन्हा पुन्हा मोहवश होतात आणि जनांच्या अधिक्षेपास पात्र होतात. अशा विटंबना पावणाऱ्या मनुष्यास कोणीच मानिनासा होतो व तो खऱ्या मोक्षसुखासही आंचवतो. तेव्हा तात्पर्य काय की, गृहस्थाश्रमाचा त्याग करून गोसावी बनून, इकडे तिकडे फिरत राहण्यापेक्षा संसारात राहून नीतीने वागावे व परोपकार आणि हरिभक्ती करण्यात आयुष्य घालवावे हे विशेष चांगले. याप्रमाणे सर्वसाधारण बोध करून तुकारामाने राजाच्या कर्तव्याविषयी थोडेसे विवेचन केले. त्यात त्याने असे दाखवून दिले की, राजा जर सदाचारी व प्रजापालनदक्ष असला तर त्याच्या हातून लोककल्याण पुष्कळ होण्यासारखे असते. पुराणांतरी वर्णिलेल्या अंबरिष, जनक, धर्म इत्यादी राजर्षीची उदाहरणे देऊन त्याने असे सिद्ध केले की, हरिभक्ती व सद्वर्तन साध्य करण्यासाठी राजानेसुद्धा स्वराज्यत्याग करण्याची गरज नाही. हा असा अनेक दृष्टांत देऊन मोठ्या कळवळ्याने केलेला सद्‌बोध शिवाजी राजाने ऐकला तेव्हा त्याची वृत्ती अगदी तटस्थ होऊन गेली. त्याने केलेला एकंदर बोध सत्य असून तदनुसार वागण्यातच खरे हित आहे असा राजाच्या बुद्धीचा निर्धार झाला आणि मग तुकारामाच्या आणि आपल्या आईच्या पायांवर मस्तक ठेवून तो आपल्या गावी परत गेला व आपला स्वराज्यसंपादनाचा स्तुत्य क्रम त्याने पुनरपि चालविला.

या एका गोष्टीवरून तुकारामाच्या अंगी वाक्सामर्थ्य किती अप्रतिम होते व त्याची जनास बोध करण्याची शैली किती उत्कृष्ट होती ते पूर्णपणे ध्यानात येते. अशाप्रकारे श्रोतृजनांची चित्तवृत्ती पाहिजे तेव्हा मनास वाटेल तशी पालटण्याचे सामर्थ्य ज्या महापुरुषाच्या अंगी असते. त्याच्या हातून अपरिमित जनहित होण्यासारखे असते हे उघड आहे. स्वत:चे आचरण अत्यंत शुद्ध प्रकारचे राखून जनास बोध करण्याचे असे अलौकिक सामर्थ्य ज्याच्या अंगी असते त्यास जगद्गुरू म्हणण्यास काहीएक हरकत नाही. पुन्हा तुकारामाच्या अंगी दुसरा असा अलोकसामान्य गुण होता की, त्यास आपला शिष्य परिवार वाटावा अशी इच्छा मुळीच नव्हती. ती त्याच्याठायी यत्किंचित तरी असती त्याने शिवाजी राजा आपण होऊन त्याच्यापाशी आला असता, त्यास त्याने 'सद्गुरु रामदासाचे भूषण । तेथे घाली मन चळों नको' ।। असा नि:स्पृहतेचा उपदेश त्याला केला नसता.

ह्याप्रमाणे शिवाजी राजाच्या मनात तुकारामाविषयी पूज्यबुद्धी उत्पन्न होऊन हरिभक्तीकडे त्याच्या मनाचा ओढा विशेष झाल्या दिवसापासून तुकारामाचे कीर्तन ऐकण्याची संधी मिळाल्यास तो ती व्यर्थ दवडीत नसे. एके समयी तुकारामास कोणी भाविक लोकांनी पुण्यास आणून त्याची कीर्तने घरोघर करविण्याचा क्रम आरंभिला. यावेळी शिवाजी सिंहगडावर होता. त्याला हे वर्तमान कळल्यावरून तो नेहमी रात्रीचा गडावरून पुण्यास कीर्तन ऐकावयास येऊ लागला. तो रात्रीचा गावात येतो, असे यवनास कळताच ते त्याच्या पाळतीवर राहिले. एके दिवशी एका वाण्याच्या घरी कीर्तन असून शिवाजी ते ऐकावयास येणार आहे, अशी बित्तमबातमी चाकणच्या किल्ल्यावरील यवनांस कळताच त्यांनी दोन हजार पठाण शिवाजीस धरून आणण्याकरिता त्या ठिकाणी पाठविले. त्यांनी त्या वाण्याच्या घरास वेढा दिला. त्यांनी शिवाजीस पूर्वी कधीही पाहिले नसल्यामुळे कीर्तनातील एकंदर लोकास पकडून नेण्याचा विचार केला. इकडे कीर्तन ऐकावयास बसलेले लोक अगदी घाबरून जाऊन गलबला करू लागले. तुकारामाने गडबड कशाची म्हणून विचारता लोकांनी त्यास ते संकट निवेदन केले आणि म्हटले की, शिवाजी महाराजास येथून पळविण्याची आज्ञा व्हावी. तेव्हा तुकाराम त्यास म्हणाला की, कीर्तन चालले असता मध्येच उठून जाऊ नये, असे आहे. त्यात आणखी आज एकादशी आहे. तर अशा समयास आपणासर्वास मरण आले तर आमचे मोठे भाग्यच समजावे. विठ्ठलाच्या भक्तीत गुंतले असता मरण आले तर कैवल्यप्राप्ती होऊन जन्ममरणाची येरझारा चुकेल. यासाठी येथून कोणीही निघून जाऊ नये. असे म्हणून त्याने विठ्ठलनामाचा गजर करून देवाचा परम सद्‌गदित अंत:करणाने धावा चालविला. इकडे शिवाजीराजाही कीर्तनातून उठून न जाण्याचा निर्धार करून जागच्या जागी बसून राहिला? तेव्हा त्याच्या परिवारापैकी एका इमानी नोकराने आपल्या धन्यावर व कीर्तनास बसलेल्या एकंदर लोकांवर आलेल्या संकटाचे निवारण करण्याची अशी युक्ती योजली की, तो राजाचा शिरपेच वगैरे पोशाख चढवून एका घोड्यावर बसून यवनास दिसे अशा रीतीने तेथून निसटून गेला. त्याला असा हळूच भरधाव घोडा टाकून पळून जाताना पाहून यवनाला वाटले की, हा शिवाजीच पळून जात आहे. म्हणून त्यांनीही आपले घोडे त्याच्या मागोमाग भरधाव सोडले. ती चांदणीरात्र असल्यामुळे तो मराठा स्वार जिकडे पळत गेला त्या दिशेने त्यांनी त्याचा पुष्कळ वेळपर्यंत पाठलाग केला; परंतु तो काही केल्या हाती लागेना. शेवटी चंद्र अस्तास जाऊन चोहोकडे काळोख पडला. इतक्यात तो स्वारही कोठे आडवाटेने निसटून पार निघून गेला. पठाणाच्या घोड्यास पुढे मार्ग सापडेना. इतक्यात मोठे हीव सुटून त्यांची अगदी तारंबळ उडाली.

इकडे वाड्यास वेडा घालणारे सर्व पठाण निघून गेल्यावर श्रोते मंडळींची मने स्वस्थ होऊन ते देवाचा जयजयकार करू लागले आणि कीर्तन आटोपल्यावर सर्वजण निर्धास्तपणे आपापल्या घरी गेले. शिवाजीही तुकारामाचा निरोप घेऊन आपल्या परिवारासह सिंहगडावर निघून गेला. हे अरिष्ट देवाने शिवाजीचे रूप धारण करून येऊन, त्या पठाणास आपल्यामागे धावावयास लावून निवारण केले, असा भाविक लोकांचा त्या वेळी समज झाला आणि महिपतीने तुकारामचरित्रात व मल्हारराव चिटणिसाने शिवाजीच्या बखरीत ह्याच समजुतीप्रमाणे सदरील गोष्ट सांगितली आहे; परंतु आपल्या धन्याचा जीव वाचविण्यासाठी आपले स्वत:चे प्राण संकटांत घालून एकादे साहस करण्यास तयार होणाऱ्या स्वामिभक्त शूर पुरुषांची कमताई त्या काळी मुळीच नव्हती. असे पुरुष शिवराजाच्या पदरी होते म्हणूनच त्याला यवनांच्या हातचा मुलूख हिसकावून घेऊन स्वराज्यस्थापना करिता आली. असो.

ह्याप्रमाणे यवनांच्या अगदी तावडीत सापडलो असता आपला बचाव मोठ्या विलक्षण रीतीने झाला असे पाहून शिवाजीची तुकारामावर अधिकच श्रद्धा बसली. पुढे तुकारामाचे देहावसान होईपर्यंत तो त्याचे कीर्तन संधी सापडे तेव्हा ऐकत असे. अशा विरक्त साधुपुरुषांचे आपण उतराई कसे व्हावे हा विचार त्याच्या मनात नेहमी येई. त्याला काही द्रव्य द्यावयास नेल्यास तो त्याचा निक्षून अव्हेर करितो, हे त्यास स्वानुभवावरून चांगले ठाऊक होते. तरी एके वेळी त्याचा देहू गावाजवळ मुक्काम असता त्याने अशी युक्ती केली की, एका बैलावर दोन मण धान्याची गोणी घालून व स्वत: गरीब मनुष्याचा वेश धारण करून त्याने संध्याकाळच्या सुमारास तो बैल तुकारामाच्या घरापाशी हाकून आणला. त्या वेळी तुकाराम हातात स्मरणी घेऊन आपल्या घरासमोरील वृंदावनात नामस्मरण करीत बसला होता. त्याला हा वेशधारी पुरुष म्हणाला की, स्वामीमहाराज हे धान्य मी स्वकष्टाने मिळवून आपल्यासाठी आणले आहे. तरी आपण हे घेऊन आपल्या घरी साठवून ठेवावे, एवढेच या दासाचे आपल्या पायापाशी मागणे आहे. असे म्हणून त्याने ती बैलाच्या पाठीवरील गोणी त्याच्या अंगणात लोटून व तुकारामाच्या पायावर मस्तक ठेवून तेथून लागलीच निघून गेला. तुकारामाने त्याच्या तोंडाकडे पाहताच त्याला ओळखले; परंतु त्या वेळी त्यास ओळख दिल्यास त्याच्या प्रेमाचा भंग होईल, असे मनात आणून तो उगीच बसला. तो ते धान्य तेथे ठेवून गेल्यावर तुकारामाने अवलीस हाक मारून म्हटले की, हे धान्य शिवाजी राजाने येथे आणून ठेवले आहे; तरी यातून आजच्या दिवसापुरते घेऊन बाकीचे ब्राह्मणास वाटून दे. आपण हे सगळे धान्य घेतल्यास आपले सुकृत नष्ट

होईल. हे त्याचे शब्द ऐकून अवलीस फार राग आला आणि ती आपल्या कपाळावर हात मारून घेऊन म्हणू लागली की, याला ही काय अवदशा आठवली आहे न कळे. घरी अवचित धान्याची गोणी आली असून ती पोरे उपाशी मरताहेत त्यास खाऊ देण्याचे सोडून हा ती ब्राह्मणास वाटून दे म्हणून सांगतो. याला म्हणावे तरी काय? तरी नवऱ्याच्या आज्ञेप्रमाणे त्या साध्वीने ते धान्य निरुपायास्तव ब्राह्मणास वाटून दिले!

याप्रमाणे शिवाजी राजाच्या चित्तात तुकारामाविषयी आदरबुद्धी उत्पन्न होऊन तो त्याची महासाधूत गणना करू लागला; तरी त्याची रामदासावरची श्रद्धा मुळीच कमी झाली नव्हती. हा रामदासही त्या काळी एक मोठा देवभक्त होता. तो मोठा विरक्त असून एका रामावाचून सर्व देवता त्याला तुच्छ वाटत असत. पंढरीच्या वारकऱ्यांनी त्याला पंढरीस विठोबाच्या दर्शनास बोलाविले असता तो म्हणे की, माझा राम सर्वत्र आहे. मला पंढरीस येण्याची आवश्यकता वाटत नाही; परंतु एके प्रसंगी तुकारामाच्या एका अनुयायाने त्यास अनेक प्रकारे विनवणी करून पंढरीस आणले. त्या वेळी तेथले ते देवस्थान पाहून व गावोगावच्या जमलेल्या मोठमोठ्या संतांची भक्ती पाहून तो केवळ चकित झाला. त्यांची भजने, कीर्तने, गोपाळकाले वगैरे प्रेमळ भक्तीचे प्रकार पाहून त्याचे चित्त अगदी तल्लीन झाले. त्याचप्रमाणे तेथे जमलेले निरनिराळे संत परस्परजातिप्रकरणी वगैरे भिन्नत्व मुळीच मनास न आणिता परस्परांस समानबंधुत्वाच्या नात्याने आदरपूर्वक नमन करिताना व प्रेमभावाने आलिंगने देताना पाहून त्याच्या मनात स्वजातीच्या उच्चत्वाची वगैरे थोडीशी आढ्यता होती ती समूळ नष्ट होऊन त्याचे मन विकास व सुप्रसन्नता पावले. याप्रमाणे रामदासाच्या अंगी खरी निरभिमानता बाणून तो पंढरीच्या वारकऱ्यांची भजने व कीर्तने ऐकण्यासाठी सगळा उत्सव संपेपर्यंत तेथे राहिला. एकादशीच्या दिवशी वाळवंटावर निरनिराळ्या संतांनी कीर्तने केली ती ऐकण्यासाठी तो गेला असता, तेथे प्रथमत: तुकारामाचे दर्शन त्यास झाले. तेथे तुकारामाचे कीर्तन चालले असून हजारो यात्रेकरू ते श्रवण करण्यास बसले होते. त्यात रामदासही जाऊन बसला. त्या समयी त्याचे ते अप्रतिम वक्तृत्व व आबालवृद्धास समजेल अशा रीतीचा बोध करण्याची अलौकिक शैली पाहून रामदास अगदी थक्क होऊन गेला आणि त्याच्या कीर्तनश्रवणाने श्रोतृजनांच्या हृदयात भक्तिरसाचे कल्लोळ उसळून ते देहभान विसरून प्रेमभराने टाळ्या, चुटक्या वाजवून दीर्घस्वराने नामोच्चरण करू लागले, तेव्हा तर रामदास केवळ विदेही होऊन राहिला. याप्रमाणे तीन प्रहर रात्र उलटेपर्यंत कीर्तन चालले होते. तरी श्रोतेमंडळींपैकी कोणीही हलला नाही किंवा कोणास क्षणभरसुद्धा डुलकी आली नाही. हा त्या महासाधूचा अपूर्व वाक्प्रभाव पाहून रामदासाच्या मनात त्याच्याविषयी आदरबुद्धी उत्पन्न झाली आणि त्याच्या कीर्तन

श्रवणाचा अमूल्य लाभ ज्यास नेहमी होत असेल ते धन्य पुरुष होत, असे तो म्हणू लागला. येणेप्रमाणे रामदासाच्या चित्तात पंढरीच्या देवस्थानाचे माहात्म्य पूर्णपणे बिंबून तुकारामसाधूविषयी त्याच्या मनात पूज्यताबुद्धी उत्पन्न झाली. असे सांगतात की, तुकारामाचे कीर्तन झाले त्याच्या दुसऱ्या दिवशी काही संतमंडळीच्या आग्रहावरून रामदासानेही पंढरीस कीर्तन केले. ते ऐकण्यास तेथले मोठमोठे वैदिक ब्राह्मण जमले होते; पण तुकारामाचे कीर्तन ज्यास ऐकावयास मिळत असे त्यास ते अगदी फिके वाटले. रामदास मोठा बुद्धिवान व विचारी असल्यामुळे त्याने वेदांतमताचा ऊहापोह उत्कृष्ट प्रकारे केला; पण जो भक्तिरस तुकारामाच्या कीर्तनात उचंबळत असे तसा त्यात काहीएक उत्पन्न झाला नाही, असो.

पुढे पुन्हा एक वेळ रामदास आपल्या शिष्यमंडळींसह पंढरीस गेला. या वेळी त्याच्याबरोबर शिवाजीराजाही गेला होता. देवदर्शन घेतल्यावर वाळवंटात तुकारामाचे कीर्तन चालले होते ते ऐकण्यासाठी सगळे तिकडे गेले. रामदासास पाहून सगळी संतमंडळी त्यास भेटण्यास उभी राहिली. परस्पर आलिंगने व नमने झाल्यावर रामदास तुकारामाचे कीर्तन ऐकावयास बसला. तुकारामानेही इतरांबरोबर त्यास साष्टांग दंडवत घालून प्रेमाने आलिंगन दिले. इतक्यात शिवाजीराजाही त्याचे कीर्तन ऐकण्यासाठी तेथे आला आणि सर्व साधुसंतांस नमस्कार करून आपल्या प्रधानादी परिवारासह कीर्तनास बसला. कीर्तनास नेहमीप्रमाणे रंग येऊन सर्व श्रोतृवृंद केवळ विदेही झाला. या वेळी त्याने पुढील अभंग म्हटले असे महिपती संतविजयात लिहितो:-

*उजळले भाग्य आतां । अवघी चिंता वारली ।।१।।*
*संतदर्शने हा लाभ । पद्मनाभ जोडला ।।२।।*
*संपुष्ट हे हृदयपेटी । करूनि पोटीं साठवूं ।।३।।*
*तुका म्हणे होता ठेवा । तो या भावा सांपडला ।।४।।*

*करू ऐसें पाठांतर । करुणापर भाषणें ।।१।।*
*जिंहीं केला मूर्तिमंत । ऐसा संतप्रसाद ।।२।।*
*सोज्वळ केला पाठ । आइत्या निटा मागिल्या ।।३।।*
*तुका म्हणे घेऊं धांवा । करो हावा ते जोडी ।।४।।*

*पृथक मी सांगूं किती । धर्म नीति सकळां ।।१।।*
*अवघियांचा एक ठाव । शुद्ध भाव विठ्ठलीं ।।२।।*
*क्षराक्षरांचा भाग । करा लाग पंढरी ।।३।।*
*तुका म्हणे आगमींचे । मथिलें साचें नवनीत ।।४।।*

*अंतरींचें बीज प्रकाशलें ज्योति । मुळींची जे ज्योति आच्छादिली ।।१।।*
*तेणें हा आनंद आनंदीं नसमाये । उपमा यासी काय देऊं सुखा ।।२।।*
*भावाचें बोलिले निर्गुण संचलें । तें हें उभें केले विटेवरी ।।३।।*
*तुका म्हणे आम्हा विसावा पंढरीं । प्रेमाची हे थोरी साठवण ।।४।।*

रामदासाने त्याचे ते अप्रतिम कीर्तन ऐकून सभोवतालच्या मंडळीस म्हटले की, आज मी तुकारामाचे कीर्तन ऐकून धन्य झालो आणि याप्रमाणे प्रेमभरित चित्तवृत्ती झाली असता रामदासाचे पुढीलप्रमाणे ह्रदयोद्गार निघाले आहेत:-

*सुखे वाढिती ते मुखे संतसाधू । असंभाव्य हा ज्ञानबोधू अगाधू ।।*
*रुची भोजनाची मिठी प्राप्त झाली ।। भले जेविती वृत्ति त्यांची मुराली ।।१।।*
*कितीएक ते स्वाद नाना प्रकारें ।। महा योग्यते जेविती श्रोत्रद्वारें ।।*
*मनामाजि संतोष तो भोजनाचा ।। गळाल्या महा मौनचत्वारिवाचा ।।२।।*
*कितीएक ती सारिलीं स्थूळ भक्षें ।। बहुता परीची बहूतीं सळक्षे ।।*
*बरा वेळिला भात तो सुक्षमेचा ।। सुवासेच भावीतसे साधनाचा ।।३।।*
*बहु वृत्तिच्या कितीएक शाखा ।। कितीएक मंत्रावळी लोणशाखा ।।*
*वरान्ने भिरी वाढिल्या कामनेच्या कितीएक तीर्थावळी रायत्याच्या ।।४।।*
*रुचीची कढी सद्यद्ध्योदने ते ।। सुवासे जळे निर्मळें घेति स्वांते ।।*
*अशा भोजने पालटे सर्व काया ।। म्हणे दास कल्याण हे रामराय ।।५।।*

दुसरे दिवशी रामदासाने संतांच्या आग्रहावरून कीर्तन केले. या प्रसंगी त्याने भक्तिमाहात्म्याचे वर्णन मोठे सरस करून श्रोतृसमुदायास अगदी थक्क करून सोडले असे म्हणतात. द्वादशीच्या दिवशी शिवाजीराजाने विठोबाची महापूजा करून पुष्कळ ब्राह्मणास भोजन घातले. नंतर तिसरे प्रहरी पुराणास सुरुवात झाली. हे पुराण रामदासाची शिष्य आकाबाई हिने वाचले असे म्हणतात. पुराणाची पोथी रामदासकृत दासबोध होता. त्यातील एक एक ओवी आकाबाई वाची आणि तिचे स्पष्टीकरण रामदास करी आणि मधून मधून संतमंडळी शंका काढी त्यांचे समाधान तो करीत असे. या श्रवण करणारामध्ये तुकारामही होता. असो. तर याप्रमाणे पुन्हा एक वेळ पंढरीचे माहात्म्य डोळे भरून पाहून व तुकारामांचे कीर्तन ऐकून रामदास आणि शिवाजीराजा हे स्वस्थानी गेले.

ह्याप्रमाणे तुकारामांचा रामदासांशी दृढ परिचय झाल्यावर रामदासाने रामनवमीचा उत्सव मोठ्या थाटाचा केला, तेव्हा इतर संतमंडळींबरोबर त्याने तुकारामासही आमंत्रण पाठविले. त्याप्रमाणे तुकारामाने त्या उत्सवास जाऊन रामदासाच्या आग्रहास्तव तेथे एक दिवस कीर्तनही केले.

यानंतरचा त्यांच्या मुलाखतीचा प्रसंग म्हटला म्हणजे शिवाजीराजाने परळीच्या गडावर एक मोठा राममठ बांधून रामदासास तेथे आग्रह करून नेल्यानंतरचा होय. राजाने या समयी येथे सव्वा लक्ष ब्राह्मणास भोजन घातले आणि महाराष्ट्रातील आसपासच्या सर्व संत मंडळीस बहुमानपूर्वक बोलावून आणून त्यांचा यथोचित आदरसत्कार व संभावना केली. इतर संतांबरोबर या वेळी तुकारामासही आमंत्रण गेले. राजाला तुकारामाचा विरक्त स्वभाव माहीत होता; तरी त्याने रामदासाच्या आग्रहावरून पुन्हा एकवार शिबिका व कारकून त्याला घेऊन येण्यासाठी पाठविले. कारकुनांनी तुकारामाकडे येऊन निरोप सांगितला की, परळीच्या गडावर राजाने मोठा मठ बांधून तेथे रामदासस्वामीस आणून ठेविले असून हल्ली त्या ठिकाणी मोठा संतमेळा जमावयाचा आहे, तरी आपणासही स्वामीचे बोलावणे आहे. हा निरोप ऐकताच तुकारामास परम संतोष वाटून तो तत्काळ परळीस जावयास निघाला. कारकुनांनी त्यास शिबिकेत बसण्याविषयी पुष्कळ विनंती केली, तरी तो तीत मुळीच बसला नाही. तो आणि त्याच्या जवळ नेहमी असणारे दुसरे चौदा वैष्णव चालतच परळीस गेले. तुकाराम येतो आहे अशी वर्दी राजास पोचताच तो त्याला सामोरा आला आणि त्याला साष्टांग दंडवत घालून व गळ्यात पुष्पहार घालून त्याच्या कपाळास त्याने बुका लाविला. गडावर आल्यावर त्याची आणि रामदासाची दृष्टादृष्ट होताच उभयतास मोठा आनंद वाटला आणि तुकारामाने दंडवत घालताच रामदास उठून त्याला मोठ्या प्रेमाने भेटला. या वेळी तुकारामाने एक अभंग म्हटला, तो हा :-

*देशावरासी आलों आतां ।। लाभ कोणता याहूनी ।।१।।*
*प्रेम चित्तीं आनंद झाला ।। जीव धाला दर्शनें ।।२।।*
*भाग्ये झाली संतभेट ।। आवड पोटीं दुणावे ।।३।।*
*तुका म्हणे श्रम केला ।। तितुका आला फळासी ।।४।।*

या उत्सवप्रसंगी राजाने मोठमोठ्या वैदिकास व पंडितास बोलावून आणले असून त्यांची मोठी सभा भरून तीत नानाप्रकारची ज्ञानचर्चा झाली असे म्हणतात. दिवसास भोजनसमारंभ होऊन ब्राह्मणास दक्षिणा वाटल्यावर रात्रीस कीर्तनाची तयारी केली. याप्रसंगी रामदासाच्या आज्ञेवरून खुद्द राजाने आपल्या पायात घुंगुर बांधून कीर्तन केले असे महिपती म्हणतो. राजाचे कीर्तन आटोपल्यावर रामदासाच्या दुसऱ्या कित्येक शिष्यांची कीर्तने झाली. नंतर दुसरे दिवशी पुन्हा तीन प्रहर दिवस उलटल्यावर कीर्तनास आरंभ होऊन कित्येक मोठमोठ्या संतांची कीर्तने झाली आणि शेवटी रात्रीच्या समयास तुकाराम रामदासाच्या आग्रहावरून कीर्तनास उभा राहिला. तेव्हा त्या उत्सवास

आलेले एकंदर लोक त्यांचे कीर्तन ऐकावयास जमा झाले. रामदास व शिवाजी यास परमानंद झाला आणि ते मोठ्या आवडीने त्यांचे कीर्तन ऐकू लागले. या प्रसंगाच्या तुकारामाच्या कीर्तनास अपूर्व रंग येऊन सर्व संत व पंडित तल्लीन होऊन गेले आणि तो अप्रतिम कीर्तनकार आहे अशी सर्वांची खात्री झाली. या वेळी तुकारामाने तात्कालिक स्फूर्तीने म्हटलेले पुष्कळ अभंग महिपतीने संतविजयात दिले आहेत. त्यापैकी सहा येथे देतो :-

*घोंटवीन लाळ ब्राह्मज्ञान्या हातीं ।। मुक्ता आत्मस्थिती सांडवीन ।।१।।*
*सांडवीन तपोनिधि अभिमान ।। यज्ञ आणि दान लाजवीन ।।२।।*
*ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनीं ।। भाग्ये तरी ऋणी देवा ऐसा ।।३।।*
*तीर्थभ्रमकाशी आणीन आळस ।। कडू स्वर्गवास करीन भोगें ।।४।।*
*धन्य म्हणवीन या लोकींच्या लोकां ।। भाग्ये आम्ही तुका देखियेला ।।५।।*

*सकळा लागोनी हेचि विनवणी ।। मस्तक चरणी ठेवीतसें ।।१।।*
*श्रोतेवक्ते तुम्ही सकळही जन ।। बरे पारखून बांधा गांठीं ।।२।।*
*फोडिले भांडार धन्याचा हा माल ।। मी येथें हा माल भारवाही ।।३।।*
*तुका म्हणे चाल झाली चहूंदेशी ।। निवडला कशी खरा माल ।।४।।*

*भावें गावें गीत । शुद्ध करूनियां चित्त ।।१।।*
*जरी तुज व्हावा देव । तरी हा सुलभ उपाव ।।२।।*
*करीं मस्तक ठेंगणा । लवें संतांच्या चरणां ।।३।।*
*आणिकाचे कानी । गुणदोष मना नाणी ।।४।।*
*वेंची तेंची ते वचन । जेणें राहे समाधान ।।५।।*
*तुका म्हणे फार । थोडातरी परउपकार ।।६।।*

*वैष्णवांची कीर्ती गाइली पुराणीं । साहीं अठरा जणी चहूं वेदीं ।।१।।*
*ऐसें कोणी दावा ग्रंथांचे वाचक ।। कर्मिष्ठ धार्मिक पुण्यशील ।।२।।*
*आदिनाथ शंकर नारद मुनीश्वर ।। शुका ऐसा थोर कोणी नाही ।।३।।*
*तुका म्हणे मुगुटमणी हरिभक्ति ।। आणिक विश्रांति आरतीया ।।४।।*

*विठ्ठल विठ्ठल चित्तीं ।। गोड लागे गातां गीती ।।१।।*
*आम्हा विठ्ठल जीवन ।। टाळ चिपोळिया धन ।।२।।*
*विठ्ठल विठ्ठल हे वाणी ।। अमृत संजीवनी ।।३।।*
*नित्य रंगाल पा रंगी ।। तुका विठ्ठल सर्वांगी ।।४।।*

*भाग्यवंत म्हणो तयां ।। शरण गेले पंढरिराया ।।१।।*
*तरले तरती हा भरवसा ।। नाम धारकाचा ठसा ।।२।।*
*भुक्तिमुक्तीचे हें स्थळ ।। भोळ्याभाविकां निर्मळ ।।३।।*
*ऐसें गाईलें पुराणी ।। तुका म्हणे वेदवाणी ।।४।।*

याप्रमाणे कीर्तन चालले असता मध्येच गागापंडित याने अशी शंका काढिली की; हरिकीर्तनाचा महिमा कोणत्या श्रुतीत वर्णिला आहे बरे? तुकाराम जातीचा शूद्र असल्यामुळे त्याला श्रुतीचे ज्ञान नाही. म्हणून हा काहीतरी बोलत आहे. याचे बोलणे सहसा सत्य नव्हे. या शंकेचे समाधान वामनपंडित याने पुढील श्लोक म्हणून केले असे महिपती म्हणतो:-

*वेदीही हरि कीर्तनींच महिमा केला असे आदरें ।।*
*कोठेंसा तरी विष्णुसूक्त अवघें शोधोनि पाहा बरें ।।*
*त्या मध्येंच तृतीय वर्गहि भवान् मित्रो असे त्या पहा ।।*
*त्यामध्यें तिसरी ऋचा तंव तमुस्तोर नामे पहा ।।१।।*
*जयाची वदे पूर्ण वेदांत वाणी ।। म्हणावे कसे हो तया लागीं वाणी ।।*
*परब्रह्मरूपी असा हा तुकावा ।। तयाचे तुकी कोण ऐसा तुकावा ।।२।।*

हे वामनपंडिताचे वचन ऐकून गागापंडित कुंठित झाला. तरी तो आणखी म्हणाला की, ही सारी मंदजनांची सभा आहे. हीत सगळ्यांचे मत एकच असावयाचे. यावर तुकारामाने पुढील अभंग म्हटला:-

*शास्त्रांचे जे सार वेदाची हे मूर्ति ।। तो माझा सांगाती प्राणसखा ।।१।।*
*म्हणवोनि नाही आणिकाचा पांग ।। सर्व झाले सांग नामें एका ।।२।।*
*सगुण निर्गुण हीं जयाचीं अंगे ।। तोचि आम्हासंगे क्रीडा करी ।।३।।*
*तुका म्हणे आम्ही विधीचे जनिते ।। स्वयंभ आयिते केले नोहे ।।४।।*

याप्रमाणे गागापंडिताने शंका काढल्यामुळे कीर्तनात थोडासा विरस झाला. तरी तुकारामाने सदरील अभंग म्हणून आपले विवेचन पुढे चालविले आणि त्या प्रतिरोधाचे परिमार्जन होऊन श्रोतृजनांची चित्तवृत्ती पुन्हा भक्तिपरायण व्हावी म्हणून त्याने आपले रसभरित व प्रेमळ वाक्सामर्थ्य इतके उत्तम प्रकारे प्रकट केले की, सर्वांच्या हृदयातला विक्षेप विगलित होऊन तेथे बसलेल्या वैदिक व कर्मठ ब्राह्मणांच्या नेत्रातूनसुद्धा प्रेमाश्रुधारा वाहू लागल्या. याप्रमाणे बोलता बोलता तुकारामास प्रेमाचे इतके भरते आले की, त्याचा कंठ अगदी सद्गदित होऊन त्याच्या तोंडावाटे एक शब्दही निघेना.

अशी त्याची स्थिती होऊन गेली; तेव्हा तो नुसता टाळ्या वाजवून नाचू लागला. ही त्याची स्थिती पाहून रामदास, शिवाजी व इतर संतमहंत हेही प्रेमभरात येऊन नाचू लागले. राजाचे प्रधान व इतर सेवकजन आणि एकंदर वैदिक ब्राह्मण व पंडित टाळ्या वाजवून नाचू लागले. फार तर काय; पण राजाच्या पदरचे जे मुसलमान नोकर तेथे हजर होते त्यांच्यासुद्धा मनावर तुकारामाच्या बोधाचा ठसा उमटून तेही नाचू लागले. याप्रमाणे काही वेळपर्यंत झाल्यावर शेवटी तुकारामाने आपल्या कीर्तनाचा समारोप करून संतजनास दंडवत घातला. त्यासरशी रामदासाने उठून त्यास मोठ्या प्रेमाने आलिंगन दिले. नंतर रीतीप्रमाणे खिरापती वाटल्यावर जमलेले लोक तुकारामाचा जयजयकार करीत आपापल्या स्थानी गेले.

दुसरे दिवशी पुन्हा ब्राह्मणभोजने होऊन रात्रीस कीर्तन समारंभ झाला. या वेळी खुद्द रामदासाने कीर्तन केले. तेही चांगले झाले; परंतु त्याच्या वचनांत प्रसाद कमी असल्याकारणाने ती सामान्य जनास सहज कळण्यासारखी नसत. याप्रमाणे आपल्या कीर्तनास रंग येत नाही असे पाहून रामदासाने आपला असा अभिप्राय प्रकट केला की, माझ्यासारख्याने कीर्तन करून या समारंभाचा एकादा दिवस अडविण्यापेक्षा प्रतिदिवशी रात्री तुकोबांनीच कीर्तन करावे आणि आम्ही सर्वांनी बसून ते ऐकावे, यातच आपली आध्यात्मिक उन्नती होईल. हे समर्थांचे म्हणणे सर्वांस अत्यंत मान्य होऊन त्यांनी सर्वांनी मिळून तुकारामास दररोज कीर्तन करण्याविषयी विनंती केली व मग सुमारे एक महिना नित्य दिवसास ब्राह्मणभोजने आटोपल्यावर रात्रीस तुकारामाचे कीर्तन होत असे.

याप्रमाणे सव्वालक्ष ब्राह्मणांची भरती झाल्यावर राजाने तेथे जमलेल्या एकंदर संतमहंतांची संभावना केली. प्रत्येक साधूचे पाय आपल्या हाताने धुऊन त्यांची पूजा शिवाजीने केली व त्यास बहुमोल वस्त्रे देऊन त्यांची यथोचित बोळवण केली. ही अशी संत मंडळींची संभावना राजा करतो आहे असे पाहून तुकाराम कोणास न पुसता हळूच तेथून निघून गेला. तो गेला असे राजाला कळले तेव्हा तो फारच खंती झाला आणि रामदासाकडे जाऊन म्हणू लागला की, तुकारामबावांची काही तरी यथोचित संभावना करावी अशी मला फार दिवसांपासून इच्छा होती आणि तो प्रसंग आज प्राप्त झाला आहे असे मनात येऊन मला मोठा उल्हास वाटत होता. इतक्यांत तुकारामबावा कोठे नाहीतसेच झाले असे सेवकजन मला येऊन सांगू लागले. तेव्हा माझे मन अत्यंत निरुत्साह झाले आहे. मी त्याला देण्याकरिता चार गावांची सनदही लिहून ठेविली होती; पण हा माझा हेतू आज असिद्ध राहिला हे पाहून मला फारच वाईट वाटते. हे

राजाचे गाऱ्हाणे ऐकून रामदास हसून म्हणाला शिवराया, संतास त्रैलोक्याचे राज्य देऊ केले तरी ते त्यास तुच्छ वाटेल; मग तुझ्या एवढ्याशा देणगीची त्यास काय पर्वा? तुकाराम हा अत्यंत विरक्त पुरुष आहे. त्याला मोठमोठ्या सिद्धींची किंबहुना चारी मुक्तींचीसुद्धा परवा नाही? त्याची हरिभक्ती केवळ निष्काम आहे. तुकारामसाधूसारखे महापुरुष या भूतलावर जे अवतीर्ण होतात ते केवळ विश्वाच्या उद्धारासाठीच होत. त्यांना ऐहिक सुखाविषयांची किंवा संपत्तीची मुळीच चाड नसते.

येणेप्रमाणे रामदासाने शिवरायाचे समाधान केले. तरी त्या साधुनृपवराने ती लिहून ठेवलेली सनद पुढे तुकारामाच्या मुलांच्या नावे करून दिली. ती अद्यापि चालू आहे. रा. माडगावकरांनी देहूगावी जाऊन चौकशी केल्यावरून त्याला असे आढळून आले आहे की, हल्ली तुकारामाच्या वंशजास तीनच गावाचे उत्पन्न भोगत आहे. एकतर खुद्द देहूगाव; याची हल्लीची जमाबंदी रु. २३१९ रुपये. दुसरा गाव किन्हई; याची जमाबंदी रु. ७८४ आहे. तिसरा गाव एलवाडी; याची जमाबंदी रु. १२०० आहे.*

●●●

* प्रसिद्ध विद्वान पंडित रा. रा. वामनराव दाजी ओक यांनी निबंधमालाकारास एक पक पत्र पाठविलेले निबंधमालेच्या पासष्टाव्या अंकात छापले होते. त्यात त्यांनी असे प्रतिपादन केले आहे की, तुकारामाच्या अंतकाळी शिवाजी राजाचे वय फार तर बावीस वर्षांचे होते. असे असता तुकारामास आणण्याकरिता 'कारकून, घोडे, अबदागिरी वगैरे मोठा लवाजमा' पाठविण्याचे सामर्थ्य शिवाजीस होते असे वाटत नाही. या शंकेचे निरसन अगदी सोपे आहे. तुकारामाचा अंत शके १५७१ ला झाला. हे निर्विवाद आहे. या कालापर्यंत शिवाजीने काय काय केले होते ते पाहिले म्हणजे व पुणे वगैरे गावाच्या जहागिरीची वहिवाट त्याच्याकडे होती हे ध्यानात आणले म्हणजे वरील शंकेत काही जीव नाही असे कोणाच्याही लक्षात येईल. सदरील सालापर्यंत शिवाजीच्या हाती रायगड, चाकण, सिंहगड, पुरंधर, पन्हाळगड, विशाळगड, रांगणा वगैरे किल्ले आले असून, सुपे, कल्याण, राजापूर वगैरे ठिकाणे त्याने हस्तगत केली होती. त्याचप्रमाणे या सालापूर्वी त्याला ३००० घोडेस्वार व १०००० मावळे व हेटकरी ठेवण्याचे सामर्थ्य आले होते. आणखी असे की, शिवाजीचे सामर्थ्य वाढून तो आपल्या मुलखास त्रास देतो असे विजापूरकरांच्या लक्षात येऊन त्यांनी शहाजीस दग्याने पकडून कैदेत ठेविले ते शके १५७१ होय. यावरून शिवाजीचे सामर्थ्य तुकारामाच्या अंतकाळी केवढे होते हे चांगले ध्यानात येईल.

# अंतकाळ

येथपर्यंत तुकारामाच्या चरित्रातील मुख्य मुख्य गोष्टींचे निरूपण झाले. आता या महापुरुषाचा अंत कोणत्या प्रकारे झाला ते थोडक्यात सांगू.

तुकाराम प्रतिवर्षी आषाढी कार्तिकी एकादशीला पंढरीस जाण्याचा नियम कधीही टळू देत नसे; परंतु एके प्रसंगी त्यास शीतज्वर लागून त्याची प्रकृती अगदी बिघडून गेली आणि शक्ती क्षीण झाल्यामुळे त्याला चार पावलेसुद्धा चालण्याची ताकद उरली नाही. ही आपली अवस्था पाहून तुकारामाच्या चित्तास तळमळ लागून राहिली. आजपर्यंत जो नियम आपल्याकडून चुकला नाही, त्यास अंतराय येऊन पंढरीरायाचे व संतजनांचे दर्शन आपणास होणार नाही, हे मनात येऊन तो अत्यंत खेद करू लागला. इकडे वार्षिक नियमाप्रमाणे त्याचे चौदाशे अनुयायी वैष्णव पताका घेऊन पंढरीस जाण्याकरिता देहूगावी जमा झाले. तेव्हा तुकारामाने त्या सर्वांची सद्गदित अंत:करणाने भेट घेऊन त्यास पंढरीस जाण्याविषयी निरोप दिला आणि त्यांच्या बरोबर विठोबास छत्तीस अभंगाचे पत्र लिहून दिले. त्यांपैकी सोळा अभंग येथे देतो:-

*जायाचे शरीर जाईल क्षणांत । कां हा गोपीनाथ पावेचि ना ।।१।।*
*तुम्ही संत सारे कृपेचे सागर । माझा निरोप फार सांगा देवा ।।२।।*
*अनाथ अज्ञान कोणी नाहीं त्याला ।। पायांपें विठ्ठला ठेवी मज ।।३।।*
*तुका म्हणे जाणे ऐसी करा मिरवण । मग तो रक्षण करील माझें ।।४।।*

*नव्हे धीर कांहीं पाठव निरोप । आला तरीं कोप येऊ सुखें ।।१।।*
*कोपोनियां तरी देईल उत्तर । जैसें तैसें पर फिरावूनि ।।२।।*
*नाही तया तरी काय एक पोर । मज तों माहेर आणिक नाहीं ।।३।।*
*तुका म्हणे असे तयामध्ये हित । आपण निवांत असों नये ।।४।।*

*विनवीजे ऐसें भाग्य नाहीं देवा । पायाशी केशवा सलगी केली ।।१।।*
*धीटपणें पत्र लिहिलें आवडी । पार नेणें थोडी मति माझी ।।२।।*
*जेथे वेग तुझा नकळेची पार । तेथें मी पामर काय वाणूं ।।३।।*
*जैसे तैसे माझे बोल अंगीकारीं । बोबड्या उत्तरीं मस्तक हे ।।४।।*
*तुका म्हणे विटेवरि जी पाऊले । तेथे म्या ठेवियले मस्तक हे ।।५।।*

*सीण भाग हरे तेथींच्या निरोपें । देखिलिया रूप उरी नुरे ।।१।।*
*इंद्रियांची धाव होईल कुंठित । पावेल हे चित्त समाधान ।।२।।*
*माहेर आहेसें लौकिकी कळावे । निढळ बरवे शोभा नेदी ।।३।।*
*आस नाही परी उरी बरी वाटे । आपले ते भेटे आपणासी ।।४।।*
*तुका म्हणे माझी अविट आवडी । खंडण तांतडी होऊ नेदी ।।५।।*

*का माझे पंढरी न देखती डोळे । काय हे न कळे पापा यांचें ।।१।।*
*पाय पंथे का हे न चालती वाट । कोण हे अदृष्ट कर्म बळी ।।२।।*
*का हे पायावरी न पडे मस्तक । क्षेम का हस्तक न पावती ।।३।।*
*का या इंद्रियांचि न पुरे वासना । पवित्र होईना जिव्हा कीर्ति ।।४।।*
*तुका म्हणे कई जाऊनि मोटळें । पडेन हा लोळें महाद्वारीं ।।५।।*

*निरोपासी वेचे । काय बोलतां फुकाचें ।।१।।*
*परी हें नेघे वेचि यश । भेओं नको सुखी आस ।।२।।*
*सुख समाधानें । कोण पाहे देणें घेणें ।।३।।*
*नलगे निरोपासी मोल । तुका म्हणे वेचे बोल ।।४।।*

*पुढें तरी चित्ता । काय येईल तें आतां ।।१।।*
*मज सांगोनियां धाडी । वाट पाहतो बराडी ।।२।।*
*कंठी धरिला प्राण । पायांपाशी आलें मन ।।३।।*
*तुका म्हणे चिंता । बहु वाटतसे आतां ।।४।।*

*येती वारकरी । वाट पाहतो तोंवरी ।।१।।*
*घालूनिया दंडवत । पुसेन निरोपाची मात ।।२।।*
*पत्र हाती दिले । जया जेथें पाठविलें ।।३।।*
*तुका म्हणे येती । जाइन सामोरा पुढती ।।४।।*

*रुळे महाद्वारी । पायां खालील पायरी ।।१।।*
*तैसे माझे दंडवत । निरोप सांगतील संत ।।२।।*
*पडे दंडकाठी । देह भलतीसवा लोटी ।।३।।*
*तुका म्हणे बाळ । लोळे न धरिता सांभाळ ।।४।।*

*माहेरासी जैसा धाडीना सुनेला । मनी जावयाला आवांकी ते ।।१।।*
*माझा हेतू असे जावें पंढरीसी । परी या ज्वरासी काय करूं ।।२।।*
*सासू ती सासरा चांडाळ माहेरा । धाडीना दातारा काय करू ।।३।।*
*तुका म्हणे विठो गरुड आहे द्वारी । न्या मज पंढरी कृपावंता ।।४।।*

*तुम्ही संतजनीं । माझी करावी विनवणी ॥१॥*
*काय तुक्याचा अन्याय । त्यासी अंतरले पाय ॥२॥*
*भाका बहुतां रीती । माझी कींव काकुळती ॥३॥*
*न देखे पंढरी तुका चरण विटेवरी ॥४॥*

*होईल कृपादान । तरी मी येईन धांवोन ॥१॥*
*होती संतांचिया भेटी । आनंदे नाचों वाळवंटीं ॥२॥*
*रिघेन मातेपुढें । स्तनपान करीन कोडें ॥३॥*
*तुका म्हणे ताप । हरती देखोनियां बाप ॥४॥*

*परिसोनि उत्तर । जाब देईजे सत्वर ॥१॥*
*जरी तू होसी कृपावंत । तरि हा बोलावी पतित ॥२॥*
*नाणी कांहीं मना । करूनि पापाचा उगाणा ॥३॥*
*तुका म्हणे नाहीं । काय शक्ति तुझे पायीं ॥४॥*

*आतां हे सेवटीं । माझी आइकावी गोष्टी ॥१॥*
*आतां द्यावा वचनाचा । जाब कळे तैसा याचा ॥२॥*
*आता करकर । पुढें न करीं उत्तर ॥३॥*
*तुका म्हणे ठसा । तुझा आहे राखें तैसा ॥४॥*

*पंढरीस जाते निरोप आयका । वैकुंठनायका क्षेम सांगा ॥१॥*
*अनाथांचा नाथ हें तुझें वचन । धांवें नको दीन गांजों देऊं ॥२॥*
*ग्रासिले भुजंगे सर्पे महाकाळे । न दिसे हे जाळे उगवतां ॥३॥*
*कामक्रोधसुनी श्वापदी बहुतीं । वेढलो आवर्ती मायेचिये ॥४॥*
*मृगजलनदी बुडविना तरी । आणुनियां वरी तळा नेते ॥५॥*
*तुका म्हणे तुवां धरिलें उदास । तरि पाहो आस कवणाची ॥६॥*

*कृपाळू सज्जन तुम्ही संतजन । हेंचि कृपादान तुमचें मज ॥१॥*
*आठवण तुम्ही द्यावी पांडुरंगा । कींव माझी सगा काकुळती ॥२॥*
*अनाध अपराधी पतित आगळा । परि पाया वेगळा नका करूं ॥३॥*
*तुका म्हणे तुम्ही निरविल्यापरि । मग मज हरि उपेक्षीना ॥४॥*

हे अभंग वाचले म्हणजे त्याच्या मनाची त्या वेळी कशी अवस्था झाली होती हे चांगले ध्यानात येते. त्याची ती सुक्षोभ चित्तवृत्ती पाहून व त्याने विठोबास पत्र म्हणून दिलेले अभंग ऐकून तेथे जमलेल्या वारकऱ्यांस मोठा गहिवर आला व ते मोठ्या

प्रेमाने तुकारामास आलिंगन देऊन त्याचा निरोप घेऊन पंढरीस गेले. तुकारामही त्यास बोळवीत गावाबाहेर गेला आणि ते शेवटचा निरोप घेऊन मार्गस्थ झाले असता त्यांच्या वाटेकडे पाहत तो जागच्या जागी उभा राहिला. तो काही केल्या तेथून हलेना. अशी त्याच्या मनाची तदाकार वृत्ती झाली. पंढरीस गेल्यावर वारकऱ्यांनी तुकारामांचे ते अभंगरूप पत्र विठोबापुढे वाचून दाखविले आणि तुकारामाच्या शरीरास आराम नाही, म्हणून त्याचे पंढरीस येणे झाले नाही. यासाठी त्यावर क्षोभ होऊ नये अशी त्यांनी देवाची विनवणी केली.

इकडे वारकरी गेल्या दिवसापासून तुकारामास पंढरीचा ध्यास लागून राहिला. तेथे होणारा एकंदर उत्सव त्याच्या मनात एकसारखा घोळू लागला. अशा मनाच्या अस्वस्थ स्थितीमध्ये त्याने आणखी एकोणीस अभंग केले. त्यापैकी दहा येथे देतो:-

*माहेरींचा काय येईल निरोप । म्हणऊनी झोप नाहीं डोळां ।।१।।*
*वाट पाहें आस धरूनियां जीवीं । निढळा हे ठेवीं वरी वाहे ।।२।।*
*बोटवरी माप लेखितों दिवस । होतां कासावीस धीर नाहीं ।।३।।*
*काय नेणों संता पडिला विसर । कीं नव्हे सादर मायबाप ।।४।।*
*तुका म्हणे तेथे होईल दाटणी । कोण माझें आणी मना तेथें ।।५।।*

*यावरो न कळे संचित आपुलें । कैसे वोढवलें होईल पुढें ।।१।।*
*करील विक्षेप धाडितां मुळासी । किंवा धाडा ऐसी तांतडी हे ।।२।।*
*जोवरी हे डोळां देखे वारकरी । तों हे भरोवरीं करी चित्त ।।३।।*
*आस वाढविते बुद्धीचे तरंग । मनाचेही वेग वावडती ।।४।।*
*तुका म्हणे तेव्हा होतील निश्चळ । इंद्रियें सकळ निरोपानें ।।५।।*

*ऐसी ते सांडिली होईल पंढरी । येत वारकरी होते वाटे ।।१।।*
*देखिले सोहळे होती आठवत । चालती ते मात करूनियां ।।२।।*
*केली आइकिली होईल जे कथा । राहिले ते चित्ता होइल प्रेम ।।३।।*
*गरुडटके टाळ मृदंग पताका । सांगती ते एकां एक सुख ।।४।।*
*तुका म्हणे आता येती लवलाहीं । आलिंगनीं बाही देईन क्षेम ।।५।।*

*क्षेम मायबाप पुसेन हें आधी । न घालीं हें मधीं सुख दुःख ।।१।।*
*न करी तांतडी आपणांपासूनी । आइकेन कानी सांगती तें ।।२।।*
*अंतरीचें संत आणतील गुज । निरोप तो मज सांगतील ।।३।।*
*पायांवरी डोई ठेवीन आदरें । प्रीतिपडिभरे आलिंगून ।।४।।*
*तुका म्हणे काया करीन कुरवंडी । ओंवाळून सांडीं त्यांवरून ।।५।।*

*होईल माझी संतीं भाकिली करुणा । जे त्या नारायणा मनीं बैसे ।।१।।*
*शृंगारूनी माझीं बोबडी उत्तरें । होतील विस्तारे सांगितलीं ।।२।।*
*क्षेम आहे ऐसे होईल सांगितलें । पाहिजे धाडिलें शीघ्र मूळ ।।३।।*
*अवस्था जे माझी ठावी आहे संतां । होईल कृपावंता निरोपली ।।४।।*
*तुका म्हणे सवें येईल मुऱ्हाळी । किंवा काही उरी राखतील ।।५।।*

*बैसता कोणापें नाही समाधान । विवरे हें मन तेचि सोई ।।१।।*
*घडीघडी । मज आठवे माहेर । न पडे विसर क्षणभरी ।।२।।*
*न बोलावें ऐसा करितों विचार । प्रसंगीं तो फार आठवतें ।।३।।*
*इंद्रियांसी वाहो पडिली ते चाली । होती विसांवली येचि ठायीं ।।४।।*
*एकसरे सोस माहेरासी जावें । तुका म्हणे जीवें घेतलासे ।।५।।*

*नाहीं हानि पीर न राहावे निसुर । न पडे विसर काय करूं ।।१।।*
*पुसाविसी वाटे मात कापडियां । पाठविती न्याया मूळ मज ।।२।।*
*आणिक या मना नावडे सोहळा । करिते टकळा माहेरींचा ।।३।।*
*बहु कामें केलें बहु कासावीस । बहु झाले दिस भेटी नाहीं ।।४।।*
*तुका म्हणे त्याचें न कळे अंतर । अवस्था तो फार होते मज ।।५।।*

*माहेरींचें आले तें मज माहेर । सुखाचे उत्तर करीन त्यासी ।।१।।*
*पायांवरी माथा आलिंगीन पायीं । घेईन लवलाही पायवणी ।।२।।*
*सुख समाचार पुसेन सकळ । कैसा पर्वकाळ आहे त्यास ।।३।।*
*आपुलें जीवींचें सुखदु:ख भावें । सांगेन आघवें आहे तैसें ।।४।।*
*तुका म्हणे वीट नेघें आवडीचा । बोलिलीच वाचा बोलवीन ।।५।।*

*आतां माझे सखे येती वारकरी । जीवा आस थोरी लागलीसे ।।१।।*
*सांगतील माझ्या निरोपाची मात । सकळ वृत्तांत माहेरींचा ।।२।।*
*काय लाभ झाला काय होते केणें । काय काय कोणे सांठविलें ।।३।।*
*मागणे ते काय धाडिले भातुकें । पुसेन ते सुखें आहे तसीं ।।४।।*
*तुका म्हणे काय सांगती ते कानी । ऐकोनिया मनी धरुनी राहें ।।५।।*

*आतां करावा कां सोस वायांवीण । लटिकान्चि सीण मनासी हा ।।१।।*
*असेल ते कळों येईल लवकरी । आतां वारकरी आल्यापाठीं ।।२।।*
*बहु विलंबाचे सन्निध पातलें । धीराचें राहिले फळ पोटीं ।।३।।*
*चालिले तें ठाव पावेल शेवटीं । पुरलिया तुटी पाउलांची ।।४।।*
*तुका म्हणे आसे लागलासे जीव । म्हणऊनि कीव भाकितसें ।।५।।*

याप्रमाणे त्याला अगदी तळमळ लागून राहिली. वारकरी परत येण्याच्या सुमारास तो, त्यास बोळविण्यास जाऊन जेथे उभा राहिला होता तेथे पुन्हा जाऊन त्यांची वाट पाहू लागला. उत्सव आटपल्यावर वारकरी पुन्हा परत त्याच वाटेने त्याला भेटण्याकरिता आले. ते येत आहेत असे पाहून तुकाराम त्यास सामोरा गेला आणि सद्गदित होऊन त्याने त्यास साष्टांग दंडवत घातला, तेव्हा त्याच्या त्या अनुयायी मंडळीने त्याला मोठ्या प्रेमाने आलिंगन देऊन त्याला आणलेला प्रसाद दिला. तो तुकारामाने मोठ्या प्रीतीने सेवन केला. मग पंढरीस कोणकोणत्या प्रकारे उत्सव झाला ते त्याने मोठ्या आवडीने त्याला विचारले. ते त्यांनी त्याला इत्थंभूत सांगून व त्याचा निरोप घेऊन ते आपापल्या घरी गेले. वारकरी परत येऊन भेटले तेव्हा तुकारामाने अकरा अभंग म्हटले. त्यापैकी सहा येथे देतो:-

*भागलेती देवा । माझा नमस्कार घ्यावा ।।१।।*
*तुम्ही क्षेम की सकळ । बाळ अवघे गोपाळ ।।२।।*
*मारगी चालतां । श्रमलेती येता जाता ।।३।।*
*तुका म्हणे काही । कृपा आहे माझ्या ठायीं ।।४।।*

*घालुनियां ज्योती । वाट पाहे दिवसराती ।।१।।*
*बहु उतावीळ मन । तुमचे व्हावे दरुषण ।।२।।*
*आलो बोळवीत । तैसे याचि पंथें चित्त ।।३।।*
*तुका म्हणे पेणीं । येता जातां दिवस गणीं ।।४।।*

*आजि दिवस धन्य । तुमचे झालें दरुषण ।।१।।*
*सांगा माहेरींची मात । अवघा विस्तारी वृत्तांत ।।२।।*
*आइकतों मन । करूनी सादर श्रवण ।।३।।*
*तुका म्हणे नाम । माझा सकळ संभ्रम ।।४।।*

*आजीचिया लाभे ब्रह्मांड ठेंगणें । सुखी झालें मन कल्पवेना ।।१।।*
*आर्तभूत माझा जीव जयांसाठी । त्यांच्या झाल्या भेटी पायांसवें ।।२।।*
*वाटुली पाहता सिणले नयन । बहु होते मन आर्तभूत ।।३।।*
*माझ्या निरोपाचे आणिले उत्तर । होईल समाचार सांगती तो ।।४।।*
*तुका म्हणे भेटी निवारला ताप । फळले संकल्प संत आले ।।५।।*

*आजी बरवें झालें । माझे माहेर भेटले ।।१।।*
*डोळा देखिले सज्जन । निवारला भाग सीण ।।२।।*
*धन्य झालो आतां । क्षेम देऊनिया संतां ।।३।।*
*इच्छेचें पावलो । तुका म्हणे धन्य झालों ।।४।।*

*आले ते आधी खाईन भातुकें । मग कवतुके गाईन ओव्या ।।१।।*
*सांगितला आधी आइकों निरोप । होईल माझा बाप पुसे तो तें ।।२।।*
*तुका म्हणे माझे सखे वारकरी । आले हे माहेरीहून आजी ।।३।।*

यापुढे तुकारामाची वृत्ती अधिकाधिक उदास होत चालली. त्याचा पूर्वीचा उत्साह बराच कमी झाला. तरी त्याने कीर्तने करण्याचा क्रम मुळीच कमी केला नव्हता. आमच्याकडे येऊन कीर्तन करा, असे कोणी म्हटले तर त्याला तो कधीही नाही म्हणत नसे. तो कीर्तन करू लागला म्हणजे किती वेळ झाला याचे त्यास भान उरत नसे; बरे कोणी त्याला पुष्कळ वेळ झाल्याचे सुचविले तरी तो त्यांच्या सूचनेकडे फारसे लक्ष देत नसे. सर्व काळ अभंग म्हणत व नामोच्चारण करीत राहावे असे त्यास वाटे. कोणाशी बोलणे झाल्यास तो अभंगातच बोले. एकदा एके ठिकाणी तो बसला की, तेथून त्याने तासांचे तास उठू नये. कोणास न समजू देता कोठे तरी एकांत जागी जाऊन तो बसत असे किंवा दुसऱ्या गावी निघून जात असे. मग त्याच्या जवळील शिष्यमंडळी त्याला शोधीत रानोमाळ व गावोगाव हिंडत असे. कोठे जाता म्हणून कोणी विचारिले असता त्याने त्यास असे उत्तर द्यावे की, आम्ही वैकुंठपुरी चाललो. कीर्तनप्रसंगी त्याने देवास नानाप्रकारी आळवून असे म्हणावे की, देवा, हे लोक मला आपल्या घरी नेऊन मिष्टान्ने खावयास घालतात आणि माझा बहुमान करितात. तो मला मुळीच आवडत नाही. यामुळे मी बिघडण्याचा संभव आहे. तरी मला आता या लोकी फार दिवस ठेवू नको, वैकुंठास घेऊन जा. आपला अंतकाळ समीप येत चालला आहे असे तुकारामासही वाटत असे. तो वेळोवेळा असे उद्गार काढी की, देवा, माझे आयुष्य उणे कर; परंतु मी जिवंत आहे तोपर्यंत माझी गात्रे नि:शक्त होऊ देऊ नको; कारण तुझी भक्ती माझ्या हातून जीवमान आहे तोपर्यंत अखंड चालावी अशी माझी उत्कट इच्छा आहे.

याप्रमाणे त्याची वृत्ती आधीच उदास झाली असता तीत आणखी एका गोष्टीने भर पडली. तिचे निरूपण येथे करितो. लोहगावच्या लोकांचे तुकारामावर मनस्वी प्रेम होते. ते त्याला आपल्या गावी वेळोवेळा नेऊन त्याची घरोघर कीर्तने करवीत असत. त्यांच्या गावी तुकारामही मोठ्या आनंदाने जाऊन महिन्याचे महिने राहत असे. या क्रमाप्रमाणे एके समयी तुकाराम लोहगावी जाऊन एक महिना कीर्तने करीत असता त्या गावावर एकाएकी परचक्र येऊन लोक लुटले गेले. त्यामुळे एकंदर लोक वित्तहीन होऊन दु:खी झाले; परंतु तुकारामाचा बोध ज्यांच्या चित्तात पूर्णपणे बाणला होता,

त्यास नश्वर वित्तहानीने फारसा खेद वाटला नाही. या प्रसंगी तुकारामाने लोहगावच्या मंडळीस पुष्कळ प्रकारे मोठ्या कळवळ्याचा बोध केला. त्यापैकी एकच अभंग येथे देतो :-

*गेलीयाची हळहळ कोणी ।। नका मना धरू कांहीं ।।१।।*
*पावलें तें म्हणो देवा ।। सहज सेवा या नांव ।।२।।*
*जळता अंगी पडता खाण ।। नारायण भोगिता ।।३।।*
*तुका म्हणे नलगे मोल ।। देवबोल आवडती ।।४।।*

याप्रमाणे त्याने त्यांचे सांत्वन करण्याचा प्रयत्न केला, तरी त्याच्या स्वत:च्या मनास लोहगावावर गुदरलेल्या या संकटप्रसंगामुळे फारच खिन्नता आली. त्याला या जीविताचा पुरा वीट आला. लोहगावच्या भाविक लोकांची विपन्नता व दु:ख त्याच्याने मुळीच पाहवेना. आपला ज्यावर लोभ व ज्यांची आपल्यावर नि:स्सीम भक्ती अशा त्या लोकांचे हाल पाहण्यापेक्षा मरण पुरवले असे त्यास वाटू लागले. ही अशी चित्तास अतिशयित उदासीनता आली असता त्याने आपणास वैकुंठी नेण्यासाठी देवाचा धावा केला. त्यापैकी सहा अभंग येथे देतो :-

*न देखवे डोळां ऐसा हा आकांत ।। परपीडे चित्त दु:खी होतें ।।१।।*
*काय तुझी येथे नसालसे झालें ।। आम्हीं न देखिलें पाहिजे हें ।।२।।*
*परचक्र कोठे हरिदासांच्या वासें ।। न देखिजेत देशें राहातिया ।।३।।*
*तुका म्हणे माझी लाजविली सेवा ।। हीनपणे देवा जिणे झालें ।।४।।*

*काय म्यां मानावे हरिकथेचे फळ ।। तरिजे सकळ जनीं ऐसे ।।१।।*
*उच्छेद तो असे येथें आरंभला ।। रोकडें विठ्ठला परचक्र ।।२।।*
*तुका म्हणे जेथे वसतील दास ।। तेथे तुझा वास कैसा आतां ।।४।।*

*भीत नाहीं आतां आपुल्या मरणा ।। दु:खी होता जना न देखवे ।।१।।*
*आमची तो जाती ऐसी परंपरा ।। कां तुम्ही दातारा नेणां ऐसें ।।२।।*
*भजनीं विक्षेप तेंची पैं मरण ।। न वजावा क्षण एक वायां ।।३।।*
*तुका म्हणे नाही आघाताचा वारा ।। ते स्थळी दातारा ठाव मागें ।।४।।*

*नाहीं मागितला ।। तुझा मान म्यां विठ्ठला ।।१।।*
*जे हे करविली फजिती ।। माझी येवढी जनां हातीं ।।२।।*
*नाहीं केलें पोट ।। पुढें घालुनी बोभाट ।।३।।*
*तुका म्हणे धरुनी हात ।। नाही नेले दिवाणात ।।४।।*

*बोलिलो तें आता पाळावे वचन ।। ऐसें पुण्य कोण माझे गांठीं ।।१।।*
*जातो आता आज्ञा घेऊनियां स्वामी ।। काळक्षेप आम्ही करूं कोठें ।।२।।*
*न घडे यावरी न धरवे धीर ।। पीडतां राष्ट्र देखोनि जग ।।३।।*
*तुका म्हणे तुम्ही दिसे मोकलिलें ।। काय आतां आलें जीवित्वाचें ।।४।।*

*बोलतों निकुरे ।। नव्हत सलगीची उत्तरें ।।१।।*
*माझे संतापलें मन ।। परपीडा ते पाहोन ।।२।।*
*आंगावरी आले ।। तोवरी जाईल सोसिले ।।३।।*
*तरी तुज भक्तांची आण देवा ।। जरी तुका येथे ठेवा ।।४।।*

लोहगावाच्या ज्या कित्येक लोकांची सर्व संपत्ती लुटीस गेली होती त्यांची मने अगदी विरक्त होऊन त्यांनी घरदार सोडले व तुकारामापाशी सर्वकाळ राहून त्यांचा बोध ऐकण्याचा निर्धार करून ते त्याच्याबरोबर निघाले. तुकाराम त्याला घेऊन देहूगावी परत आला; परंतु तो पुढे फार दिवस वाचला नाही. त्याच्या मनास जो हा धक्का बसला त्याने त्यास कोठेच चैन पडेना. त्याला एकसारखा वैकुंठास जाण्याचा ध्यास लागून राहिला. पुढे लवकरच फाल्गुन महिन्याचा उत्सव आला. या महिन्याच्या शुद्ध पक्षातील एकादशीपासून उत्सवास सुरुवात झाली. या उत्सवप्रसंगी दूरदूरच्या गावचे भाविक लोक देहूगावी दिंडीपताका घेऊन यात्रेस आले होते. एकादशीपासून एकसारखी पाच दिवस समराधना व कीर्तने चालली होती. तुकारामाने या कीर्तनात भाविक जनास शेवटला बोध अतिशयित प्रेमाने व कळवळ्याने केला. त्यात त्याने ऐहिक जीविताची क्षणभंगुरता आणि ऐश्वर्यादी सुखविषयांची असारता व अस्थिरता श्रोतृजनांच्या चित्तांत इतकी पूर्णपणे बिंबविली की, सर्व यात्रेकरी अगदी विरक्त व उदास होऊन गेले. याप्रमाणे त्याच्या श्रोत्यांची वृत्ती झाली असता त्याने आपला हा लोक सोडून जाण्याचा संकल्प पुष्कळ अभंग बोलून आपल्या अनुयायी जनास सुचविला. यावेळी त्याची वृत्ती वैकुंठगमनाच्या विचारात इतकी गढली होती की, त्याला त्या सुखसोहळ्यांचा साक्षात प्रत्यय घडल्याचा भास होऊ लागला. या वेळचे त्याचे उद्गार अत्यंत हृदयद्रावक आहेत. रा. तुकाराम तात्यांनी छापलेल्या गाथेच्या दुसऱ्या भागात निर्वाण प्रकरण दिले आहे. ते जो सहृदय पुरुष वाचील त्याच्या मनाची वृत्ती तटस्थ होऊन या साधुपुरुषाच्या हृदयाची स्थिती किती उन्नत व प्रेमळ होती ते सहज समजून येईल. संसारामध्ये आजन्म विरक्ततेने नांदून स्वत:स जे सत्य कळले त्याचा प्रसार करण्याविषयी अहर्निश झटण्यात ज्याने आपल्या आयुष्याचा सद्व्य केला, ज्याला आपल्या सभोवतालचे लोक सदाचारी व सन्मार्गवर्ती व्हावे अशी

उत्कट इच्छा असल्याकारणाने, स्वत:स कितीही श्रम किंवा दगदग सोसावी लागली तरी त्याचे ज्याला काहीएक वाटत नसे, त्या स्वजनकल्याणेच्छू महापुरुषास आपल्या परिचयाच्या लोकांची आध्यात्मिक अवनती पाहून परम खेद वाटणे साहजिक होते. ही त्यांची अवनती दूर करण्याचे सामर्थ्य आपणास नाही हे पाहून त्याला एकसारखा हृद्रोग लागलेला असे. त्यात आणखी आपल्या गात्रास शिथिलता प्राप्त होऊन त्यांची कामे पूर्वीप्रमाणे जोमाने होत नाहीत हे पाहून तर त्यास अधिकच झुरणी लागली होती, याविषयी पूर्वी उल्लेख केलाच आहे. या सर्व उदासीनतेच्या विचारात आणखी लोहगावावर आलेल्या संकटामुळे अधिकच भर पडून त्याला हे जीवित अगदी दुर्वह होऊन गेले आणि या नंतर या लोकी राहण्यात आपली शोभा नाही, असे वाटून त्याने सदरी सांगितल्याप्रमाणे उत्सवप्रसंगीच्या कीर्तनात स्वसंकल्प श्रोतृवृंदास बोलून दाखविला. या अंतसमयींच्या हृदयोद्गारांचा थोडासा मामला वाचकांस येथे देणे इष्ट दिसते:-

*जरा कर्णमुळी सांगो आली गोष्टी । मृत्युचीये भेटी जवळी आली ।।१।।*
*आतां माझ्या मना होई सावधान ।। हे पुण्याची जाण कार्यसिद्धि ।।२।।*
*सेवटील घडी बुडतां नलगे वेळ ।। साधावा तो काळ जवळी आला ।।३।।*
*तुका म्हणे चिंतिं कुळीची देवता ।। वारावा भोंवता मिथ्या शब्द ।।४।।*

*संतांचे उपदेश आमुचे मस्तकीं ।। नाही मृत्युलोकी राहणेसा ।।१।।*
*म्हणऊनि बहु तळमळी चित्त । येई वो धांवत पांडुरंगा ।।२।।*
*उपजली चिंता लागला उसीर ।। होत नाही धीर निढळ वाटे ।।३।।*
*तुका म्हणे पोटी रिघालेंसे भय ।। करूं आता काय ऐसें झालें ।।४।।*

*घर्माचि तूं मूर्ती ।। पापपुण्य तुझे हातीं ।।१।।*
*मज सोडवी दातारा ।। कर्मापासूनि दुस्तरा ।।२।।*
*करिसी अंगीकार ।। तरी काय माझा भार ।।३।।*
*जिवींच्या जीवन ।। तुका म्हणे नारायणा ।।४।।*

*आतां बरें झालें ।। सकाळींच कळो आलें ।।१।।*
*मज न ठेवी इहलोकीं ।। आलों तेव्हां झाली चुकी ।।२।।*
*युगमहिमा ठावा ।। नव्हता ऐसा पुढें देवा ।।३।।*
*तुका म्हणे ठेवीं ।। भोगासाठी निरयगावी ।।४।।*

*तुम्ही सनकादिक संत ।। म्हणविता कृपावंत ।।१।।*
*एवढा करा उपकार ।। देवा सांगा नमस्कार ।।२।।*
*माझी भाकुनी करुणा ।। विनवा वैकुंठीचा राणा ।।३।।*
*तुका म्हणे मज आठवा ।। मूळ लवकरी पाठवा ।।४।।*

*आपुल्या माहेरा जाईन मी आतां ।। निरोप या संतां हाती आला ।।१।।*
*सुख दुःख माझे ऐकियलें कानीं ।। कळवळला मनी करुणेचा ।।२।।*
*करूनि सिद्ध मूळ साउले भातुकें । येती दिवसे एके न्यावयासी ।।३।।*
*त्याची पंथें माझे लागलेसे चित्त ।। वाट पाहे नित्य माहेराची ।।४।।*
*तुका म्हणे आता येतील न्यावया ।। अंगे आपुलिया मायबापा ।।५।।*

*संतांचे उपदेश आमचे मस्तकीं ।। नाही इहलोकी रहाणें आतां ।।१।।*
*म्हणुनी बहु तळमळे चित्त ।। येई हो धावत पांडुरंगे ।।२।।*
*उपजलि चिंता लागला उशीर ।। होत नाही धीर निढळ बाढे ।।३।।*
*तुका म्हणे पोटी रिघालेसे भय ।। करू आता काय ऐसें झालें ।।४।।*

*ऐका ऐका भाविक जन । कोण केला व्हाल ते ।।१।।*
*तार्किकांचा टाका संग । पांडुरंग स्मरा हो ।।२।।*
*नका शोधू मतांतरे नुमगे खरें बुडाल ।।३।।*
*कलीमध्यें दास तुका । जातो लोका सांगत ।।४।।*

*सखे सज्जनहो स्मरा नारायण । संगें येतें कोण सत्य सांगा ।।१।।*
*आमुचे गावीचे जरी रत्न गेले । नाही सांगितलें म्हणों नये ।।२।।*
*म्हणोनी सकळां केलें जरी ठावें । नाइकलें जावें पुण्यवाटे ।।३।।*
*इतुकियावरी तुम्ही राहो नका । विनवितो तुका विठोबासी ।।४।।*

*माहेरीचा मज आलासे मुळारी । उद्या प्रातःकाळीं जाणें मज ।।१।।*
*बहु काळ माझा केलासे सांभाळ । पांडुरंगे मूळ पाठविलें ।।२।।*
*हीच आम्हां भेटी लोभ असों द्यावा । पुन्हा मी केशवा नयें येथें ।।३।।*
*तुका म्हणे बहु न बोलों उत्तर । दया आता फार असों द्यावी ।।४।।*

याप्रमाणे त्याचा संकल्प झालेला ऐकून तेथे जमलेल्या एकंदर लोकांस फारच वाईट वाटले. त्याचा संग यापुढे आपणास अंतरणार म्हणून त्यांच्या मनास हळहळ लागून राहिली. फाल्गुन वद्य प्रतिपदेची सर्व रात्र कीर्तन करण्यात काढून तुकारामाने शेवटी मोठ्या प्रेमाने आरती केली आणि विठोबास साष्टांग दंडवत घालून तो देवळातून बाहेर पडला आणि इंद्रायणीच्या तीराकडे मोठमोठ्याने अभंग म्हणत जाऊ लागला. तेव्हा त्याचे अनुयायी व इतर यात्रेकरी त्याच्या मागून गेले. जाता जाता त्याने आपल्या स्त्रीस असा निरोप धाडला की, आम्ही वैकुंठास चाललो आहो तर आपण आमच्या समागमे यावे; तेव्हा तिने असे उत्तर पाठविले की, माझ्या गळ्यात पोरवडा असून मी हल्ली गर्भिणी आहे; याकरिता स्वामीबरोबर माझ्याने येववत नाही. हे उत्तर ऐकून तुकारामाने तिला पुढीलप्रमाणे आशीर्वाद दिला :-

*स्त्रियेसीहो तुका जातो सांगोनिया ।। बैसा म्हणोनिया जातों आम्हीं ।।१।।*
*सडासंमार्जन तुळसी वृंदावन ।। देवाचें पूजन करीत जावें ।।२।।*
*तुझिये गर्भी आहे नारायण ।। तो तुजलागाने उद्धरील ।।३।।*
*ऐसें बोलोनिया तुका पुढें आले ।। सद्गदित झाले हृदय तिचे ।।४।।*

अवलीला या प्रसंगीच्या तुकारामाच्या निरोपाचा अर्थ मुळीच कळला नाही. तिला असे वाटले की, नेहमीच्या परिपाठाप्रमाणे स्वारी कोठच्या तरी तीर्थास चालली असावी आणि अलीकडे आम्ही वैकुंठास चाललो असे सांगण्याचा जो त्याचा क्रम होता त्यास अनुसरूनच हाही निरोप असावा. या वेळी तो इहलोक सोडून खचितच जाईल असे तिला वाटले नव्हते. फार तर काय; पण त्याच्या कीर्तनातील वर दिलेले मरणसंकल्पसूचक अभंग ज्यांनी ऐकले होते व तो इंद्रायणीच्या तीराकडे चालला असता त्याच्या तोंडून निघत असलेले अभंग जे ऐकत होते, त्यावरूनही त्याला तो पुढे काय करणार याविषयी काहीएक खात्रीने समजले नव्हते. ते आपल्या मनाशी म्हणू लागले होते की, स्वामीची वृत्ती अतिशयित उद्विग्न व उदास झाली आहे, यासाठी ते कोठे तरी लांबच्या तीर्थयात्रेस चालले असावे. त्यास वैकुंठास जाण्याचा निदिध्यास लागल्यामुळे त्याला दुसरे काहीच सुचत नाही; म्हणून हा शेवटला निरवानिरवीचा निरोप ते घेत आहेत; परंतु हा त्यांचा भ्रम लवकरच नाहीसा झाला. 'आम्ही वैकुंठास चाललो' असे जे तुकाराम लोकास वेळोवेळा सांगत असे, ते त्याने या खेपेस खरे केले. इंद्रायणीच्या तीरी गेल्यावर त्याने आणखी पुष्कळ अभंग म्हटले. त्यास विहरिणीचे अभंग म्हणतात. यात त्याने आपल्या अनुयायांचा शेवटला निरोप घेतला. ह्या त्याच्या अखेरच्या अभंगांपैकी काही येथे देतो :-

*क्षणभरी आम्ही सोसिलें वाईट ।। साधिलें अवीट निजसुख ।।१।।*
*सांडी मांडी मागें केल्या भरोवरी ।। अधिकचि परी दुःखाचिया ।।२।।*
*तुका म्हणे येणे जाणे नाही आता ।। राहिलो अनंताचिये पायीं ।।३।।*

*मरणाही आधी राहिलों मरोनी ।। मग केलें मनी होतें तैसें ।।१।।*
*आतां तुम्ही पाहा आमुचें नवल ।। नका वेचूं बोल वायांवीण ।।२।।*
*तुका म्हणे तुम्ही भयभीत नारी ।। कैसी संग सरी तुम्हां आम्हां ।।३।।*

*पर पुरुषांचें सुख भोगे तरी ।। उतरोनि करीं घ्यावें सीस ।।१।।*
*संवसारा आगी आपुलेनि हातें ।। लावूनि मागुते पाहू नयें ।।२।।*
*तुका म्हणे व्हावें तयापरी धीट ।। पतंग हा नीट दीपा सोई ।।३।।*

*न राहे रसना बोलतां आवडी ।। पायीं दिली बुडी माझ्या मने ।।१।।*
*मानेल त्या तुम्ही आइका स्वभावे ।। मी तो माझ्या भावे अनुसरलों ।।२।।*
*तुका म्हणे तुम्ही फिरावे बहुतीं ।। माझी तों हे गति जाली आतां ।।३।।*

*सकळही माझी बोळवण करा । परतोन घरा जावे तुम्ही ।।१।।*
*कर्म धर्म तुम्हा असावे कल्याण । घ्या माझे वचन आशीर्वाद ।।२।।*
*वाढवूनि दिलें एकाचिये हाती । सकळ निश्चिति झाली येथें ।।३।।*
*आता मज जाणे प्राणेश्वरासवें । मी माझीया भावे अनुसरलो ।।४।।*
*वाढवितां लोभ होईल उशीर । अवघीच स्थिर करा ठायीं ।।५।।*
*धर्म अर्थ काम झाले एक ठायी । मेळविला तिहीं हाता हात ।।६।।*
*तुका म्हणे आता झाली याची भेटी । उरल्या त्या गोष्टी बोलावया ।।७।।*

*चार लक्ष तीस इजार ही पदें । तुम्हासी विषदें सांगितलीं ।।१।।*
*पुन्हा नरतनु मिळणार नाही । म्हणोनियां देहीं भव तरा ।।२।।*
*सर्वांच्या चरणी मस्तक ठेवितों । आम्ही आतां जातो निजधामा ।।३।।*
*सर्वत्र मिळोनि विनंति हे ऐका । भजनी करूं नका आळस कोणी ।।४।।*
*पोटाचिये साठीं चिंता न करावी । देईल गोसावी अलबेले ।।५।।*
*मन हे तुमचे अधीर हे आहे । म्हणोनियां वाहे चिंता बहु ।।६।।*
*राजा जनालागी चाकर ठेवितो । पोटालागी देतो किंवा नाही ।।७।।*
*म्हणोनी देवासी साधावे विचारे । देईल निर्धारें अन्न बहु ।।८।।*
*पोटासाठी इतकी हळहळ लागली । कैसी भ्रांती आली देवाविशी ।।९।।*
*तुका म्हणे माझ्या गळ्याचि हे आण । जरी नारायण विसराल ।।१०।।*

*उठा सकळिक भेटू तुम्ही आम्ही । लक्ष लावा नामी विठोबाच्या ।।१।।*
*लहानथोर सारे आशीर्वाद घ्यारे । बोळवीत यारे इंद्रायणी ।।२।।*
*येथुनी आमुचा खुंटलासे मार्ग । तुम्ही कृपा लोभ असूं द्यावा ।।३।।*
*तुम्हासाठी जीव झाला कासावीस । कोणी हरीचे दास निवडांना ।।४।।*
*तुका म्हणे आता जाईल हीच भेटी । राहतील त्या गोष्टी बोलावया ।।५।।*

*येतो काकुळती अर्थ धरा चित्ती । आमचीये पंथी हेत धरा ।।१।।*
*आमुच्या पंथें नाही जकातीचें नाते । सणद आलिया पंथे कोण दंडी ।।२।।*
*असे मी सांगतो बरे धरा मनी । अनहिताचे कोणी सांगत नाहीं ।।३।।*
*परिहारासाठी वैद्य नारायण । औषध आपुला गुण करितसे ।।४।।*

*उठा एक आतां सांगतों तुम्हाला । देशनटा आला आम्हालागीं ।।१।।*
*इंद्रायणीवरी उतरलीं विमानें । आम्हापासी आले विष्णुदूत ।।२।।*
*मृत्युलोकी माझे पूर्ण झाले मन । गाईले कीर्तन विठोबाचें ।।३।।*
*साधुसंता पायी गेलो लोटांगणी । नित्य गर्जे वाणी विठ्ठलनामे ।।४।।*
*आतां एक ऐका सांगतो तुम्हासी । जावे पंढरीसी सर्व काळ ।।५।।*
*तुम्ही कोणी करा हरिनामकीर्तन । ऐसें तुम्हा सांगोन जातो तुका ।।६।।*

*बैसा आता आमचा रामराम घ्यावा । आम्ही गेलों देवा शरणागत ।।१।।*
*शरणागत जातां ब्रह्म झाली काया । गेल्या नासोनिया पापराशी ।।२।।*
*तुमची आमची तुटी झाली येथोनी । तुम्ही स्मरा वाणी रामराम ।।३।।*
*नामें करो विठ्ठल दूर अंतरला । भावें हा वळला पांडुरंग ।।४।।*

*निरपेक्ष निरभिमानी असती जे प्राणी । त्यांसी चक्रपाणी जवळी आहे ।।१*
*ज्यांचा भाव जडला विठोबाचे पायीं । त्यांसी मुक्ति देई पांडुरंग ।।२।।*
*ज्ञान अभिमान अंगीं भरला ताठा । देवासीं करंटा दुरावला ।।३।।*
*ज्ञानाचा अभिमान सांडा म्हणे तुका । तरी जोडेल सखा पांडुरंग ।।४।।*

*बसारे गड्यांनो आज्ञा द्यावी आम्हा । आमुच्या रामनामा चित्तीं धरा ।।१।।*
*उपकार करा पतीत उद्धरा । वारंवार उच्चारा रामनाम ।।२।।*
*व्हारे वारकरी वेगी जा पंढरी । निरोप महाद्वारी एवढा सांगा ।।३।।*
*तुका आमुचे गावी होता एक आपुला । नाही कोठे गेला पायांविणे ।।४।।*

*आम्ही जातो आपुल्या गावा । आमुचा राम राम घ्यावा ।।१।।*
*तुमची आमुची हेचि भेटी । येथुनियां जन्मतुटी ।।२।।*
*आतां असों द्यावी दया । तुमच्या लागतसें पायां ।।३।।*
*येतां निजधामीं कोणी । विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ।।४।।*
*रामकृष्ण मुखी बोला । तुका जातो वैकुंठाला ।।५।।*

*घरचीं दारचीं भजा पांडुरंगा । वडिलासी सांगां दंडवत ।।१।।*
*मधाचिये गोडी माशी टीका उडी । मोडलिया घडी पुन्हा नये ।।२।।*
*गंगेचा हा ओघ सागरीं मिळाला । नाही मागें आला कदा काळी ।।३।।*
*ऐशिया शब्दांची बरी करा सोय । गेला तुका नये मागुता तो ।।४।।*

*विमानांचे घोष वाजती असंख्य । सुरु झाला डंका वैकुंठींचा ।।१।।*
*शब्दांचा विश्वास झाली आठवण । करा बोळवण सज्जनहो ।।२।।*
*आले विष्णुदूत तेचि प्रेममूर्ति । अवसान हाती सांपडलें ।।३।।*
*झाला पाठमोरा इंद्रायणीतळीं । रामघोष टाळी वाजविली ।।४।।*
*प्रथम तो पाय घातला पाण्यांत । राहिली ते मात तुका म्हणे ।।५।।*

याप्रमाणे आपल्या बरोबर आलेल्यास शेवटचा बोध करून व त्यांचा अखेरचा निरोप घेऊन तुकारामाने विठोबाचे भजन पराकाष्ठेच्या प्रेमाने चालविले. तेव्हा त्याचा तो शेवटचा हृदयभेदक निरोप ऐकून आधीच शोकविव्हळ झालेल्या त्याच्या शिष्यजनांचे नेत्र प्रेमाश्रूंनी भरून जाऊन त्यांना अगदी देहभान नाहीसे झाले असता, तुकारामाने अकस्मात इंद्रायणीच्या डोहात उडी घातली.* सभोवतालचे लोक शुद्धीवर येऊन पाहतात तो तुकाराम अदृश्य झाला. तेव्हा त्यांचा असा समज झाला की, तो कुडीसहित वैकुंठास गेला. त्या भाविक लोकांस असे वाटण्याचे कारण हे होते की, तुकारामाने आपल्या अनुयायी जनांचा निरोप घेताना जे अभंग म्हटले होते त्यामध्ये हे होते:–

*कुडीसहित तुका जाईल वैकुंठासी । ते गुज तुम्हांसी कळलें नाहीं ।।१।।*
*पुढे जे होईल ते जाणे विठ्ठल । लौकिकां कळेल काय तेथे ।।२।।*
*तुका म्हणे आता काया ब्रह्म झाली । विमाने उतरलीं आम्हांलागीं ।।३।।*

*तुका उतरला तुकीं । नवल झाले तिहीं लोकीं ।।१।।*
*नित्य करितो कीर्तन । हेंची त्याचें अनुष्ठान ।।२।।*
*तुका बैसला विमानीं । संत पाहती लोचनीं ।।३।।*
*देव भावाचा भुकेला । तुका वैकुंठासी गेला ।।४।।*

या अभंगांचे वास्तविक इंगित पाहू जाता इतकेच दिसते की, ज्या गोष्टीचा त्याला एकसारखा निदिध्यास लागला होता, त्या प्रत्यक्ष घडल्याचा त्यास भास व्हावा, हे उघड आहे. तुकारामासारखे जे भक्तिपरायण कवी अत्यंत सहृदय असतात, त्यांची चित्तवृत्ती अतिशयित सुक्षोभ झाली असता, त्यांचे हृदयोद्गार असेच अतिशयोक्तिरूप असावयाचे. त्यात आणखी इहलोकच्या जीविताचा त्यास पुरा वीट आला असून आपणास वैकुंठप्राप्ती केव्हा होईल असे होऊन गेले होते. तेव्हा त्याची वृत्ती तदाकार होऊन त्यास सदरील अभंगात निर्दिष्ट केल्यासारखा भास होणे साहजिक होते.

असो, तर याप्रमाणे हा साधुशिरोमणी गुप्त झाला तेव्हा त्यांच्या बरोबर तेथे आलेल्या लोकांस पराकाष्ठेचे दु:ख वाटले. सर्व लोक अगदी उद्विग्न होऊन हळहळू लागले. मग ते अत्यंत उदास व शोकाकुल होऊन परत गावात आले; परंतु तुकारामाचा भाऊ कान्हया, रामेश्वरभट्ट गंगाजी मवाळ कडूसकर वगैरे चौदा वैष्णव, जे त्याच्या

---

* शालिवाहन शके पंधराशे एकाहत्तर ।। विरोधीनाम संवत्सर उत्तरायणीं ।।१।।
फाल्गुन वद्य द्वितिया दिवस सोमवार ।। प्रथम प्रहर प्रात:काळ ।।२।।
जये दिवशी शेवटी कीर्तन करिता ।। म्हणे मज आता निरोप द्यावा ।।३।।
तुका म्हणे नमन साधुसंतपाया ।। ऐसे बोलोनियां गुप्त झाले ।।४।।

जवळ नेहमी असत, ते इंद्रायणीतीरी शोक करीत बसले. त्यांनी असा निर्धार केला की, तुकारामाचे पुन्हा दर्शन झाल्यावाचून तेथून उठावयाचे नाही. अवलीस हे वर्तमान कळताच ती तेथे मुले घेऊन धावत आली आणि मोठ्याने आक्रोश करू लागली. रामेश्वरभट्ट वगैरे मंडळी तेथे पंचमीपर्यंत बसून राहिली; परंतु तुकारामाचे पुनरपि दर्शन झाले नाही. तेव्हा ते अगदी निराश झाले असता तुकारामाची गोदडी व टाळ ही त्यांच्या नजरेस पडली. तेव्हा त्या भाविक शिष्यास वाटले की, स्वामींनी ही आपली गोदडी व टाळ खाली टाकून असे सुचविले की, मी वैकुंठास गेलो, तुम्ही आपल्या घरी परत जावे. असा आपला समज करून ते ती गोदडी व टाळ घेऊन अवली व मुले यासह गावात आले. ज्या महापुरुषाच्या सहवासात इतके दिवस मोठ्या आनंदाने व प्रेमाने काढले, त्याचे पाय अक्षयी अंतरल्यामुळे त्यांच्या मनाची कशी काय स्थिती झाली असावी याची कल्पना वाचकास सहज करिता येण्यासारखी आहे.

पुढे स्वामीची प्रयाणतिथी कोणती धरावी याविषयी त्या शिष्यमंडळीस संशय उत्पन्न आला, तेव्हा रामेश्वरभट्टाने असे सांगितले की, स्वामींची गोदडी व टाळ ही आपणास पंचमीस मिळाली, यासाठी त्यांची पुण्यतिथी हीच धरावी आणि स्वामी देहासकट गुप्त झाले असल्या कारणाने त्यांचे क्रियाकर्मांतर करण्याचे काहीच प्रयोजन नाही. तर स्वामींच्या पुण्यतिथीनिमित्त ब्राह्मणभोजन घालावे म्हणजे झाले. हा त्याचा निर्णय इतर मंडळीस पसंत पडून त्याप्रमाणे सर्वकाही व्यवस्था करण्यात आली. त्यांनी गावात आल्यावर ब्राह्मणभोजन घालून त्या दिवशी व दुसरे दिवशी कीर्तन केले व सप्तमीस लळीत करून समारंभ समाप्त केला.

●●●

# बायकामुले

तुकारामास दोन बायका होत्या. त्यापैकी पहिली व तिच्या पोटचा मुलगा ही दुष्काळात पोटभर खावयास न मिळाल्यामुळे हाल होऊन मरण पावल्याचे मागे सांगितलेच आहे. दुसरी बायको अवलाई, जिला जिजाई असेही एक दुसरे नाव होते, ती तुकारामाच्या मागे राहिली होती. अवलाईला पूर्वीच्या तीन मुली व दोन मुलगे असून तुकारामाच्या अंतकाळी ती पाच महिन्यांची गरोदर होती. तिला पुढे पुत्र होऊन त्याचे नाव नारायण असे ठेविले. पूर्वीच्या दोघा मुलांची नावे महादेव व विठोबा अशी होती आणि मुलींची नावे काशी, भागीरथी व गंगा अशी असून त्यास अनुक्रमे लोहगावचे मोझे, एलवाडीचे गाडे व जांबळीचे जांबूळकर यांच्या घराण्यात दिले होते. या मुलींच्या विवाहाची हकीकत महिपती मोठी चमत्कारिक सांगतो. मुली मोठ्या होत चालल्या तेव्हा अवलीस त्यांच्या लग्नाची चिंता रात्रंदिवस लागून राहिली. कारण उघडच होते की, तुकाराम विरक्त होऊन कोणताच निर्वाहाचा उद्योग करिनासा झाला असून त्या मुलींविषयी तो अगदी बेफिकीर होता; परंतु एके दिवशी अवलाईची ती कुरकुर ऐकून तो घरातून बाहेर गेला आणि रस्त्यात आपल्या जातीचे काही मुलगे खेळत होते त्यापैकी तिघास घरात घेऊन येऊन ब्राह्मणास बोलावून आणले आणि मग आपल्या मुलीस व त्या मुलास हळद वगैरे लावावयास लावून त्यांची एकदम लग्ने लावून दिली! हा विधी आटोपल्यावर त्याने जावयास दूधभात जेऊ घातला; पण ही वार्ता त्या मुलांच्या आईबापास कळताच त्यांना त्या गोष्टीचा मोठा संतोष वाटून, त्यांनी तेथे आपापल्या सबंधिजनांस बोलावून आणले आणि आपल्या खर्चाने चार दिवस लग्नाचा सोहळा उत्तम प्रकारे केला.

तुकारामाचा शेवटचा मुलगा नारायण हा इतर सर्व मुलांहून मोठा बुद्धिवान व धर्मशील निपजला. त्याच्याठायी भक्ती व वैराग्य ही लहानपणापासूनच उत्पन्न होऊन तो नेहमी हरिभजनात रत असे. आपल्या तीर्थरूपाचे सारे अभंग त्याने मुखोद्गत केले असून तो लवकरच नावाजण्यासारखे कीर्तन करू लागला. पुढे एके समयी शिवाजी राजा देहूगावी आला असता त्याने तेथील विठोबाचे दर्शन घेऊन तुकारामाच्या घरची कशी काय स्थिती आहे ते पाहण्यासाठी तो तेथे आला. तेव्हा नारायणाची ती वृत्ती

पाहून राजा फारच संतोष पावला आणि त्याने पूर्वी तुकारामास द्यावयासाठी तयार केलेली सनद त्या मुलाच्या नावे करून दिली. याविषयी आम्ही पूर्वी उल्लेख केलाच आहे.* हे निरंतरचे उत्पन्न मिळाल्यापासून तुकारामाने देहूगावी स्थापलेल्या विठोबाच्या देवळाचा खर्च व तेथील वार्षिक समारंभ मोठ्या थाटाने होऊ लागला.

नारायणबावा पुढे अगदी विरक्त झाला आणि त्याने आपली सर्व संपत्ती ब्राह्मणांकडून लुटवून द्वारका, काशी वगैरे तीर्थास प्रयाण केले. असे सांगतात की, त्याने महायात्रा करून अकरा कावडी काशीहून रामेश्वरी नेऊन तेथल्या शिवलिंगाची पूजा केली. याप्रमाणे यात्रा करून आल्यावर त्याने आपले उरलेले आयुष्य भगवद्भक्तीत घालविले. त्याचे दोघे वडील भाऊ नेहमी त्याच्या आज्ञेत असत. नारायणबावास पुत्र नसल्यामुळे त्याने आपल्या वडील भावाच्या दुसऱ्या मुलास दत्तक घेतले. याचे नाव उद्धवबावा. उद्धवबावाचा पणतू सदानंदबावा. या सदानंदबावाचे तिघे पुत्र नारायणबावा, रामचंद्रबावा व गंगारामबावा हल्ली हयात आहेत. यापैकी वडील नारायणबावा याजकडे देवस्थानाची सर्व व्यवस्था आहे.*

ह्या प्रकरणाचा शेवट करण्यापूर्वी येथे आणखी एका गोष्टीचा खुलासा करणे इष्ट दिसते. ती अवलीच्या स्वभावासंबंधाची होय. लोकप्रवाद असा आहे की, ही बाई कर्कशा असून हिने तुकारामास पुष्कळ त्रास दिला; परंतु आमची या प्रकरणी अगदी उलट समजूत झाली आहे. लोक म्हणतात त्याप्रमाणे अवलीचा स्वभाव मुळीच नसून ती मोठी पतिव्रता व चांगल्या स्वभावाची बायको होती. कारण असे पाहा की, ती मोठ्या सधन घराण्यातील मुलगी असून प्रारंभी चांगल्या सुखी कुटुंबात पडली असता, पुढे तिचा नवरा विरक्त होऊन धंदारोजगार सोडून हरिभजनी लागला, तेव्हा तिला पोटभर अन्न किंवा अंगभर वस्त्रही मिळेनासे झाले. आपल्या नवऱ्याचा व मुलांचा निर्वाह तिला दुसऱ्यांचे दळणकांडण करून करण्याची पाळी आली. अशा स्थितीमध्ये ती त्रासून जाणे स्वाभाविक होते. तरी तसा प्रकार तिच्याकडून फारसा कधीही झाला नाही. तुकारामाचे वचन ती सहसा मोडीत नसे. कोणास शिधा दे, कोणास जेऊ घाल अशी त्याची काहीना काही वर्दळ नेहमीची असे; पण ती साध्वी ती सारी मुकाट्याने सोशीत असे. ती त्याला दुरुत्तर असे बहुतकरून कधीही करीत नसे. रा. तुकारामतात्यांनी आपल्या गाथ्यात तिच्या दुरुत्तरसंबंधाचे काही अभंग छापले आहेत; परंतु ते फारसे यथार्थ नव्हेत असे आम्हाला वाटते. तुकारामाने संसारसंबंधाने जे वेळोवेळा उद्गार

* पृष्ठ ८७ पहा.

* ही माहिती रा. मांडगावकर यांनी लिहिलेल्या चरित्रावरून घेतली आहे.

काढले त्यामधे स्त्रिया भक्तिपरायण पुरुषास कोणत्याप्रकारे दुरुत्तरे बोलतात याचा मासला दिला आहे. ते म्हणजे अवलीच्याच तोंडचे सारे शब्द असावे, असे म्हणणे बरोबर नाही. आता एवढे खरे की, कुटुंबभरणाचा सर्वच बोजा तिच्यावर पडल्यामुळे ती कधी कधी त्रासून त्याला काही अधिकउणे बोलली असेल; परंतु तेवढ्यावरून ती दुर्भाषणी व कजाग होती असा तर्क करणे मुळीच योग्य नव्हे.

अवलीचे आपल्या पतीवर फारच प्रेम होते याविषयीचे मात्र पुष्कळ दाखले आहेत. उदाहरणार्थ, असे पाहा की, ती मोलमजुरी करून दाणे मिळवी किंवा आपल्या माहेराहून कधी कधी दाणागोटा किंवा पैसाअडका आणीत असे, तरी घरात शिजविलेले अन्न आपल्या नवऱ्याने सेवन केल्यावाचून ती कधाही जेवीत नसे. तुकाराम अगदी विरक्त झाल्या दिवसापासून तो कोठेतरी जाऊन बसे. तिकडे ती त्याला शोधीत जाऊन त्याला जेवावयास घरी घेऊन येत असे. मागे सांगितलेच आहे की, तो ग्रंथाध्ययन व मनन करण्याकरिता भांडार पर्वतावर एकांतात जाऊन बसे. तेथे ती त्याला भाकरतुकडा घेऊन रोज दोन प्रहरी जात असे. हा पर्वत गावापासून तीन कोस दूर होता. तरी ती नित्यनेमाने त्याला तेथे भाकरपाणी पोचवून घरी येऊन मग स्वत: जेवीत असे. तुकाराम वेडा झाला आहे अस समजून लोक त्याला वाटतील ती कामे करावयास सांगू लागले, तेव्हा ती त्यांच्यावर रागवून त्यास शिव्याशाप देत असे. अशी ती आपल्या नवऱ्यास नेहमी जपत असे. तिचे त्याच्यावर अगदी पंचप्राण असत असे महिपती म्हणतो. हा चरित्रकार एके ठिकाणी म्हणतो की, अवली कधी कधी तुकारामास कठीण शब्द बोलत असे; पण ती त्याला कधी शिव्या देई किंवा त्याच्या मर्जीविरुद्ध वागे, असा उल्लेख तो कोठेही करीत नाही. आता कठीण शब्दांच्या संबंधाने पाहता ते अवलीच्या मुखावाटे वेळोवेळा येणे साहजिक होते. कारण तुकाराम उदरनिर्वाहाचा कोणताही धंदा करीत नसता घरी वेळावेळा कोणाला तरी घेऊन येत असे व त्याला शिधासामग्री किंवा अन्न पुरविण्यास तिला सांगत असे. एकदा तर तिने आपले एकचे एक लुगडे स्नान करताना सोडून ठेविले असता या विरक्त बुवांनी ते भिकारणीस दिले! अशा प्रसंगी तिच्या तोंडून एखादा कठीण शब्द निघाला तर त्याबद्दल ती दोषी ठरत नाही. यासंबंधाने तिला दोष देणारांनी हे पक्के लक्षात ठेवावे की, ती आपल्या नवऱ्याप्रमाणेच विरक्त झालेली नसून तिला संसार करावयाचा होता. तेव्हा वर निर्दिष्ट केल्यासारख्या प्रसंगी कोणत्याही साध्वी स्त्रीच्या हातून अवलीसारखेच वर्तन झाले असते. यासाठी तिला दोष देणारांनी तिच्या एकंदर स्थितीचा व आचरणाचा चांगला विचार करावा.

आपला नवरा विरक्त होऊन विठ्ठलभजनी लागल्यामुळे आपल्या संसाराची धूळधाण झाल्याबद्दल तिला पहिल्या पहिल्याने कितीही वाईट वाटले असले, तरी त्याच्या ठायींच्या अप्रतिम व अलोकसामान्य गुणांमुळे त्याची सर्वत्र ख्याती होऊन आसपासच्या गावातले लोक त्याच्या भजनी लागले, तेव्हा तिच्या ठायी आपल्या नवऱ्याविषयी अभिमान व पराकाष्ठेची प्रीती उत्पन्न होणे साहजिक होते आणि ह्या वृत्ती अवलीच्या चित्तात पूर्णपणे विकास पावल्या होत्या, याविषयी आम्हास तर मुळीच शंका वाटत नाही. नाही तर तुकाराम केवळ विदेही होऊन जिकडेतिकडे हिंडू लागला तेव्हा तिला त्याचा कंटाळा येऊन ती आपल्या नवऱ्याचे घर सोडून माहेरी जाऊन सुखाने राहिली असती; परंतु तिने असे कधीही केले नाही. ती नेहमी देहूगावीच राहून तेथे दळणकांडण वगैरे करून आपला व आपल्या मुलांचा निर्वाह करीत असे. तिचे माहेर चांगले संपन्न असल्याकारणाने ती तिकडून नेहमी दाणागोटा व पैसाअडका आणीत असे; पण आपल्या नवऱ्याचे घर सोडून जाण्याची बुद्धी तिला कधीही झाली नाही.

तुकारामालाही ही स्वपत्नीची आपल्यावरील निष्ठा पूर्णपणे अवगत होती. तो कोठेही गेला व तेथे कितीही दिवस राहिला तरी तो आपल्या बायकोमुलांस विसरत नसे. तो देहूस आला म्हणजे आधी घरी जाऊन त्यांचा समाचार घेत असे. त्यांच्या चरितार्थासाठी स्वत: श्रम करण्याचे जरी त्याने सोडले होते, तरी त्यांच्यावरचे त्याचे प्रेम कमी झाले नव्हते; परंतु विठ्ठलभक्ती व लोकसेवा यामध्ये आपल्या उरलेल्या आयुष्याचा व्यय करण्यातच खरे जीवित सार्थक्य आहे, असे त्यास वाटत असल्या कारणाने व व्यवहारात दक्षतेने वागण्यास जे गुण अंगी असावे लागतात, त्यांचा त्याच्या ठायी मुळीच विकास झाला नसल्यामुळे त्याला कोणत्याही अर्थप्राप्तीच्या व्यवसायात निमग्न होणे हितावह वाटत नसे. पुन्हा अवलीचे लक्ष संसाराकडे पूर्णपणे असून ती आपला व आपल्या मुलांचा चरितार्थ चालविण्यास समर्थ आहे, असे जेव्हा त्याच्या प्रत्ययास आले तेव्हापासून त्याने संसाराचा विचार मुळीच सोडला होता. यावरून पाहता ज्या स्त्रीच्या साहाय्याने ईश्वरभक्ती व जनसेवा या अत्यंत महत्त्वाच्या परम कल्याणकारक व्यवसायांमध्ये आपले आयुष्य निर्वेधपणे चालविता आले, तिच्याविषयी तुकारामाच्या मनात प्रेम असणे साहजिक होते आणि एकंदरीत पाहता अवलीच्या अंगच्या या अलौकिक गुणांमुळे तुकारामास नि:संगपणे आपल्या इष्ट व्यवसायात निमग्न होता आले, हा तिचा एकंदर महाराष्ट्रावर किंबहुना एकंदर मानवजातीवर मोठाच उपकार झाला आहे असे मानले पाहिजे. तेव्हा अशा ह्या साध्वीवर नाही नाही ते दोषारोप करणे आमच्या मते कृतघ्नपणाचे काम आहे.

आता येथे कोणी अशी शंका घेतील की, तुकारामाच्या अप्रतिम उपदेशबलाने आसपासच्या पुष्कळ स्त्रीपुरुषास विरक्तता प्राप्त होऊन ती विठ्ठलभजनी लागली असता, त्याच्या त्या उपदेशाचा परिणाम खुद्द अवलाईवरच का मुळीच झाला नाही? (यावरून पाहता ती मोठी कठोर मनाची व अल्लड स्वभावाची बायको असावी. या शंकेचे समाधान अर्थात असे की, अवलाईने जर तुकारामासारखीच वृत्ती धारण करून सर्व संगपरित्याग केला असता तर तिच्या मुलांचे संगोपन चांगलेसे झाले नसते. पुन्हा तिला व तिच्या नवऱ्याला भिक्षापात्राचा अवलंब करून स्वचरितार्थ चालवावा लागला असता; परंतु भिक्षा मागणे हे मोठे निंद्य कर्म आहे असा तिच्या नवऱ्याचा जनास नेहमी बोध असे. संसार करीत असता विठ्ठलभक्ती करण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाही, असा त्याचा सिद्धांत होता आणि त्याचा उपदेश ऐकून जे जे विठ्ठलभक्तिपरायण झाले त्या सर्वांनी म्हणजे संसाराचा त्याग केला होता अशातली काही गोष्ट नाही. तेव्हा मनुष्य स्वभावास व निसर्गनियमास अनुसरून होणाऱ्या या स्वपतीच्या बोधानुसार तिने स्ववर्तन आमरण ठेविल्याबद्दल तिला दोष देण्यात काय अर्थ आहे? आणखी असे की, ती विठ्ठल भक्तीविषयी स्वत: उदासीन होती असाही उल्लेख महिपतीने कोठे ही केलेला नाही. प्रारंभी तिने थोडास विठ्ठलभक्तीविषयी विरोध प्रकट केला असला तरी पुढे आपल्या पतीचे कीर्तितेज सर्वत्र फाकून त्याचे अंतेवासित्व मोठमोठ्या लोकांनी जेव्हा पत्करले तेव्हा त्याची खरी योग्यता व विठ्ठलभक्तीचे खरे माहात्म्य तिच्या लक्षात आले असावे, यात काही संदेह नाही. तुकाराम बाहेरगावी हिंडू लागला म्हणजे देहूगावच्या देवस्थानाची एकंदर व्यवस्था ती मोठ्या आस्थेने व भक्तीने ठेवीत असे. विठ्ठलाविषयी तिच्या मनात विरोधभाव असता तर तिने त्या देवस्थानाकडे ढुंकूनही पाहिले नसते. त्याचप्रमाणे तुकारामाचे देहूगावी कीर्तन किंवा भजन होऊ लागले म्हणजे ते ऐकावयास ती मोठ्या आवडीने येऊन बसत असे.

मागे एके ठिकाणी सांगितले आहे की, तुकाराम संसारास त्रासून अगदी विरक्त होऊन भांडारपर्वतावर जाऊन बसू लागला तेव्हा अवली दररोज दुपारी भाकरपाणी घेऊन त्या पर्वतावर जात असे. या तिच्या नित्यक्रमाप्रमाणे एके दिवशी ती त्या पर्वतावर चढत असता तिच्या पायास काटा लागून तिला मोठी इजा झालेली पाहून तुकाराम पुन्हा त्या पर्वतावर जाऊन बसेनासा झाला. आपल्या स्त्रीस नेहमी त्रास देण्यापेक्षा आपणच गावात राहावे असे त्याला वाटले. पुढे काही दिवसांनी पुन्हा त्याला संसाराचा कंटाळा येऊन तो इंद्रायणीचे प्रात:काळी स्नान करून व विठोबाचे

पूजनार्चन करून कोठे तरी वनात जाऊन सर्व दिवसभर बसू लागला. यावेळी अवलाईचे वय अल्प असल्यामुळे तिच्या अंगी म्हणण्यासारखी समजूत आली नव्हती. यास्तव ती नवऱ्यास जेव्हा तेव्हा टाकून बोलत असे. कोणा अतिथाभ्यागतास त्याने घरी आणले तर ती त्याच्यावर दातओठ चावीत असे. या तिच्या स्वभावास त्रासून तो घरदार सोडून वनात जाऊन बसू लागला असे महिपती म्हणतो. याप्रमाणे त्याने दोन महिनेपर्यंत एकसारखा क्रम चालविला होता. कोणी भाकरतुकडा आणून दिल्यास खावा आणि कोठेतरी एकांतात जाऊन बसावे असा त्याचा वर्तनक्रम पाहून अवलीस अतिशयित दु:ख वाटू लागले. तिला कोठेच चैन पडेनासे होऊन आपल्या नवऱ्यास पिसे लाविल्याबद्दल ती देवास दोष देऊ लागली. एके दिवशी निरुपाय होऊन तिने तुकारामास वाटेत गाठून त्याचा पदर धरला आणि ती त्याला पुसू लागली की, तुम्ही जर मजकडे ढुंकूनही न पाहण्याचा निर्धार केला तर मी काय करावे? आपल्या वाचून माझा संसार कसा चालेल? मला व माझ्या मुलांना सोडून कोठे तरी फिरत राहणे तुम्हास शोभते काय? याप्रमाणे अवलाईने त्याच्याशी तंडून त्यास घरी येण्याचा आग्रह केला. तेव्हा तुकारामाने तिला असे सांगितले की, तू विठ्ठलाचे पाय आठवीत जा, म्हणजे तुला संसारामध्ये कधीही विपत्ती येणार नाही. माझी तुला काय गरज आहे? तरी अवलाईने फारच आग्रह केल्यावरून तुकारामाने म्हटले की, तू माझ्या विचाराने नेहमी वागण्याचे वचन देशील तर मी घरी येतो. तेव्हा अवलाईने होय म्हणून आणभाक केली. मग तुकाराम तिच्याबरोबर घरी गेला. तो दिवस एकादशीचा असल्यामुळे तुकारामाचे कीर्तन ऐकण्याच्या उद्देशाने तुकारामाकडे लोक आले असता, अवली त्याच्या अंगावर वसकन आली. तेव्हा तुकारामाने तिची अशी समजूत केली की, हे असे साऱ्यागावचे लोक आपल्याकडे येतात हे आपले मोठे भाग्य समज. त्यांचा अनादर न करिता त्यांचा यथोचित मानसन्मान करावा हे तुला योग्य होय. हे नवऱ्याचे शब्द ऐकून अवली थोडीशी शांत झाली. त्या दिवशी तुकारामाने आपल्या घरीच कीर्तन करण्याचा बेत करून अवलीस कीर्तन ऐकावयास बसण्याचा आग्रह केला. तेव्हा ती निरुपाय होऊन ते ऐकावयास बसली. या प्रसंगी तुकारामाने आपल्या स्त्रीस उद्देशून नाना प्रकारी बोध केला. या समयी स्वस्त्रीस बोध होण्यासाठी त्याने जे कित्येक अभंग म्हटले त्यापैकी अकरा येथे देतो:-

*पिकल्या शेताचा आम्हां देतों वांटा । चौधरी गोमटा पांडुरंग ।।१।।*
*सत्तर टक्के बाकी उरली मागे तो हा । मागें झडले दहा आजीवरी ।।२।।*
*हांडा भांडी गुरे दाखवी ऐवज । माजघरीं बाज बैसलासे ।।३।।*
*मज यासी मांडता जाब नेदी बळें ।। म्हणे एका वेळे घ्याल वांटा ।।४।।*
*तुका म्हणे स्त्रिये काय वो करावें । नेदितां लपावे काय कोठें ।।५।।*

*करिता विचार अवघे एक राज्य । दुजा कोण मज पाठी घाली ।।१।।*
*कोण्या रीती जावे आम्ही वो पळोनी । मोकळे अंगणीं मागें पुढें ।।२।।*
*काय तें गव्हाणें हिंडावीं वो किती । दूत ते लागती याचे पाठी ।।३।।*
*कोठें याची करू गेलों कुळवाडी । आता हा न सोडी जीवे आम्हां ।।४।।*
*होऊनी बेबाख येथेचि रहावें । देईल ते खावे तुका म्हणे ।।५।।*

*नागवूनी एके नागवीच केलीं । फिरोनिया आली नाहीं येथें ।।१।।*
*भेणे सुती कोणी न घेती पालवी ।। करुनिया गोवीं निसंतान ।।२।।*
*एकें ती गोविलीं घेऊनी जमान । हासतील जन लोक तयां ।।३।।*
*सरले तयासी घालितो वैकुंठी । न सोडी हे साटी जीवें जाली ।।४।।*
*तुका म्हणे जावो जाणोनी नेणतीं । सापडलों हातीं याचे आम्ही ।।५।।*

*आतां तू तयास होई वो उदास । आरंभला नास माझ्या जीवा ।।१।।*
*जरूर हे जाले तुज कां नावडे । उपास रोकडे येती आतां ।।२।।*
*वरे म्या तुझिया जीवाचे ते काय । व्हावे ते पाहे विचारूनी ।।३।।*
*तुज मज तुटी नव्हे या विचारे । सहित लेकुरे राहो सुखे ।।४।।*
*तुका म्हणे तरी तुझा माझा संग । घडेल वियोग कधी नव्हे ।।५।।*

*काय करू आता माझिया संचिता । तेण जीववित्ता साटी केली ।।१।।*
*न म्हणावे कोणी माझें हें करणे । हुकुम तो येणें देवें केला ।।२।।*
*करूनि मोकळा सोडिलो भिकारी । पुरविली तरी पाठी माझी ।।३।।*
*पाणिया भोपळा जेवावया पानें । लाविलो वो येणे देवे आम्हा ।।४।।*
*तुका म्हणे यासी नाहीं वो करुणा । आहे नागवणा ठावा मज ।।५।।*

*नको धरूं आस व्हावे या बाळास । निर्माण ते त्यांचे त्यास आहे ।।१।।*
*आपुला तू गळा घेई उगवूनी । चुकवीं जाचणी गर्भवास ।।२।।*
*ऐवज देखोनि बांधितील गळ । म्हणोनि निराळा पळतसे ।।३।।*
*देखोनियां त्यांचा अवघड मार । कापे थरथर जीव माझा ।।४।।*
*तुका म्हणे जरी आहे माझी चाड । तरी करी वाड चित्त आता ।।५।।*

*भले लोक तुज बहु मानवती । वाढेल या कीर्ती जगामाजी ।।१।।*
*म्हणे मेली गुरे भांडीं नेली चोरें । नाहींत लेकुरें जालीं मज ।।२।।*
*आस निरसूनी कठिण हें मन । करी वो समान वज्र तैसें ।।३।।*
*किंचित हे सुख टाकी वो थुंकोनी । पावसील धनि परमानंद ।।४।।*
*तुका म्हणे थोर चुकती सायास । भवबंध पाश तुटोनिया ।।५।।*

*ऐक हे सुख होईल दोघांसी । सोहळे हे ऋषि करिती देव ॥१॥*
*जडितविमाने बैसविती माने । गंधर्वांचें गाणे नामघोष ॥२॥*
*संत महंत सिद्ध येतील सामोरे । सर्व सुखा पुरे कोड तेथे ॥३॥*
*आलिंगूनी लोळों त्यांच्या पायांवरी । जाऊं तेथवरी मायबापें ॥४॥*
*तुका म्हणे तया सुखा वर्णं काय । जेव्हां बापमाय देखों डोळां ॥५॥*

*देव पाहावया करी वो सायास । न धरी हे आस नाशिवंत ॥१॥*
*दिन शुद्ध सोम सकाळीं पातला । द्वादशी पडला पर्वकाळ ॥२॥*
*द्विजा पाचारूनि शुद्ध करी मन । देई वो हे दान यथाविध ॥३॥*
*नको चिंता करू वस्त्रा या पोटाची । माउली आमुची पांडुरंग ॥४॥*
*तुका म्हणे दुरी सांगतों पाल्हाळीं । परी तो जवळी आहे आम्हां ॥५॥*

*सुख हे नावडे आम्हां कोणा बळे । नेणसी अंधळे जालीसी तूं ॥१॥*
*भूकतान कैसी राहिली निश्चळ । खुंटले चपळ मन ठायीं ॥२॥*
*द्रव्य जीवाहुनी आवडे या जना । आम्हांसी पाषाणाहूनि हीन ॥३॥*
*सोयरे सज्जन जन आणि वन । अवघे समान काय गुणें ॥४॥*
*तुका म्हणे आम्हा जवळीच आहे । सुख दुःख साहे पांडुरंग ॥५॥*

*गुरुकृपे मज बोलविलें देवें । होईल ते घ्यावे हित कांहीं ॥१॥*
*सत्य देवे माझा केला अंगीकार । आणीक विचार नाहीं आतां ॥२॥*
*होई बळकट घालूनियां कास । हाचि उपदेश तुज आतां ॥३॥*
*सडा संमार्जन तुळसीवृंदावन । अतिथिपूजन ब्राह्मणाचें ॥४॥*
*वैष्णवांची दासी होई सर्वभावे । मुखी नाम घ्यावे विठोबाचे ॥५॥*
*पूर्णबोध स्त्रीभ्रतारसंवाद । धन्य जिहीं वाद आइकिला ॥६॥*
*तुका म्हणे आहे पांडुरंगकथा । तरेल तो चित्ता धरील कोणी ॥७॥*

हा अगदी मनापासून व पुऱ्या कळवळ्याने केलेला बोध तिच्या मनावर इतका ठसला की, ती काही वेळपर्यंत विरक्त होऊन हरिभजनात अगदी गढून गेली. तिला आपल्या पतीप्रमाणेच संसाराचा वीट येऊन ती सर्वस्व त्याग करण्यास तयार झाली । तिने आपल्या घरचे भांडेकुंडे, दाणागोटा, गुरेढोरे वगैरे सर्वकाही ब्राह्मणांकरवी लुटविले! याप्रमाणे तिची वृत्ती थोडा वेळ झाली खरी, तथापि ती लवकरच शुद्धीवर येऊन पुन्हा पक्की संसारी बनली. तिच्या वृत्तीत हा असा पालट होण्यास असे कारण झाले की, एके दिवशी तिने आपले एकचएक जुने लुगडे परसात वाळू घातले असता तुकारामाने ते एक महारीण भिक्षा मागावयास आली होती, तिला न्यावयास सांगितले. हे अवलीला समजले तेव्हा तिला पराकाष्ठेचा राग आला आणि ती आपल्या नवऱ्यास दिलेले वचन मनास न आणिता पुन्हा संसार करू लागली.

या एका गोष्टीवरून अवलाईची एकंदर स्थिती वाचकाच्या लक्षात सहज येणारी आहे. वर सांगितलेली गोष्ट घडल्या दिवसापासून अवलाईचे ईश्वरभक्तीकडे विशेष लक्ष लागले. तरी तिने घरसंसार सोडून आपल्या नवऱ्यासारखी वृत्ती कधीही धरिली नाही आणि ही अशी तिची वृत्ती बनली नाही, हे महाराष्ट्राचे मोठेच भाग्य होय; कारण अवली तुकारामाप्रमाणे संसाराविषयी उदास झाली असती, तर त्या उभयतांची काय दशा झाली असती ते सांगवत नाही. त्याचप्रमाणे तुकारामाच्या हातून महाराष्ट्राची आध्यात्मिक उन्नती होण्यास साहाय्य झालेले जे आज दिसत आहे तितके झाले असते की नाही याची आम्हास शंका वाटते. हे आपल्या स्त्रीचे आपल्यावर होणारे उपकार तुकाराम पूर्णपणे जाणून होता. म्हणूनच तो तिला सोडून कधीही गेला नाही.

येथे प्रसंगानुरोधाने तुकारामाविषयी आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे इष्ट दिसते. ही गोष्ट अर्थात त्याच्या एकपत्नीव्रतासंबंधाची होय. तरुण वयामध्ये त्याच्या मातापितरांनी त्याची दोन लग्ने केली होती; तरी पुढे पहिली बायको वारल्यावर तो अवलीशिवाय इतर सर्व स्त्रियास माता व भगिनी लेखीत असे. यासंबंधाने एक गोष्ट घडून आली तिचे येथे निरूपण करितो. तुकारामाचे कीर्तन ऐकावयास पुरुषांप्रमाणे काही स्त्रियाही नेमाने येत असत. या स्त्रियांपैकी एका सुंदर स्त्रीच्या मनात त्याच्याविषयी व्यभिचारबुद्धी उत्पन्न होऊन, एके दिवशी एकांत पाहून हा आपला मनोदय तिने त्यास निवेदन केला. तेव्हा तिच्या प्रेमकटाक्षास व मोहक भाषणास यत्किंचितही न भुलता त्याने तिला नानापरी उपदेश करून तिच्या मनातली पापवासना काढून टाकली व तिला पुन:सन्मार्गवती केले. या प्रसंगी त्याने त्या स्त्रीस संबोधून जे अभंग म्हटले त्यापैकी दोन येथे देतो:-

*स्त्रियांचा तो संग नको नारायणा । काष्ठा या पाषाणमृत्तिकेच्या ।।१।।*
*नाठवे हा देव न घडे भजन । लांचविलें मन आवरेना ।।२।।*
*दृष्टिमुखे मरण इंद्रियांच्या द्वारें । लावण्य ते खरे दु:खमूळ ।।३।।*
*तुका म्हणे जरी अग्नि झाला साधु । परी बाधू संघटणें ।।४।।*

*पराविया नारी रखुमाईसमान । हे गेले नेमून ठायीचेंचि ।।१।।*
*जाई वो तूं माते न करी सायास । आम्ही विष्णुदास नव्हों तैसे ।।२।।*
*न साहावे मज तुझें हे पतन । नको हे वचन दुष्ट वदों ।।३।।*
*तुका म्हणे तुज पाहिजे भ्रतार । तरी कां इतर लोक थोडे ।।४।।*

या गोष्टीवरून त्याचा आपल्या मनावर व इंद्रियांवर किती दाब होता हे व्यक्त होते. त्याचप्रमाणे त्याचे एकपत्नीव्रत किती कडकडीत होते हेही दिसून येते. अवलीचेही पतिव्रत्य अगदी अढळ असून शेवटपर्यंत ती आपल्या नवऱ्यावर एक भावाने प्रीती करीत असे.

●●●

# चमत्कार प्रकरण

येथपर्यंत तुकारामाचे यथोपलब्ध जीवनवृत्त संक्षेपत: लिहिले. हे लिहिताना केवळ विश्वसनीय व ऐतिहासिक अशाच गोष्टींचे निरूपण करण्याची आम्ही खबरदारी घेतली आहे. या साधूचे महिपतिकृत ओवीबद्ध चरित्र वाचले असता व रा. रा. विष्णुशास्त्री पंडित व रा. रा. शंकर पांडुरंग पंडित या विद्वद्द्वयाने सरकारच्या आश्रयाने छापलेल्या गाथेच्या प्रारंभी रा. रा. जनार्दन सखाराम गाडगीळ यांनी महिपतीच्या चरित्राचे गद्यात्मक सार दिले आहे ते व रा. रा. रामचंद्र विष्णू मांडगावकर यांनी छापलेल्या गाथेच्या प्रारंभी लिहिलेले तुकारामचरित्र ही दोन्ही वाचली असता त्यात चमत्कार प्रकरण बरेच आढळते; परंतु जुन्या व भोळ्या समजुतीच्या लोकास रुचेल असे या साधुपुरुषांचे चरित्र लिहिण्याचे जे हे उदाहरण या विद्वानांनी घालून ठेविले आहे, त्याचे अनुकरण करणे सध्याच्या स्थितीत इष्ट नाही असा आमचा समज झाल्यामुळे आम्ही हे चमत्कारप्रकरण गाळले आहे. असे करण्याचे मुख्य कारण एवढेच की, अद्भुत व चमत्कृतिजनक गोष्टींची रेलचेल ऐतिहासिक पुरुषाच्या चरित्रांत असल्याने त्यात निर्दिष्ट केलेली प्रत्येक गोष्ट सत्य आहे किंवा कसे याविषयी साधारण समजुतीच्या माणसाच्या मनात संशय उत्पन्न होतो आणि अशा महापुरुषांच्या चरित्ररूप ग्रंथास कल्पित गोष्टींच्या वर्गात लोटून देण्याकडे जनांची प्रवृत्ती होते. यामुळे महापुरुषचरित्रवाचनाने मनावर इष्ट परिणाम व्हावा अशी जी अपेक्षा असते ती व्यर्थ होते. चमत्कृतिमिश्रित सत्याची गोष्टच अशी आहे. आमच्या देशाचा प्राचीन इतिहास लोपल्याबद्दल विद्वज्जन आज खेद करीत आहेत, याचे इंगित याच गोष्टीत आहे. आमच्या संस्कृत भाषेमध्ये एवढे मोठे पुराण कथांचे ग्रंथ असता आमचा इतिहास लोपला आहे असा सिद्धांत विद्वान लोक का करितात, याचे भाविक जनास मोठे नवल वाटेल; परंतु इतिहास कसा असला म्हणजो तो विश्वसनीय होतो याविषयी सत्यजिज्ञासू पाश्चात्त्यांच्या परिश्रमाने योग्य निर्णय झाला आहे. या त्यांच्या कसोटीस आमचे प्रचंड पुराणकथाग्रंथ लावून पाहिले असता त्यास इतिहासग्रंथ मुळीच म्हणता येणार नाही. आता हे कोणीही कबूल करील की, ह्या पुराण ग्रंथाचे ज्ञान मूळ खऱ्या गोष्टीच्याच आधारावर बहुत करून केलेले आहे. तथापि त्यात चमत्कृतिप्रिय कवींनी लोकरंजनाच्या हेतूने पुष्कळ अद्भुत व काल्पनिक भाग संमिश्रित केल्यामुळे त्या सत्य गोष्टी लुप्तप्राय झाल्या. ह्या

सत्यइतिहास– लोपामुळे आमच्या प्राचीन स्थितीचे व पूर्वी होऊन गेलेल्या महापुरुषांचे यथार्थ ज्ञान होण्यास किती प्रकारे प्रत्यवाय येत आहे, याचा जो शांतपणे विचार करील तो यापुढे तरी असा प्रकार घडू न देण्याविषयी निश्चयाने झटेल. गेल्या पाचसहा शतकामध्ये आमच्या ह्या भरत भूमीमध्ये महान महान साधुपुरुष निर्माण होऊन त्यांनी आपल्या उज्ज्वल चरित्र महिम्याने या भूमीस पावन केले आहे. तेव्हा त्यांचे मिळेल तेवढे ऐतिहासिक अतएव विश्वसनीय असे वृत्त लिहून ठेवण्याचा प्रयत्न करणे हे अत्यंत इष्ट होय. महिपतीने या महापुरुषांची चरित्रे आपल्या रसाळ वाणीने लिहून ठेविली आहेत. त्यात त्याने पूर्वपद्धतीस अनुसरून व भाविक लोकात प्रचलित असलेल्या दंतकथांचा संग्रह करून चमत्कार व अद्भुत गोष्टी यांचे यथेष्ट ग्रंथन केले आहे. या त्याच्या पद्धतीचे प्रस्तुत काली अवलंबन करणे सहसा इष्ट नव्हे.

आता येथे आणखी अशी शंका उद्भवण्यासारखी आहे की, महिपतीसारख्या प्रेमळ व भाविक मनुष्याकडून हा असंभाव्य गोष्टींचे वर्णन करण्याचा प्रकार कसा घडला? याचे समाधान एक तर उघडच आहे की, भाविक लोकांची सामान्यत: अशी समजूत आहे की, पुराणांतरी देवाच्या अवतारांच्या कथा सांगितल्या आहेत. त्याप्रमाणेच बौद्धावतारीसुद्धा गोष्टी घडणे स्वाभाविक आहे. आता पंढरीचा विठोबा हा बौद्धावतार आहे असे महाराष्ट्रातील भाविक लोकास आज कैक शतके वाटत आले आहे. मागल्या युगात रामकृष्णादिकांचे अवतार होऊन त्यांनी इतर संसारी जनांप्रमाणे सर्वकाही ऐहिक व्यापारांमध्ये निमग्न होऊन आपल्या पवित्र चरित्रमहिम्याने हा लोक पावन केला. अशा अवतारांपैकी बौद्धावतार नसून तो कोठे तरी निश्चल व उदासीन असा असावयाचा, अशी हिंदू लोकांची समजूत आहे. पंढरीच्या विठोबाच्या संबंधाने अनेक अद्भुत कथा आहेत, त्या सगळ्या खऱ्या नसल्या तरी त्यास प्रारंभी काहीतरी आधार असावा असा आमचा तर्क आहे. येथे त्या संबंधाने विशेष पाल्हाळ करण्याचे प्रयोजन नाही याप्रमाणे पंढरीच्या विठोबास साक्षात देवावतार मानल्यामुळे त्या देवस्थानाचे माहात्म्य महाराष्ट्रात उत्तरोत्तर वाढतच गेले. बौद्धावतारी देव इहलोकी काहीच करणार नाही अशी जरी कल्पना सर्वत्र रूढ आहे, तरी त्या देवाची जे महाभगवद्भक्त एकनिष्ठपणे सेवा करितात त्यास तो प्रसन्न होऊन त्यांशी बोलतो, चालतो व त्यांनी दिलेले खातो पितो, असा समज होणे स्वाभाविक आहे. ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम वगैरे जे अत्यंत प्रेमळ व भाविक भगवद्भक्त झाले त्यांच्याशी हे पंढरपूरचे सगुणब्रह्म बोलत चालत होते असे सामान्य लोकांस वाटत असे. त्या भगवद्भक्तांच्या चरित्रात जे अलौकिक प्रसंग घडून आले ते सारे भगवत्साहाय्याने तसे घडले असावे अशी त्यांची कल्पना

होणे साहजिक होते. दुसरे असे की, जगातील एकंदर व्यापार देव करीत आहे असा त्या भगवद्भक्तांच्या बुद्धीचा निश्चय झाला होता; यास्तव ते आपल्याकडून घडणारी किंवा आपणास घडणारी प्रत्येक गोष्ट देवच करीत आहे असे ते नेहमी म्हणत. एखाद्या संकटप्रसंगापासून ते काही तरी अनपेक्षित गोष्टी घडून येऊन मुक्त झाले असता ते नेहमी देवाचा त्याबद्दल स्तव करून म्हणत की, देवकृपेनेच आपण त्यातून सुटलो. हे त्यांचे म्हणणे त्या भाविक जनांच्या समजाप्रमाणे असल्याकारणाने त्यात त्यांनी सत्यापलाप केला असा दोष त्यास मुळीच देता येत नाही. याप्रमाणे अत्यंत नीतिमान साधुसंतांच्या मुखावाटे निघणाऱ्या ईश्वरपरायणतेच्या उद्गारांवर भाविक लोकांचा विश्वास दृढ होऊन महाराष्ट्रात साधुसंतांच्या हातून घडलेल्या अनेक चमत्कारांचे प्रवाद प्रचलित झाले. ह्या सामान्य जनात चालू असलेल्या अद्भुत दंतकथा ऐकून घेऊन त्या संतचरित्ररूपाने ग्रंथित केल्याबद्दल महिपतीस दोष देण्यात काहीच अर्थ नाही. तोही अशा भाविक लोकांपैकीच एक असल्या कारणाने त्याने आपल्या समजुतीप्रमाणे संतजनांची चरित्रे लिहून ठेवून महाराष्ट्रजनास अक्षयींचे ऋणी केले आहे.

असो. आता तुकारामाच्या हातून जे चमत्कार घडले म्हणून महिपती लिहितो, त्याविषयी खुद्द तुकारामाच्या ग्रंथात काही उल्लेख आहे की काय ते पाहू जाता, त्याने आपल्या हातून ते चमत्कार घडल्याचा उपलब्ध ग्रंथात मुळीच कोठेही उल्लेख केलेला आढळत नाही. तर उलट या सामान्य जनसमजुतीप्रमाणे त्याच्याकडून चमत्कार व्हावे अशी लोकांनी अपेक्षा केली असता त्याने आपली तत्संबंधाने दुर्बलता प्रकट केलेली आढळते. या प्रकरणी काही उदाहरणे देऊन आमच्या या विधानाचे सत्यत्व दर्शवितो.

मागे सांगितलेच आहे की, कोणी ब्राह्मण व्युत्पत्ती प्राप्त व्हावी म्हणून आळंदीस ज्ञानदेवाच्या समाधीपाशी धरणे धरून बसला असता त्यास तुकारामापाशी जाण्याचा दृष्टांत झाला. त्याप्रमाणे तो ब्राह्मण तुकारामापाशी आला असता त्याने जे अभंग त्यास देण्याकरिता लिहिले त्यामध्ये व पुढे तो बाह्मण तुकारामाने दिलेले अभंग व नारळ टाकून गेला तेव्हा तुकारामाने ज्ञानदेवास जे अभंगरूप पत्र लिहिले त्यामध्ये त्याने हा चमत्कार करण्याविषयीचे आपले दुर्बलत्व स्पष्टपणे प्रकट केले आहे. त्याचप्रमाणे व्युत्पत्तीचा हव्यास न धरिता भगवद्भक्तीचा अवलंब करण्याविषयी त्या ब्राह्मणास त्यात उपदेश केला आहे. ह्या वर सांगितलेल्या तुकारामाच्या अभंगांपैकी काही अभंग आम्ही मागे दिले आहेत. आता हे अभंग कोंडभट्टास मिळाले तेव्हा त्याला व्युत्पत्ती प्राप्त झाली, असा उल्लेख महिपतीने केला आहे. या प्रवादाचे इंगित अर्थात असे की, व्युत्पत्तिप्राप्तीच्या आशेने आलेल्या ब्राह्मणासाठी ते अभंग तुकारामाने केले

असल्याकारणाने त्यांचा इष्ट प्रभाव कोणावर तरी होणे शक्य होते, अशी समजूत भाविक लोकांची असल्यामुळे कोंडभट्टावर त्यांचा तो परिणाम झाला असावा, असा तर्क होणे साहजिक होते. पुन्हा व्युत्पत्तिप्राप्तीहूनही विशेष श्रेयस्कर जी साधुसंगती ती कोंडभट्टास प्राप्त झाल्यावर त्याने आपली कृतकृत्यता दर्शित केल्यावरूनही लोकांचा तसा ग्रह होणे साहजिक आहे. शिवाय आम्ही यथास्थली दर्शविल्याप्रमाणे रामेश्वरभट्टाच्या साहाय्याने त्याने संस्कृत ग्रंथांचे यथावकाश अध्ययन केल्यावर तर त्याच्या ठायी त्या अभंगाच्या प्रभावाची प्रतीती स्पष्टपणे दिसून आली.

दुसरे उदाहरण असे की, एक कासार तुकारामाच्या उपदेशपर कीर्तनास अगदी लुब्ध होऊन जेथे त्याचे कीर्तन होई तेथे तो ते ऐकावयास जात असे. एके दिवशी त्याच्या एकुलत्या एक मुलास काही आजार होऊन तो मरणोन्मुख झाला. तेव्हा त्याच्या बायकोने सांगितले की, आज आपण कीर्तनास जाऊ नका; परंतु त्या भाविक कासारास कीर्तनश्रवणाची इतकी गोडी लागली होती की, त्यास घरी मुळीच चैन पडेना. मग तो पुत्रमोहास मुळीच वश न होता नि:शंकपणे कीर्तनास जाऊन बसला. इकडे त्या बालकाच्या नाड्या आटपल्या असे पाहून त्या कासारणीने मोठा आक्रोश केला आणि आपल्या मुलाचे प्रेत खांद्यावर घेऊन तुकाराम कीर्तन करीत होता तेथे ती आली आणि कीर्तनाच्या जागी ते प्रेत ठेवून मोठ्याने हंबरडा फोडून म्हणाली की, तुकोबा तुमच्या नादी माझा नवरा लागल्यापासून आमच्यावर हे असे एक एक प्रसंग येत आहेत. तेव्हा कीर्तनास बसलेले लोक तिची समजूत घालून म्हणू लागले की, बाई, तुझ्या मुलांचे आयुष्य खुंटून ते मेले, त्याला स्वामींनी काय करावे? हे प्रेत तू येथे कशाला आणलेस? यांच्यापाशी काही संजीवनिविद्या नाही. महिपती असे सांगतो की, तुकारामाने देवाचे भजन व धावा मोठ्या आवेशाने व कळवळ्याने केल्यावर ते मूल पुन्हा जिवंत झाले. आता या प्रसंगी त्याने म्हटलेले अभंग हे होत:-

*अशक्य तो तुम्हा नाही नारायणा ।। निर्जिवा चेतना आणावया ।।१।।*
*मागे काय जाणो स्वामींचे पवाडे ।। आतां कां रोकडे दावूं नये ।।२।।*
*थोर भाग्य आम्ही समर्थाचे कासे ।। म्हणवितो दास काय थोडें ।।३।।*
*तुका म्हणे माझे निववावे डोळे ।। दावूनि सोहळे सामर्थ्याचे ।।४।।*

*दाता तो एक जाण ।। नारायण स्मरवी ।।१।।*
*आणिक नाशिवंते काय ।। न सरे हाय ज्याच्यानें ।।२।।*
*यावें तया काकुलती ।। जे दाविते सुपंथ ।।३।।*
*तुका म्हणे उरी नुरे ।। त्याचे खरे उपकार ।।४।।*

या अभंगावरून असे स्पष्ट सिद्ध होते की, तुकाराम आपल्या अंगात काही अलौकिक सामर्थ्य आहे, असे मुळीच समजत नसे. तर पुराणांतरी कथन केलेल्या अद्भुत गोष्टींवर त्याचा पूर्ण भरवसा असल्यामुळे, या वेळी देवाकडून त्या मुलास उठविण्याचा चमत्कार होण्यास काही एक हरकत नाही असे त्याने पहिल्या अभंगात म्हटले आहे. यावरून असे अनुमान करावयाचे की, पूर्वी भक्तिपरायण पुरुषास ज्याप्रमाणे देव वेळोवेळा साहाय्य करीत असे, तसे साहाय्य प्रकृत प्रसंगीही देवाने आपणास करावे अशी त्याला इच्छा होती. तेव्हा असे अद्भुत चमत्कार तुकारामाच्या काळी मुळीच होत नसत व तुकारामाच्या हातून तर ते मुळीच होण्यासारखे नव्हते हे सिद्ध होते. आता या प्रसंगी मूल उठले असल्यास ते उठण्याचे कारण दुसरे काही तरी असावे असा तर्क केल्यावाचून गती नाही; परंतु तुकारामाच्या सदरील अभंगावरून तर अशा चमत्काराची असंभाव्यताच व्यक्त होते.

या प्रकरणी आणखी उदाहरण हवे असल्यास शिवजी कासाराच्या बायकोने तुकारामाच्या अंगावर कढत पाणी ओतले तेव्हाचे आहे. त्या दुष्ट स्त्रीने त्याच्या अंगावर पाणी ओतले तेव्हा त्याच्या अंगाचा दाह होऊ लागून ज्या असह्य वेदना त्याला झाल्या त्यासरशी त्याने म्हटलेला एक अभंग मागे दिलाच आहे.* तो वाचिला असता असे दिसून येते की, तुकारामाने या प्रसंगी केवळ इतर सामान्य भाविक लोकांप्रमाणेच देवाचा धावा केला आहे. महिपती सांगतो त्याप्रमाणे ते उष्ण पाणी अगदी शीतळ करून टाकण्याचे सामर्थ्य त्याच्या अंगी असते, तर त्याने हा असा एखाद्या दुर्बळ मनुष्याप्रमाणे धावा केला नसता.

त्याचप्रमाणे रामेश्वरभट्टाच्या अंगाचा दाह होऊ लागला तेव्हा त्याने आपल्यावर कृपादृष्टी करण्यासाठी तुकारामास एक पत्र लिहिले असता त्याचे उत्तर आमच्या भाविक भगवद्भक्ताने काय पाठविले तेही वाचकांनी मागे वाचलेच आहे. त्याने जो अभंग रामेश्वरभट्टास लिहून पाठविला त्यात फक्त चित्तशुद्धीचा महिमा वर्णन केला आहे; परंतु महिपती असे लिहितो की, त्या अभंगाच्या वाचनाने त्या ब्राह्मणाच्या अंगाचा दाह शमन पावला. हा असा प्रकार घडला असल्यास काही नवल नाही; कारण केवळ मनाच्या समजुतीचा परिणाम देहावर कधी कधी याहूनही विलक्षण घडल्याचे दाखले व्यवहारात पुष्कळ आहेत; परंतु आम्हाला तर ही सारीच गोष्ट केवळ अलंकारिक वाटते. या गोष्टीतले खरे बीज असे दिसते की, तुकारामासारख्या केवळ हीन जातीच्या मनुष्याकडून भगवद्भक्ती घडल्यामुळे त्याचे तेज इतके उज्ज्वल

---

* पृ. ४८ पाहा. पृ. ३४ पाहा.

झाले व देव त्याचा धावा ऐकून त्याचे वेळोवेळा साहाय्य करितो आणि आपण एवढे कर्मनिष्ठ असून आपला वर्णही उच्च असता आपणात अशी काहीच योग्यता नाही, हे कसे! अशी तळमळ त्याच्या चित्ताला एकसारखी लागली असल्यामुळे त्याला कोठेच चैन पडली नसावी. पुढे या गोष्टीचा उलगडा पूर्वोक्त अभंगात तुकारामाने केल्यावर त्याचे समाधान होऊन त्याच्या चित्तास होणारा ताप उपशम पावला असावा. या अभंगात तुकारामाने त्याला चित्तशुद्धीचा महिमा सांगून असे सुचविले की, एकंदर कर्ममार्गाचा उद्देश मिळून इतकाच की, तेणेकरून चित्ताची शुद्धी होऊन मोक्षसिद्धीचा अधिकार मानवास प्राप्त व्हावा. हा अधिकार तुला अद्यापि आलेला नाही, म्हणून तुझी ही खटपट व तळमळ चालली आहे. याप्रमाणे स्वत:मधील व तुकारामामधील भेद त्याच्या लक्षात आला, तेव्हा त्या ब्राह्मणाने सर्व कर्माची कटकट सोडून व स्वाभिमान एकीकडे गुंडाळून ठेवून तुकारामाची परिचर्या अंगीकारिली.

याप्रमाणे तुकारामाने चमत्कार केल्याचा उल्लेख त्याच्या वचनात नाही असे जे आम्ही येथवर प्रतिपादन केले आहे, ते खोटे आहे असे ठरविण्यासाठी प्रतिपक्षाकडून तुकारामाचे निरनिराळ्या प्रसंगीचे तीन उल्लेख पुढे आणण्यात येतील. त्यापैकी एक असा की, चिंचवडच्या देवाने तुकारामास बोलावून नेऊन त्याची परीक्षा केल्यावर त्याला भोजन घातले. त्यावेळी तुकारामाने म्हटलेले काही अभंग गाथ्यात छापले आहेत. त्यात गणपती व विठोबा यांचे आव्हान करून त्यास पंक्तीस घेऊन तुकारामाने भोजन केले, या चमत्काराचा उल्लेख केला आहे. ते अभंग हे :-

*चिंतामणी देवा गणपतीशीं आणा ।। करावे भोजना दुजे पात्रीं ।।१।।*
*देव म्हणती तुक्या एवढी कैंची थोरी ।। अभिमाना भितरी नागवलों ।।२।।*
*वाढ वेळ झाला शिळें झालें अन्न ।। तटस्थ ब्राह्मण बैसलेती ।।३।।*
*तुका म्हणे देवा तुमच्या सुकृतें ।। आणीन त्वरित मोरयासी ।।४।।*

*भोक्ता नारायण लक्ष्मीचा पति ।। म्हणोनि प्राणाहुति घेतलिया ।।१।।*
*भर्त्ता आणि भोक्ता कर्ता आणि करविता ।।*
*आपण सहजता पूर्ण काम ।।२।।*
*विश्वंभर कृपादृष्टि सांभाळितो ।। प्रार्थना करितां बाह्मणाची ।।३।।*
*कवळो कवळीं नाम घ्यावें गोविंदाचें ।। भोजन भक्तांचें तुका म्हणे ।।४।।*

आता हे अभंग खुद्द तुकारामाचेच आहेत असे घेऊन चालले तरी आमच्या सदरील म्हणण्यास मुळीच बाधा येत नाही. हे वरील दुसऱ्या अभंगावरून स्पष्ट होत आहे. त्यात जगदात्मा सर्व भूतांच्या ठायी असल्या कारणाने व तोच कर्ता व करविता

असल्या कारणाने तुम्ही आम्ही त्याचे नाव घेऊन मुखी ग्रास घातला असता त्या देवानेच ते अन्न सेवन केल्यासारखे होते, असे तुकारामाने सुचवून चिंतामणी देवाची भ्रांती फेडली आणि तो मूळचा गणपती उपासक असता त्याला बोध करून त्याचे लक्ष वेदांताकडे लागेल असे केले. पुढे या साध्या गोष्टीच्या पायावर सदरीं सांगितल्यासारख्या चमत्काराची इमारत रचली आहे. वस्तुत: पाहता वरील प्रसंगी तुकारामाच्या व चिंतामणी देवाच्या पंक्तीला कोणतेही दैवत साक्षात येऊन खरोखरीच जेवावयास बसले होते असे सहसा म्हणवत नाही. असा काही प्रकार जर खरोखरीच घडला असता तर वरती दिलेल्या अभंगांपैकी दुसरा अभंग म्हणण्याचे काय बरे प्रयोजन होते?

याप्रमाणे प्रतिपक्षाच्या एका मुद्याचा निकाल लागला; परंतु याहूनही विशेष बलवत्तर पुरावा अभंगाच्या गाथा तेराव्या दिवशी पाण्यावर तरल्या त्या प्रसंगीच्या तुकारामाच्या उद्गारांत आहे, असे उलट पक्षाची मंडळी म्हणेल. तर त्याचेही निरसन अगदी सोपे आहे. या उद्वेगकारक समयीचे तुकारामाचे एकंदर उद्गार मननपूर्वक वाचले असता त्यात त्याने आपली दुर्बलता पूर्णपणे व्यक्त केली आहे. हे चांगले ध्यानात येईल. आता अभंग पाण्यावर तरल्याबद्दल जो त्याने आपल्या अभंगात उल्लेख केला आहे त्यासंबंधाने एवढेच सांगावयाचे की, तेरावे दिवशी इंद्रायणीच्या डोहात पुन्हा गाथा तरताना लोकांनी पाहून त्याला येऊन कळविले, तेव्हा त्याने देवाचे उपकार मानले आहेत. या पलीकडे त्याने त्यात काही एक म्हटलेले नाही. आता या अशा चमत्कारावर त्याचा पूर्ण भरवसा होता, हे निर्विवाद आहे. कारण परमेश्वर पाहिजे ते करण्यास समर्थ असून भक्तास संकटी पावतो, अशी त्याची दृढ भावना होती. आता ह्या गाथा पुन्हा पाण्यावर तरल्या कशा? हा एक मोठाच प्रश्न आहे; परंतु हे म्हणजे मोठेसे गूढ आहे असे कोणी मानावयाला नको. या प्रकरणी तुकारामाच्या पदरी दोषाचा लवलेशही न येता या गोष्टीचा उलगडा पाडता येण्यासारखा आहे.

परंतु याहूनही एका मोठ्या चमत्काराचा उल्लेख तुकारामाच्या एकदोन नव्हे तर पंचवीसतीस अभंगामध्ये आढळतो. त्याची कशी काय वाट लावावयाची? असा प्रतिपक्षाकडून प्रश्न होण्यासारखा आहे. तो चमत्कार अर्थात तुकारामाच्या निर्वाणसमयीचा. त्याने देहूगावच्या उत्सवाच्या शेवटल्या दिवशी सर्वांचा निरोप घेऊन इंद्रायणीच्या तीराकडे जाताना व तेथे गेल्यावर जे अभंग म्हटले, त्यात आपणास देवाकडून विमान आलेले दिसत आहे, सर्व देव व हा लोक सोडून गेलेले सर्व भगवद्भक्त आपणास न्यावयास आले आहेत वगैरे साक्षात अद्भुतदर्शनाचे वर्णन केले

आहे. हे त्याचे वर्णन एक तर अगदी खोटे असले पाहिजे किंवा खरे तरी असले पाहिजे. जर खोटे म्हणावे तर अनीतीचा दोष तुकारामाच्या पदरी येतो. बरे खरे म्हणावे तर हा चमत्कार नव्हे काय? असे विचारणे येते. या कैचीतून सुटून जाण्याचा एक मार्ग उघडच आहे की, या अभंगांपैकी बहुतेक अभंग तुकारामाचे नसावे. तर ते पुढे त्याच्या कोणी तरी शिष्याने केले असावे; परंतु ह्या सोप्या मार्गाचे अवलंबन न करिता ते सारेच अभंग तुकारामाच्या तोंडचे आहेत असे मानून चालले तरी त्यात काही एक अद्भुत नाही किंवा त्यात तुकारामाच्या सत्यप्रीतीविषयी संशय घेण्यास मुळीच अवकाश नाही. यथास्थली सांगितलेच आहे की, लोहगावावर परचक्र आल्या दिवसापासून त्याच्या चित्तवृतींत पराकाष्ठेची उदासीनता उत्पन्न होऊन त्याला ह्या लोकचे जिणे अगदी असह्य झाले आणि त्याने इहलोक सोडून जाण्याचा निर्धार करून शेवटी जलसमाधी घेतली. ह्या अंतसमयी त्याची चित्तवृत्ती अत्यंत क्षुब्ध होऊन आधीच प्रबल असलेली त्याची कल्पनाशक्ती अनिवार झाली. तेव्हा पुराणादिकातून सहस्रश: ऐकलेल्या स्वर्गारोहणाच्या वगैरे गोष्टी त्याच्या दृष्टीपुढे प्रत्यक्ष घडताहेतशा दिसू लागणे साहजिक होते. गतयुगात देवाकडून आलेल्या विमानात बसून सत्पुरुषांनी स्वर्गारोहण केल्याच्या गोष्टी त्याने ऐकल्या व वाचल्या होत्या. तेव्हा तसा प्रकार आपल्यासंबंधानेही होत आहे असा भास त्याला होणे स्वाभाविक होते. कारण आधीच तो सहृदय कवी असून त्यात आणखी अत्यंत प्रेमळ व भाविक भगवद्भक्त होता; यास्तव त्याला स्वर्गारोहणाचा एकसारखा निदिध्यास लागून त्याची वृत्ती तदाकार झाली व पुराणांतरी कथन केल्याप्रमाणे आपणासही नेण्यास देवाचे विमान आले आहे असा भास त्याला होणे मानसिक सृष्टीच्या नियमास अनुसरून आहे. असे आभास अगदी सामान्य जनासही कधीकधी होतात, असा अनुभव आहे. तर मग ते आमच्या प्रेमळ व विदेही महाभगवद्भक्ताला झाल्यास त्यात नवल ते कोणते? याप्रमाणे उपपत्ती केली असता तुकारामाच्या तोंडून जे आधुनिक दृष्टीने असंभाव्य असे उद्गार निघाले, ते त्या साधूने कोणास विनाकारण भ्रमात पाडण्यासाठी काढले असे सहसा म्हणवत नाही.

आता शेवटी तुकाराम देहासकट वैकुंठास गेला किंवा नाही याविषयीचा वाद राहिला. त्याचा निर्णयही तुकारामाच्या एतद्विषयक वचनांवरूनच सहजी होण्यासारखा आहे. मागे आम्ही तुकारामाच्या स्वर्गारोहणसमयाचे काही अभंग दिले आहेत त्यात शेवटी हे शब्द आहेत :-

*झाला पाठमोरा इंद्रायणीतळी । नामघोष टाळी वाजविली ।।*
*प्रथम तो पाय घातला पाण्यांत । राहिली ते मात तुका म्हणे ।।*

यावरून हे स्पष्ट होते की, तुकारामाने जलसमाधी घेतली. त्याने देहासकट विमानात बसून स्वर्गारोहण केले व मग वरून गोदडी व टाळ ही खाली टाकली, अशी अद्भुत कथा लोकांनी मागाहून रचली असून तीत काही तथ्य आहे असे आम्हास वाटत नाही. पुन्हा असे पाहा की, इहलोक सोडून स्वर्गादिकांप्रत जाण्याच्या संबंधाने जेवढ्या म्हणून कल्पना आहेत त्यामध्ये येथला देह येथेच ठेवून आत्मा जातो असे मानण्याची प्रवृत्ती आहे व याप्रमाणे देहासकट कोणी स्वर्गास गेल्याचे एकही उदाहरण पुराणग्रंथात नाही. असे असता तुकारामाच्याच संबंधाने हा अद्भुत प्रकार कसा घडला? असा प्रश्न उत्पन्न होतो. तर या प्रकरणी असा तर्क करण्यासारखा आहे की, तुकारामाने 'देहासकट तुका गुप्त झाला' वगैरे जी वचने अंतकाळी म्हटली त्यावरून पुढे लोकांनी ही अद्भुत कथा रचली असावी. ती वचने कल्पनाशक्ती अनिवार झाल्यामुळे तुकारामाच्या तोंडून निघाली असावी असे मानण्यास त्याला काहीएक कारण वाटले नाही. त्यांचा चमत्कारावर पूर्ण भरवसा असल्यामुळे असा विवेक त्यास व्हावा कोठून? महिपतीने लिहिलेल्या कथेवरून एकंदरीत पाहता तुकाराम देहासकट स्वर्गास गेला नाही असेच सिद्ध होते. कारण तो म्हणतो की, फाल्गुन वद्य द्वितीयेस तुकाराम गुप्त झाला असता त्याचे शिष्य व त्याची बायको अवलाई ही इंद्रायणीतीरी पंचमीपर्यंत होती. जर तो वर गेला हे त्यास खास ठाऊक असते, तर ती इतके दिवस तेथे बसून राहिली नसती; परंतु वास्तविक प्रकार, जो खुद्द तुकारामाच्या पूर्वी दिलेल्या अभंगात दर्शविला आहे, तो घडला असल्याकारणाने तो पुन्हा डोहातून वरती येईल या आशेने ती तेथे बसली होती हे उघड आहे. कारण ज्या डोहातून पुन्हा तेरा दिवसांनी अभंगाच्या गाथा वरती आल्या त्याच डोहातून तुकाराम पुन्हा वरती येणार नाही कशावरून? असे त्यास वाटणे साहजिक होते. याप्रमाणे कोणीकडूनही पाहता हा देहासकट स्वर्गारोहण करण्याचा निसर्गविरुद्ध चमत्कार तुकारामाच्या हातून घडला नाही असेच म्हणावे लागते.

असो, आता तुकारामासारख्या भगवद्भक्तांच्या हातून दोन शतकांपूर्वी सामान्यत: जो एक अद्भुत चमत्कार घडत असे त्याविषयी थोडेसे लिहू. तो चमत्कार अर्थात असा की, देवाकडून दूध, खीर वगैरे खावविणे व त्याच्याशी सलगीची भाषणे करणे. महिपतीने हा प्रकार पुष्कळ भगवद्भक्तांकडून घडल्याचे लिहिले आहे. आता पंढरीचा विठोबा आपल्या भक्तांशी खरोखरीच बोलत असे व त्यांनी काहीतरी दिलेले खात असे किंवा कसे? याविषयी निर्णय देणे फारसे कठीण आहे असे आम्हाला वाटत नाही. आमच्या चरित्रनायकासंबंधाने तर आम्हास असे खास सांगता येण्यासारखे आहे की, त्याच्या कवितेमध्ये असा उल्लेख कोठेच नाही. रा. तुकाराम तात्यांनी

तुकारामाने देवाशी केलेली सलगीची भाषणे म्हणून जे अभंग एकत्र केले आहेत, त्यांचे अवलोकन केले असता असे लक्षात येईल की, तुकाराम ती वचने देवाशी साक्षात बोलला असे काही नाही, तर देव आपल्या संनिध सर्वदा असून आपण बोललेले सर्वकाही ऐकतो, अशी दृढ भावना त्या प्रेमळ भगवद्भक्ताची झाली असल्याकारणाने तो असा देवाशी प्रत्यक्ष बोलल्यासारखे भासते; परंतु हा सारा आत्मनिवेदनाचा प्रकार होय. तो तुकारामासारख्या सद्भावप्रेरित भक्ताचा असा प्रत्यक्षवत होत असला तर त्यात काही आश्चर्य नाही. देव सर्वत्र आहे व तो भक्ताच्या हाकेसरसा धावून येण्यास सर्वदा तत्पर आहे. इतकेच नव्हे तर भगवद्भक्तापाशीच त्याचा सर्वदा वास असतो. अशी समजूत ज्याची दृढ झालेली असते. त्याला देवाचे साक्षात दर्शनही घडल्याचा भास होणे साहजिक आहे. स्वप्नात किंवा जागृतीत वृत्ती तल्लीन झाली असता साक्षात देव येऊन आपणाशी बोलतो आहे असा भास महाभगवद्भक्तांस वेळोवेळा झाल्याची उदाहरणे पुष्कळ आहेत. ङमनी वसे ते स्वप्नी दिसेफया म्हणीत या चमत्काराचे सर्व इंगित सांपडण्यासारखे आहे. ज्याला देवावाचून चोहोकडे काहीच दिसेनासे झाले व ज्याला त्याचा रात्रंदिवस निदिध्यास लागला त्याचे हे एक लक्षणच आहे. तेव्हा अशा साधुपुरुषांनी आपणास देवदर्शन घडल्याचे आपल्या शिष्यास किंवा अनुयायी जनांस सांगितले असले तर त्यात खोटे काहीच नाही, तर त्यावरून त्यांची हृदयवृत्ती किती एकाग्र होण्यासारखी असे व त्यांचा देवावर केवढा दृढभाव असे याचे अनुमान होण्यासारखे आहे. असो, तर या दृष्टीने हा देवाशी बोलण्याचालण्याचा प्रकार पाहिला असता एतद्विषयक एकंदर अद्भुत गोष्टींचा उलगडा पडण्यासारखा आहे. चिंतामणी देवाच्या घरी तुकारामाने विठोबास व गणपतीस भोजनाला आणल्याचा जो प्रसंग वर सांगितला आहे, त्या प्रसंगी जे रहस्य तुकारामाने आपल्या अभंगात सूचित केले आहे, तेच या अद्भुत दिसणाऱ्या चमत्कारांच्या संबंधानेही ध्यानात ठेवण्यासारखे आहे.

आता देवाशी भगवद्भक्त खरोखरीच बोलतचालत होते या गोष्टीचा खोटेपणा त्याच भगवद्भक्तांच्या उक्तीवरून चांगला सिद्ध होण्यासारखा आहे. तुकारामाशी देव बोलत असे, असे जर गृहीत धरिले तर देवाने आपणास दर्शन द्यावे म्हणून जो त्याचा अभंगातून सर्वदा टाहो चाललेला असे, त्यात काय बरे अर्थ? या एका गोष्टीवरून हे उघड होते की, भगद्भक्तांचे देवाशी व्यवहार झाल्याचे जे उल्लेख आहेत ते केवळ अतिशयोक्तिरूप होत.

येथवर आम्ही जे प्रतिपादन केले आहे त्यावरून आमच्या वाचकांची या

चमत्कारप्रकरणासंबंधाने बरीच यथार्थ बुद्धी होईल अशी आम्हास आशा आहे. आमच्या लोकात अणिमा, महिमा आदिकरून ज्या अष्ट सिद्धी मानल्या आहेत त्यांच्या साधनाने सिद्ध पुरुषास पाहिजे ते अमानुष व अस्वाभाविक चमत्कार करिता येतात, असा सर्वत्र रूढ असल्यामुळे तुकारामासारख्या महाभगवद्भक्तालाही या सिद्धी करतलामलकवत असून त्याला त्यांचा प्रभाव मनास वाटेल तेव्हा दाखविता येण्यासारखा होता, असे भाविक लोकांस वाटणे साहजिक आहे; परंतु ह्या अद्भुत सिद्धीच्या संबंधाने या साधुपुरुषांच्या ठायी पुरा तिटकारा वसत होता, असे त्यांच्या प्रसंगोपात्त उल्लेखांवरून उघड होत आहे. तुकाराम स्वत:स या प्रकरणी सर्वतोपरी निर्बल मानीत असल्याचा पुरावा आम्ही वर दिलाच आहे. दुसरे असे की, तुकारामासारख्या नीतिमान व पापभीरू पुरुषांविषयी सामान्य जनांच्या ठायी पूज्यताबुद्धी व प्रेम उत्पन्न होण्यास असले चमत्कार त्यांच्या हातून घडण्याची मुळीच आवश्यकता नसते. त्यांचे सद्वर्तन व अत्यंत प्रेमळ व कोमल अंत:करण पाहून जनांच्या हृदयांत त्यांच्याविषयी आदरबुद्धी व सद्भाव ही उत्पन्न होणे अगदी साहजिक आहे. पुन्हा मोठमोठाले चमत्कार करून दाखवून आपले महत्त्व व स्तोम माजविण्याची हाव खऱ्या साधूस कदापि नसते. लोक आपणास चांगले म्हणोत किंवा वाईट म्हणोत; ते आपणावर प्रीती करोत किंवा आपला द्वेष करोत; आपणाला ते मान देवोत किंवा आपली निंदा करोत; जो मार्ग आपणास सत्य व हिताचा वाटला त्याचा अवलंब दृढ विश्वासाने करून या जगात असेपर्यंत आपले कर्तव्यकर्म निश्चयाने करावयाचे, असा निर्धार खऱ्या भगवद्भक्तांचा असतो आणि या निर्धाराप्रमाणे अहर्निश वर्तन करण्याविषयी त्यांचा प्रयत्न सुरू असतो. आमच्या चरित्रनायकांचेही वर्तन अशाच बाण्याचे होते. तेव्हा लोकाला आपल्या सामर्थ्याचे व प्रभावाचे आश्चर्य वाटवून आपल्याविषयी त्यांच्या मनात पूज्यताबुद्धी किंवा दहशत उत्पन्न करण्याच्या वेड्या नादास तो कधीही लागला नाही आणि हे सामर्थ्य आपल्याठायी मुळीच नाही असेही त्याला खात्रीने वाटत होते, हे त्याच्या अनेक प्रसंगीच्या उद्गारांवरून सिद्ध आहे. तर मग अशा साध्या-सरळ व भाविक साधुपुरुषाच्या हातून मोठमोठे चमत्कार घडल्याचे रसभरित वर्णन करण्यात काय हाशील आहे बरे. तुकारामाच्या हातून जे मोठमोठे चमत्कार झाल्याचे महिपतीने लिहिले आहे ते मुळीच झाले नाहीत असे मानल्याने त्या महापुरुषाची योग्यता तिळप्रायही कमी होत नाही असा आमचा समज आहे. उलट त्याने चमत्कार केले असे म्हणणे म्हणजे त्याची वास्तविक योग्यता कमी लेखणे होय. लोकांना स्वपराक्रमाने चकित करणे ही वृत्ती खऱ्या साधूस मुळीच शोभत नाही आणि तुकाराम जर खरा साधू होता तर त्याच्या संबंधाचे हे प्रवाद केवळ दंतकथारूप मानून त्यात फारसे तथ्य नाही

असेच विचारी मनुष्याने समजले पाहिजे.

हा आमचा सामान्यजनसमजुतीविरुद्ध लेख वाचून भाविक लोकास पुष्कळ वाईट वाटण्यासारखे आहे. तथापि सत्य दिसेल तेच लिहिण्याचा आमचा निर्धार असल्याकारणाने आम्हास या प्रकरणी जे योग्य दिसते तेच लिहावे हे आमचे कर्तव्य होय असे वाटते; परंतु आमचे एकंदर लिहिणे जे विचारपूर्वक वाचतील त्यांचा अभिप्राय आमच्या सारखाच होईल अशी आमची खात्री आहे.

आता तुकारामाने जे चमत्कार केले म्हणून महिपती लिहितो त्यापैकी काहीचा उल्लेख येथे केला असता त्यांचे स्वरूप वाचकांच्या लक्षात येईल.

१. लोक तुकारामाकडे तेलाचे नळे व पैसे देऊन त्याला बाजारात पाठवीत असत; पण कोणाचे किती तेल आणावयाचे याची त्याला आठवण राहू नये. तरी ज्याचे जितके तेल यावयाचे त्याच्या नळ्यात नेमके तितकेच सापडावयाचे. असा चमत्कार घडत असे.

२. लोहगावी शिवजी नावाचा एक कासार होता. तो तुकारामाची निंदा करीत असे. त्याच्या कीर्तनास तो कधीच जात नसे. हा एवढाच एक विरोधी साऱ्या गावात असावा हे जरासे विचित्र होते. तथापि त्यास आपल्या भजनी लावण्यासाठी तुकारामाने एक चमत्कार केला. तो असा: आळंदीस ज्ञानदेवाच्या समाधीपाशी एक कर्जाने पिडलेला ब्राह्मण धरणे धरून बसला होता. त्याला असा दृष्टांत झाला की, तू देहूस तुकारामापाशी जा म्हणजे तुझे ब्रह्मस्व फिटेल. त्यावरून तो ब्राह्मण शोध करीत करीत लोहगावी आला. तेथे त्याला तुकारामाचे दर्शन घडून त्याचा मनोदय त्याने न सांगता तुकारामास कळला. पुढे गावकरी लोकास त्याच्यासाठी काही पैसे गोळा करावयास सांगून, त्या कासाराकडून काहीतरी अवश्य आणावे म्हणून त्याने त्यास आग्रह केला. त्याप्रमाणे लोक त्या कासारापाशी जाऊन काहीतरी मागू लागले. पहिल्याने तो त्याला काहीच देईना; पण शेवटी त्यांचा फारच आग्रह पाहून त्याने त्यांच्या हातावर दोन ढबू पैसे ठेवले. ते घेऊन लोक तुकारामापाशी आले. तेव्हा त्याने एक खडा उचलून तो त्या कासाराकडच्या पैशांवर घासला. त्यासरशी त्या तांब्याचे तत्काळ सोने झाले! परंतु तेकढ्याने त्या ब्राह्मणाचे कर्ज फिटण्यासारखे नव्हते. तुकारामाने त्याला आपले गवाळे सोडून एकादे तांब्याचे भांडे असल्यास दे म्हणून सांगितले. त्याप्रमाणे त्या ब्राह्मणाने तांब्या, पंचपात्री, ताह्मण वगैरे जी तांब्याची भांडी होती ती तुकारामाच्या हाती दिली. तेव्हा त्याने तो खडा त्यावर घासून त्याचे सोने केले. हा अद्भुत चमत्कार पाहून शिवजीकासाराला असे वाटले की, तुकारामापाशी परीस आहे. तेव्हा अशा

साधूंचे शिष्यत्व पत्करले तर आपले कल्याण होईल या आशेने तो पहिल्याने त्याच्या भजनी लागला; पण पुढे तुकारामावर खरा भाव बसून तो त्याचा पुरा अनुयायी बनला. याच कासारासंबंधाने महिपती आणखी असा एक चमत्कार सांगतो की, तो तुकारामाचा शिष्य होऊन कीर्तन ऐकू लागल्यावर एक वेळ त्याने आपले छत्तीस बैल मुंबईस कथील आणण्याकरिता पाठविले होते. त्याच्या गुमास्त्यांनी रीतीप्रमाणे माल खरेदी करून तो बैलांच्या पाठीवर लादून लोहगावास आणला, तो त्या साऱ्या कथलाचे रुपे झाले आहे असे शिवजीकासारास दिसून आले. हा काय घोटाळा आहे म्हणून त्याने मुंबईच्या व्यापाऱ्यास पत्र लिहून पुसले. तेव्हा त्यांनी जाब पाठविला की, आम्ही तुम्हाला विकले ते कथीलच होते. याप्रमाणे त्यांचा जबाब आल्यावर त्याने तुकारामापाशी येऊन त्या धनाचे काय करू म्हणून त्याला विचारिले. तेव्हा त्याने सांगितले की, पंढरिनाथाच्या कृपेने तुला हे धन प्राप्त झाले आहे. तर ते सत्कारणी लाव म्हणजे झाले. या धनाच्या साहाय्याने त्याने पुढे एक मोठी विहीर बांधली. तिला कासारविहीर असे म्हणत. यापुढे तो कासार अगदी विरक्त होऊन आपले घरदार व संसार सोडून नेहमी तुकारामाजवळ राहू लागला.

३. सदरील कासाराच्या स्त्रीने तुकारामास आपल्या घरी बोलावून नेऊन त्याला कढत पाण्याचे स्नान घातल्याचे मागे लिहिलेच आहे. हे स्नान आटोपल्यावर त्याला तिने फराळ घातला. त्यात तिने विष कालविले होते. तुकारामाने ते सर्व अन्न खाल्ले; पण त्याला त्या विषापासून मुळीच बाधा झाली नाही! परंतु या तिच्या कर्माचे प्रायश्चित तिला लागलेच भोगावे लागले. तुकाराम तेथून जाताच ती गलितकुष्ट झाली आणि तिचे प्राण कासावीस होऊ लागले. ही अशी आपल्या बायकोची अवस्था का झाली ते शिवजी कासारास तेव्हाच कळले. मग रामेश्वरभट्टाने त्याला असा उपाय सांगितला की, तुकारामास तिने ज्या ठिकाणी कढत पाण्याचे स्नान घातले होते त्या ठिकाणची माती घेऊन तिच्या अंगास लावा, म्हणजे तिचा तो रोग बरा होईल. याप्रमाणे त्याने सद्भावपूर्वक करिताच ती पुन्हा पूर्ववत निरोगी झाली! हा चमत्कार घडल्यावर त्या कासाराच्या बायकोचीही भक्ती तुकारामाच्या पायी जडली, असे महिपती लिहितो.

४. तुकारामाच्या अनुयायी मंडळीत नावजीमाळी म्हणून एक इसम होता. तो मोठा भाविक होता. तुकारामाचे कीर्तन चालले असता त्याला प्रेमाचे भरते येऊन तो मध्येच उठून भजन करून नाचत असे. तो जरासा तोतरा असल्याकारणाने त्याचे वर्णोच्चार साफ नसत. हा त्याचा दोष कीर्तनास येणाऱ्या एका ब्राह्मणाने त्याला एके

दिवशी सांगितला. तो ऐकून नावजी फारच ओशाळला आणि आपण पुन्हा असे शब्द कधीही उच्चारणार नाही अशी त्याने शपथ वाहिली. या प्रकारे बोलणे झाल्यावर तो ब्राह्मण घरी गेला. तो त्याची वाचा बंद झाली. तेव्हा त्या ब्राह्मणाला फारच दुःख झाले. दुसरे दिवशी त्याने तुकारामापाशी येऊन आपली इत्थंभूत हकीकत त्याला लिहून कळविली. इतक्यात असे झाले की, एका कुणब्याने एक फळ तुकारामासाठी आणले. आपण ते फळ खावे असा त्या कुणब्याच्या मनातला भाव ओळखून तुकारामाने ते कापून त्याच्या चार फाका केल्या व त्यापैकी तीन आपण एकट्याने खाऊन बाकी उरलेल्या चौथीतली अर्धी त्या वाचा बसलेल्या ब्राह्मणास दिली. त्याने ती मोठ्या प्रेमाने खाली; पण चमत्कार असा झाला की, त्याने ती खाताच त्याची वाचा सुटली आणि तो पूर्ववत बोलू लागला.

५. एक ब्राह्मण आपले दारिद्र्य नष्ट व्हावे म्हणून आळंदीस धरणे धरून बसला असता त्याला असा दृष्टांत झाला की, देहूगावी जाऊन तुकाराम काय देईल ते घेऊन ये. त्याप्रमाणे तो लोभी ब्राह्मण तुकारामापाशी आला. तेव्हा त्याने त्याला सांगितले की, तू लोहगावी शिवजीकासारास जाऊन भेट आणि तो काय देईल ते घेऊन ये. मग तो ब्राह्मण शिवजीकासारापाशी गेला. कासाराला त्या गोष्टीचे मोठेच आश्चर्य वाटले. तरी त्याने त्याला लोखंडाच्या चार कांबा देऊन सांगितले की, या तू तुकारामाकडे घेऊन जा. त्याप्रमाणे तो ब्राह्मण ते लोखंडाचे तुकडे डोकीवर घेऊन मोठ्या कष्टाने मार्गस्थ झाला; पण त्या लोखंडाचे ओझे त्याला फारच झाल्यामुळे त्याने त्यातल्या तीन कांबा वाटेत टाकून देऊन एक राहिली तेवढीच तो तुकारामाकडे घेऊन आला. तुकारामाची त्या लोखंडावर नजर पडताच ते सोने झाले! तेव्हा त्या ब्राह्मणास लोभ सुटून असे वाटले की, आपण चाऱ्ही कांबा येथे आणल्या असत्या तर बरे झाले असते. असा मनात विचार करून तो आल्या वाटेने माघारी जाऊन कांबा टाकल्या होत्या तेथे पाहतो तो तेथे काहीएक नव्हते.

६. एकदा असे झाले की, देहू ग्रामातले काही लोक मुळाभिवरा संगमापाशी स्नान करण्याच्या उद्देशाने चालले असता त्यांना वाटेत एका ओसाड अरण्यामध्ये एक कुत्रा आढळला. तो कुत्रा माणसास पाहिले की, त्याच्या अंगावर धावून जात असे आणि त्याची नरडी फोडून रक्त पीत असे. हा बोभाटा आसपासच्या गावातल्या लोकांच्या कानी गेल्यामुळे त्यांनी ती वाटच मुळी टाकली होती. देहूगावची मंडळी त्या वाटेने जाऊ लागली तेव्हा त्या कुत्र्याने एका दोघांवर घाला घालून त्यास गतप्राण केले. इतक्यात तुकाराम त्या वाटेने आला. त्याला पाहून तो कुत्रा त्याच्या अंगावर

धावून गेला आणि त्याच्या नरडीस धरून त्याने त्याला खाली पाडले आणि आता ती तो फोडणार तो तुकारामाने त्याला इतकेच म्हटले की, तुझे हे गुरगुरणे व क्रूरकर्म आमच्याकडे चालावयाचे नाही; कारण आमचा हा स्वभाव कधीच नाहीसा झाला आहे. हे शब्द ऐकताच तो कुत्रा त्याला सोडून एकीकडे जाऊन अगदी शांतपणे बसला. त्यानंतर त्याने कोणासच उपद्रव केला नाही. तो अगदी मांजरासारखा साबळा होऊन गेला. पुढे हा कुत्रा तुकारामाबरोबर देहूस आला आणि तेथे तो तुकारामापाशी सर्वदा राहून त्याच्या कीर्तनास नेहमी हजर असे. तो एकादशीस अन्न सेवन करीत नसे असे महिपती लिहितो.

७. सदरी सांगितल्याप्रमाणे मुळाभिवरासंगमावर स्नानास गेल्यावर दुसरा एक चमत्कार तुकारामाच्या हातून घडल्याचे महिपती लिहितो. भीमातीरी स्नान केल्यावर मध्यान्हसमय झाला तेव्हा भिक्षा मागण्यासाठी तुकाराम रांजणगावी गेला. तेथे तो एका एका ब्राह्मणाच्या घरी वैश्वदेवसमयास प्राप्त झाला म्हणून त्या ब्राह्मणाने त्याला आपल्या घरी राहून घेऊन भोजन घातले. भोजन आटोपल्यावर तो ब्राह्मण तुकारामास म्हणाला की, साधुमहाराज हा माझा आठ वर्षांचा मुलगा आहे. हा जन्माचा मुका आहे. याला गायत्री मंत्र बोलता येत नाही. म्हणून याचा व्रतबंध राहिला आहे. तेव्हा तुकारामाने त्या मुलास आपल्या समीप बोलावून म्हटले की, बाळा, विठ्ठलविठ्ठल बोल पाहू. हे शब्द त्या मुलाच्या कानी पडताच त्याला वाचा फुटून तो बोलू लागला. हा चमत्कार पाहून तो ब्राह्मण परम हर्षित झाला आणि तुकारामाचे उपकार मानून त्याने त्याला दुसरे दिवशी आपल्या घरी राहून घेतले आणि त्या मुलाच्या व्रतबंधाचा समारंभ मोठ्या थाटाने केला.

८. चिंचवडच्या काही ब्राह्मणांनी तुकारामाची कीर्ती ऐकून मनात आणले की, हा असा लौकिक साधुपुरुष आहे तरी कोण तो स्वत: डोळ्यांनी पाहावा. मग ते आपला वर्णाभिमान सोडून तुकारामाच्या दर्शनासाठी देहूस आले. तुकारामाचे दर्शन झाल्यावर त्या ब्राह्मणांनी त्याला असा सविनय प्रश्न केला की, महाराज, आपण कोण आहा? हा प्रश्न ऐकून तुकारामाने आपली मांडी चिरून त्यास दाखविली. तो तीत पिंजारलेला कापूस भरला आहे असे त्यांच्या नजरेस आले. हे पाहून त्या बाह्मणास अतिशयित अचंबा वाटून त्यांनी त्याला आपल्या गावी कीर्तन करण्यासाठी नेले.

९. एके प्रसंगी तुकाराम लोहगावी कीर्तन करीत असता श्रोते मंडळींची एकाग्रवृत्ती होऊन त्यास देहभान नाहीसे झाले. ज्यांनी हिलाल पेटवून धरले होते त्यांचीसुद्धा वृत्ती बाकीच्यांप्रमाणे अगदी तल्लीन झाली. तेव्हा हिलालास तेल घालण्याचे काम ते

अगदी विसरून गेले. त्यामुळे हिलाल विझून कीर्तनाच्या जागी अंधार पडला; पण तुकारामाच्या अंगचे विलक्षण तेज चोहोकडे फाकून अंधकार नाहीसा झाला. पुढे तीन प्रहर कीर्तन झाल्यावर आरती होऊन तुकाराम खाली बसला. त्यासरसा पुन्हा चोहोकडे काळोख पडला. तेव्हा श्रोते मंडळी देहभानावर येऊन चकित झाली. मग पाहतात तो हिलाल केव्हाच विझले असून आणलेले तेल जशाचे तसेच राहिले आहे असे त्यांच्या नजरेस आले.

१०. लोहगावी एक मोठी विहीर होती. तिचे पाणी खारट होते. एके दिवशी तुकाराम त्या गावी कीर्तनास गेला असता त्याने त्या विहिरीत अवचित उतरून एक वेळ स्नान केले. त्या सरशे तिचे पाणी गोड झाले. पुढे शिवजी कासाराने ही विहीर बांधून काढल्यामुळे तिला कासारविहीर असे म्हणू लागले.

११. लोहगावचा एक ब्राह्मण तुकारामाच्या कीर्तनास अगदी लुब्ध होऊन ते ऐकण्यासाठी तुकाराम जिकडे जाई तिकडे तो जात असे. त्याचा बोध ऐकता ऐकता त्याच्या चित्तात वैराग्यवृत्ती बाणत चालली. त्यास याप्रमाणे प्रपंचाचा वीट आलेला पाहून त्याच्या बायकोस फारच वाईट वाटत असे आणि ही अशी आपल्या नवऱ्याची वृत्ती पालटण्यास तुकाराम कारण झाला आहे, असे तिला वाटून ती त्याचा मनापासून द्वेष करीत असे. एके समयी तिचा नवरा बाहेर गावी गेला असता तिने तुकारामास आपल्या घरी जेवावयास बोलावून आणले आणि त्याला कडू भोपळ्याची भाजी खावयास घातली. ती त्याने मुकाट्याने खाल्ली; इतकेच नव्हे तर त्याने ती आणखी मागून घेऊन खाल्ली. तुकाराम जेऊन गेल्यावर त्या बायकोच्या सर्व अंगास आवळ्या एवढी गुल्मे आली. ती जाण्याविषयी पुष्कळ औषधोपचार केले; पण काहीएक गुण आला नाही.

१२. लोहगावी दुसरा एक भाविक ब्राह्मण होता. त्याने सोमवाराच्या व्रतासाठी तुकारामास आपल्या घरी भोजनास बोलाविले. तो ब्राह्मण आणि तुकाराम जेवावयास बसले असता दिव्यातले तेल संपून तो जाण्याच्या बेतात आला. त्यात आणखी तेल घालावयास घरात नव्हते. त्यामुळे बिचारी ब्राह्मणाची बायको अगदी ओशाळून खाली मान घालून उभी राहिली. तुकारामाने तिचे ते संकट जाणून तिला सांगितले की, बुधल्यात तेल असेल पाहा. त्याच्या सांगण्यास मान देण्यासाठी तिने पुन्हा तो रिता बुधला पाहिल्यासारखा केला. तो आत तेल आहे असे तिच्या दृष्टीस पडले. ते पाहून तिला पराकाष्ठेचा हर्ष झाला आणि तिने त्यातले तेल दिव्यात आणून घातले. पुढे

ती नवराबायको जिवंत होती तोपर्यंत त्या बुधल्यातले तेल कधीच खलास झाले नाही.

१३. एके दिवशी लोहगावी तुकाराम पाटलाच्या दारात एक मोठी शिळा होती तीवर जाऊन बसला असता तेथे एक तुंबडीवाला भिक्षा मागावयास आला आणि तुकारामापाशी तुंबडी भरून मागू लागला. तुकारामाने त्याला म्हटले की, गावात हिंडून काय आणले आहेस ते मला दाखीव. तेव्हा त्या भिक्षेकऱ्याने आपल्या पिशवीत जमा झालेले लोखंडाचे तुकडे त्या शिळेवर ओतले. ते त्या शिळेस लागताच त्यांचे सोने झाले. मग तुकारामाने त्याला सांगितले की, हे आपले सोने पुन्हा पिशवीत भरून घेऊन जा. त्याप्रमाणे त्या याचकाने मोठ्या आनंदाने केले. तो तेथून निघून गेल्यावर ज्यांनी तो चमत्कार पाहिला होता ते त्या शिळेवर लोखंडाचे तुकडे घासून पाहू लागले; पण त्यांचे सोने कोठून होणार!

हे व असेच दुसरे काही चमत्कार तुकारामाच्या हातून घडल्याविषयी महिपती लिहितो. या चमत्कारांच्या सत्यतेविषयी आम्हास संशय वाटतो, असे आम्ही पूर्वी दर्शविलेच आहे. आधुनिक शास्त्रीय ज्ञानाचा सर्वत्र प्रसार होऊन सृष्टिक्रमाच्या अबाधितपणाविषयी सुशिक्षित जनांची पूर्ण खात्री झाली आहे. ह्या प्रचंड विश्वाचे जे नियम मानवास आम्हाला ज्ञात झाले आहेत त्याविषयी विद्वज्जनांची अशी निखालसपणे खात्री होऊन चुकली आहे की, त्यामध्ये अपवादास मुळीच अवकाश नसून त्यांच्या अनुरोधाने होणाऱ्या व्यापारांमध्ये कोणाच्यानेही फेरफार करवणार नाही. एकाद्या प्रसंगी साधारणत: सर्वसंमत व निश्चित अशा सृष्टिनियमास अपवादभूत असा एखादा प्रकार घडून आल्यास विद्वज्जन तो दैवी चमत्कार समजत नाहीत. तर मानवास अद्यापि अवगत न झालेल्या एखाद्या  गूढ नियमाच्या प्रभावाने तो प्रकार घडून आला असावा असे ते मानतात आणि मग त्या अज्ञात नियमाच्या शोधाकडे त्यांची प्रवृत्ती होऊन ते आपल्या परिश्रमाने मानवी ज्ञानात भर घालतात. ज्या कित्येक गोष्टी पुरातनकाळी मंत्राच्या किंवा पिशाचाच्या किंवा देवाच्या साहाय्याने घडतात असे भाविक लोक मानीत, त्यासृष्टीच्या काही गूढ नियमांच्या योगाने घडतात असे सांप्रतकाळी शोधक पुरुषांनी सप्रयोग सिद्ध केले आहे. ज्या कित्येक खेळास पूर्वी अद्भुत जादूचे खेळ म्हणत, ते आता एखाद्या सामान्य गृहस्थासही त्या विषयावरील पुस्तके वाचून करिता येतात. जे रोग पूर्वी मंत्र साहाय्याने किंवा दैविप्रसादाने बरे होतात अशी बोलवा असे ते रोग हल्ली काही विवक्षित औषधादी उपचारांच्या योगाने सहज बरे करिता येतात. सामान्य मनुष्यास आसपास असलेल्या वस्तूंच्या साधारण धर्माचेच काय ते ज्ञान असते; परंतु पदार्थविज्ञानादी शास्त्रांचे आधुनिक काळी ज्ञान वाढून हे वस्तुज्ञान

फारच वाढले आहे आणि या ज्ञानाच्या प्रभावाने एवढा एक सिद्धांत विद्वज्जनसंमत झाला आहे की, सृष्टीत सर्वत्र कार्यकारणभावरूप व्यवस्था आढळत असून मानवास आजपर्यंत कळलेले सृष्टिनियम अबाधित व कधी न पालटणारे असे आहेत. हे नियम निरंतर अबाधित आहेत म्हणूनच ही विश्वाची समग्र रहाटी सुरळीत चालली आहे. या नियमात काहीतरी धरसोड असती किंवा त्यात कोणास कधी काळी फेरफार करिता आला असता तर मनुष्यास कोणत्याच गोष्टीची खात्री न वाटून तो नेहमी संशयात असता. केव्हा काय होईल याचा नेम नाही असे त्यास वाटून तो निरंतर भयभीत होत्साता कोणताच उद्योग करण्यास प्रवृत्त होताना; परंतु एकंदर मानवजातीचा आजपर्यंतचा अनुभव व उद्योग हे अशी साक्ष देत आहेत की, सृष्टीचे नियम सर्वदा अबाधितपणे चालावयाचे. त्यात खळ किंवा उलटापालट कदापि व्हावयाची नाही, असा त्यांच्या बुद्धीचा सामान्यत: निश्चय झाला आहे. आता मनुष्यावर आलेल्या एखाद्या संकटाचा किंवा विपत्तीचा परिहार स्वपरिश्रमाने होत नाही असे वाटले म्हणजे दैवी साहाय्य मिळण्यासाठी आराधना, उपासना आदिकरून उपायांचे तो अवलंबन करितो. आपले संकट निवारण करण्याचे किंवा आपली विपत्ती नाहीशी करण्याचे सामर्थ्य आपल्याठायी असावे अशी इच्छा मानवास होणे साहजिक आहे. देव पाहिजे ते करण्यास समर्थ आहे, तेव्हा त्याच्या प्रसादावाचून ही शक्ती मानवास प्राप्त होणे नाही; असा मनुष्याचा समज होणे स्वाभाविक आहे. आता हा ईश्वरी प्रसाद अर्थात देवभक्तांवरच व्हावयाचा. कारण देवास स्वभक्तांहून दुसरे काहीच प्रिय नाही, असा समज सर्व धर्मांत आहे. यासाठी सामान्य जन स्वत:चे संकट किंवा विपत्ती नाहीशी करण्यासाठी अशा भगवद्भक्तांस शरण जातात आणि काकतालीय न्यायाने त्यांचा मनोरथ सिद्धीस गेला असता तो त्या महासाधूच्या प्रभावाने सिद्ध झाला असा समज भाविक जनांचा होणे स्वाभाविक आहे. याप्रमाणे जो भगवद्भक्त झाला त्याजवर ईश्वरी प्रसाद होऊन अष्टसिद्धी* त्याला करतलामलकवत झाल्या असे भोळे लोक आजपर्यंत मानीत आले आहेत. ही त्यांची समजूत अगदी दृढ झाली असल्यामुळे साधुपुरुषांच्या चरित्रात एकादी अलौकिक गोष्ट घडून आली असता ती त्या सिद्ध पुरुषाला साध्य झालेल्या एखाद्या सिद्धीच्या प्रभावाने घडली असा लोकप्रवाद सर्वत्र प्रसृत होत असे. याची अगदी ताजी उदाहरणे हवी असल्यास आमच्या महाराष्ट्रात नुकतेच होऊन गेलेल्या दोन साधूची आहेत. एक अक्कलकोटच्या स्वामीचे व दुसरे देवमामलेदारांचे. त्यांच्या हातून पुष्कळ चमत्कार घडल्याचा प्रवाद सर्वत्र पसरला आहे; परंतु त्यात कितपत तथ्य आहे ते पाहण्याचे त्या वेळच्या शोधक पुरुषांनी कसे

---

* आणिमा, महिमा, गरिमा, लघिमा, प्राप्ति, प्राकाम्य, ईशित्व आणि वशित्व अशा आठ सिद्धी मानल्या आहेत.

मनावर घेतले नाही नकळे.

असो; तर एकंदरीत काय की, असे चमत्कार साक्षात प्रत्ययास येईपर्यंत विचारी मनुष्याने ते खरे आहेत असे मानणे बरे नव्हे. कारण ते एकंदर मानवजातीच्या अनुभवाबाहेरचे असून केवळ भाविक लोकांच्या सांगण्यावरून लोकप्रवादरूप पावले आहेत. दुसरे असे की, सर्वच भाविक लोक या प्रकरणी सत्य बोलत असतात अशातला काही अर्थ नाही. ज्या एखाद्या महापुरुषावर आपले प्रेम बसते, त्याचे गौरव जितके करवेल तितके करण्याविषयी पाहिजे त्या खोट्यानाट्या गोष्टी ते बनवून सांगतात. पिसाचा कावळा करण्यास त्याला मुळीच दिक्कत वाटत नाही. आपल्या परमपूज्य गुरूचा महिमा वाढविण्यास आपण प्रयत्न केला असता आपणास पुण्यप्राप्ती होईल असे त्यास वाटत असते. हे त्यांचे अंधप्रेम व निःस्सीम भाव ही एका दृष्टीने पाहता कितीही स्तुत्य असली तरी सत्यशोध करणारास त्यापासून बराच अडथळा येतो. यास उदाहरण प्रकृत चरित्रविषयाचेच आहे. तुकाराम हा कोणी अद्भुत चमत्कार करणारा पुरुष असून त्याने अनेक प्रसंगी मोठमोठाले चमत्कार केले असा समज भाविक लोकांचा नसता तर त्याच्या पवित्र चरित्रातील आणखी पुष्कळ खऱ्या गोष्टी कळून त्याच्याविषयी जनचित्तांत विशेष यथार्थबुद्धी उत्पन्न झाली असती आणि तेवढ्यामानाने त्याचे अनुकरण करण्याकडे लोकांची प्रवृत्ती अधिक झाली असती. कारण जो मनुष्य दैविप्रसादाने मोठमोठाले चमत्कार करण्यास समर्थ झाला, त्याच्या सद्वर्तनाचा कित्ता आम्हा पामर जनांस कसा गिरविता येईल? अशी समजूत लोकांची झाल्याने त्यांचे चरित्र समजून न समजून सारखेच होते. तो कोणी तरी दैवी पुरुष आहे. यास्तव त्याचे भजनपूजन करावे एवढाच आपला अधिकार आहे, असे अल्पशक्ती मानवास वाटते. यामुळे महापुरुषचरित्रांपासून होणारी जी मानवांची नैतिक उन्नती तिला बराच प्रत्यवाय येतो; परंतु भाविक लोकांच्या ध्यानात हा परिणाम न येऊन त्यांच्या समजुतीविरुद्ध कोणी प्रतिपादन केले असता ते कोपायमान होतात. अशा लोकांची समजूत होणे कठीण आहे. तरी त्यास भिऊन ग्रंथकर्त्याने स्वकर्तव्य पराङ्‌मुख व्हावे हे सर्वथा युक्त नव्हे. ज्या आमच्या चरित्रनायकाने आपले सारे आयुष्य जनांचा उद्धार करण्यामध्ये वेचले; ज्याने आपल्या अत्यंत शुद्ध व सरळ आचरणाचे परम पवित्र उदाहरण महाराष्ट्रीयास घालून दिले; 'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले' या स्वोक्तीची सत्यता ज्याने आपल्या आचरणाने लोकांस पूर्णपणे पटविली, त्या महापुरुषाला एखाद्या अहंमन्य पुरुषाच्या मालिकेत बसविण्याचा प्रयत्न करणे आम्हास मुळीच इष्ट वाटत नाही. आपण मोठे सिद्ध आहो, आपल्यावर ईश्वरी प्रसाद पूर्णपणे

होऊन आपल्या अंगात दैवी शक्ती आली आहे, असे जनास भासविण्यासाठी त्याने चमत्कार केले अशी कल्पना करण्याचे धाडस आमच्याने तरी निदान करवत नाही. फार काय; पण अशी दैवी शक्ती त्याच्या ठायी खरोखरीच असती तरी ती त्याने लोकास कदापि दाखविली नसती. कारण आपण कोणी तरी महापुरुष आहो, आपल्या भजनी सर्वांनी लागावे असे त्याला कदापि वाटले नसते. त्याच्याठायी निरभिमानता व नम्रता किती वसत असे याविषयी प्रस्तुत चरित्रात जागजागी उल्लेख केले आहेत; परंतु ज्या कोणास या प्रकरणी शंका असेल त्याने या महापुरुषाचे काही अभंग वाचावे. म्हणजे त्याची तेव्हाच खात्री होईल की, अशा प्रेमळ व अत्यंत नम्र पुरुषाच्या हातून लोकास थक्क करून टाकण्यासाठी चमत्कार घडले नसावे. तेव्हा तात्पर्य काय की, हे चमत्कार त्याने केले म्हणणे म्हणजे त्याची वास्तविक योग्यता कमी करणे होय. असो; आता हे प्रकरण येथेच आटपतो. यासंबंधाने आणखी पुष्कळ लिहिण्यासारखे आहे; परंतु ते सारे येथे लिहू गेलो असता या प्रकरणाची मर्यादा फारच वाढवावी लागून विनाकारण वादात शिरल्यासारखे होईल. तरी जे येथवर थोडेसे लिहिले आहे त्याचा आमचे वाचक शांतपणे विचार करितील अशी आम्हास उमेद आहे.

●●●

# तुकारामाची कविता

मागे कवित्वस्फूर्तीच्या प्रकरणात तुकारामास कविता करण्याची स्फूर्ती कशी झाली ते सांगून त्याची मानसिक उन्नती कोणत्या ग्रंथांच्या पठनाने झाली होती ते सांगितले आहे. त्यावरून त्याच्या कवितेचे स्वरूप वाचकांच्या तेव्हाच लक्षात येण्यासारखे आहे. ते अर्थात असे की, त्याची सारी कविता धर्मसंबंधी विषयावर आहे. नामदेवाचे बाकी राहिलेले अभंग पुरे करण्याविषयी त्यास स्वप्नामध्ये ईश्वरी आज्ञा झाली होती. त्या आज्ञेप्रमाणे या परम भक्तिमान पुरुषाने आपले कवित्व जगात प्रकट केले. ते करण्याचा त्याचा हेतू केवळ ईश्वरी आज्ञेचे पालन करावे एवढाच होता. आपल्या अंगचे अलौकिक कवित्वसामर्थ्य जनांच्या दृष्टीस पडून आपला त्यांनी बहुमान करावा, अशी मनीषा त्याच्या हृदयात क्षणभरही वसली नाही. याप्रमाणे त्याने निरनिराळ्या प्रसंगी जे अभंग केले ते केवळ स्वकर्तव्यबुद्धीनेच केले असल्यामुळे त्यात कृत्रिमपणा असा मुळीच आढळत नाही. पदलालित्य, अलंकाराची यथोचित योजना, चित्तवृत्ती तटस्थ करून टाकण्यासारखी वर्णनशैली इत्यादी कवित्वास शोभा आणणारे गुण त्याच्या कवितेत आढळत नाही; परंतु सत्कवीच्या कृतीत आढळणारे जे प्रधान गुण, जे कवितेचे केवळ जीवप्राण होत, त्यांची प्रतीती तुकारामाच्या प्रत्येक अभंगात पूर्णपणे होण्यासारखी आहे. हे गुण कोणते ते आता सांगतो.

पहिला गुण सहृदयता हा होय. हा तुकारामाच्या ठायी पूर्णपणे वसत होता. हा अत्यंत प्रेमळ असून याची वृत्ती अतिशय साधी होती आणि हा मनाचा मोठा थोर व मोकळा होता. यामुळे प्रसंगानुरोधाने त्याचे मन क्षुब्ध होऊन त्यास निरनिराळ्या वृत्ती स्पष्टपणे भासत असत आणि हृदयाच्या या परम सुक्षोभ स्थितीमध्ये त्याच्या मुखावाटे अत्यंत सरस उद्गार निघत असत. अमुक एका विषयावर आपणास काव्य करावयाचे असा पूर्वी संकेत करून मग त्यावर अनेक वेळा मनन करावयाचे आणि अंती कवितारूपाने स्वाभिप्रेत अर्थ ग्रंथित करावयाचा, असा प्रकार त्याच्याकडून फारसा कधी घडत नसे. कीर्तनादिप्रसंगी मनाची वृत्ती तदाकार होऊन तात्कालिक स्फूर्तीने त्याने आपले बहुतेक अभंग म्हटले आहेत. म्हणून ते अगदी साधे, सरळ व सहज समजण्यासारखे झाले असून त्यात जो जो आशय व्यक्त केला आहे, तो तो वाचकांच्या

किंवा श्रवण करणारांच्या हृदयात पूर्णपणे ठसतो. सहृदय कवींच्या कृतीत मुख्य गुण हाच असतो. कवीचे जे उद्गार सहृदयतेने निघालेले असतात ते तसेच सहृदय वाचकांच्या किंवा श्रोत्यांच्या चित्तात पूर्णपणे ठसत असतात. तुकारामाने जे उद्गार प्रकट केले ते सारे केवळ सहृदयतेने आले आहेत. म्हणून त्यांचा इष्ट प्रभाव जनचित्तावर विलक्षण होत असतो.

सत्कवीच्या ठायी आढळणारा दुसरा गुण प्रसाद हा होय. हाही गुण तुकारामाच्या प्रत्येक वचनात उत्तमप्रकारे दिसून येतो. याचे कारण अर्थात असे की, त्याची शब्दयोजना अत्यंत साधी असून प्रत्येक पदाचा अन्वय अगदी सरळ असतो. यामुळे प्रत्येक वचनात ग्रंथित केलेला अर्थ स्पष्टपणे समजण्यास मुळीच अडचण पडत नाही. पुन्हा जो जो आशय स्ववचनात ग्रंथित करावयाचा त्याचा पूर्ण प्रत्यय स्वचित्तास अगोदर झाल्यावाचून त्याचा शब्दांच्या साहाय्याने उद्गार काढण्यास तो सहसा प्रवृत्त होत नसे. जे आपणास चांगल्या प्रकारे समजले आहे व ज्याच्याविषयी आपणास मुळीच भ्रांती नाही, तेच लोकास सांगण्याचा त्याचा निर्धार असल्यामुळे त्याच्या कोणत्याच वचनात गूढता किंवा दुर्बोधता आढळत नाही. त्याला स्वत:चे पांडित्य मिरविण्याची मुळीच हाव नसल्यामुळे तो आपला आशय जनचित्तांत पूर्णपणे ठसण्याविषयी अगदी साध्या नित्याच्या व्यवहारातल्या दृष्टांतादिकांचा उपयोग करीत असे.

याप्रमाणे सत्काव्यात आढळणारे मुख्य गुण तुकारामाच्या कवितेत पूर्णपणे आढळतात. याशिवाय त्याच्या कवितेत एक विशेष गुण असा आढळतो की, त्याचा प्रत्येक उद्गार मोठा गंभीर असतो. त्याच्या कवितेचा विषय केवळ आध्यात्मिक असल्या कारणाने हा गुण तीत पूर्णपणे आढळतो. त्याची वृत्ती सर्वदा शांत व सद्भावयुक्त असून त्याचा मानस आपल्या श्रोतृजनांच्या ठायी सद्भक्तीस अत्यंत आवश्यक अशा शमदमकरुणादी गुणांचा उद्भव व विकास व्हावा असा असे. श्रोतृजनांचे रंजन करावे किंवा खुबीदार रीतीने बोलून त्यांची चित्तवृत्ती तटस्थ करावी असा त्याचा मुळीच हेतू नव्हता. यास्तव त्याचा प्रत्येक हृदयोद्गार प्रेमपूर्वक व खऱ्या कळवळ्याचा असून अत्यंत गंभीरतेचा आहे. त्याची एकंदर कविता शांतरसाने परिपूरित असून प्रेमळ व भाविक वाचकांच्या किंवा श्रोत्यांच्या चित्तात भक्तिभाव दृढ करणारी आहे.

तुकारामाच्या कवितेचे हे असे साधे, गंभीर व प्रसादगुणयुक्त स्वरूप असूनही तीत धर्मविषयक अत्यंत गहन व उदात्त कल्पनाचे निरूपण अगदी सहजरीतीने केले आहे. ह्या कल्पना त्याची कविता वाचली असता जितक्या लवकर व अनायासे समजतात तितक्या दुसऱ्या कोणाचेही अध्यात्मविषयावरील ग्रंथ वाचून कळत नाहीत. धर्मसिद्धांत

इतक्या सोप्या रीतीने व मनावर पूर्णपणे ठसण्यासारखे समजावून देण्याची कला महाराष्ट्रातील दुसऱ्या कोणाही कवीस किंवा ग्रंथकारास साधलेली नाही. यास्तव तुकारामाचे समग्र महाराष्ट्रावर मोठे उपकार झाले आहेत. पंडित–अपंडित, वृद्ध–तरुण, पुरुष–स्त्रिया या सर्वांस त्याचे अभंग अगदी सहजरीतीने आध्यात्मिक ज्ञान करून देणारे आहेत. अगदी अनभिज्ञ तरुण पुरुषांच्या किंवा स्त्रियांच्या हृदयात जसे आमच्या ह्या सत्कवीविषयी अतिशयित प्रेम उत्पन्न होणे शक्य आहे; तसेच ते मोठ्या पंडिताच्याही मनात उत्पन्न होण्यासारखे आहे. पंडिताने मोठमोठ्या ग्रंथाचे अध्ययन करून अध्यात्मविषयाचे कितीही ज्ञान संपादन केले असले तरी तुकारामाच्या एखाद्या साधारण अभंगात जो बोध व जे रहस्य त्यास आढळून येते तसे त्यास कोठेही सापडत नाही. याचसाठी अध्यात्मविषयांचा बोध करणाऱ्या हरिदासांच्या कीर्तनात तुकारामाच्या वचनास पहिला मान मिळत असतो. ते तुकारामाचे एखादे वचन घेऊन त्यावर तासांचे तास ऊहापोह करीत असतात. इतका बोध व रहस्य प्रत्येक अभंगात भरलेले असते. ते अभिज्ञांच्या दृष्टीस विशेषरीतीने विषयीभूत होते. तसे ते अनभिज्ञास समजत नसते, हे जरी खरे आहे, तथापि त्यातील प्रधानतत्त्वाचा बोध सामान्य जनासही तेव्हाच होत असतो. पुन्हा त्याचे विचार व कल्पना इतक्या सरस व सरळ रीतीने अभंगरूपाने ग्रंथित केलेल्या असतात की, त्यांचे श्रवण किंवा वाचन भाविक व सहृदय मनुष्यास एक वेळ घडले म्हणजे त्यातील बोध त्याच्या चित्तावर उत्तमप्रकारे ठसून त्याची विस्मृती त्यास सहसा होत नाही. हा गण इतर कोणाही कवीच्या वचनात इतक्या पूर्णपणे वसत नाही. तुकारामाच्या वाङ्मयाचा दुसरा एक गुण असा आहे की, ती सारी अभंगरूपाने प्रकट झाली असून प्रत्येक अभंग एक स्वतंत्र वचन असते. त्यांचा पूर्वापार संबंध फारसा नसतो. यामुळे त्याचा प्रत्येक विषयावरील बोध प्रत्येक वचनात संपूर्णपणे आढळतो आणि तो एका वचनात सामग्र्येकरून निबंधित व्हावा म्हणून त्याने होईल तेवढा संक्षेप करण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे कोठेच पाल्हाळ न होऊन त्याचा साररूप बोध सहजरीतीने जनचित्तांत ठसण्यासारखा आहे. यामुळे त्याची वचने म्हणजे अत्यंत सोप्या शब्दांनी सांगितलेले धर्म व नीती या विषयातले सिद्धांत होत. आपल्या भाषेमध्ये ह्या कवीच्या प्रासादिक वाङ्मयातील पुष्कळ वचने केवळ म्हणी होऊन गेल्या आहेत. त्याची काहींना काही वचने आबालवृद्धांच्या तोंडी झाली आहेत आणि जे आपणास कळलेल्या बोधाप्रमाणे वागण्याचा निर्धार करून मनोनिग्रहपूर्वक स्ववर्तन सुधारण्याचा प्रयत्न करितात, त्याला तर तुकारामाच्या या अत्यंत सुलभ वचनापासून अतिशयित फायदा होत आहे.

येथवर तुकारामाच्या अत्यंत प्रासादिक वाङ्मयाच्या अंत:स्वरूपाचे सामान्यत्वेकरून निरूपण झाले. ते प्रकृतसारख्या चरित्ररूप ग्रंथात अर्थात अत्यंत संक्षेपानेच होणे इष्ट होय. आता हे या महासाधूचे कवित्व कोणकोणत्या रूपांनी व कोणकोणत्या निमित्तानी प्रकट झाले, त्याचे अल्पमात्र दिग्दर्शन करितो.

तुकारामास देवाने स्वप्नात दर्शन देऊन नामदेवाचे बाकी राहिलेले अभंग करण्याविषयी आज्ञा केल्यामुळे त्याने मुख्यत: अभंगच केले आहेत. तरी त्याने थोड्या ओव्या, पदे, आरत्या, भुपाळ्या, पाळणे व दोहोरेही केले आहेत. दंतकथेप्रमाणे पाहता हे अभंग साडेसहा कोटी असावयास पाहिजे होते; परंतु निरनिराळ्या ठिकाणच्या गाथांच्या प्रती जमा करून आजपर्यंत अवघे ८४४१ अभंग रा. रा. तुकारामतात्यांनी मिळविले आहेत. सरकारच्या आश्रयाने छापलेल्या गाथेत फक्त ४६०३ अभंग व २३१ ओव्या होत्या. तेव्हा दुसरे आणखी सुमारे चार हजार अभंग रा. तुकारामतात्यांच्या परिश्रमाने आपणास पहावयास मिळाले आहेत. याबद्दल समग्र महाराष्ट्र देश त्यांचा ऋणी झाला आहे. आता रा. तुकारामतात्यांनी आपल्याकडून होईल तितका प्रयत्न करून वर निर्दिष्ट केले इतकेच अभंग आजला सापडले आहेत आणि यापुढे आणखी काही सापडण्याची शक्यता असली तरी त्यांची संख्या पूर्वोक्त दंतकथा खरी ठरण्याइतके ते खास सापडावयाचे नाहीत. यावरून अशी शंका उत्पन्न होते की, तुकारामाने जे एके ठिकाणी म्हटले आहे की, देवाने आपणास सांगितलेली कामगिरी आपण केली, ते खोटे ठरू पाहते आणि या भगवद्भक्तावर खोटे बोलल्याचा दोष येतो; परंतु या शंकेचे समाधान अगदी सोपे आहे. ते अर्थात असे की, तुकारामाने आपल्या हयातीत हजारो ठिकाणी कीर्तने केली असून प्रत्येक कीर्तनाच्या प्रसंगी तो समयास अनुरूप असे शेकडो नवे अभंग तात्कालिक स्फूर्तीने म्हणत असे. ते सारे टिपून ठेवण्याची सोय नव्हती. त्याच्या ज्या कित्येक शिष्यांनी हे काम पत्करिले होते, त्याला सर्व प्रसंगी अभंग टिपून ठेवण्याचे साधत नसे. त्या काळी हल्लीच्या सारखी लघुलेखनकला ज्ञात असती तर हे काम त्यांना करिता आले असते. एरवी कीर्तनप्रसंगी बोध करण्याच्या भरात येऊन तुकारामाच्या तोंडावाटे भराभर निघणाऱ्या सहस्त्रावधी उक्ती जशाच्या तशा टिपून घेण्याचे सामर्थ्य कोणाही मनुष्यास त्या काळी असणे संभवत नाही. या कारणास्तव त्याचे हजारो अभंग लोकांच्या कानी पडले तेवढेच. ते लिहून ठेविले नाहीत. ही गोष्ट ध्यानात आणिली असता तुकारामाच्या पदरी खोटे बोलल्याचा दोष मुळीच येत नाही असे म्हणण्यास हरकत नाही.

आता तुकारामाने कोणकोणत्या निमित्ताने अभंग केले ते येथे थोडक्यात सांगतो. त्याची बरीच कविता सहृदय कवींच्या वृत्तीस अनुसरून स्वत:च्याच संबंधाची आहे.

संसारात जे नानाविध प्रसंग त्यास आले त्याच्या अनुरोधाने त्याने अभंग म्हटले आहेत. त्याचप्रमाणे कीर्तनभजनादी प्रसंगी निरनिराळ्या विषयांवर त्याने पुष्कळ अभंग केले आहेत. रा. रा. तुकारामतात्या यांनी छापलेल्या गाथेत या विषयांच्या अनुरोधाने तुकारामाच्या अभंगाचे वर्गीकरण केले आहे. त्याचे येथे दिग्दर्शन केल्यास अप्रासंगिक होणार नाही असे वाटते. हे वर्गीकरण येणेप्रमाणे आहे:-

पहिल्याने स्वत:च्या संबंधाची प्रकरणे: यापैकी बरेच अभंग आम्ही येथवर प्रसंगानुरोधाने दिले आहेत. त्यावरून त्या प्रकरणांची माहिती वाचकाला सहज होण्यासारखी आहे. यानंतरचा दुसरा विभाग वैराग्यपर प्रकरणांचा होय. यात संसारविपत्तिवर्णन, संसाराचा त्रास, वैराग्य, संसारापासून सोडविण्याविषयी विनवणी, संसारापासून मुक्त होण्याचा प्रयत्न, भक्तीस लागल्यानंतरची संसारस्थिती, संकल्प, मनास उपदेश, सगुण उपासना, स्तवन, करुणा, आपले हीनपण, मनाची उपाधी दूर करण्यासाठी देवाचे स्तवन, देवाबरोबर सलगीची व कौतुकाची उत्तरे इतकी प्रकरणे आहेत. तिसरा विभाग भक्तीविषयक प्रकरणांचा होय. यात भाव, भक्ती व प्रेम यांचे सामर्थ्य, भजन, कीर्तन, चिंतन, ध्यान आणि पूजन, नामाचा महिमा, संतांविषयी प्रेम, सत्संग, संत व भक्त यांचा महिमा, भक्तवात्सल्य, प्रतिमापूजन, देवाचा कनवाळूपणा, देवावर अभंग, देवदर्शनाची उत्सुकता, देवप्राप्ती, सद्गुरूप्राप्ती, शिष्यप्राप्तीची इच्छा, सिद्धी, ज्ञान, वैकुंठ व मुक्ती यापेक्षा भक्तीची प्रौढी, पंढरीचा महिमा, हरिपाठ ही प्रकरणे आहेत. चौथा विभाग ज्ञानसंबंधी प्रकरणांचा होय. यात भक्तीपासून ज्ञानप्राप्ती, भक्तीस लागल्यानंतरची मनाची स्थिती, मानसपूजा, घाण्याचे अभंग, देवाचे व भक्तांचे ऐक्य, गुरूविषयी प्रेम व गुरूची आवश्यकता, साधनाविषयी, प्रारब्ध अथवा कर्माचे फळ, जनास उपदेश, बोधपर अभंग, जनास शिक्षा, दांभिकास शिक्षा, ब्राह्मणास शिक्षा, शाक्तांस शिक्षा, ज्ञाती किंवा वर्णविचार, कलीचा महिमा, कन्याविक्रय, हिंसानिषेध, अभाविक, नास्तिक व तार्किक, व्रतांचा महिमा, क्षुद्रदेवतांचा उपहास, ज्ञानबोध, ही प्रकरणे आहेत. पाचवा विभाग आख्यानांचा आहे. यात ओव्यांचे अभंग असून बाळक्रीडेवर व त्या क्रीडेत येणाऱ्या बहुतेक खेळावर केवळ अध्यात्मपर अभंग आहेत. याशिवाय रामचरित्र, हनुमंतस्तुती, कार्तिकीचा सोहळा, पंढरपूर, एकनाथस्तुती वगैरे पुष्कळ प्रकरणे या विभागात आहेत. सहावा विभाग भगवद्‌गीतेवरील अभंगाचा आहे. यात गीतेतील प्रत्येक श्लोकाची फोड स्पष्टपणे केली आहे. सातवा विभाग चरित्राचा आहे. यात पुराणातील महाविभूतींची व अर्वाचीन काळी झालेल्या काही साधूंची त्रोटक चरित्रे असून कित्येक मुख्य मुख्य कथाप्रसंगांचे वर्णन आहे. ह्या सात प्रकरणाशिवाय आणखी पदे, आरत्या, पाळणे, दोहोरे वगैरे आहेतच.

ही एवढी यादी वाचिली असता आमच्या चरित्रनायकाचे कवित्व किती प्रकारांनी प्रकट झाले होते ते वाचकांच्या ध्यानात येईल. आता हल्ली जे त्याचे कवित्व निरनिराळ्या भाविक जनांच्या व कित्येक विद्वज्जनांच्या परिश्रमाने उपलब्ध झाले आहे, ते किती अल्प आहे याची थोडीशी कल्पना व्हावी म्हणून तुकारामाच्या तोंडचे असे मानलेले एक वचन येथे देतो:

*वेदाचे अभंग केले श्रुतिपर ।। द्वादश सहल संहितेचे ।।१।।*
*निरुक्त निघंट आणि ब्रह्मसूत्र ।। अवतार सहस्त्र उपग्रंथ ।।२।।*
*अभंग ते कोटी भक्तिपर केले ।। ज्ञानपर केले तितुकेचि ।।३।।*
*पंचाहत्तर लक्ष भक्तिपर वर्णिले ।। नाम तें गाईलें तितुकेंचि ।।४।।*
*साठीलक्ष केला बोधक जनांसी ।। वर्णिलें रूपासी तितुकेंची ।।५।।*
*द्वादशसहस्त्र आत्मबोध केला ।। अनुभव घेतला एक सर्व ।।६।।*
*चौतीससहस्त्र लक्ष कोटी पांच ।। सांगोनिया साच तुका गेला ।।७।।*

या वरून पाहता तुकारामाचे पुष्कळ कवित्व नाहीसे झाले आहे. जे थोडे आज आम्हाला पहावयास मिळत आहे त्याचे सारे श्रेय भाविक लोकास दिले पाहिजे. हे जरी खरे आहे तरी त्यांच्या हस्तलिखित चोपड्यातच ते सारे अक्षयी अडकून राहिले असते व काले करून बहुतेक लोपले असते. आमच्या आधुनिक विद्वान मंडळीस ते मुद्दाम शोधून तपासून छापून प्रसिद्ध करण्याची बुद्धी कधीच झाली नसती; परंतु ही या महासाधूच्या कवित्वसंबंधाची अनास्था आमच्या या इलाख्याच्या एका गव्हर्नराच्या कृपेने दूर झाली. त्याचे नाव नेक नामदार सर बार्टल फ्रीअर हे होय. देहू, आळंदी वगैरे ठिकाणी तुकारामाचे माहात्म्य आहे व त्याच्या नावाचा घोष करीत सहस्त्रावधी वारकरी प्रतिवर्षी दोन वेळा सदरील ठिकाणाहून कसे पंढरीस जावयास निघतात, हे त्या विद्वान अधिकाऱ्याच्या लक्षात येऊन त्याने आमच्या चरित्रनायकाची सारी कविता छापविण्याविषयी तेव्हाचे डायरेक्टर मेहरबान ग्रांटसाहेब याला सूचना केली. त्यांच्याही अवलोकनात तुकारामाविषयी लोकांचे किती प्रेम आहे ते दिसून आले होते. यास्तव त्यांनी आपल्या काही शिष्यांस हे काम सांगितले. हे गृहस्थ रा. रा. विष्णू परशुरामशास्त्री पंडित, रा. रा. शंकर पांडुरंग पंडित एम. ए. व रा. रा. जनार्दन सखाराम गाडगीळ बी. ए. इत्यादी होत. यांना देहू, आळंदी, तळेगाव, पंढरपूर वगैरे ठिकाणी फिरून तुकारामाच्या अभंगाच्या हस्तलिखित गाथा मिळवावयास सांगितले. त्याप्रमाणे त्यांनी निरनिराळ्या ठिकाणी जाऊन हस्तलिखित प्रती मिळविल्या आणि तुकारामाचे जितके अभंग त्यास मिळाले तितके त्यांनी छापून काढले. हे सारे मिळवून छापण्यास सरकारी तिजोरीतून

२४००० रुपये खर्च झाला; परंतु या छापील ग्रंथाची किंमत फारच मोठी ठेविल्यामुळे साधारण लोकास त्या विकत घेऊन संग्रही ठेवण्याचे सामर्थ्य नसे; परंतु पुढे रा. तुकाराम तात्या यांनी आणखी पुष्कळ शोध करून व आणखी हस्तलिखित प्रती मिळवून पूर्वीच्यांच्या सरासरी दुप्पट अभंग छापून काढले व याप्रमाणे वाढवून छापलेल्या ग्रंथाची किंमतही त्यांनी अगदी माफक ठेविली. हल्ली हेच परोपकारी गृहस्थ या ग्रंथाचीही दुसरी अगदी स्वस्त आवृत्ती काढण्याच्या विचारात आहेत असे आम्ही ऐकतो. हा आपला स्तुत्य उद्देश त्यांनी शेवटास नेल्यास त्यांचे महाराष्ट्रजनांवर मोठेच उपकार होतील. तुकारामतात्यांनी छापलेल्या अभंगाची रचना विषयवार केली असल्यामुळे तर त्यांच्या ग्रंथाची उपयुक्तता फारच जास्त आहे; दुसरी आवृत्ती काढण्याचा त्यांचा हेतू सिद्धीस गेल्यास तीत त्यांनी आणखी एक सुधारणा अवश्य करण्यासारखी आहे. ती हीच की, सरकारी छापील प्रतीत जसा शब्दकोश दिला आहे तसाच तो त्यांनी आपल्या नूतन आवृत्तीत अवश्य द्यावा. असे केल्याने प्रचारातून गेलेल्या कित्येक शब्दांचा अर्थ समजून तुकारामाच्या कित्येक वचनास थोडीशी दुर्बोधता आली आहे ती नाहीशी होईल. त्याचप्रमाणे कित्येक स्थले अगदीच दुर्बोध झाली आहेत; ती निरनिराळ्या हस्तलिखित प्रतीत ताडून पाहून दुरुस्त करण्याची खटपट नव्या आवृत्तीच्या वेळी होईल तर फारच चांगले होईल.

●●●

# तुकारामाची मते

शेवटी एका प्रकरणाविषयी थोडेसे लिहिणे राहिले. ते अर्थात तुकारामाच्या मताविषयी होय. ही मते सांगावयाची म्हटली म्हणजे ज्ञानदेवाच्या वेळापासून जो एक आध्यात्मिक उन्नतीचा मार्ग महाराष्ट्रात सर्वत्र रूढ झाला, त्याच्या स्वरूपाचे निरूपण केले पाहिजे. याविषयी प्रकृत चरित्राच्या उपक्रमात थोडेसे दिग्दर्शन केले आहे. त्यावरच येथे थोडासा विस्तार करू.

ज्ञानदेवाच्या वेळापासून सुमारे पाचशे वर्षांच्या अवकाशात आमच्या ह्या महाराष्ट्रामध्ये पुष्कळ संत निर्माण झाले. त्यापैकी सुमारे पन्नास असामीची चरित्रे महिपतीने आपल्या ग्रंथात दिली आहेत. या संतमालिकेमध्ये ब्राह्मण व इतर बहुतेक सर्व उच्चनीच मानलेल्या जातींचे मनुष्य असून त्यात काही स्त्रियाही आहेत. फार काय; पण कित्येक मुसलमानांनीही आपल्या मूळ धर्माचा त्याग करून या आध्यात्मिक मार्गाचा अवलंब केला होता आणि महिपतीसारख्या भाविक ब्राह्मणाने त्यांची नावे साधुमालिकेत ग्रंथित करण्यासारखे त्यांच्या अंगी साधुत्व आले होते. यावरून पाहता या काळी संतमंडळीत असा एक सिद्धांत स्थापित झाला होतासा दिसतो की, कोणी कोणत्याही जातीचा असला किंवा कितीही पढलेला किंवा न पढलेला असला, तरी त्याला ईश्वरभक्तीचा अत्युच्च मार्ग साध्य असून त्याने त्याचे अवलंबन करण्यास मुळीच प्रत्यवाय नाही. देवास सर्व माणसे सारखी असून त्यावर त्याची सारखीच कृपा आहे. स्त्री-पुरुष, पंडित-अपंडित, हिंदू-मुसलमान असा भेद देवाच्या घरी मुळीच नाही. हा बाह्य व कृत्रिम भेदभाव त्याच्या भक्तीस यत्किंचितही प्रत्यवायभूत होत नाही, कर्मठ ब्राम्हणांनी पुण्य व मोक्ष यांच्या प्राप्तीस जातिभेदाचा जबरदस्त अडथळा या काळापूर्वी घालून ठेविला होता. त्याचा उच्छेद ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम वगैरे संतांनी याप्रमाणे सर्वस्वी करून टाकला आणि मोक्षप्राप्तीचा सर्वांत सुगम मार्ग जो भक्तीचा त्याचा पुरस्कार आपल्या आचरणाने व बोधाने सर्वत्र केला आणि त्यांचे प्रांजलपणाचे, निष्कपटपणाचे व अत्यंत शुद्ध आचरण, त्यांची परमेश्वराच्या ठायी नि:सीम निष्ठा व जनाला सन्मार्ग लावून देण्यासाठी त्यांनी पुष्कळ छळ व त्रास सोसून अहर्निश चालविलेली खटपट ही पाहिली म्हणजे ते अत्यंत शुद्ध हेतूने प्रवृत्त झाले होते

असे म्हणावे लागते. त्यांच्या समकालीन पुराणप्रिय ब्राह्मणमंडळीने त्यांचा आपल्याकडून होईल तेवढा छळ केला; परंतु या महाशय साधुशिरोमणींच्या ठायी जी ज्ञानज्योती प्रदीप्त झाली ती या छलरूप प्रचंड झंझावाताने लवमात्र आंदोलनसुद्धा पावली नाही. तिच्या उज्ज्वल तेजाने त्यांनी आपला सन्मार्ग प्रकाशित करून अत्यंत सामान्य जनांसही तो स्पष्टपणे दिसे असा केला आणि त्यामुळे त्या मार्गाच्या अवलंबनाकडे त्यांची प्रबल प्रवृत्ती झाली. आमच्या चरित्र नायकाच्या चरित्रात या प्रकरणी कसकसा वृत्तांत घडून आला त्याचे वर्णन यथास्थली केलेच आहे. ईश्वरभक्तीस व कैवल्यप्राप्तीस जातिभेद आड येत नाही असे त्याने आपल्या पुष्कळ अभंगामध्ये म्हणून दाखविले आहे. त्यापैकी येथे एकच देतो :-

*नामधारकासी काही नाही वर्णावर्ण ।। लोखंड प्रमाण नाना जात ।।१।।*
*शस्त्र अथवा गोळे भलता प्रकार ।। परिसीं संस्कार सकळही हेम ।।२।।*
*पर्जन्य वर्षतां जीवना वहावट ।। तें समसकट गंगे मिळे ।।३।।*
*सर्व ते हे जाय गंगाचि होऊन ।। तैसा वर्णावर्ण नाही नामीं ।।४।।*
*महापुरीं जैसें जातसे उदक ।। मध्यें तें तारक नाव जैसी ।।५।।*
*तये नावेसंगें ब्राह्मण तरती ।। केवीं ते बुडती अनामिक ।।६।।*
*नाना काष्ठजात पडता हुताशनीं ।। ते जात होऊनी एकरूप ।।७।।*
*तेथें निवडेना घुरे कीं चंदन ।। तैसा वर्णावर्ण नामीं नाहीं ।।८।।*
*पूर्वानुओळख तेचि पैं मरण ।। जरी पावे जीवन नामामृत ।।९।।*
*नामामृते झाले मुळींचें स्मरण ।। सहज साधन तुका म्हणे ।।१०।।*

अत्युच्च मानलेले जे ब्राह्मण्य त्याच्याविषयी तुकारामाची कल्पना पुढीलप्रमाणे होती:-

*ब्राह्मण तरी एक नरहरि सोनार ।। ज्यासाठीं शंकर माथां राहे ।।१।।*
*ब्राह्मण तरी एक सजना कसाई ।। चक्रधारी गृहीं मांस विकी ।।२।।*
*तुका म्हणे ब्रम्ह जाणे तो ब्राह्मण ।। येरातें नमन करा परतें ।।३।।*

'जरी तो ब्राह्मण झाला कर्मभ्रष्ट ।। तुका म्हणे श्रेष्ठ तिहीं लोकी' या सर्वप्रसिद्ध वचनाचा अर्थही सदरील अभंगाच्या अनुरोधानेच लावावयाचा. याप्रमाणे पुरातन काळापासून चालत आलेले उच्चवर्णांचे स्तोम ज्ञानदेवाच्या काळापासून नाहीसे होऊन जो तो म्हणू लागला की, मनुष्याच्या ठायी जो आत्मा वास करीत आहे त्याला ह्या जडदोहाच्या किंवा कृत्रिम भेदभावाच्या योगाने कोणताच विकार घडू शकत नाही. ह्या आत्म्याच्या संबंधाने उच्चनीचपणाचा विचारच मुळी युक्त नव्हे. यास्तव त्याला मोक्षाचा

अनुभव घडण्यास ब्राह्मणांनी करून ठेवलेले अडथळे केवळ व्यर्थ होत. ईश्वरभक्तीचा अधिकार सर्वांस सारखाच असून सद्भाव, सदाचार व सत्संगती यांच्या योगाने मोक्षप्राप्ती सर्वांस सुगम आहे.

मोक्षसिद्धीसाठी संसाराचा त्याग करून रानावनात जाऊन बसावे, योगादिकांचे साधन करावे, वानप्रस्थाची किंवा संन्याशाची वृत्ती पत्करावी, वगैरे जे कैवल्यसिद्धीचे मार्ग पूर्वीपासून हिंदुधर्मांत विहित केले होते व ज्यांचे अनुसरण ब्राह्मण करीत असत, त्यांची व्यर्थता ज्ञानदेव, नामदेव, एकनाथ, तुकाराम वगैरे महाराष्ट्रांतील संतांनी स्वतःच्या आचरणाने लोकांच्या नजरेस पूर्णपणे आणून दिली. महाराष्ट्रांतील बहुतेक साधू आमरण संसारी राहून त्यांनी आपला भक्तिमार्ग अव्याहत चालविला होता. आमच्या चरित्रनायकाच्या चरित्रात तरी हीच गोष्ट प्रत्ययास आली. योगादी जी साधने महाप्रयासाने घडावयाची व तीही विवक्षित वर्णांसच विहित केलेली होती, इतर वर्णांतल्या लोकास त्यांचा मुळीच अधिकार नाही असे स्पष्ट सांगितले होते, त्यांच्याऐवजी नवविधा भक्ती व त्यातूनही भगवन्नामस्मरण हेच एक मानवास तारक आहे. असा अभिप्राय आमच्या तुकारामाने अनेक वेळा प्रकट केला आहे. उदाहरणार्थ पुढील अभंग पाहा:-

*न लाहिजे जपें न लाहिजे तपें ।। आम्हांसी हे सोपे गीती गातां ।।१।।*
*न करितां ध्यान न करिता धारण ।। तो नाचे कीर्तनामाजी हरि ।।२।।*
*जयासी नाहीं रूप आणि आकार ।। तोचि कटी कर उभा विटे ।।३।।*
*अनंत ब्रह्मांडे जयाचिया पोटी ।। तोचि आम्हा संपुष्टीं भक्तिभावे ।।४।।*
*तुका म्हणे वर्म जाणती लडिवाळें ।। जैं होती निर्मळे अंतर्बाहीं ।।५।।*

*युक्ताहार नलगे आणिक साधनें ।। अल्प नारायणें दाखविलीं ।।१।।*
*कलियुगामाजी करावें कीर्तन ।। तेणें नारायण देईल भेटी ।।२।।*
*नलगे हा लौकिक सोडावा वेव्हार ।। घ्यावें वनांतर भस्म दंड ।।३।।*
*तुका म्हणे मज आणिक उपाव ।। दिसती ते वाव नामावीण ।।४।।*

'सुखे संसार करावा ।। माजी विठ्ठल आठवावा ।।' हे सुप्रसिद्ध वचन तर सर्वांच्या तोंडीच आहे. तेव्हा यावरून हे उघड होते की, प्राचीन काळापासून उच्चवर्णांचे मोक्षप्राप्तीविषयी जे अत्यंत कठीण प्रयत्न सुरू झाले होते, त्यांचे व्यर्थत्व स्थापित करून सर्व जातींच्या व सर्व प्रकारच्या लोकांस अत्यंत सुलभ असे मोक्षप्राप्तीचे साधन जी भक्ती तिचा सर्वत्र प्रसार करणे हे आपले कर्तव्य होय, असे तुकारामाचे मत होते. पूर्वी संसार सोडून, गिरिकुहरांत जाऊन ध्यानधारणादि करीत बसण्याचा जो क्रम सर्वत्र रूढ झाला होता तो अस्वाभाविक असून निरर्थक आहे असे त्यास वाटत असे.

आपल्या असद्‌वृत्तीचे दमन करण्यासाठी संसाराचा व जनांचा त्याग करून एकांतवास स्वीकारणारांपेक्षा जे संसारात राहून व जनात वागून आपल्या असद्‌वृत्तींचे दमन करून सद्‌वृत्तींचा विकास करितात तेच खरे साधुपुरुष. मोहप्रसंग सदोदित उपस्थित असता जे त्याला कदापि वश होत नाहीत, त्यांचीच आध्यात्मिक उन्नती झाली म्हणावयाची. मनोनिग्रह असा त्यालाच घडतो; परंतु जे मोहप्रसंग टाळण्याकरिता निर्जन अरण्यात एकांतवास स्वीकारून बसतात, त्यांच्या ठायी मनोनिग्रहास अवकाशच न उरून त्यांची इष्ट उन्नती साधत नसते. पुन्हा कलत्र व पुत्र यांचे यथोचित संगोपन करणे हा मानवाचा परमपवित्र धर्म आहे. त्यास पराङ्‌मुख होऊन त्यास अकाली सोडून जाणे हे अत्यंत निर्घृणपणाचे, निःसीम आत्मपरतेचे व निसर्गविरुद्ध कर्म होय. निसर्गात सर्वत्र दृग्गोचर होणारा व्यवहार पाहता पूर्वकाली व अर्वाचीनकाली जे कोणी संसाराचा त्याग करून किंवा त्यात मुळीच प्रवेश न करून केवळ अवधूतवृत्तीचा अवलंब करितात, त्यांचे ऐहिक जिणे बरेच व्यर्थ होते व ही वृत्ती स्वीकारण्याची आपणास कोठून बुद्धी झाली, असा त्यास अहर्निश अनुताप होत असतो. हा जगाचा अनुभव ध्यानात आणून आमचा चरित्रनायक व त्याच्याच मालिकेतले इतर महाराष्ट्रीय संतजन नेहमी संसारात राहूनच स्वाभिमत मोक्षमार्गास अनुसरले.

मुकुंदराज, ज्ञानदेव, एकनाथ, मुक्तेश्वर, वामनपंडित आदिकरून महाराष्ट्रसाधू निर्माण होण्यापूर्वी वेदादी संस्कृत ग्रंथांत धर्मादी विषयांचे सर्व ज्ञान संग्रहित असून त्याचा अधिकार द्विजास मात्र आहे, इतरांस नाही अशी समजूत सर्वत्र रूढ झाली होती. मनुस्मृत्यादी व्यवहारशास्त्रावरील ग्रंथात हाच निबंध विहित केला होता. यामुळे द्विजखेरीजकरून इतर जन या ज्ञानास सर्वस्वी मुकल्यासारखेच झाले होते. ही दुःस्थिती सदरील महापुरुषांच्या परिश्रमाने नाहीशी होऊन सामान्य व्यवहारातल्या भाषेत आध्यात्मिक विषयावर ग्रंथ झाले. आमच्या चरित्रनायकाला या पूर्वकालीन साधूंच्या ग्रंथांचे साहाय्य कसे झाले ते यथास्थली सांगितलेच आहे. तुकारामानेसुद्धा या अधिकारप्राप्तीविषयी आपला संतोष अनेक वचनात प्रकट केला आहे. उदाहरणार्थ हे वचन पाहा:-

*वेदांचें जिव्हार वदवी चक्रपाणी ।। नव्हे माझी वाणी पदरची ।।१।।*
*बुडविल्या वह्या न भिजवा पाणी ।। नव्हे माझी वाणी पदरींची ।।२।।*
*गीतेचिया तुकें तुकविले अभंग ।। तुका म्हणे संग विठोबाचा ।।३।।*

सर्व वेद, शास्त्रे व पुराणे यांचे सार केवळ भगवन्नामस्मरण होय, असा त्याच्या बुद्धीचा निश्चय झाला होता. याचे प्रत्यंतर पुढील अभंग वाचून होईल:-

*वेद अनंत बोलिला ।। अर्थ इतकाची साधिला ।।१।।*
*विठोबासी शरण जावे ।। निजनिष्ठा नाम गावें ।।२।।*
*सकळ शास्त्रांचा विचार ।। अंती इतकाची निर्धार ।।३।।*
*अठरा पुराणी सिद्धांत ।। तुका म्हणे हाची हेत ।।४।।*

याप्रमाणे संस्कृत भाषेतील ग्रंथांचे दीर्घ काळ परिशीलन केल्यावाचून जे ज्ञान होणारे नव्हते ते या साधूच्या कृपेने सर्वांस सुलभ होऊन पूर्वकालीन पांडित्यादिकांची मुळीच गरज नाही असे झाले. यामुळे अगदी जडमुढासही वैदिक धर्माचे परम रहम्य प्राप्त होऊन वास्तविक आध्यात्मिक उन्नती झटली म्हणजे नीतिसंपन्नता होय, असे सर्वत्र स्थापित झाले. धर्मशीलतेस जशी शरीरबलाची आवश्यकता नाही तशीच बुद्धिबलाचीही नाही. तिला अगत्य काय ते एक चित्तशुद्धीचेच आहे. याविषयी तुकारामांचे म्हणणे येणेप्रमाणे आहे.

*आळस मत्सर नागविती मला ।। न सोडीच घाला क्रोध घाली ।।१।।*
*निर्बळ जाणोनी हात पाय नाहीं ।। अवघीयां पाही पांगुळा मी ।।२।।*
*काम दंभ मज अहंकार तिन्ही ।। बैसले धरूनि आडमार्ग ।।३।।*
*लज्जा भय द्वेष किल्मिष संसारीं ।। क्रोध षड्विकारी जाऊं नेदी ।।४।।*
*लटिकें कुचर अविचारी शंका ।। अविद्या कुतर्का सांडवलों ।।५।।*
*मनी उच्चाठणे पुरविली पाठी ।। अभेद ते दृष्टि ओढवले ।।६।।*
*तुका म्हणे येथे सांडवलों हातीं ।। सोडवीं श्रीपति अपंगासी ।।७।।*

*संगें वाढे शीण न घडे भजन ।। त्रिविध हे जन बहु देवा ।।१।।*
*याचिमुळे आला संगाचा कंटाळा ।। दिसताती डोळा नाना छंद ।।२।।*
*एकविध भाव रहावया ठाव ।। नेदी हा संदेह राहों चित्तीं ।।३।।*
*शब्दज्ञानी हित नेणती आपुलें ।। आणिक देखिलें नावडे त्यां ।।४।।*
*तुका म्हणे आतां ऐकिलेंचि भलें ।। बैसोनि उगलें रहावें तें ।।५।।*

हे अभंग वाचले म्हणजे तुकारामास चित्तशुद्धीची आवश्यकता किती वाटत असे हे ध्यानात येईल आणि ही चित्तशुद्धी दैवी प्रसादावाचून व्हावयाची नाही, असा त्याच्या बुद्धीचा निश्चय झाला असल्याकारणाने त्याने याप्रमाणे देवाची अनेक वेळा करुणा भाकिली आहे.

याप्रमाणे वर्णाश्रमकर्मे प्राचीन पद्धतीप्रमाणे कर्माचरणाची आवश्यकता नाही असे सांगून व कर्मकांड्यांनी मोक्षप्राप्तीस वर्णभेदाचा जो जबरदस्त अडथळा उत्पन्न केला

होता तो नाहीसा करून वेदशास्त्रादिकांच्या अध्ययनाचीही आवश्यकता नाही असे ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम इत्यादी साधूंनी स्थापित केले. गुरूची मात्र आवश्यकता त्यांनी विहित केली आहे. या संतमंडळींचा असा अभिप्राय असे की, जो सद्गुरूस शरण गेला नाही, त्याला खरे आध्यात्मिक ज्ञान व्हावयाचे नाही. या गुरुमाहात्म्यावर तुकारामाचे पुष्कळ अभंग आहेत, त्यापैकी एक येथे देतो :-

*सद्गुरूवांचोन प्रेतरूप वाणी ।। बोलती पुराणीं व्यास ऋषि ।।१।।*
*म्हणोनि तयाचें पाहूं नये तोंड ।। निगुरा अखंड सुतकाळा ।।२।।*
*कोणे परी तया नव्हेची सुटका ।। देह त्याचा लटिका जाणा तुम्ही ।।३।।*
*तुका म्हणे ऐसी बोलती पुराणे ।। संतांचीं वचने मागिला हो ।।४।।*

गुरू केल्यावाचून खरे धर्मरहस्य कदापि कळावयाचे नाही असा त्यांचा समज होण्याचे मुख्य कारण असे की, धर्मविषयांचे कितीही ज्ञान प्राप्त झाले तरी त्यांचे खरे बीज समजणे त्या काळी फारच कठीण होते. लेखी ग्रंथ पठन करण्याची तरी अनावश्यकता त्यांनी याच कारणास्तव सांगितली होती. नाना ग्रंथांचे व मतांचे ज्ञान प्राप्त करून घेण्याचा हव्यास धरिल्याने साधारण पुरुषाच्या बुद्धीचा काहीएक निश्चय होत नाही आणि एकंदर साधक बाधक मतांचे ज्ञान मिळवून त्यांचे शांतपणे व नि:पक्षपातबुद्धीने दीर्घ काळपर्यंत मनन करून सत्यनिर्णय करण्याची सवड व योग्यता फारच थोड्यांना असते. तेव्हा अशा स्थितीमध्ये सर्वांनीच ही अशी कष्टसाध्य गोष्टीची हाव न धरिता ज्याला हे रहस्यज्ञान गुरुशिष्यपरंपरेने प्राप्त झाले आहे, त्याची कास धरावी, म्हणजे व्यर्थ अटाट चुकून श्रमात पडण्याची भीती नाहीशी होईल. त्याचप्रमाणे सगुणब्रह्माची उपासना करण्याकडे सामान्य जनांची आधी प्रवृत्ती होऊन थोडासा सद्भाव व सद्भक्ती यांचा त्यांच्या ठायी विकास झाला म्हणजे निर्गुणबह्माच्या ज्ञानास ते चित्तशुद्धीद्वारा अधिकारी होतात. असा अधिकार त्यास प्राप्त झाला म्हणजे मग त्यांनी गुरूपसत्ती अवश्य करावी. गुरूपसत्ती घडली नाही तर त्याला खरे रहस्य कळणे नाही, अशी त्यांची समजूत होती. महिपतीने जी साधूंची चरित्रे दिली आहेत, त्यामध्ये हा गुरूस शरण जाण्याचा क्रम पुष्कळ वर्णिला आहे. इतर संतमंडळीप्रमाणेच तुकारामाची ही समजूत असणे साहजिक आहे. आता येथे हे एक सांगितले पाहिजे की, ही जी गुरू करण्याची आवश्यकता संतांनी स्थापित केली आहे ती फक्त बोधापुरती. गुरूच्या साहाय्याने धर्मरहस्य तेवढे समजावून घ्यावयाचे. ते समजेपर्यंत व समजल्यावर जी देवाची भक्ती करावयाची तीत त्यांना गुरूचे मुळीच साहाय्य लागत नसे. होमहवनादी वैदिकधर्मविहित कर्मे करण्यास जशी उपाध्यायाची गरज लागते, त्याच्यावाचून मुळी

चालावयाचेच नाही, तसा काही एक प्रकार संतजन जो गुरू करीत असत त्याच्या संबंधाने नसे. आमच्या ज्ञानदेवतुकारामादी संतमंडळीला देवास आपल्या भक्तीने आळविण्यासाठी मध्यस्थ कसला तो मुळीच लागत नसे. आपल्या वेड्यावाकड्या शब्दांनी ते देवाचे स्तवन करीत. वेडेंवाकडें गाईन।। परी मी माझा म्हणवीन।। हे तुकारामवचन सर्वश्रुतच आहे. त्याचप्रमाणे देवस्तुती करण्यास संस्कृत भाषेतील विवक्षित मंत्र अमुक तऱ्हेनेच म्हटले पाहिजेत, असा जो प्राचीन काळापासून समज होता तो या साधूंनी व्यर्थ ठरविला. हा कृत्रिम अडथळा अगदीच अप्रयोजक होता. कारण असे की, देव सर्वांचा मायबाप असता त्याला संतुष्ट करण्याकरिता कोणतेही कर्म करावयाचे ते अमुक एका वर्गातल्या माणसाच्या किंवा अमुक एका भाषेतील मंत्राच्या द्वारे केले तरच इष्ट हेतु सिद्धीस जाईल, असे म्हणणे स्वभावतःच अयुक्त दिसते. आपल्या मनातील उद्गार ठरलेल्या मंत्राद्वारे मध्यस्थाने म्हणून दाखविले तरच देव ते ऐकणार, असे मत ज्यांनी सर्वत्र रूढ केले त्याला देवाचे खरे स्वरूप कळलेच नाही असे म्हणावे लागते. वस्तुतः पाहता प्रत्येकाने त्या मायबाप प्रभूपाशी आपणास येत असेल त्या भाषेत साधेल त्या तऱ्हेने करुणा भाकिली असता तो ती अवश्य ऐकतो; किंबहुना तीच त्याला विशेष प्रिय होते. पुन्हा देवाने मनुष्याचे शब्द ऐकिले तरच त्याला त्याचे मनोगत कळावयाचे; एरवी कळावयाचे नाही असे मुळीच म्हणता येत नाही; मनुष्याला आपला हेतू शब्दांनी चांगलासा व्यक्त करिता आला नाही; तरी देव सर्वांच्या अंतर्यामी असल्याकारणाने त्याला तो समजण्यास मुळीच कठीण जात नाही. असा सिद्धांत सर्वसंमत आहे; मानसपूजेचे आमच्या साधुसंतांनी जे एवढे महत्त्व सांगितले आहे त्याचे तरी बीज यातच आहे. तुकारामाने या मानसपूजेवर काही अभंगही केले आहेत. माझे भक्त गाती जेथें ।। पांडवा मी उभा तेथें ।। हे भगवद्वचन सर्वप्रसिद्धच आहे. याप्रमाणे ज्ञानदेव, नामदेव, तुकाराम वगैरे साधूंची समजूत असल्यामुळे त्यांनी या गोष्टीचा बोध जनास आमरण करून कर्मकांडी ब्राह्मणांचे महत्त्व पुष्कळ कमी केले. या त्यांच्या बोधाने महाराष्ट्रातील एकंदर लोकास बरेच मतस्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्य प्राप्त होऊन पूर्वीची निरर्थक बंधने पुष्कळ शिथिल झाली. मोक्षसिद्धीच्या खऱ्या मार्गाचे अवलंबन करण्याचा अधिकार सर्वांस सारखाच प्राप्त होण्यासारखा आहे असे वाटून त्यांच्या ठायी उमेद व उत्साह ही उत्पन्न झाली आणि संतांनी उपदेशिलेल्या भक्तिमार्गाचा ते मोठ्या आस्थेने अवलंब करू लागले. याप्रमाणे आध्यात्मिक उन्नतीचे परमश्रेष्ठ साधन त्याला सुगम झाले. हा त्या संतमंडळीचा महाराष्ट्रावर फारच मोठा उपकार झाला. आमच्या चरित्रनायकाने या संबंधाने कसकशी खटपट केली ती वाचकांस आठवतच आहे.

असो; आता तुकारामाच्या ईश्वरविषयक मताविषयी येथे थोडेसे लिहू. यासंबंधाने कित्येकांचा मतभेद आहे; परंतु जे कोणी त्याचे अभंग चित्त देऊन शोधपूर्वक वाचतील त्यांना या प्रकरणी मुळीच संशय उरणार नाही. प्रथमत: या मतभेदाचे दिग्दर्शन करून मग आम्हास या प्रकरणी काय सिद्ध करावयाचे आहे, ते प्रमाणे देऊन करू. कित्येकांचे असे मत आहे की, तुकाराम द्वैतवादी होता. आत्मा व परमात्मा यांचे भिन्नत्व तो मानीत असे. एरवी त्याने नवविधा भक्तीचा अंगीकार व पुरस्कार केला नसता. दुसऱ्यांचे असे म्हणणे आहे की, तुकाराम अद्वैतवादी होता. जीवात्मा व परमात्मा हे भिन्न स्वरूपी नसून, हे सारे विश्व ब्रह्मरूपच आहे, असा त्याचा समज असल्याची साक्ष त्याची शेकडो वचने देत आहेत. हे दुसरे मत आम्हास यथार्थ वाटते. आमचा तर असा समज झाला आहे की, ज्ञानदेवाच्या वेळापासून पुढे जे साधू महाराष्ट्रात झाले ते सारे वेदांती होते. आता, ते वेदांती होते तर त्यांनी नवविधा भक्तीचा अंगीकार आमरण केला याचे कारण काय? या शंकेचे समाधान अगदी सोपे आहे. ते असे की, सामान्य जनास निर्गुण निर्विकार परब्रह्माचे स्वरूप एकदम समजण्यासारखे नसल्या कारणाने त्याला सगुण ब्रह्माची उपासनाच योग्य होय. पुराणांतरी ज्या देवावतार कथा सांगितल्या आहेत त्यांच्यावर ज्यांची श्रद्धा दृढ झालेली असते, ते त्या अवतारांच्या प्रतिमा करून त्यांचे भजनपूजनादी मोठ्या भाविकपणाने करितात. वेदांतमताच्या प्रवर्तकास प्राचीन ग्रीक तत्त्ववेत्त्यांप्रमाणे ही जनाची समजूत कायम राखून आपला इष्ट उद्देश सिद्धीस नेणे सोईचे वाटल्यावरून त्यांनी या अवतारावर अशी कल्पना बसविली की, एकंदर चराचर विश्वाच्या ठायी जसे ब्रह्म सर्वत्र स्थित आहे तसे ते या अवतारांच्या ठायीही होते. भेद इतकाच की, त्यांच्या ठायी त्या ब्रह्माचा अंश अधिक होता. म्हणून त्यांच्या हातून धर्म संस्थापनेसाठी अलौकिक कर्मे घडली. तेव्हा या अवतारास नामरूपास आलेले परब्रह्म मानण्यात काही एक हरकत नाही आणि सामान्य लोक ज्या अर्थी त्यास देवावतार मानून त्यांची पूजाअर्चा करीत आहेत, त्या अर्थी त्याला तसे करण्यापासून परावृत्त न करिता त्यांची समजूत मात्र घालण्याची सोय व्हावी म्हणजे झाले आणि चित्तशुद्धी होइर्पर्यंत ही सगुण ब्रह्माची भक्ती मानवांनी अवश्य करावी असे त्यांनी विहित केले. गीतेत तरी हाच आशय व्यक्त केला आहे. तेथे चित्तशुद्धी होऊन ज्ञानाचा अधिकार प्राप्त होईपर्यंत कर्माचरण करावे असे पुन्हा पुन्हा सांगितले आहे. ज्या महाविभूती या भूतलावर अवतृत होऊन लोकोन्नतीसाठी आमरण झटल्या, त्यांच्या प्रतिमा सगुणब्रह्माची प्रतीके म्हणून पुढे ठेवून त्यांची नवविधा भक्ती करून चित्तशुद्धी संपादणे, यज्ञादी कर्मानुष्ठानाची खटपट करण्यापेक्षा विशेष चांगले,

सोईचे व सुलभ आहे यात संशय नाही. आता ज्या पाषाणादिकांच्या मूर्तीपुढे हे संतजन भजनपूजनादी करीत असत त्यांच्याविषयी त्यांची कशी समजूत होती ते तुकारामाच्या पुढील वचनांवरून स्पष्टपणे कळेल.

*केला मातीचा पशुपति ।। परि मातीस काय म्हणती ।।*
*शिवपूजा शिवासि पावे ।। माती माती माजी सामावे ।।१।।*
*केला पाषाणाचा विष्णु ।। परी पाषाण नव्हे विष्णु ।।*
*विष्णुपूजा विष्णूसी अर्पे ।। पाषाण राहे पाषाणरूप ।।२।।*

*अवघे ब्रह्मरूप रिता नाही ठाव ।। प्रतिमा तो देव कैसा नव्हे ।।१।।*
*नाही भाव तया सांगावे ते किती ।। आपुलाल्या मती पाखांडिया ।।२।।*
*जया भावे संत बोलिले वचन ।। नाही अनुमोदन शाब्दिकांसी ।।३।।*
*तुका म्हणे संती भाव केला बळी ।। नकळता खळीं दुषिला देव ।।४।।*

ही तुकारामाची वचने वाचिली म्हणजे प्रतिमापूजेविषयी वेदांतवादी संतमंडळीस दोष लावण्यास मुळीच आधार नाही असे दिसून येईल. आता ज्ञानदेव व तुकाराम यांसारख्या ज्या साधूंचे ही अशी भक्ती करून चित्त शुद्ध झाले होते त्यांनी शेवटपर्यंत तोच क्रम सुरू ठेवण्यात काय अर्थ होता बरे? अशी जर कोणी शंका घेईल तर तिचे समाधानही अगदी सोपे आहे. एक तर असे की, भक्ती दोन प्रकारच्या मानल्या आहेत. एक आरंभभक्ती व दुसरी ज्ञानोत्तर भक्ती. ज्या भक्तांची चित्तशुद्धी झालेली नसते तो आरंभभक्त होय आणि चित्तशुद्धी झाल्याने ज्ञानाचा अधिकार येऊन गुरूच्या कृपेने ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर जो भक्ती सोडीत नाही तो ज्ञानोत्तर भक्त होय. ज्ञानोत्तर भक्तीमध्येच मनुष्य का राहतो म्हणाल तर त्याच्या ठायी भक्तिभाव दृढ होऊन त्याची वृत्ती अगदी तद्रूप झालेली असते; भजनपूजनादि नवविधा भक्ती त्याची केवळ प्रतिस्वभाव बनून जाते आणि याप्रमाणे वृत्ती झाली म्हणजे त्याला तीवाचून चैनच पडेनासे होते. सत्यज्ञानाचा प्रत्यय घडल्यावर तर त्याला तीत प्रेमाचे अतिशयितच भरते येते. तो तीत वारंवार रत होऊन देहभानही विसरतो. तेव्हा अर्थात अशा साक्षात ब्रह्मानंदाचे निधान जी भक्ती तिचा तो सहसा त्याग करीत नाही. तुकारामाने ह्या आनंदाचे महत्त्व स्वानुभवपूर्वक वेळोवेळा वर्णिले आहे. उदाहरणार्थ त्याची पुढील वचने पहा :-

*सिद्धीचा दास नव्हे श्रुतीचा अंकिला ।। होईन विठ्ठला सर्व तुझा ।।१।।*
*सर्वकाळ सुख आमच्या मानसीं ।। राहिले जयासी नास नाहीं ।।२।।*
*नेणे पुण्यपाप न पाहें लोचनीं ।। आणिका वांचूनि पांडुरंगा ।।३।।*

*न करी आस मुक्तीचे सायास ।। भक्ति प्रेमरस सांडूनियां ।।४।।*
*गर्भवासी धाक नाही येतां जातां ।। हृदयी राहतां नाम तुझें ।।५।।*
*तुका म्हणे झालो तुझाचि अंकिला ।। न भे मी विठ्ठला कळिकाळासी ।।६।।*
*मोक्षाचे आम्हास नाही अवघड ।। तो असे उघड गांठोळीस ।।१।।*
*भक्तीचे सोहळे होतील जीवासी ।। नवल तेविशी पुरवितां ।।२।।*
*ज्याचे त्यासी देणे कोणतें उचित ।। मानूनिया हित घेतों सुख ।।३।।*
*तुका म्हणे सुखे देई संवसार ।। आवडीसी धार करी माझे ।।४।।*

सारांश काय की, आरंभभक्त ब्रह्मज्ञानप्राप्तीनंतर ही भक्तिसुखानुभव घेत राहिला, तर त्यात अस्वाभाविक असे काहीच नाही. आता सदरील शंकेचे दुसरे समाधान गीतेमध्ये श्रीकृष्णाने तृतीय अध्यायात केले आहे. ज्ञानप्राप्ती झाली तरी जडदेह आहे तोपर्यंत प्रारब्धप्राप्त सर्व कर्मे मानवाकडून होत असतात. जसा ज्याचा स्वभाव बनला असतो तसा तो देहावसान होईपर्यंत वर्तावयाचा. भगवद्भक्ताचीही स्थिती अशीच आहे. दुसरे असे की,

*यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जन: ।।*
*स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ।। भ. गी. अ.३, श्लो.२१.*

या श्लोकांचे तुकारामकृत भाषांतर येणेप्रमाणे आहे:-

*जैसे आचरती श्रेष्ठ ।। तो परनिष्ठ पदे मार्ग ।।१।।*
*तैसे इतर लोक ।। हा विवेक चाळिती ।।२।।*
*श्रेष्ठ निर्णया सारिखे ।। जग या सुखे मानावें ।।३।।*
*तुका म्हणे सुफळ न्याय वेदरायसभेचा ।।४।।*

या वचनाचा भावार्थ मिळून इतकाच की, श्रेष्ठ जन ज्याप्रमाणे वागतात त्याप्रमाणे इतर जन वागण्याचा निश्चय करितात. हा मानवी स्वभावाचा कल जाणून ज्ञानदेव, तुकाराम आदिकरून संत ज्ञानप्राप्तीनंतरही भक्तिमार्गांतच रत झाले. कारण त्यांनी जर ज्ञानोत्तर भक्तीचा त्याग केला असता तर त्यांच्या शिष्यांस तीच अवस्था एकदम प्राप्त करून घ्यावी असे वाटून चित्तशुद्धीस आवश्यक जी नवविधा भक्ती तिचा त्यांनी मुळापासूनच अव्हेर केला असता. श्रीकृष्णाने भगवद्गीतेत अशा प्रकारे उतावळेपणा करणाराचा निषेध केला आहे. दुसऱ्या अध्यायात त्याने असे सांगितले आहे की, चित्तशुद्धीपूर्वी कर्मसंन्यास करणे उचित नव्हे. त्यापासून आत्महानी होते; परंतु हा नियम ध्यानांत न आणून आजपर्यंत कैक संन्याशी अकाली संसारत्याग करून केवळ दुराचारी बनले आहेत. हा असा दुराचार माजू नये म्हणून तुकारामासारखे जीवनमुक्त पुरुष आमरण भक्तिपरायण राहिले. ही वास्तविक स्थिती लक्षात आणिली असता तुकाराम द्वैतवादी होता असे म्हणण्याचे कोणीही धाडस करणार नाही.

आता ज्ञानदेव, रामदास, तुकाराम आदिकरून भगवद्भक्त अनेक देवपूजा करणारे होते असे म्हणणे मुळीच युक्त नव्हे. पुराणांतरी वर्णिलेल्या अवतारकथा खऱ्या मानून, त्यात सांगितलेल्या निरनिराळ्या विभूतीस त्यांनी देव मानले, हे जरी खरे आहे, तरी त्यांचे रहस्य असे की, ही सर्व सगुणब्रह्माची लीला आहे. ज्या निरनिराळ्या विभूती निरनिराळ्या काळी इहलोकी प्रकट होतात, त्या साऱ्या त्या ब्रह्माच्या अंशरूप आहेत. तेव्हा त्यापैकी कोणत्याही विभूतीच्या ठायी आपली निष्ठा दृढ केली तरी अंती कल्याण व्हावयाचे, असा आमच्या संतांच्या बुद्धीचा निश्चय असे तरी त्यांच्या चरित्रात असे आढळून येते की, ते बहुतकरून कोणातरी एकाच विभूतीवर आपला सर्व भाव ठेवून चालत असत. कोणी रामाची, कोणी शिवाची, कोणी कृष्णाची, कोणी विठ्ठलाची भक्ती करीत असत. त्यांची स्वाभिमत दैवतावर इतकी दृढ निष्ठा असे की, कित्येक साधू इतर दैवतांच्या दर्शनास गेले तरी त्यास आपल्या इष्ट दैवतांचे नाव घेऊन नमस्कार करीत असत. या संबंधाचे कित्येक चमत्कारही महिपतीने आपल्या चरित्ररूप ग्रंथांत वर्णिले आहेत. यापैकी मासल्यासाठी येथे एकच देतो. रामदामस्वामी रामदैवताचा नि:स्सीम भक्त असे. त्याला तुकारामाच्या काही अनुयायांनी एक वेळ आग्रह करून पंढरीस नेले. विठोबासमोर जाऊन या भगवद्भक्ताने हात जोडले तो विठोबाच्या ठिकाणी रामाची मूर्ती दिसू लागली! इतका त्याचा रामचरणी दृढभाव होता. आमच्या चरित्रनायकाची तरी गोष्ट अशीच होती. त्याची निष्ठा सर्वस्वी पंढरीच्या विठोबावर असे. इतर देवतांची त्याने स्तुती केली आहे. ती आम्ही वर दर्शविलेल्या दृष्टीने त्यांचे हे पुढील म्हणणे किती निश्चयाचे आहे ते पाहा:-

*विठ्ठलावांचोनि त्राता त्रिभुवनी ।। दीन उद्धरणी दुजा नाहीं ।।१।।*
*दया क्षमा शांति आहे ज्याचे मनीं ।। वर्णिती पुराणीं गुण ज्याचे ।।२।।*
*मज अनाथासी साह्यकारी झाला ।। कृपेने छेदिला भवपाश ।।३।।*
*तुका म्हणे हरिकांसेसीं लागावे ।। होतो मी शिणलों बहु जन्मीं ।।४।।*

*विठ्ठलावांचोनि ब्रह्म जे बोलती ।। वचन ते संती मानू नये ।।१।।*
*विठ्ठलावांचोनि जे जे उपासना ।। अवघाची जाणा संभ्रमु तो ।।२।।*
*विठ्ठलावांचूनि सांगतील गोष्टी ।। वांया ते हिंपटी होत जाणा ।।३।।*
*विठ्ठलावांचूनि जे काही जाणती ।। तितुक्या वित्पत्ती वाउगिया ।।४।।*
*तुका म्हणे एक विठ्ठलचि खरा ।। येर तो पसारा वाउगाचि ।।५।।*

इष्ट दैवतावर नि:स्सीम निष्ठा ठेवून मोक्षप्राप्तीची अपेक्षा करण्याची ही रीती अगदी पुरातन आहे. आर्यधर्मातील एकंदर मतमतांतरांचे मूळ ज्यात आहे त्या ऋग्वेदांतच या

रीतीचे बीज आहे. त्यात इंद्र, वरुण आदिकरून दैवीशक्तीच्या स्तुतिपर जी स्तोत्रे आहेत, त्यात ती ती दैवीशक्ती एकंदर विश्वाची उत्पादक व नियामक आहे असे वर्णन केले आहे. त्यात ऋषी एका देवतेची स्तुती करू लागले म्हणजे दुसऱ्या देवता नाहीतच असे तेवढ्या वेळापुरते ते मानतातसे दिसतात; परंतु याचे वास्तविक इंगित असे आहे की, एकंदर विश्वाच्या दैवी शक्ती जरी चर्मचक्षूस भिन्नशा भासतात तरी त्या एकरूपच आहेत. ती एकाच महाशक्तीची विविध दर्शने आहेत, असे त्यावेळच्या ज्ञानी पुरुषांना वाटत असे यात काहीएक संशय नाही. उपनिषदात व त्यांच्या आधारावर रचलेल्या वेदांतदर्शनातही हाच सिद्धांत स्थापित केला आहे. प्राचीन ऋषिमुनींनी विश्वाचे प्रत्यक्ष अवलोकन करून जो हा विश्वविषयक सिद्धांत प्रणीत केला त्याचेच प्रणयन अर्वाचीन काळी ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम वगैरे महापुरुषांनी वर्णिलेल्या दैवी अवतारांची चरित्रे शतश: ऐकून व मनन करून केले. वेदकाळी जशा देवी शक्तीच मुख्यत: ब्रह्माचा प्रतीके मानीत, तद्वतच पुराणकाळी धर्मसंस्थापनार्थ इहलोकी जे देवावतार झाले अशा कथा सर्वत्र पसरल्या, ते सगुणब्रह्याची प्रतीक होत असे मानण्याची प्रवृत्ती पडली. आता ही प्रवृत्ती वेदांतमतवाद्यांनी मोठ्या धूर्तपणाने पाडली यात किमपि संदेह नाही; कारण एकंदर जनसमाजास आपल्या मताचा करण्याविषयी जो प्रयत्न करू जाईल, त्याने त्यास कोणत्या गोष्टी मान्य, प्रिय व पूज्य वाटतात त्यांचे सूक्ष्मरीत्या अवलोकन करून त्यांच्या कलाप्रमाणे आपल्या उपदेशास वळण दिले पाहिजे. ही स्वमताच्या सार्वत्रिक प्रसाराची कला जशी ग्रीक तत्त्ववेत्त्यांना साधली होती तशी ती त्यांच्याहूनही पुरातन अशा आमच्या ऋषीस साधली होती आणि तिचाच अवलंब व पुरस्कार आमच्या तुकारामादी संतमंडळीने केला होता. या दृष्टीने त्यांच्या एकंदर धर्मविषयक कल्पनांचा विचार केला असता त्याला नाव ठेवण्यास मुळीच जागा नाही असे म्हणावे लागते. ह्या साधारण प्रवृत्तीस अनुसरून आमच्या चरित्रनायकाचे वर्तन होते. पुराणातील देवतासच फक्त तो मान देत असे; त्यापैकी कित्येक देवतांची त्याने स्तोत्रेही केली आहेत. इतर क्षुद्र देवतांना तो मुळीच मानीत नसे. तर उलट त्यांच्या उपहासपर त्याने अभंग केले आहेत. उदाहरणार्थ पुढील अभंग पाहा:–

*नव्हे जाखाई जोखाई ।। मायराणी मेसाबाई ।।१।।*
*बळिया माझा पंढरीराव ।। जो या देवांचाही देव ।।२।।*
*रंडी चंडी शक्ति ।। मद्यमांसातें भक्षिती ।।३।।*
*बहिरव खंडेराव ।। रोटी मुटी सांटी देव ।।४।।*

*गणोबा विक्राळ ।। लाडूमोदकांचा काळ ।।५।।*
*भुंज्या म्हैसासुरे ।। हे तो कोण लेखी पोरे ।।६।।*
*वेताळें फेताळें ।। जळो त्यांचे तोंड काळे ।।७।।*
*तुका म्हणे चित्ती ।। धरा रखुमाईचा पती ।।८।।*

ही सारी दैवते येथील मूळच्या राहणाराची असल्यामुळे आर्यांच्या पुराणग्रंथात त्यांचा मुळीच उल्लेख नाही. आता गणपतीलाही इतर क्षुद्र देवतांच्या मालिकेत तुकारामाने कसे गोविले हा प्रश्न आहे. कारण शिव व त्याचा पुत्र गणपती या दोन देवास आर्यांनी आपल्या उपास्य दैवतात प्राचीन काळापासून सामील केल्याचा पुरावा आहे. त्यांच्या पराक्रमाच्या वर्णनपर पुराणेही रचिली आहेत. वस्तुत: पाहता हे येथील मूळरहिवाशांचे पूर्वीचे देव होते. रोमन लोकांनी निरनिराळी राष्ट्रे पादाक्रांत केल्यावर ज्याप्रमाणे त्या राष्ट्रांतील मुख्य मुख्य देवतास आपल्या उपास्य देवतात सामील केले, तसाच प्रकार हिंदुस्थानात वसाहती करणाऱ्या आर्यांनी केला होता; परंतु तुकारामाला ही गोष्ट त्या वेळी माहीत असण्याचा संभव नव्हता.

आता तुकाराम वेदांतमतवादी होता हे त्याच्या पुढील वचनावरून सिद्ध होईल.

*अवघें ब्रह्मरूप रिता नाहीं ठाव।। प्रतिमा तो देव कैसा नव्हे ।।१।।*
*नाहीं भाव तया सांगावें तें किती ।। आपुल्या मती पाखंडिया ।।२।।*
*जया भावे संत बोलिले वचन ।। नाहीं अनुमोदन शाब्दिकांसि ।।३।।*
*तुका म्हणे संती भाव केला बळी ।। न कळतां खळी दुषिला देव ।।४।।*

*कवणा पाषाणासी धरूनि भाव ।। कवणावरी पाव ठेवूं आतां ।।१।।*
*म्हणऊनि निश्चित राहिलों मनीं ।। तूचिं सर्वां खाणी देखोनियां ।।२।।*
*कवणाचें कारण नलगेचि कांहीं ।। सर्वीं सर्वां ठायीं तूं मज एक ।।३।।*
*काया वाचा मन ठेविलें तुझ्या पायीं ।। आतां उरले कायी न दिसे देवा ।।४।।*
*जळें जळ काय धोविले एक ।। कवण ते पातक हरले तेथे ।।५।।*
*पापपुण्य हे वासना सकळ ।। ते तुज समूळ समर्पिली ।।६।।*
*पितर स्वरूपी तूचि जनार्दन ।। सव्य ते कवण अपसव्य ।।७।।*
*तुका म्हणे जित पिंड तुम्हा हातीं ।। देऊनि निश्चिती मानियेली ।।८।।*

*आम्ही न देखों अवगुणा ।। पापी पवित्र शाहाणा ।।१।।*
*अवघीं रूपे तुझीं देवा ।। वंदूं भावें करूं सेवा ।।२।।*
*मज भक्तीसवें चाड ।। नेणें पाषाण धातु वाड ।।३।।*
*तुका म्हणे घोटीं ।। विष अमृत तुजसाठीं ।।४।।*

ही वचने वाचून तुकारामास जे मूर्तिपूजक म्हणत असतील त्यांची मूर्तिपूजेच्या संबंधाने काही विलक्षणच कल्पना असली पाहिजे. आम्हाला तर यात वेदांतमताच्या खऱ्या रहस्याचा बोध होतो. आता जीवात्मा व परमात्मा हे भिन्न नसून एकरूप आहेत, या वेदांताच्या महासिद्धांताचे निरूपण पुढील अभंगात आहे :-

*तुज मज नाहीं भेद ।। केला सहज विनोद ।।१।।*
*तुज माझा आकार ।। मी तों तूंच निर्धार ।।२।।*
*मी तुजमाजी देवा ।। घेसी माझ्या अंगें सेवा ।।३।।*
*मी तुजमाजी अचळ ।। मजमाजी तूं सबळ ।।४।।*
*तूं बोलसी माझ्या मुखें ।। मी तों तुजमाजी सुखे ।।५।।*
*तुका म्हणे देवा ।। विपरीत ठायीं नांवा ।।६।।*

*तुज मज ऐसी परी ।। जैसे तरंग सागरी ।।१।।*
*दोहींमाजी एक जाणा ।। विठ्ठल पंढरीचा राणा ।।२।।*
*देव भक्त ऐसी बोली ।। जंव भ्रांति नाहीं गेली ।।३।।*
*तंतु पट जेवी एक ।। तैसा विश्वेसीं व्यापक ।।४।।*

समुद्र व तरंग, तंतू व पट हे दृष्टांत वेदांतावरील ग्रंथात नेहमी देण्यात येत असतात. त्यांचाच अनुवाद सदरील अभंगात तुकारामाने केला आहे. समग्र विश्व ब्रह्मरूप आहे या वेदांतसिद्धांताचे दिग्दर्शन पुढील अभंगात आहे :-

*रक्त श्वेत कृष्ण पीत प्रभा भिन्न ।। चिन्मय अंजन सुदलें डोळां ।।१।।*
*तेणें अंजनगुणें दिव्य दृष्टि जाली ।। कल्पना निमाली द्वैताद्वेत ।।२।।*
*देशकालवस्तुभेद मावळला ।। आत्मा निर्वाळिला विश्वाकार ।।३।।*
*न झाला प्रपंच आहे परब्रह्म ।। अंहसोहं ब्रह्म आकळलें ।।४।।*
*तत्त्वमसि विद्या ब्रह्मानंद सांग ।। तेंचि झाला अंगें तुका आतां ।।५।।*

*पय दधि घृत आणि नवनीत ।। तैसे दृश्यजात एकपणे ।।१।।*
*कनकाचे पाहीं अलंकार केले ।। कनकत्वा आलें एकपणें ।।२।।*
*मृत्तिकेचे घट झाले नानापरी ।। मृत्तिका अवधारीं एकपणे ।।३।।*
*तुका म्हणे एक एक ते अनेक ।। अनेकत्वी एक एकपणा ।।४।।*

आता हे चराचर विश्व व संसार मृगजलवत मिथ्या आहेत हा वेदांताचा सिद्धांत तुकारामाच्या पुढील अभंगात स्पष्टपणे सांगितला आहे : -

*मृग जळा काय करावा उतार ।। पावावया पार पैल थडी ।।१।।*
*खापराचे होन खेळती लेंकुरें ।। कोणत्या वेव्हारे लाभहानी ।।२।।*

*मंगळदायक करिती कुमारी ।। काय त्याची खरी सोयरीक ।।३।।*
*स्वप्नींचे सुख दु:ख झालें कांहीं ।। जागृतीं तो नाहीं साच भाव ।।४।।*
*सारी झालीं लटिकें वचन ।। बद्ध मुक्त शीण तुका म्हणे ।।५।।*

*रज्जु धरुनियां हातीं । भेडसाविलीं नेणतीं ।।*
*कळो येता चितीं । दोरी दोघां सारिखी ।।१।।*
*तुम्हां आम्हांमध्यें हरी । जाली होती तैसी परी ।।*
*मृगजळाच्या पुरी । ठाव पाहों तारावया ।।२।।*
*सरी चिताक भोंवरी । अळंकाराचिया परी ।।*
*नामें जाली दुरी । एक सोनें आटितां ।।३।।*
*पिसांची पारवीं । करोनि बाजागिरी दावी ।।*
*तुका म्हणे तेवीं । मज नको चालवूं ।।४।।*

*गंधर्वनगरी क्षण एक रहावे ।। तेंचि पैं करावे मूळ क्षेत्र ।।१।।*
*खपुष्पाची पूजा बांधोनि निर्गुणा ।। लक्ष्मीनारायणा तोषवावें ।।२।।*
*वंध्यापुत्राच्या लग्नाचा सोहळा ।। आपुलिया डोळां पाहों वेगीं ।।३।।*
*मृगजळ पोही घालुनि सज्ञाना ।। आपलिया जना निववावें ।।४।।*
*तुका म्हणे मिथ्या देहेंद्रियकर्म ।। ब्रह्मार्पण ब्रह्म होय बापा ।।५।।*

वेदांतवाद्यांचा प्रसिद्ध मायावाद पुढील अभंगात सांगितला आहे.

*मायेसी पाहुनी लुब्धलेसे प्राणी ।। नेणतीच कोणी हरीलागी ।।१।।*
*मायेचा व्यापार झालासे बहुत ।। तेथें आत्मज्योत कोण जाणे ।।२।।*
*मायेने वेष्टिलें अवघें जगत्र ।। तेथें तो विचार काय सुचे ।।३।।*
*तुका म्हणे आम्हीं मायेसी पाहून ।। परब्रह्म जाण ओळखिलें ।।४।।*

*ओंकाराचे पूर्वी निघालें जें फळ ।। ओतलें सकळ मात्रारूप ।।१।।*
*ओविले वो मणी सूत्र मणी गणी ।। ओंकाररूपिणी माया होय ।।२।।*
*वारेल हे माया वाग याचा वदा ।। घ्यावे या गोविंदा एका भावें ।।३।।*
*वेदांचिये बीज ओंकाराचे निज ।। तुका म्हणे जत्र आवडलें ।।४।।*

ही व अशीच दुसरी शेकडो वेदांतपर वचने तुकारामाच्या उपलब्ध गाथात आढळतात. त्यावरून तो वेदांती होता हे सिद्ध होते. आता तो विठ्ठलभक्त होता याचे बीज त्याच्याच वचनात जागजागी प्रकट झाले आहे. उदाहरणार्थ पुढील वचन पाहा: –

*उत्तम चांडाळ नर नारी बाळ ।। अवघेचि सकळ चतुर्भुज ।।१।।*
*अवघा विठ्ठल तेथे दुजा नाही ।। भरला अंतर्बाही सदोदित ।।२।।*

याप्रमाणे वेदांतमत तुकारामाच्या ठायी पूर्णपणे बाणल्यामुळे त्याची पुढीलप्रमाणे वृत्ती झाली होती:-

*विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म ।। भेदाभेद भ्रम अमंगळ ।।१।।*
*आइकाजी तुम्ही भक्त भागवत ।। कराल तें हित सत्य करा ।।२।।*
*कोणाही जिवाचा न घडो मत्सर ।। वर्म सर्वेश्वरपूजनाचें ।।३।।*
*तुका म्हणे एका देहाचे अवयव ।। सुख दुःख जीव भोग पावे ।।४।।*

तुकाराम वेदांतवादी होता म्हणावे, तर तो देहावसान होईपर्यंत पंढरीची वारी करीत असे हे कसे? असा कोणी प्रश्न केल्यास त्याला त्याच्या पुढील अभंगात उत्तर आहे:-

*काया हे पंढरी प्रेम पुंडलीक । सत्रावी सन्मुख चंद्रभागा ।।१।।*
*परा तेची वीट आत्मा पंढरीनाथ ।। जेथें पाहिजे तेथे ठसावला ।।२।।*
*शांति क्षमा दोन्ही राई रुकमिणी ।। दोही भागी दोन्ही विराजती ।।३।।*
*विवेक वैराग्य गरुड हनुमंत ।। जोडोनियां हात तिष्ठताती ।।४।।*
*तुका म्हणे आम्ही पंढरी देखिली ।। गाठी हे सुटली चौदेहांची ।।५।।*

*औट हातांची पंढरी ।। बरवी साधिली साजिरी ।।१।।*
*स्थूळ सूक्ष्म कारण ।। चौथें जाण महाकारण ।।२।।*
*अंती कारणाची शोभा ।। मध्यें उन्मनीची प्रभा ।।३।।*
*तुका म्हणे धरा भाव ।। तुमचा तुम्हापाशी देव ।।४।।*

याप्रमाणे त्याची वृत्ती झाली होती. तरी तो भक्तिमार्गच अत्यंत हितकार मानीत असे. या प्रकरणी त्याचे पुढील अभंग पाहा:-

*मोक्षाचें आम्हासी नाहीं अवघड ।। तो असे उघड गांठोडीस ।।१।।*
*भक्तीचे सोहळे होतील जीवासी ।। नवल ते विशीं पुरवितां ।।२।।*
*ज्यांचें त्यासी देणे कोणतें उचित ।। मानूनियां हित घेतों सुख ।।३।।*
*तुका म्हणे सुखे देईं संवसार ।। आवडीसी थार करीं माझे ।।४।।*

*कासयासी व्हावे जीतांचि मुक्त ।। सांडुनिया शीत प्रेम सुख ।।१।।*
*वैष्णवांचा दास झाला नारायण ।। काय त्या मिळोन असे काम ।।२।।*
*काय त्या गाठींचे पडले सुटोन ।। उगेचि बैसोन धीर धरूं ।।३।।*
*सुख आम्हांसाठीं केलें हें निर्माण ।। निर्दैव तो कोण हाणे लाता ।।४।।*
*तुका म्हणे मज नलगे सायुज्यता ।। राहेन या संतां समागमें ।।५।।*

*आत्मस्थिति मज नको हा विचार ।। देईं निरंतर पादसेवा ।।१।।*
*जन्मोजन्मी तुझा दास मेघःश्यामा ।। हाचि गोड प्रेमा देईं देवा ।।२।।*
*काय सायोज्यता मुक्ति हाचि गोड ।। देव भक्त कोड तेथें नाही ।।३।।*
*काय तें निर्गुण पाहों वेश्येपरी ।। वर्णूं तुझी थोरी किती कैसी ।।४।।*
*गोड पादसेवा देवभक्तपण ।। मज देवा जाण दुराविसी ।।५।।*
*जाणत्यापासूनि सांडावें त्या जीवा ।। निरंतर सेवा देईं पाद ।।६।।*
*तुका म्हणे गोड नेघे प्रीतिकर ।। प्रेम तेंहि गार सेवा हेर ।।७।।*

येथवर तुकारामाच्या मताविषयी संक्षेपतः निरूपण केले. वर जी त्याची मते दर्शविली आहेत, त्याशिवाय दुसरी आणखी पुष्कळ मते येथे नमूद करण्यासारखी आहेत; परंतु त्या सर्वांचा उल्लेख करू लागल्यास प्रकृत प्रकरणाची व एकंदर ग्रंथाचीही इयत्ता फारच वाढवावी लागेल. यासाठी तसे करण्याच्या भरीस न पडता त्याच्या मताविषयी यथार्थ ज्ञान ज्याला हवे असेल त्याने ते त्याच्या गाथा वाचून यथावकाश करून घ्यावे इतके सांगून हे प्रकरण आटपतो.

●●●

# उपसंहार

*भगवद्भक्ति कराया बहु जड जीवांसि जो तुका शिकवी ।।*
*याच्या दुसरा धरणीवरि येइल कोण हो तुकासि कवी ।।१।। मोरोपंत.*

याप्रमाणे या महासाधुपुरुषाच्या चरित्राच्या एकंदर भागाचे निरूपण केले. यातील काही भाग अपुरे आहेत; परंतु त्याला उपाय नाही. आमच्या देशामध्ये खरा विश्वसनीय असा व्यक्तीविषयक किंवा राष्ट्रविषयक इतिहास लिहून ठेवण्याची पद्धती पुरातनकाळी फारशी नसल्यामुळे आमच्या देशात पूर्वकाळी होऊन गेलेल्या महापुरुषांचे जीवनवृत्त कळण्याची सोय आधुनिक काळी म्हणण्यासारखी मुळीच नाही. ज्या कित्येक महात्म्यांचे कीर्तितेज सर्वत्र फाकून त्याची वाखाणणी सर्वतोमुख झाली, त्यांच्या संबंधाने पितृपुत्रपरंपरेने दंतकथा चालू राहिल्या. या दंतकथांच्या व लोकप्रवादांच्या आधारावर कित्येक कवींनी चरित्ररूप कवने केली. या कवनांचा आधार खरे ऐतिहासिक चरित्र लिहिणारास फारच बेताने घ्यावा लागतो. आमच्या चरित्रनायकाच्या जीवनवृत्ता-संबंधाचीही स्थिती बहुतेक अशीच आहे. तरी आम्हाला जेवढी विश्वसनीय माहिती सापडली तेवढी प्रस्तुत पुस्तकात ग्रंथित केली आहे.

जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति ।। देह कष्टविती उपकारें ।। या स्वोक्तीप्रमाणे या महात्म्याने आपले वर्तन शेवटपर्यंत एकसारखे ठेविले. आपणास जो मोक्षमार्ग सत्य वाटला, त्याचा उपदेश आपल्या बांधवास करून त्यास सन्मार्गवर्ती करण्याविषयी त्याने आमरण परिश्रम केले. स्वत:चे आचरण सर्वदा परमशुद्ध ठेवून इतर जनांच्या ठायी सदाचार व सद्भाव यांचे बीजारोपण व उन्नती करण्यास झटणे हे आपले परम कर्तव्य आहे, असे त्यास वाटत असल्यामुळे त्याने संसारात राहून स्वशक्यतेनुसार उद्योग केला. एखाद्या बैराग्यासारखा संसारादिकांचा व्याप सोडून फटिंग होऊन कोठेतरी तीर्थाच्या वगैरे ठिकाणी स्वस्थ पडून राहण्याचे त्याने कदापि मनात आणले नाही. प्रारंभी एक दोन वेळा त्याची अशी वृत्ती झाली होती; परंतु ती कधीही कायम राहिली नाही. हे समग्र महाराष्ट्राचे मोठेच भाग्य समजावयाचे. तो पुरा बैरागी बनून आपल्या भावासारखा कोठे तरी निघून गेला असता, तर त्याची सद्बोधप्रचुर प्रासादिक कविता आम्हा महाराष्ट्रीयास प्राप्त झाली नसती. तुकारामाचे देहावसान होऊन आज जवळ

जवळ अडीचशे वर्षे लोटली आहेत. तरी तो आपल्या अभंगवाणीच्या रूपाने अमर झाला आहे. त्याचा खऱ्या कळवळ्याचा अमृतरसोपम सद्‌बोध वाचून किंवा ऐकून आजपर्यंत लक्षावधी लोकांची आध्यात्मिक उन्नती झाली आहे आणि यापुढे ती अशीच होत राहील, यात संशय नाही. सद्भाव, सदाचार, निरंहकारता, परोपकारबुद्धी, विनय, मनोनिग्रह इत्यादी ज्या उज्ज्वल सद्‌वृत्ती त्यांचा पूर्ण विकास झालेला ज्यास पाहणे असेल, त्यांना या तुकारामासारख्या अत्यंत विरल महात्म्याच्याच ठायी आढळतील. असा हा जगदुदाहरक अद्वितीय साधू आमच्या या महाराष्ट्रात निर्माण झाल्याबद्दल आम्हास मोठा अभिमान वाटला पाहिजे आणि त्याचा चरित्रमहिमा समजावून घेण्याची उत्कंठा सर्वांस लागली पाहिजे.

●●●

वाय ६५४–११०५ पु.–५.२०१९

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर